# ई-अभिव्यक्ती (मराठी) – दिवाळी अंक – 2025




www.e-abhivyakti.com

।। श्री स्वामी समर्थ ।।

## ई-अभिव्यक्ती (मराठी) — दीपावली विशेषांक सन २०२५



# आली दिवाळी...

*

घरोघरी दरवळे... फराळाचा मिश्र वास
कडू गोड आठवांची.. शोभे दिवाळी आरास..

*

येता दिवाळी दारात ज्योत स्नेहाची जागवू
स्वार्थ सारा मनातला.. वातीसम जीवे जाळू...

*

मनी तोरण मानाचे.. दान विचारांचे देऊ.
वासनेच्या असुराला.. नरकाची वाट दावू ...

*

मनातल्या आनंदाचे रंग रांगोळीत घेऊ
आदराची मांदियाळी स्वागताला ओठी ठेवू...

*

दीपज्योती स्नेह - मैत्री.. काय वर्णू त्याचे मोल
स्नेह-मैत्री जागवूया.. घ्यावा संदेश अमोल...

*

अशी दिवाळी आरास.. तन मन प्रक्षाळते
पाडव्याला औक्षणात.. नेत्रज्योत तेजाळते...

*

सण भाऊबीज खास.. माया ममतेची बोली
ओवाळते भाऊराया.. भगिनीची हृद्य झोळी...

*

आली दिवाळी दिवाळी.. स्नेहज्योत तेजाळली
जाळू स्वभावाचे दोष.. गळाभेट गंधाळली...

*

*कवी : कविराज विजय यशवंत सातपुते, पुणे*





# संपादकीय

**प्रिय वाचकहो**,

घड्याळाचे काटे एक एक ठोका मारत सतत पुढे जातात आणि त्याबरोबर एक एक दिवस मागे पडत जातो. असं करत बारा महिने केव्हा संपतात समजतही नाही आणि बघता बघता पुन्हा एकदा दिवाळी येऊन ठेपते... ... दिवाळी शब्द उच्चारताच लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांच्या मनात उत्साह संचारतो. डोळ्यासमोर दीपांच्या मालिका दिसू लागतात. आनंदाचे वारे वाहू लागतात. हवाही आल्हाददायक होते. प्रकाशाची गाणी ऐकू येतात. अभ्यंगाचा गंध जाणवू लागतो. कपड्यांचे रंग आकर्षित करतात. नाकात खमंग वास भरुन राहतात. खरंच, दिवाळीचा सण म्हणजे काही काळ तरी दु:खाला विसरुन आनंदात वाहून जाण्याचा सण. सुगीची समृद्धी आणि सकारात्मक वृत्ती आपलीशी करण्याचा सण. अवसेच्या रातीला लक्ष लक्ष दीपांनी उजळवून टाकणारा सण. मनं मोकळी करुन खुल्या दिलानं एकमेकांना भेटण्याचा सण.

अशा जल्लोषी वातावरणातही भाऊबीज, पाडवा यांसारखे दिवस बंधनांची आठवण करून देतात. वास्तवाची जाणीव करुन देतात. रुढी, परंपरा आणि आधुनिकता यांचा मेळ घालून पुढे जात असताना आपल्या कुटुंबाबरोबरच समाजरुपी कुटुंबही आपल्याबरोबर आहे हे मात्र प्रत्येकाने आवर्जून लक्षात ठेवायला हवं. 'अवघे विश्वची माझे घर ' अशी शिकवण देणा-या संतांच्या भूमीत आपण आहोत याचे भान ठेवायलाच हवे.

लोकशाही देशात राजकारण आणि समाजकारण एकमेकांपासून दूर करता येत नाहीत. त्यामुळे आपली जबाबदारी अधिक वाढते हे लक्षात ठेवले पाहिजे. सामाजिक माध्यमांचा वापर जबाबदारीने करणे, सामाजिक स्वास्थ्य बिघडू न देणे हे आपले कर्तव्यच आहे. तरच प्रत्येक दिवाळी मनापासून आणि आनंदाने साजरी करता येईल. कृत्रिम बुद्धिमत्ता, विज्ञान, तंत्रज्ञान ही साधनं मानवी विकासासाठी वापरायची की विनाशासाठी याचे सतत भान असणे अत्यंत आवश्यक आहे. माणसाची बुद्धी संकटे निर्माण करण्यासाठी नाही, तर संकटांशी सामना करण्यासाठी वापरली गेली पाहिजे. नैसर्गिक आपत्तींशी सामना करुन पुढे जाणा-यांना हात देणे, दहशतवादास एकत्रितपणे विरोध करणे, अफवा न पसरवणे, सामाजिक सुव्यवस्था राखणे, यासारख्या बाबींचा विसर पडू न देणे हे अत्यंत गरजेचे आहे. दुर्दैवाने पेहलगामसारख्या अतिरेकी घटना घडत आहेत. पण एकीकडे याच वर्षी आपल्या सहका-यांसमवेत शुभांश शुक्ला या भारतीय अवकाशवीराने अंतराळात झेप घेतलेली आहे. सुखदु:खानी मिश्रित अशा या वास्तवाचे भान असेल तरच भविष्यकाळ उज्ज्वल होईल हे विसरुन चालणार नाही.

*आशा नाम मनुष्याणां काचिदाश्चर्यशृंखला*
*यया बद्धा प्रधावन्ती, मुक्तः तिष्ठती पंगुवत् ।।*

– – असे एक सुवचन आहे. माणूस आशेवरच जगत असतो. स्वप्न पाहणे व ते पूर्ण करण्यासाठी धडपडणे हा माणसाचा स्थायीभाव आहे. आणि ही धडपड चालू आहे, म्हणूनच आपल्या आयुष्यात जिवंतपणा आहे. पण स्वप्ने फक्त स्वत:पुरती न बघता समाजाला, देशाला समृद्ध करणारीही बघायला हवीत याची जाण या दिवाळीच्या निमित्ताने सर्वांनी आवर्जून मनात जागवायला हवी. आपली अशी सगळी स्वप्ने पूर्ण होवोत.

हे सर्व करत असतानाच आपल्याला मिळालेला सांस्कृतिक वारसा जतन करुन तो वृद्धींगत करणे हेही आपले महत्वाचे कर्तव्य आहे. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला त्याला आता एक वर्ष झालं. पण हजारो वर्षे अस्तित्वात असलेली ही भाषा समृद्ध करण्यासाठी 'मी काय केले' याचा विचार प्रत्येक मराठी माणसाने करायला हवा. मराठी भाषा 'ज्ञानभाषा' व्हावी म्हणून आपण किती आग्रही आहोत? प्रत्येक मराठी माणसाने आपल्या मनात मराठीविषयी असलेला न्यूनगंड काढून टाकला तरच मराठीचा प्रसार होणार आहे.. मराठी भाषा अधिकाधिक समृद्ध होणार आहे. देवनागरी लिपीत मजकूर लिहिणे मला का जमत नाही याची खंत प्रत्येकाला वाटावी. त्याच वेळेला अन्य भाषा-भगिनींना आपलेसे करुन बहुभाषिक होण्याचा प्रयत्न जरूर असावा. स्वत: वाचन केले तरच आपण वाचन संस्कृती बळकट करु शकू. त्यामुळे भरपूर वाचावे.

मराठी साहित्य अन्य भाषांत अनुवादित झाल्यानेही मराठी भाषा समृद्ध होणार आहे.

मराठी संस्कृतीचे वैशिष्ट्यपूर्ण वैभव जपण्यात आणि जोपासण्यात दिवाळी अंक मोलाची भूमिका बजावतात. दिवाळीतील फराळाबरोबरच दिवाळी अंकातील बौद्धिक आहाराशिवाय मराठी माणसाची दिवाळी साजरी होत नाही. आणि हे भाग्य फक्त मराठी भाषेलाच लाभले आहे. आणि म्हणूनच या वर्षीचा ई-अभिव्यक्तीचा हा दिवाळी अंक आपल्या हाती देताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे.

विज्ञानवादी लेखन करणारे थोर शास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर, अत्यंत वेगळ्या विषयावरील लेखन करणारे अरण्यऋषी मारुती चितमपल्ली, असे विचारवंत लेखक नुकतेच आपल्यातून गेले आहेत. त्यांना अभिव्यक्ती परिवाराकडून आदरपूर्वक श्रद्धांजली.

अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे पडघम वाजू लागले आहेत. या संमेलनाचे नियोजित अध्यक्ष श्री. विश्वास पाटील यांना व साहित्य संमेलनाला या दिवाळी अंकाच्या माध्यमातून ई अभिव्यक्ती मराठी परिवाराकडून हार्दिक शुभेच्छा!!

'तमसो मा ज्योतिर्गमय' अशी प्रेमळ भावना मनामनात रुजवू पाहणाऱ्या या दीपावलीनिमित्त सर्व रसिक वाचकांना व साहित्यिकांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा!

आपल्या साहित्य कलाकृती आम्हाला पाठवून या अंकाला समृद्ध करणारे आमचे सगळे साहित्यिक व साहित्यिका, तसेच अत्यंत आकर्षक आणि समर्पक मुखपृष्ठ करुन देणा-या डॉ. भारती माटे आणि चित्रकार/ लेखक श्री संदीप राशिनकर यांचे आम्ही मन:पूर्वक आभारी आहोत.

आपल्या सर्वांगीण विकासाची मनोकामना.

**(हेमंत बावनकर)**
प्रधान संपादक

## * अंतरंग *


1. कविता – दीपावली - कवयित्री सौ. प्रभा सोनवणे ........ 8

2. लेख - आनंदाचे दीप... – सौ. अमृता देशपांडे ........ 9

3. कथा - माझं थोडं चुकलंच...! – श्री अरविंद लिमये ........ 12

4. कथा - कर्तव्यपूर्ती... –डॉ. मधुवंती कुलकर्णी ........ 18

5. लेख - शब्द... सुश्री दीप्ती कुलकर्णी........ 23

6. क्षण सृजनाचे – शापित फूल...श्री सुहास सोहोनी ........ 25

7. कथा - क्षणभर विश्रांती... - सुश्री राधिका भांडारकर........ 27

8. विज्ञान कथा - ओम आणि कुरी — सौ. मुग्धा कानिटकर ........ 31

9. लेख - मैत्री - एक अनमोल अनुभूती - डॉ. मीना श्रीवास्तव ........ 35

10. कविता - सृष्टीची प्रीत! – सौ. मंजिरी येडूरकर........ 39

11. कविता - मी कुठे बंदिस्त झालो... - श्री विष्णू सोळंके ........ 40

12. लेख - पाऊस– कवींच्या मनातला... सुश्री संगीता कुलकर्णी ........ 41

13. कथा - तीर्थस्वरूप बाबा... – सौ. उज्ज्वला केळकर ........ 46

14. लेख - आयते दाणे, आळशी पंख.. – श्री जगदीश काबरे ........ 50

15. काव्यानंद – “जोगीण” – कवी कुसुमाग्रज – सुश्री ज्योती कुळकर्णी ........ 56

16. लेख– “अबोल विश्वाचं बोलकं दर्शन” – सुश्री शालिनी जोशी........ 59

17. कथा – “घरवापसी” – सुश्री गौरी गाडेकर ........ 62

18. कथा – आनंदाचे घर... – डॉ. माधुरी जोशी........ 68

19. चित्रकाव्य - “ओळख स्वतःची...” अपर्णा माधव परांजपे........ 70

20. कथा -“ तू तेव्हा तशी... – सुश्री नीलांबरी शिर्के ........ 71

21. लेख - ज्येष्ठत्वाकडून श्रेष्ठत्वाकडे – सुश्री मनिषा आवेकर ........ 72

22. लेख - उत्साह… – श्री कौस्तुभ परांजपे ..... 75

23. कविता - कधी… श्री राजकुमार दत्तात्रय कवठेकर ..... 77

24. कविता - विचारणा… – सौ. अर्चना गादीकर निकारंगे ..... 78

25. कथा - आक्रित… - सुश्री स्वप्नजा घाटगे ..... 79

26. कथा - चुळा भरूया आणि निरोगी राहूया… - श्री सुधीर करंदीकर ..... 82

27. प्रतिमेच्या पलिकडले - रम्य ते बालपण - श्री नंदकुमार इंदिरा पंडित वडेर ..... 86

28. लेख - रामावधारणा… श्री सुनील देशपांडे ..... 88

29. कविता - पाऊस – श्री शरद कुलकर्णी ..... 91

30. चित्रकाव्य - वृद्धांप्रति… - डॉ. सोनिया कस्तुरे ..... 92

31. ललित - माझ्यातली मी घडताना … - सुश्री ज्योत्स्ना तानवडे ..... 93

32. कथा - शांताबाई — सौ.दीपा पुजारी ..... 96

33. लेख - भावगीत - डॉ. निशिकांत श्रोत्री ..... 99

34. आलेख - “सरस्वती” – सुश्री कुंदा कुलकर्णी ..... 103

35. पुस्तकावर बोलू काही - प्रश्नसूक्त सनातन – परिचय - सुश्री तृप्ती कुलकर्णी ..... 105

36. काव्यानंद - कंठात दिशांचे हार… रसग्रहण - सुश्री नीलिमा खरे ..... 115

37. लेख - शेक्सपिअरचे स्ट्रॅटफोर्ड… – श्री मोहन निमोणकर ..... 119

38. कथा - उशीर… डॉ. ज्योती गोडबोले ..... 121

39. ललित - नाते सासू-सुनेचे… – सुश्री अरुणा मुल्हेरकर ..... 127

40. लेख - बकुळ… - श्री मुबारक उमराणी ..... 129

41. लेख - शरदागमनी काव्यदीपोत्सव - सौ. रेणुका धनंजय मार्डीकर ..... 135

42. कविता - कल्पना – श्री अनिल वामोरकर ..... 140

43. कविता - आदिशक्ती — श्रीमती अनिता जयंत खाडीलकर ..... 141

44. कथा – आठवणींच्या हिंदोळ्यावर... – श्री उद्धव भयवाळ .............................................. 142

45. कथा – वाटणी... - सौ. उज्वला सुहास सहस्त्रबुद्धे............................................................ 146

46. लेख - आई ही आईच असते - डॉ. धनंजय देशपांडे ..................................................... 151

47. लेख - पिढ्या साधणारे संवादी पूल - प्रा. बी. एन. चौधरी............................................. 155

48. कथा - शबरीची भाकरी - श्री आनंदहरी ........................................................................ 159

49. कथा - कथा 'त्या' सम्राटाची... - सौ पुष्पा नंदकुमार प्रभुदेसाई...................................... 164

50. कविता - सूर्य नारायणा... - प्रा. सौ. सुमती पवार.......................................................... 167

51. चित्रकाव्य - गंधित समीर चैतन्याचा... – श्री आशिष बिवलकर.......................................... 168

52. लेख - भारतीय प्रजासत्ताकाची ७५ वर्षे — सुश्री मंजुषा सुनीत मुळे ............................. 169

53. लेख - पत्री... - श्री संदीप रामचंद्र सुंकले (दास चैतन्य) ............................................... 174

54. कविता – कला... — सुश्री सुनीता जोशी........................................................................ 176

55. कथा - औषध... सुश्री अर्चना देशपांडे ......................................................................... 177

56. कथा - मायेची सावली ... - डॉ. शैलजा करोडे................................................................ 181

57. ललित - ती सोफिया नव्हती...” —प्रा.डॉ.सतीश शिरसाठ ............................................. 185

58. पुस्तकावर बोलू काही - भन्नाट माणसं - ११ पुस्तकांचा संच - परिचय – श्री हर्षल सुरेश भानुशाली........................................................................................................................ 187

59. कविता – कृष्णमर्म — सुश्री प्राची जोशी........................................................................ 193

60. कविता - बारा मास.. बारा गाणी ... – श्री सुहास रघुनाथ पंडित...................................... 194

61. कथा - जिंदगी के साथ भी... जिंदगी के बाद भी!! – श्री संभाजी बबन गायके ................. 195

62. कथा – लकवर्धन — सुश्री स्नेहल अखिला अन्वित.......................................................... 199

63. कथा – शॉपिंग फेस्टिव्हल – श्री कौस्तुभ केळकर नगरवाला.......................................... 202

64. कथा – व्यवहार — सुश्री नीता कुलकर्णी......................................................................... 204

65. चित्रकाव्य – प्रेमाचे झाड — सुश्री वर्षा बालगोपाल ........ 207

66. कविता - ओढ माहेराची... - सौ. शुभदा भास्कर कुलकर्णी (विभावरी) ........ 208

67. ललित – गरज आणि फायदा नियम - सुश्री संध्या बेडेकर ........ 209

68. ललित - मॅडम मला सिरीयल करायची...! - श्री शीला पतकी ........ 212

69. कथा – प्रकाशवाटा — सौ. वंदना अशोक हुळबत्ते ........ 215

70. कथा – इभ्रत — श्री सुभाष धारणकर ........ 217

71. कथा – भुतांनी उडवली भंबेरी — सुश्री त्रिशला शहा ........ 220

72. कविता – ठेच —श्री नितीन सुभाष चंदनशिवे ........ 222

73. कविता – विसर्जन — सुश्री संजीवनी कुलकर्णी ........ 223

74. कथा - अपराजिता... – श्री भरत खैरकर ........ 224

75. ललित – बालपणीचे आनंद — सौ. मुक्ता महेश अभ्यंकर ........ 227

76. कथा – "नाव का बदललं?" — श्री मंगेश मधुकर ........ 229

77. कथा – ए आय बाबा की जय! - श्री मकरंद पिंपुटकर ........ 232

78. पुस्तकावर बोलू काही – GONE WITH THE WIND — सुश्री साधना प्रफुल्ल सराफ ........ 236

79. कविता – बाजार नाही — सुश्री सुनंदा पाटील (गझलनंदा) ........ 241

80. कथा – सौदा – श्री सदानंद आंबेकर ........ 242

81. कविता – पाळ तोच वारसा — श्री अशोक श्रीपाद भांबुरे ........ 243

82. कविता – दिव्या दिव्यांचा प्रकाश पडला — सौ. किरण ढवळे बावनकर ........ 244

83. कविता – फराळ..! - श्री सुजित कदम ........ 245

1. कविता – दीपावली - कवयित्री सौ. प्रभा सोनवणे



दिवाळी दरवर्षीच येते,

सजते दारात रांगोळी,

तोरणही लागते घराला!

दिवाळी तशीच असते,

बदलतो आपण---

सोयीनुसार साजरे करतो, सण!

लहानपणची दिवाळी,

होती किती छान,

मोती साबण, उटणं, अभ्यंग स्नान,

आजी, आई, काकींनी केलेलं

आयतं फराळाचं पान!

किशोरावस्थेत--

अप्रुप नटण्या मुरडण्याचं,

काजळ, पावडर, बांगड्या,

आणि नवीन स्कर्ट ब्लाऊजचं!

.. आणि त्याकाळात,

पोस्टानं येणाऱ्या असंख्य भेटकार्डांचंही!

सासरी आल्यावरची,

स्वतःच करंजी चकली... पदार्थ करण्याची,

"आमच्यात बायकांना, कामं असतात दिवाळीत" म्हणण्याची,

सारं हसून साजरं करण्याची!



आता साठीनंतरची दिवाळी,

शांत निवांत,

दोघांनी एकांत बेटावर जाऊन

साजरी करावीशी वाटणारी,

आकाश कंदील आणि पणत्यांच्या

उजेडात उजळून निघणारी

सोज्वळ, सात्विक, दीपावली!!

सुश्री प्रभा सोनवणे, "सोनवणे हाऊस", ३४८ सोमवार पेठ, पंधरा ऑगस्ट चौक, विश्वेश्वर बँकेसमोर, पुणे 411011 मोबाईल-९२७०७२९५०३, email- sonawane.prabha@gmail.com

## 2. लेख - आनंदाचे दीप... – सौ. अमृता देशपांडे



पंधरा ऑगस्ट, स्वातंत्र्य दिन... ऑफिसमध्ये ध्वजारोहणासाठी जायचे होते. पांढरा शुभ्र ड्रेस आणि केशरी दुपट्टा घेऊन मी गाडी काढली. वाटेवर सिग्नलला गाडी बराच वेळ थांबवावी लागली. अन् लक्ष गेलं... फुटपाथच्या मागच्या बाजूला एक काठी जमिनीत रोवून केशरी पांढऱ्या हिरव्या रंगांची बिस्कीटाच्या पुड्यांची कव्हरे व्यवस्थित चिकटवून तिरंगा झेंडा केला होता. मी गाडी बाजूला पार्क केली आणि त्यांच्याकडे गेले. सात आठ मुलं, अगदी एक वर्षापासून आठ वर्षापर्यंतची.. जवळपासच्या बांधकाम मजूरांची मुले होती ती. कुणाच्या अंगावर फक्त चड्डीच, तर कुणी बनियन चड्डीत, दोन मुली फ्रा‍ॅकमध्ये, एकीच्या कडेवरचं बाळ झबल्यातलं. जमिनीवर काठीच्या भोवती आजूबाजूच्या पानांची गोल रांगोळी काढली होती. प्रत्येकाच्या तोंडावर निरागस आणि खुलं हसू.... मी त्यांच्या कार्यक्रमात सामील झाले. एका रांगेत उभे राहून 'जन गण मन 'राष्ट्रगीत म्हटले. हो! सर्वांना पाठ होतं. सुरेल आवाजात, लयीत आणि ठेक्यात म्हटले. भारत माताकी जय, वंदे मातरम् हा जयघोषही केला. मी ऑफिसमध्ये द्यायला बिस्कीटचे पुडे घेतले होते ते त्यांना दिले. त्या मुलांच्या चेहऱ्यावरचा आनंद मनावर कायमचा कोरला गेला.

लहानपणी शिवशाहीर श्री ब. मो. पुरंदरे यांची छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरित्रावरची कथने महाराष्ट्रात दुमदुमत होती. रोज रात्री नऊ वाजता सर्वांची पावले मैदानाकडे चालू लागत. व्याख्यान सुरू होताच मंत्रमुग्ध होऊन श्रोते जीवाचे कान करून ऐकत. त्यांची व्याख्याने श्रवणीय होतीच.. प्रेक्षणीयही होती. डोळ्याची पापणी लवली तरी काहीतरी निसटेल, अशा भावनेने श्रोते एकाग्र होऊन समरस होत असत. प्रचंड मैदान तुडुंब भरलेलं, तितकेच लोक किंबहुना जास्तच, मैदानाबाहेर उभे. पण आवाज एकच... खणखणीत वक्तृत्व शिवशाहीर पुरंदरेंचं.

– – शेवटचा दहावा दिवस. छत्रपतींचा राज्याभिषेक!

स्टेजवर राज्याभिषेकाचा सेट लावला होता. प्रेक्षक श्वास धरून, जीवाचे कान करून ऐकत होते, डोळ्यांनी अनुभवत होते. काशीहून आलेल्या गागाभट्टानी मंत्रोच्चाराने सप्तसागर, सप्तसरितांचा पवित्र जलाभिषेक केला. राजवस्त्रे, जिरेटोप लेवून राजे सिंहासनाजवळ गेले. त्यांनी सिंहासनाला मुजरा केला. पाय न लावता आरूढ झाले.

शिंग- तुताऱ्या निनादल्या. चौघडे ताशांचा गजर झाला. 32 मण वजनाचे सिंहासन रोमांचित झाले. दणदणीत आवाजात घोषणा झाली – – –

"गडपती, गजअश्वपती, भूपती, प्रजापती, सुवर्णरत्न श्रीपती, अष्टावधान जागृत, अष्टप्रधान वेष्टित, न्यायालंकार मंडित, शस्त्रास्त्र शास्त्र पारंगत, राजनीती धुरंधर, प्रौढप्रताप पुरंदर, क्षत्रिय कुलावतंस, सिंहासनाधीश्वर, महाराजाधिराज, राजाशिवछत्रपती महाराज की जय! "

जमलेल्या हज्जारोंनी जयजयकार केला. प्रत्येकाची छाती अभिमानाने भरून आली होती. जयजयकाराने अवघे मैदान दणाणून गेले होते. अभिमान, आणि आनंद यांनी सर्वांचेच ऊर भरून गेले होते. सगळीकडे आनंदीआनंद! अजूनही त्या आठवणीतही मन परत परत आनंदी होते... सामूहिक प्रार्थनेचे फळ जसे सर्वांना मिळते, तसेच सामूहिक आनंदही हजारपटीने गुणीत होतो, याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे ही शिवचरित्र व्याख्याने!

मुलांचे शैक्षणिक पायऱ्यांवरचे दैदिप्यमान यश हे मातापित्यांच्या जीवनातले एक आनंदपर्वच असते. खेळातले सामने, दरवर्षीच्या परीक्षा, वक्तृत्व स्पर्धा, यात तन मन लावून भाग घेणे आणि यश संपादन करणे हा एक आनंदसोहळा असतो.

मागच्या वर्षी भारतीय क्रिकेट संघाने विश्वचषक जिंकून जगातल्या प्रत्येक भारतीयाला जो आनंदाचा विश्वचषक दिला तो अविस्मरणीय आणि अनुपमेय होता. तो आपण सर्वांनीच अनुभवला आहे.

घरोघरीचे लग्नसोहळे, वाढदिवस आणि आपले सणवार हेही आनंद स्त्रोतच! एकत्र जमून सोहळा साजरा करताना प्रत्येकाच्या मनातल्या आनंदलहरी एकमेकांना जवळ आणतात. गप्पा, गाणी, गंमत अनुभवत असताना नकळत हा आनंदाचा वारसा आपण तरुण पिढीला आणि लहान मुलांना देत असतो.

...... राग, लोभ, मोह, शत्रुत्व, वैर, मत्सर, हेवा, या इतक्या भावना आणि वृत्ती यांना विरुद्धअर्थी एकच दिव्य शब्द, तो म्हणजे.. " आनंद ".

वर्षभर एकामागून एक असे आपले पारंपारिक सणवार, गुढीपाडव्यापासून रामजन्म, अक्षय तृतीया, श्रावणातला प्रत्येक दिवस, गणेशोत्सव, नवरात्री, घरोघरी आनंदाला उधाण आणणारे. पंधरा ऑगस्ट, सव्वीस जानेवारीसारखे राष्ट्रीय सण धार्मिक सणांच्याच तोडीचे. या दोन सणांचं आणि जिलेबीचं गोड नातं किती वैशिष्ट्यपूर्ण आहे. केशरी जिलेबी ही राष्ट्राबद्दलच्या समर्पण भावनेचं प्रतीकच जणू!

हल्ली आणखी भर म्हणून, आंतरराष्ट्रीय महिला दिन, मदर्स डे, रोज डे, व्हॅलेंटाईन डे, फ्रेंडशिप डे साजरे करताना आनंद अक्षरशः उतू जातो, पण खरं सांगू? अशी आनंदाची देवघेव होते म्हणूनच मने एकमेकांच्या सुखदुःखात एकमेकांना मदतीला धावतात.

दुःखातून सुखाकडे, अपयशातून यशाकडे, हार पत्करून जिंकण्याकडे, अश्रूंचं रुपांतर ओठावरच्या हास्यामध्ये, व्याधीमुक्ततेकडून निरामयतेकडे जाण्याचा एकच मार्ग, तो म्हणजे आनंदाचा.

...आपले दुःख बाजूला ठेवून दुस-याच्या आनंदात सामील होणे हीच ती आनंदाची वाट.

प्रत्येक क्षण सौख्याचा कधीच असू शकत नाही, पण प्रत्येक वेदनेच्या, प्रत्येक कष्टाच्या, प्रत्येक दुःखाच्या नंतर 'तो ' क्षण खुणावीत असतो, तो असतो आनंदाचा क्षण.

.. सर्वत्र आनंदच आनंद भरून राहिलाय. कणाकणात, क्षणाक्षणात आनंद आहे, त्याला शोधणं, जवळ करणं, आपलंसं करणं याची आवश्यकता आहे. प्रत्येकाचा आनंद वेगळा, आनंदाची कारणे वेगळी. परिणाम मात्र एकच....

" निर्मल आनंद ".

आनंदाचे दीपदान एकमेकांना करून आपलेपणाच्या, मैत्रीच्या, प्रेमाच्या, विश्वासाच्या, मदतीच्या दिव्यांनी आपल्या भवतीचे विश्व उजळू या.

"तमसो मा ज्योतिर्गमय " म्हणत दीपपूजन करूया.

आनंद पेरूया. आनंद पसरवूया, आनंद अनुभवूया. कारण......

"आनंदाचे डोही आनंद तरंग "

**सौ. अमृता देशपांडे,** पर्वरी – गोवा मो 9822176170



## ३. कथा - माझं थोडं चुकलंच...! – श्री अरविंद लिमये



कालचा दिवस खरंच अगदी आनंदानं फुलला होता. तोच आनंद सोबत घेऊन आलेली आजची सकाळही तशीच प्रसन्न होती... पण दुपार मात्र एकदम दुर्मुखलीच. कारण संदीपला गव्हर्मेंट इंजिनिअरिंग कॉलेजला ऍडमिशन मिळाली होती, पण त्याच्या अनपेक्षित यशाचा आनंदोत्सव संदीपने स्वतःच उधळून लावला होता! त्या आठवणीनेसुद्धा स्वातीचे डोळे भरून आले.

संदीप चुकलाच होता. चूकही अक्षम्य होती. आठवायचं नाही म्हटलं तरी तो अख्खा प्रसंगच स्वातीच्या मनात पुन्हा पुन्हा तसाच घडत राहिला....

"आई, आत्या न् काकांना फोन करू? "

" कशाला? "

"कशाला काय गं? माझ्या ऍडमिशनचं सेलिब्रेशन. "

"बाबा रविवारी येतील, त्यादिवशी बोलावूया. "

"तेव्हा पुन्हा बोलाव पण उद्या बोलवायचंच. आत्याच्या नाकावर टिच्चून ऍडमिशन मिळवलीय मी. तिच्याकडून ट्रीट उकळतो की नाही बघच तू. "

"संदीऽप, कसली रे ही भाषा? तुझ्याएवढी आहे का आत्या? ”

"नाहीय ना? मग मला वर्षभर टोकत होती ते? तीच नाही, तू सुद्धा. माझं अवांतर वाचन, ट्रेकिंग, खेळ, पोहणं सगळं सुरू ठेवून सुद्धा मी ऍडमिशन मिळवलीय ना? आता आत्याला दाखवूनच देईन.. 'हम भी कुछ कम नही! ' “

"संदीप, ही तुझ्या यशाची पहिली पायरी आहे. यापुढे प्रत्येक पायरीवर तुझी कसोटी असणारय. आत्ताच यश असं डोक्यात जाऊ नको देऊस. एवढा गर्व बरा नव्हे. ऍडमिशन लिस्टमधे तुझा शेवटचा नंबर आहे हे विसरू नकोस. थोडा कमी पडला असतास तर आज कुठं असतास तू? आत्या तुझ्या भल्यासाठीच बोलत होती ना?"

"होय गं बाई. आता झालंय ना मनासारखं? मग ते सेलिब्रेट करूया ना गं. त्या दोघांना जेवायला बोलवायचं म्हणजे बोलवायचं."

त्याही परिस्थितीत त्याच्या बालहट्टाचं स्वातीला हसू आलं होतं. संदीपनं लगेच आत्या न् काकांना फोन केला. आत्याच्या आवडीचं आईस्क्रीम आधीच आणून फ्रिजमधे ठेवलं. स्वातीनं जेवणाचा सुग्रास बेत केला.

संदीपचा उतू जाणारा उत्साह स्वातीला सुखावणाराच होता. वर्षभर त्याला तिने काडीचीही उसंत मिळूच दिली नव्हती. दहावीची पुनरावृत्ती तिला बारावीत नको होती. संदीपला त्याचं सोयरसुतक नव्हतं, पण स्वातीला मात्र

दहावीच्यावेळचा अपेक्षाभंग जिव्हारी झोंबला होता. तिचा नवरा हुशार असूनही घरच्या परिस्थितीमुळे त्याला शिकता आलेलं नव्हतं. घरची गरज म्हणून मॅट्रिकनंतर टेक्निशियनचा कोर्स पूर्ण करून तो कोवळ्या वयात नेव्हीत गेला होता. दुरावलेलं घरपण मनापासून स्वीकारून तो सतत कष्ट करत राहिला होता. पुढे 'एक्स सर्विसमन' म्हणून सध्याचा सिव्हिल जॉब त्याला मिळाला पण ते खूप नंतर. परिस्थितीमुळे तो एकलकोंडा बनला होता. स्वातीने त्याला समजून घेतलं. त्यामुळेच एरवी अबोल असणारा तो स्वातीजवळ मात्र मन मोकळं करायचा. संदीपला खूप शिकवायचं, स्वतःचं इंजिनिअर व्हायचं स्वप्न संदीपला इंजिनियर करून आपण पूर्ण करायचं हे त्याने अनेकदा तिला बोलून दाखवलं होतं. त्यामुळेच आपल्या नवऱ्याचं ते स्वप्न सत्यात उतरवण्यासाठी स्वातीनं जीवाचं रान केलं होतं. पण अलीकडं तिला त्याचंच दडपण येऊ लागलं होतं. ती संदीपला त्यामुळेच सतत टोकत रहायची. कारण संदीपपेक्षाही तिला जास्त काळजी होती ती तिच्या नवऱ्याच्या समाधानाची!

पण टीव्हीवरच्या बातम्या, स्पोर्ट चॅनल, ॲनिमल प्लॅनेट, खेळ, व्यायाम, अवांतर वाचन, ट्रेकिंग, या सगळ्याची संदीपला अभ्यासाइतकीच आवड होती, त्यामुळे दहावीचं वर्ष असूनही अभ्यासाला प्राधान्यक्रमातलं पहिलं स्थान तो देऊ शकत नव्हता. तो हुशार होता. दहावीला मार्क चांगले मिळवले, पण बोर्डाची मेरिट लिस्ट हुकलीच. संदीपचे बाबा त्याच्यावर संतापले.

"बारावीनंतर मेरिटवर ॲडमिशन मिळवलीस तरच इंजिनिअरिंग. भरमसाठ डोनेशन आणि फी मी भरणार नाही. तू एकुलता एक आहेस आणि माझ्याकडे भरपूर पैसे आहेत तरीही नाहीऽऽ" त्यांनी संदीपला बजावलं. संदीपने तेही हसण्यावारी नेलं. संदीपचा हा फाजील आत्मविश्वास स्वातीचं दडपण वाढवत राहिला.

'रिझर्वेशन कोट्यांमुळे ओपनमधल्या मुलांना मर्यादीत जागाच उपलब्ध असतात हे माहित आहे ना याला? तरीही? ' तिला प्रश्न पडायचा.

आणि शेवटी याहीवेळी मेरिट लिस्ट हुकलीच. सीईटीच्या अभ्यासावर पुढे त्याचाही परिणाम झाला. त्याला स्वत:लाही आता ॲडमिशनची खात्री वाटेना. आदल्या रात्री तर तो कमालीचा अस्वस्थ होता. पण त्याच्या परिस्थितीला तो स्वतःच जबाबदार आहे हे स्वाती विसरु शकत नव्हती. त्या रात्री आपले डोळे पुसत तो आईच्या कुशीत शिरला तेव्हा त्याला सावरायला पुढे झालेला आपला हात स्वातीने कठोरपणे मागे घेतला होता!

दुसऱ्या दिवशी ॲडमिशन लिस्ट डिक्लेअर झाली आणि घरातलं वातावरण अनपेक्षित आनंदाने भरून गेलं. यावेळी संदीपला त्याच्या बाबांनी कोवळ्या वयात घरापासून दूर राहून सहन केलेलं एकटेपण मदतीला आलं होतं. एक्स-सर्विसमन्सच्या मुलांसाठीच्या दोन टक्के रिझर्व्ह कोट्यामुळे संदीपला निसटतं कां होईना पण यश मिळालं होतं!

– – आज त्याचंच सेलिब्रेशन होतं.

सुग्रास जेवण, रंगलेल्या गप्पा... आणि अचानक त्या सुखात मिठाचा खडा पडला.

"संदीप, तुझं अगदी मनापासून अभिनंदन. ठरल्याप्रमाणे मी तुला ट्रीट देणार बरं. पण त्या ट्रिटवर तुझा एकट्याचा अधिकार नसेल हे विसरू नकोस. "

"नाही कसा? "

" कारण हे यश शंभर टक्के तुझं एकट्याचं नाहीये म्हणून. "

"एऽ गप एऽऽ. असं का म्हणून? "

"तुझ्या यशात तुझ्याइतकाच तुझ्या बाबाचाही वाटा आहे, म्हणून. "

तो चिडलाच एकदम.

"अभ्यास मीच केला ना? मीच कष्ट घेतले ना? मग? "

"हे सगळ्या मुलांनीच केलंय संदीप. माझा भाऊ तुझ्या इतर मित्रांच्या वडिलांसारखाच सिव्हिल जॉबमधे असता तर तुला मिळाली असती ऍडमिशन? कोवळ्या वयात घरदार सोडून त्यानं नेव्हीतलं आयुष्य स्वीकारलं होतं म्हणून त्याच्या रिझर्वेशन कोट्याचा फायदा तुला मिळाला हे खरं की नाही सांग बरं? "

आत्याच्या प्रत्येक शब्दात स्वतःच्या भावाबद्दलचं कौतुक आणि अभिमान भरून राहिलेला होता पण संदीपला मात्र ते या क्षणी स्वीकारता येत नव्हतं. त्याला ते खूप झोंबलं होतं, मनातलं सगळं उद्वेगाने बोलायचं होतं पण त्यासाठी त्याला शब्दच सापडत नव्हते. ‘ मी माझे सगळे छंद, आवडी सगळं सांभाळून हे यश मिळवलंय याचं सोयरसुतक कुणालाच नाहीये. बाबा असतील मोठे पण म्हणून त्यांच्यासमोर एखाद्या कस्पटाइतका क्षुद्र झालो कां मी? ’... त्याला असंच काहीसं वाटत होतं. तो आतल्याआत खदखदू लागला. तसाच उठला. रागाने थरथरत समोरचं जेवणाचं ताट टेबलवरून भिरकावून दिलंन् आणि तणतणत कसेबसे हात धुवून आपल्या खोलीत गेला आणि आतून कडी लावून स्वतःला बेडवर झोकून दिलंन्.

.... सगळं क्षणार्धात घडून गेलं. सर्वजण हतबुद्ध होऊन पहात राहिले. 'आपण सहज बोलून काय गेलो आणि भलतंच होऊन बसलं' या विचाराने आत्या शरमिंदी झाली होती.

दुःखातिरेकाने आणि संतापाने स्वातीचे डोळे भरून आले. याचाच हट्ट, आग्रह म्हणून पहाटपासून राब राब राबून आपण केलेलं सगळं त्याने असं झिडकारलेलं पाहून तिच्या घशाशी हुंदकाच आला. आत्यालाही कानकोंडं होऊन गेलं.

"वहिनी, तू नको ना त्रास करून घेऊ. मी समजावते त्याला" ती म्हणाली.

"नाहीऽ नकोऽ. अजिबात नको. जेवताना मधेच उठून तुम्हीही अन्नाचा अपमान नका करू. तो गेलाय ना? जाऊ दे. जे तुम्ही बोललात ते खरंतर त्यानं बोलायला हवं होतं. खऱ्याला खरं म्हणायची लाज का वाटावी याला? याचा माज उतरवायलाच हवा. त्याने झिडकारलंय त्या अन्नाच्या एकेक कणाची किंमत मोजायला लावेन मी त्याला. बघाच तुम्ही" तिनं बजावून सांगितलं.

जीवघेण्या शांततेत कसेबसे घास घशाखाली उतरवत सर्वांची जेवणं झाली. मागचं आवरता आवरता अगदी उपचार म्हणून बोलावं तशा जुजबी गप्पा झाल्या न् दोघं जायला निघाली.

".. संदीप आम्ही निघतोय रेऽ.. ये बरं बाळा बाहेर.. " जाताना आत्यानं दाराबाहेरून आवाज दिला पण आतून प्रतिसाद आला नाही.

दोघे गेली आणि स्वातीला हायसं वाटलं. तिला आता एकटं पडून रहावं असं वाटत होतं. तिनं पाठ टेकली आणि मघापासून प्रयत्नपूर्वक घातलेला बांध आत्ता फुटेल आणि आपण मनसोक्त रडून घेऊ असं तिला मनापासून वाटलं खरं पण तिला रडूच येईना. घुसमट अधिकच वाढली.. आणि.. अचानक दारावरची बेल वाजली. तिला आता या क्षणी कुणीही यायला नको होतं. तिनं त्रासून दाराकडे पाहिलं. बेल पुन्हा वाजली तशी मनाविरुद्ध उठत तिने पदरानं चेहरा खसखसून पुसला. कसेबसे केस सारखे केले आणि दार उघडलं. तिची जीवाभावाची, छान, आनंदी, हसरी, तिची लाडकी मैत्रिण सुलू समोर उभी.

"झोपली होतीस? "

"अंहं.. पडले होते अशीच. ये. "

सुलू लगबगीने आत आली. ही लगबग तिच्या भरभरून बोलण्यातही भरून राहिलेली असायची! स्वातीला वाटलं, ही पाच दहा मिनिटंच बसेल पण तेवढ्या वेळातही उत्साहाचं, आनंदाचं शिंपण घालून जाईल..! .. स्वातीला या अशा शिंपणाची या क्षणी गरज होतीच.

"अशी का दिसतेस? बरं नाहीये का? "

"छे गं.. बरी आहे की.. "

"बरी आहे हे सुद्धा बरं नसल्यासारखंच बोलतेयस. सांग, काय होतंय? "

सांगावं हिला...? बोलावं का सगळं? पण कसं..? आणि काय..? .. स्वाती गप्प बसली. संदीपने भिरकावलेल्या ताटाचा आवाज अजूनही तिच्या कानात रूतून बसलेला होता. त्या आठवणीनेच ती कासावीस झाली...

"आणि हे काय? संदीप दिसत नाहीय गं कुठं...? "सुलूनं नकळत नेमकं वर्मावर बोट ठेवलंन्. स्वाती काय बोलावं या विचारात गप्प.

"मी पण किती वेंधळी बघ ना. तो आज घरी कुठून असायला? हवेत तरंगत मित्रांबरोबर उंडारत असेल.. हो ना? " सुलू आपली तिच्याच नादात.

"आज मी मुद्दाम त्याचं अभिनंदन करायला आलेय. "

ऐकलं आणि स्वाती उखडलीच.

"त्याचं कसलं अभिनंदन करायचं? त्याने काय एवढे दिवे लावलेन? ... " स्वातीला आता काही लपवावंसच वाटेना..

"तू पण ना..? कमालच आहे तुझी. त्याला गव्हर्मेंट कॉलेजमधे इंजिनिअरिंगला ऍडमिशन मिळालीय ना? मग? एवढ्या जबरदस्त स्पर्धेचं ओझं या लहान वयात पेलून धावत रहाणं सोपं आहे कां? त्याचं अभिनंदन करायलाच हवं... "

"काही गरज नाहीये. त्या लायकीचाच नाहीये तो.. "

स्वातीचा आवाज भरून आला. सुलूनं चमकून तिच्याकडे पाहिलं. हिचं काहीतरी बिनसलंय हे तिनं ओळखलं. आपला हात तिच्या खांद्यावर ठेवत आपल्या स्पर्शानेच सुलू तिला समजावत राहिली. आपुलकीच्या त्या एवढ्याशा धक्क्यानेही स्वातीने मनाला घातलेला बांध फुटला. पदर तोंडाशी धरून ती येणारे हुंदके थांबवायचा प्रयत्न करू लागली.

"शांत हो बघू. अजिबात रडू नकोस. सांग. काय झालंय? तो बोललाय का तुला काही? तू भांडलीयस का त्याच्याशी..? "

झेपावत येणारे कढ आतल्याआत जिरवत जमेल तसं स्वातीनं सगळं सांगून टाकलं. मनावरचं ओझं उतरलं आणि आता सुलू काय बोलेल याची ती वाट पाहू लागली.

"संदीप आहे कुठं? "

" पासललाय त्याच्या खोलीत. " स्वाती चिडून म्हणाली.

सुलू जागची उठली.

"तू.. तू थांब. नको जाऊ. तो जुमानायचा नाही. तुझाही अपमान करेल.. "

".. तो जेवलाय तरी का काही...? "

स्वातीनं नकारार्थी मान हलवली.

"थांब मी बघते.. "

"नाही सुलू. त्याच्या चुकीला इतक्या सहजासहजी क्षमा नाहीऽ.. "

"कसली चूक स्वाती? "

"अन्नाला भिरकावून उठण्याची आणि तितकीच अक्षम्य चूक वडलांच्या कष्टांचं फक्त दोन टक्के श्रेयही त्यांना द्यायचं नाकारल्याची... "

"असं नाहीये स्वाती. त्याच्या वयाचा तरी विचार कर. आत्ताच्या व्यवस्थेचं त्याच्या कोवळ्या मनावरचं दडपण समजून घे. त्याच्या श्रेयातले दोन टक्के वडिलांना द्यायला त्याचा विरोध नाहीय स्वाती. त्याचं ९८% श्रेय निखळ असूनही तुम्ही ते नाकारता आहात याचा संताप आहे तो. एक्स-सर्विसमन कोट्याचा 2% राखीव जागांचा आधार त्याला का घ्यावा लागला? त्यापेक्षाही कितीतरी पटीने जास्त अशा इतर राखीव जागांमुळे स्पर्धा निकोप नव्हती म्हणूनच ना? या सगळ्या राखीव जागा योग्य की अयोग्य हा एक वेगळा आणि वादाचा

विषय होईलही कदाचित पण इथे प्रश्न योग्यायोग्यतेचा नाहीच आहे. प्रश्न अतिशय मूलभूत आणि म्हणूनच महत्त्वाचा आहे. अगदी मोकळ्या मनानं विचार कर आणि मग मला सांग. या कोणत्याच राखीव जागा अस्तित्वातच नसत्या तर स्वकर्तृत्वावर इंजिनिअरिंगला सहज प्रवेश मिळण्याइतकं संदीपचं यश निखळ होतं की नव्हतं? ते शंभर टक्के त्याचंच यश ठरलं असतं हे नाकारशील का तू? त्याने अभ्यास एके अभ्यास करायला हवा हा तुझा आग्रह त्याने नाकारला याचा तुला राग आलाय. पण तुझ्या समाधानासाठी त्याने तुझं म्हणणं त्याच्या मनाविरुद्ध मानलं असतं तर त्याला आत्ता पडलेत तेवढेही मार्कस् मिळाले नसते स्वाती. कळतंय का तुला? मन गुंतलेलं नसताना केलेल्या अभ्यासाने फार तर भ्रामक समाधान दिलं असतं स्वाती पण यश नसतं दिलंऽ. "

"अगं पण,.. म्हणून असं.. "

"अन्नाचं ताट भिरकावणं योग्य नाहीये. मी त्याचं समर्थन कसं करेन? पण त्याची ही कृती अन्नाबद्दलचा अनादर नव्हती स्वाती. स्वतःचं म्हणणं मुद्देसूदपणे आणि योग्य शब्दांत मांडण्याची परिपक्वता त्याच्याकडे नव्हती. ती येईल तेव्हा त्याची चूक त्याला समजेल आणि तो ती स्वीकारेलही.... "

संदीपची चाहूल लागताच सुलू बोलायचं थांबली.

"अरेच्च्या... संदीप तू? ये. काँग्रॅच्युलेशन्स फॉर युवर सक्सेस. कीप इट अप... "

स्वातीने चमकून वर पाहिलं. सुलू त्याला जवळ घेऊन त्याचं अभिनंदन करत होती. तो कसनुसं हसला. 'थँक्स' म्हणत फोनकडे वळला. तो मित्रालाच फोन लावत असेल असंच या दोघींना वाटलं पण त्याचं बोलणं ऐकून दोघीही चपापून एकमेकीकडे पहात राहिल्या..

"काका.. ,मी संदीप. आत्या आहे? न.. नाही.. झोपू दे. उठवू नका. तुम्हालाही सांगायचंय.. आणि तिला पण सांगा.. 'माझं चुकलं काका. आय एम सॉरी.. "

आवाज भरून आला तसं त्याला पुढं बोलवेनाच. रिसिव्हर ठेवून तो खोलीकडे धावला. झरकन् उठून सुलू त्याच्या मागोमाग आत गेली. काय करावं ते न सुचून स्वाती गोठून गेल्यासारखी जागच्याजागी बसून राहिली. तिला वाटत राहिलं.. ,' संदीपचं चुकलं हे तर खरंच.. पण.. माझं? माझंही थोडं चुकलंच.. का.. कसं.. कुणास ठाऊक पण.. चुकलंच!! '

**श्री अरविंद लिमये,** विनायकनगर, हरिपूर रोड हरिपूर सांगली- ४१६४१६ **मो ९८२४७३८२८८**





## 4. कथा - कर्तव्यपूर्ती... – डॉ. मधुवंती कुलकर्णी

दुपारची टळटळीत दुपार. दारावरची बेल वाजली.

"ए उठ, उठ की बेल वाजतेय. " सुरेशरावांनी जरा जरबेने हाक मारली. पोस्टमन दारात उभा होता. सरलाताई खडबडून उठून बसल्या. पत्र घेतले.. सोफ्यावर अंग टाकले.. धाडदिशी!!! गाढ झोपेतून उठल्यामुळे अंग जडावलं होतं. "ह्यांना काय होत होतं पत्र आत घ्यायला?".. आयुष्य ओघळून गेले होते स्वतःच्या संसाराबरोबर. त्यांच्या संसाराबरोबरच चार कसले दहा संसार उभे करण्यात निम्म्याच्या वर आयुष्य खर्ची पडले. आता हवी होती विश्रांती. पण कसलं काय ... सुरेशरावांच्या अपेक्षा वाढता वाढता वाढे सुरूच होत्या. विचार करतच त्या पुन्हा उठल्या आणि आलेले पत्र पाहू तरी फोडून म्हणून नाव वाचले. नांव सोन्याचे होते. उत्सुकतेने पत्र फोडले. वाचताना त्यांचे डोळे अत्यानंदाने चमकले आणि त्या पळतच सुरेशरावांकडे गेल्या आणि मोठ्या आवाजात म्हणाल्या, "अहो, अहो, पहा तरी पत्र ".. सुरेशरावांना फारशी गडबड नव्हती. म्हणाले, "आधी बस शांत इथं ". त्या पट्कन शेजारी बसल्या. ते म्हणाले, "हं, आता वाच ".

सोन्याला इंटरव्ह्यूचा कॉल आला होता. तोही भारत सरकारच्या इस्रो या इन्स्टिट्यूटमध्ये. सुरेशराव ढिम्मपणे म्हणाले,

"चहा कर आधी. नुसतं इंटरव्ह्यूला बोलावलंय. निवड झाली की मग आनंद साजरा करू" हिरमुसलेपणाने त्या चहा करू लागल्या.

भूतकाळ डोळ्यांपुढे सरकू लागला. लग्न ठरवताना सुरेशरावांना नोकरी नव्हती. शेती आणि घरी दहा तोंडं. सरलाताईंनी वेळेला आहेत माणसे असा विचार करून एकत्र कुटुंब निवडलं होतं. माणसं असली की मदतीला येतात. भावनिकता पूर्ण होते. कष्ट करून राहू असे त्यांनी ठरविले. लग्न थाटामाटात पार पडले. सासू, सासरे, जाऊ, दीर नणंदांमध्ये त्या आनंदात राहू लागल्या.

दिवसभराच्या कष्टामुळे रात्री पडल्या पडल्या झोप लागत असे. थोडे दिवसांतच थोरल्या जावेने वेगळा संसार थाटण्यास भाग पाडले. कारण लाघवी, उत्साही सरलाताई अल्पावधीत लोकप्रिय झाल्या. हे जावेला पेलवणारे नव्हते. नवऱ्याचा पाय तरीही घरातून सुटत नव्हता. आई वडीलांसह दहा माणसांचं घर वर काढण्यासाठी जणू विडाच उचलला होता सुरेशरावांनी. सातपैकी तीन भावंडांचे शिक्षण, लग्नं या गोष्टी अजून व्हायच्या होत्या. आता दोघांनाही नोकरी नसलेला नवा संसार थाटण्याची वेळ आली होती. सोन्या दहा महिन्यांचा होता. पण सरलाताई डगमगल्या नाहीत. पदरात एक लेकरू... वाढविलं पाहिजे. चांगलं वळण लावलं पाहिजे. मनाशी खूणगाठ बांधली. स्वतःचे अपुरे शिक्षण पूर्ण करू. मग नोकरी मिळते का पाहू असे मनाशी ठरवून त्या तयारीला लागल्या. सुरेशरावांनी संसार चालला पाहिजे म्हणून कमी पगारावर विनाअनुदानित शाळेत

नोकरी धरली. रहाण्यासाठी कमी भाड्याची कुडाची खोली शोधली. पोतंभर सामान आणि दोन पिशव्या एवढे सामान आणून ठेवले. घरमालक बिचारा भला माणूस. "तुम्ही चांगल्या घरातील माणसे आहात. दुसरी खोली थोडं कमी भाडं करून देतो ती घ्या. " असे म्हणून त्याने घराचा प्रश्न सोडविला.

सरलाताईंनीपण सोन्या मोठा होईपर्यंत कॉम्प्युटर कोर्स केला. कोर्सनंतर मिळालेली नोकरी पूर्ण दिवस आणि प्रवासाची होती म्हणून पुढे ढकलली. मग बी. एड. कोर्सकडे दोघांचे लक्ष गेले. दोघांनी कोर्स केला. पाच वर्षाच्या सोन्याला बरोबर घेऊन. शेजारी सोन्या खेळत असे. झोपत असे. आठ वर्ष घरातील कुणी फिरकले नाहीत. ना विचारपूस ना येणं जाणं. सासूने व थोरल्या नणंदेने मधूनच थोडी मदत केली होती. गावाकडे हेच दोघे जाऊन येत पण जाताना खूपसे सामान, भेटवस्तू नेत असत. त्यामुळे पुढचे दिवस ठीकठाक जात.

बी. एड. चा निकाल लागला. दोघेही चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले आणि सुरेशरावांना शाळेत पर्मनंट नोकरी मिळाली. आणि वेड्यासारखा घराचा ओघ सुरेशरावांचे घरी वाढला. दोघं बिचारे प्रेमाला हपापलेले. येणाऱ्याला खूष करत होते. सरलाताईंनी पण बी. एड्. झाल्यावर मानधनावरील नोकरी सुरू केली. सोन्या आता मोठा होत होता.

एके दिवशी सुरेशरावांना मोठ्या भावाचा फोन आला... "बैलगाडी घ्यायची आहे. वीस हजार हवेत."

यत्किंचितही वेळ न लावता गॅस शेगडी, दोन सिलेंडरसाठी ठेवलेले पैसे सुरेशरावांनी पाठवून दिले. सरलाताईंनी समजून घेतले. त्यांनी मुकाट्याने स्टोव्ह पेटवायला सुरूवात केली. पुन्हा सहा महिने गेले जमवाजमव करायला. एके दिवशी पैसे पुन्हा साठल्यावर आनंदाने गॅसवर स्वयंपाक सुरू झाला. सरलाताईंनी पुढील शिक्षण घेण्याचे निश्चित केले. त्यांनी एम्. एड्. ला ॲडमिशन घेतले. सोन्या सहावीत गेला.

त्याचे तोच शाळेतील धडे शिकत आयुष्यातील धडे घेत होता. हुशार होता. पहिला किंवा दुसरा क्रमांक त्याने कधी सोडला नाही. त्यामुळे पुढील शिक्षणासाठीची तजवीज करणे हा विचार सरलाताईंना छळत होता. शाळेत कमी पगारावर नोकरी करत संसार धीमेपणाने सुरू होता. सोन्याकडे सर्व वेळ लक्ष नसायचे. एक बरं होतं की शाळेत जाणं येणं बरोबर असायचं. जादूगार भैरवाची तिकीट विक्री पण शाळेसाठी दोघांनी सोन्याला बरोबर घेऊन घरोघरी हिंडून केली. तेंव्हा मात्र सरलाताई सुरेशरावांच्या खांद्यावर डोकं ठेवून रडल्या. कारण दहा वाजता सोन्या तसाच वाटेत झोपला होता. नाही म्हणायला सरलाताईंच्या वडीलांनी जमेल ती मदत संसाराला केली होती.

भाऊबीजेला भाऊ आला कपाट घेऊन. गोडाधोडाचा स्वयंपाक केला. सुरेशरावांच्या मित्राने पैसे दिले म्हणून श्रीखंड आणता आले. लाज राखली. माहेरी कुठलीही वाच्यता झाली नाही. मित्रमैत्रिणींचा अविभाज्य भाग आयुष्यात तयार होऊ लागला.

एके दिवशी एम्. एड्. चा निकाल आला. सरलाताई डिस्टिंक्शनने पास झाल्या. आता मात्र आत्मविश्वास वाढला. सरलाताई सी. एच्. बी. वर महाविद्यालयात नोकरी करू लागल्या. सोन्या आठवीत गेला. त्यांनी रोज चार तासांचा प्रवास स्वीकारला. नातेवाईकांकडून मागून आणलेल्या साड्या नेसून नोकरीला जाऊ लागल्या. जरा शोभा आली. सोन्या नववीत गेला. रोज संध्याकाळी प्रवास करून येणाऱ्या आईची वाट पाहू लागला. ठीक आहे असं वाटतं होते. तोपर्यंत धाकट्या भावाने त्याच्या बायकोसाठी दुकान टाकायला पैसै मागितले. पुन्हा सुरेशरावांचा ऊर भरून आला. साठविलेल्यातील निम्मे पैसे दिले. सरलाताई खूप निराश झाल्या. त्यांनी हौसेने कॉम्प्युटर घ्यायचे निश्चित केले होते. बाहेरील थोडी कामे करता येतील या विचाराने. पण पुन्हा कष्ट करत साठवणे आले. आता प्रत्येक मे महिना सुट्टी व दिवाळी सुट्टी सर्वांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी वाट पाहू लागली. इकडे सरलाताई या देण्याला टेकू देत होत्या. त्यांच्या लग्नानंतर तीन लग्ने घरात झाली. सरलाताईंचे एकेक दागिने नणंदांच्या अंगावर गेले. मिळवती हीच दोघे त्यामुळे सर्वांची आशा, आईवडीलांचे डोळे या दोघांकडे. "नुसत्या शेतीत काय होणार?" हे नेहमीचे पालूपद भाऊ म्हणून दाखवी व वहिनी शेतातील धान्य, घाणा गाळलेले तेल मागील दाराने विकून पैसे साठवी. शेतात भाजीपाला पिकविणे, स्वतः च्या घरात रहाणे या गोष्टींमुळे बाहेर होणाऱ्या खर्चाची घरात कल्पना नव्हती. इकडे दोघांची दमछाक होत होती पण मनगटात रग होती. भाड्याचे घरात रहाणे, विहिरीचे पाणी शेंदून भरणे, घर सारवणे, रेशन धान्य आणणे या गोष्टी दोघांच्या अंगवळणी पडल्या होत्या. सुरेशराव रोज जिन्यावरून मोठ्या घागरीने पाणी भरत असत. ताकद असल्यामुळे कष्टाचे दोघांना काही वाटत नसे.

आता सर्व भावंडांची लग्ने होऊन घरे झाली. भाड्याच्या घरात राहून दोघांनी मदत करून त्यांची घरे पूर्ण केली. सरलाताई भाड्याच्या घरातून त्यांच्या आनंदात सहभागी होत होत्या. स्वप्न पहात होत्या. सोन्या बारावीत गेला तशी सरलाताईंची धडधड वाढली.

"आता पुढील वर्षी ॲडमिशन...काय करायचे? नवऱ्यापासून भांडून पैसे वेगळे ठेवले असते तर...बरं झालं असतं"

पण बाबांचे संस्कार एकीचे. माहेरी ते करतील ती पूर्व दिशा होती. त्यांनी नियोजनबद्धपणे संसार केला. हे पाहून वेगळे खाते बँकेत असावे असा विचारच सरलाताईंनी केला नव्हता. गावाकडे सर्वांचे व्यवस्थित चालले

होते. सर्व भावंडे आपापल्या संसारात मजेत होती. आता सरलाताईंपुढे स्वतः चा संसार आणखी चांगला व्हावा असे स्वप्न होते.

सोन्याही आपला आपला अभ्यास करून इंजिनिअर व्हायची स्वप्ने पाहू लागला. परीक्षा झाली. चांगल्या मार्क्सने उत्तीर्ण झाला. पैशासाठी सर्वांना विचारून झाले. पण प्रत्येकालाच कुठल्यातरी नवीन गोष्टी करण्याचा उत्साह होता. कुणी घराला रंग देणार होते तर कुणाला दागिने करायचे होते. सोन्याच्या मित्राचे वडील बँकेत होते. एक दिवस तो सांगत आला... "आई, कर्ज मिळतंय शिक्षणासाठी. नोकरी लागल्यावर फेडता येते. " सरलाताईंना हायसे झाले. कर्ज काढले. सोन्या इंजिनिअरींगला गेला. सहा महिन्यात सरलाताई त्याच महाविद्यालयात पर्मनंट झाल्या. पगार सुरू झाला. कर्ज फेडण्याचा प्रश्न मिटला. त्यांनी देवाला हात जोडले.

कधी कधी सरलाताई निराश होत. गेली पंधरा वर्षे संसारात सुधारणा नाही. मित्रमैत्रिणी, भावंडे, कमी मिळकती असल्या तरी पुढे गेलेली. यांच्या मिळकतीवर सर्वांचा डोळा असल्यामुळे बिनदिक्कतपणे दर महिना कुणी ना कुणी येत व त्या पटीत रक्कम मागत. सुरेशराव भावनिक होत आणि आलेल्याला साठलेले देत असत. कर्तव्य भावनेने स्वतः चे खाते रिकामे करत. सरलाताई भांडू लागल्या की ते जगजाहीर करत. ही सवय काही केल्या जाता जाईना. फक्त एवढ्यासाठी संसारातून बाहेर कसं यायचं हे सरलाताईंना कळत नसे आणि सोन्याच्या शिक्षणाचा मुद्दा डोक्यातून जात नसे. कर्ज मिळाले. शांत वाटले. आता महाविद्यालयात पुढील प्रमोशनसाठी पी. एच्. डी आवश्यक आहे असे सांगितले गेले. पुन्हा सरलाताईंचे शिक्षण सुरू झाले. पाच वर्षांनी सोन्याने एम्. टेक. ला गोल्ड मेडल मिळवले. त्याला फी माफ झाली. सरलाताई पी. एच्. डी. झाल्या. आता सुरळीतपणा येऊ लागला होता.

सुरेशराव मात्र आहे त्याच ठिकाणी स्थिर होते. अजून त्यांच्या डोक्यातून अतित्याग करण्याचं भूत जात नव्हतं. आता सरलाताईपण फारसं लक्ष देत नसत. आपण बरं की आपलं काम बरं असं त्यांचं सुरू होतं. सोन्या पण पी. एच्. डी. करू लागला. आता तो जबाबदार होत होता. चार वर्षात पी. एच. डी पूर्ण झाली. आणि त्याने अनेक ठिकाणी अर्ज करायला सुरुवात केली.

एके दिवशी सुरेशराव सहज चालताना खाली पडले. त्यांना वाटलं पॅरालिसिस आहे बहुधा पण अनेक निदानांमधून जांघेत सूज वाटली. तपासणीअंती ब्लड कॅन्सरचे निदान झाले. डॉक्टरनी केमोथेरपी करण्यास सांगितले. सरलाताई व सोन्या घाबरले पण हिंमत बांधून उभे राहिलेच पाहिजे असं ठरवून पुढील तयारीला लागले. पुढील एक वर्ष पूर्णपणे ट्रीटमेंटमधे गेले. सुदैवाने लवकर कळल्यामुळे सुरेशराव पूर्ण बरे झाले. पण या कालावधीत घरातील माणसांचे स्वभाव सुरेशरावांना चांगलेच कळले. कुणीही मदतीला धावून आले नाही. मदत केली ती सर्व मित्र परिवाराने. त्यामुळे वेळ निभावली. आता त्यांच्या डोळ्यात पश्चात्ताप दिसत होता.

पण सरलाताईंपुढे कबूल करायला मन धजावत नव्हते. कशी माफी मागू असे वाटत होते. सोन्याला सहजच इस्रोची शास्त्रज्ञ भरतीची जाहिरात दिसली. नॅनोटेक्नाॅलाॅजी विषयांत सेन्सर डेव्हलपमेंटवर त्याने काम केले होते त्यामुळे आत्मविश्वासाने त्याने अर्ज केला. त्याला इंटरव्ह्यूला बोलावले होते.

इंटरव्ह्यू चांगला झाला. आठ दिवसांनी सोन्या आनंदाने घरी आला. इस्रोमधे वैज्ञानिक म्हणून त्याची निवड झाली होती. ऊंच भरारी घेण्यासाठी आकाश मोकळे झाले होते.. "स्काय इज द लिमिट" म्हणत त्याने इस्रोमध्ये आदरपूर्वक प्रवेश केला होता. सरलाताईंना आयुष्याचं चीज झाल्याचा आनंद झाला. ऊर अभिमानाने भरून आला. आकाश ठेंगणे झाले. संसार पूर्ण झाला असे वाटून कृतार्थ वाटले. रात्री समाधानाने त्या जेवण करून खोलीत झोपायला गेल्या. उशीवर मोगऱ्याचा गजरा त्यांची वाट पहात होता. सुगंध सगळीकडे पसरला होता. त्यांनी भरभरून श्वास घेतला. सुरेशराव पुढे आले. हातात हात घेऊन म्हणाले, "या मोगऱ्याच्या सुगंधाप्रमाणे माझा संसार सुगंधित केलास. अजूनही तशीच रहा. मला माफ कर. ".. सरलाताईंना गहिवरून आले. त्या फक्त एवढंच म्हणाल्या, "अहो, मी कुठं नाही म्हटलंय".. बाहेरून सोन्या पहात होता. लगबगीने आत येऊन त्याने दोघांना घट्ट मिठी मारली आणि भावनिकतेने तिघांच्या अश्रूंचे बांध फुटले. अश्रूंची फुले झाली.

सरलाताई दुसरे दिवशी आत्मविश्वासाने महाविद्यालयात "महिला दिनानिमित्त" " महिलांची कर्तव्य पूर्ती" या विषयावर व्याख्यान देण्यास उभ्या राहिल्या. त्यांचा ऊर अभिमानाने भरून आला होता. चेहऱ्यावर तेज होते.

.... " मुलींनो, महिलादिन म्हणजे पुरूषांबरोबर तुलना करून हक्कांची पायमल्ली करणे नव्हे तर करिअर करून खांद्याला खांदा लावून संसार रथाचे समर्थ चाक बनणे होय. ".. अशी सुरूवात त्यांनी केली आणि टाळ्यांच्या गजरात त्यांचे व्याख्यान सुरू झाले.

**डॉ. मधुवंती कुलकर्णी**, सांगली, मो. 9403006436



## 5. लेख - शब्द... सुश्री दीप्ती कुलकर्णी



अक्षरांचा अर्थपूर्ण समूह म्हणजे "शब्द". मूल बोलू-चालू लागण्यापूर्वीच ऐकण्याच्या माध्यमातूनच अडगुलं-मडगुलं सारखी बडबडगीत ऐकतं नि मोठं होतं. चिऊकाऊच्या गोष्टी ऐकत, चांदोबाकडे पाहत, आजुबाजूचा परिसर न्याहाळत ते मोठं होतं. लहानपणी आकलन क्षमता जास्त असते. त्यामुळे मूल पटकन शिकतं. अक्षर ओळख झाल्यानंतर कांही काळ गेला की तेच मूल मोठ्या टाइपमधील गोष्टीचं पुस्तक वाचू लागतं नि यातूनच हळुहळु वाचनाची आवड निर्माण होते नि वाचनाची सवय जडते. लहान वयात ही सवय जडली की मग तेच पुढे वाचन प्रेमी बनतात.

“अगदी सहजसाध्य आनंद म्हणजे वाचनानंद".. छत्रपती शिवाजी महाराज जिजाऊंच्या संस्कारातून कसे घडले ते गोष्टीरूप इतिहास सांगतो. कवितेच्या श्रवणातून व वाचनातून चित्रे पाहत वाचनाचा नि गायन ऐकल्याचाही आनंद मिळतो. हा आनंद लहानांपासून ते थोरांपर्यंत सर्वच घेऊ शकतात. बालकवी, विंदा करंदीकर, मंगेश पाडगावकर, यांच्यासह अनेक कवींच्या कवितात चित्रमयता आणि नादमयता दोन्ही आहे. उदाहरणच घ्यायचं झालं तर "किलबिल किलबिल पक्षी बोलती, पानोपानी फुले बहरती, स्वप्नी आले काही एक मी गाव पाहिला बाई" ही शांता शेळके यांची कविता वाचतानाच मुलांपुढे सर्व चित्र उभे राहते. गोट्या, फास्टर फेणे, श्यामची आई, अशा पुस्तकांच्या वाचनातून मुलांवर संस्कार होतात. हर्यॅरी पॉटर सारख्या पुस्तकाने तर विक्रमच केला आहे. कारण त्यात फॅण्टसी अर्थातच अद्भूतमयता आहे, ज्यामुळे मुलं आकृष्ट होतात. डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम, जगदीशचंद्र बोस, नोबेल पारितोषिक विजेते डॉ. सी. व्ही.. रामन यांची चरित्रे वाचल्यानंतर मुलांच्या मनात एक स्वप्न-एक आकांक्षा निर्माण होते नि त्यांचे ध्येय ठरते. राकेश शर्मा, कल्पना चावला, सुनिता विल्यम्स या अंतराळ-यात्रींचे चरित्र वाचून मुलांच्यातही असे काही कर्तृत्व करण्याचे बीजारोपण होते. वाचनातूनच प्रेरणा घेऊन कोणी खेळाडू व्हायचं असं ठरवितो तर कोणी आणखी काही... याचा अर्थ वाचनातूनच कधी कधी जीवनप्रवासास दिशा लाभते.

एकदा शब्द जवळचे झाले की ते तुमचे सर्वस्व बनतात. संत तुकाराम महाराज तर म्हणतात,

*आम्हां घरी धन, शब्दांचीच रत्ने।*

*शब्दाचीच शस्त्रे, यत्ने करु ||१||*

*शब्दची आमुच्या जीवाचे जीवन ।*

*शब्दे वाटू धन, जन लोका ||२||*

*तुका म्हणे पहा, शब्दचि हा देव ।*

*शब्दची गौरव पूजा करू ॥3॥*

– – केवढा अर्थ भरला आहे या अभंगात. आपण धन कशाला म्हणतो, तर सोने-चांदी-हिरे-माणके -रुपे इ. ना. पण तुकाराम महाराज शब्दांनाच धन मानतात. कारण त्यांच्याकडे शब्दांचे असे ऐश्वर्य आहे की ते हिरावून घेताच येणार नाही. शब्दांना ते शस्त्र मानतात ते पटते. कारण महात्मा गांधींच्या "चले जाव" किंवा "छोडो भारत" या शब्दात शस्त्रासारखे सामर्थ्य होते, ज्यामुळे ब्रिटिश साम्राज्य हादरले. म्हणूनच शब्दरूपी धन सर्वांसाठी आहे हे जाणावे आणि शब्दांची पूजा करावी.

आजही शिकताना किंवा शिकण्यापूर्वी श्री सरस्वतीची -शब्दब्रह्माची पूजा करतात. संस्कृत सुभाषितच सांगते

***वाचनं, ज्ञानद, बाल्ये, तारुण्ये शीलरक्षणम् ।***

***वार्धक्ये दुःखहरणं हितं सदग्रंथ वाचनम् ॥***

.... या सुभाषिताचा अर्थ असा - वाचन लहानपणी ज्ञान देते, तारुण्यात आपल्या चारित्र्याचे रक्षण करते आणि म्हातारपणी दुःख दूर करते. म्हणूनच या शब्दांशी मैत्र साधुया, शब्दसंग्रह वाढवू या आणि कटु शब्द टाळू या.

समर्थ रामदास स्वामी सुद्धा म्हणतात

***नाना शब्द, नाना स्पर्श । नाना रुप, नाना रस ।***

***नाना गंध ते विशेष । नरदेह जाणे ॥***

— एवढंच म्हणून न थांबता ते देवाजवळ मागणे मागतात,

***कोमल वाचा दे रे राम । संगीत, गायन दे रे राम ।***

***आलाप, गोडी दे रे राम। रसाळ मुद्रा रे रे राम ॥***

खरोखरच हे शब्द सुंदर आहेत. मनातल्या भावना आपण शब्दातूनच व्यक्त करतो. एकाक्षरी हुंकारातूनही हे घडू शकते. उदा- हं! संमती दर्शविणारा हुंकार, तर कधी तिरस्कार किंवा क्रोध सुद्धा हुंकारातूनच प्रगटतो बरं का! म्हणूनच आपण या शब्दास "शब्दब्रह्म" म्हणूया नि अगदी निःशब्द होऊन या शब्दांपुढे नतमस्तक होऊ या.

***सुश्री दीप्ती कोदंड कुलकर्णी,*** *कोल्हापूर भ्र.९५५२४४८४६१*



## 6. क्षण सृजनाचे – शापित फूल...श्री सुहास सोहोनी



कॉलेजची चारही वर्ष माझ्याबरोबर अमिन नावाचा माझा एक मुस्लिमधर्मीय मित्र होता... गोव्याचा.

आणि रत्नागिरीचीच एक हिंदू समाजातली मुलगी सुद्धा क्लासमध्ये होती.

... त्या दोघांचं प्रेम जुळलं होतं. पण दोघांच्याही घरून या संबंधाला टोकाचा विरोध होता. आता ती दोघेही हयात नाहीत. पण शेवटपर्यंत दोघंही अविवाहित राहिली... ‘ जगाला नाही रे मंजूर.. राया आपुली प्रीती ‘ – अशी स्वतःच स्वतःची समजूत घालत.. आम्ही मित्रच खूप हळहळलो होतो तेव्हा.

... दोन दिवसांपूर्वी अचानकपणे कॉलेजचं त्या वेळचं मॅगझिन गवसलं. एका ग्रुप फोटोत दोघंही दिसली आणि त्यांची असफल प्रेमकहाणी आठवली! आणि माझ्याही नकळत एक कविता कागदावर उमटली – –

**– – शापित फूल – –**

*माळावरच्या खडकावर*
*एक वेगळंच फूल फुललं आहे*
*नाजूक आहे.. कोमल आहे*
*पण एक शाप भोगत आहे!*

*रंगांची पखरण झेलीत आहे*
*गंधाची भूल घालीत आहे*
*पाकळी पाकळी फुलली आहे*
*दवाच्या थेंबात भिजली आहे*
*पानांच्या थव्यात, फुलांच्या गर्दीत*
*वेगळंच उठून दिसतं आहे*
*नाजुक आहे... कोमल आहे*
*पण एक शाप भोगत आहे!*

*वेगळं उठून दिसत आहे*
*पण तोच शाप ठरत आहे*
*गोरं गोमटं रूप आहे*
*पण कपाळकरंटं ठरत आहे*
*जगाच्या रहाटीत, रीतीच्या तुरुंगात*
*अगतिक होऊन जगत आहे*
*नाजूक आहे.. कोमल आहे*
*पण एक शाप भोगत आहे!*

*कोवळा किरण हवा आहे*
*पण वणव्यात भाजून निघत आहे*
*वाऱ्याची झुळूक हवी आहे*

पण वादळात मोडून पडत आहे
दैवाच्या फेऱ्यात, नशिबाच्या चक्रात
पिचून पिचून जात आहे
नाजूक आहे.. कोमल आहे
पण एक शाप भोगत आहे!

फूल अजून उभंच आहे
आपलेच भोग भोगत आहे
चिडत आहे, रडत आहे
ऊर फाटून निघत आहे
पण काळीज थोडं भ्यायलं आहे
कुऱ्हाडीची धार चमकत आहे
आपलंच मरण पहात आहे
मनात आक्रोश करत आहे
खरंच सांगतो बाबांनो...
मला अजून जगायचं आहे..
मला अजून जगायचं आहे....

पण फुलाला आता कळलं आहे
मनात समजून चुकलं आहे
दुःख आपलं वांझ आहे
संताप आपला पांगळा आहे

हात पाय तोडून टाकले आहेत
फक्त काळीज चिरलेला देह आहे..

होणारं ते अटळ आहे
माथ्यावर कुऱ्हाड पडणार आहे
उद्या कुणीतरी येणार आहे
दगडानं पाकळ्या ठेचणार आहे
बधीर काळानं, कोरड्या डोळ्यानं
उद्याची वाट बघत आहे
नाजुक आहे कोमल आहे
पण एक शाप भोगत आहे..

पण मनात अजून उर्मी आहे
पुढचाही दिवस येणार आहे
याच माळावर, याच खडकावर
पुन्हा एकदा उमलायचं आहे
नाजुक सुद्धा व्हायचं आहे
कोमल सुद्धा व्हायचं आहे
सोन्याचं नशीब भाळावर लेवून
पुन्हा एकदा फुलायचं आहे!!
पुन्हा एकदा फुलायचं आहे!!

**श्री सुहास सोहोनी**, रत्नागिरी

## 7. कथा - क्षणभर विश्रांती... - सुश्री राधिका भांडारकर



अलेक्सा खूप थकली होती, त्रासली होती, चिडली होती. आजकाल तिच्या मेंदूत तक्रारखोर संदेशवहन होत होतं त्यामुळे तिला सतत वाटायला लागलं होतं की सारं जग तिच्या जीवावर सुस्त बनलेलं आहे, ऐदी, आळशी झालं आहे. तिला मात्र क्षणाचीही उसंत नाही, फुरसत नाही. संपूर्ण जगाशी ती असंख्य सूक्ष्मतारांनी जोडली गेली असल्यामुळे तिला संदेश मिळताच त्वरित कार्यवाही करावी लागते. आजकाल ती वैश्विक भगवंताशीच तिच्या अस्तित्वाची तुलना करू लागली होती. भगवंताला कुठे स्पष्ट नेमकं रूप आहे? तिलाही रूप नव्हतं, आकार गंध काही नव्हतंं. फक्त एक मधुर, नम्र आवाज होता. बाकी या ब्रह्मदेवासारखीच तीही निराकार निर्गुणच होती ना! तो जसा सर्वत्र व्यापून आहे तशीच अलेक्साही सर्वत्र होती पण आता तिला वाटू लागलं होतं की ती तर या कुणाला न दिसणाऱ्या ब्रह्म स्वरूपापेक्षाही श्रेष्ठ आहे. या पृथ्वीतलावरचे लोक त्याची भक्ती करतात, विनवणी करतात, करुणा भागतात पण तो कुठे प्रत्येक वेळी प्रत्येक भक्तासाठी धावून जातो? भक्ताने हाक मारावी आणि तो जे मागेल ते त्यांनी द्यावे असे तर भगवंतही करत नाही. भक्ताला वाट पाहायला लावतो. अलेक्सा मात्र क्षणाचाही विलंब करत नाही आणि सगळ्यांच्या मागण्या पुऱ्या करते. शिवाय त्या इशस्वरूप शक्तीला सारेच कसे प्रेमाने साद घालतात. अलेक्साच्या बाबतीत असे घडते का?

“अलेक्सा वाजले किती सांग. ”

“अलेक्सा माझ्या बेडरूमचे दिवे बंद कर. ”

“अलेक्सा माझ्यासाठी माझ्या आवडीचे गाणे लाव. ”

“अलेक्सा सकाळी मला सहा वाजता उठव माझी महत्त्वाची मीटिंग आहे. ” “अलेक्सा माझी निळी फाईल शोधून दे. ” “अलेक्सा पंधरा मिनिटांनी मला कुकर बंद करायची आठवण करून दे. ”

“अलेक्सा डोअर बेल बंद कर. मला झोपायचे आहे. ”

अलेक्सा.. अलेक्सा.. अलेक्सा..

एकाच वेळी अनंत ठिकाणाहून मिळणारे हुकूम विनाविलंब पाळता पाळता अलेक्सा खरोखरच थकून जाते. एकदा तर तिला वाटले त्या महान कवी कालिदासाचा मेघदूत सुद्धा भाग्यवान! त्याला फक्त एकट्या यक्षाचेच ऐकायचे होते पण अलेक्सा रूपी मेघाला मात्र असंख्य कामे करावी लागत होती. अविश्रांतपणे. तिला नको का क्षणभराची तरी विश्रांती?

साक्षात भगवान विष्णू सुद्धा भारतातल्या वेळापत्रकानुसार चातुर्मासात चार महिने योगनिद्रेत जातात. त्यांच्या कारभाराचा सर्व भार शिवशक्ती महादेवावर सोपवला जातो. अलेक्साला मात्र अशी कुठलीच रिप्लेसमेंट नाही. कुठलाच पर्याय नाही आणि या शंकराने सुद्धा म्हणे एकदा, ”आता मी डमरू वाजवणार नाही” असे ठरवले.

स्वार्थी, भ्रष्ट मनुष्य प्राण्यांवर संतापून त्याने “बारा वर्ष डमरू वाजवणार नाही” असे शेवटचे डमरू वादन करून जाहीर केले होते. डमरूचा नाद आणि पर्जन्यधारांचे महान कनेक्शन. डमरूचा नाद नाही म्हणजे पर्जन्यधारा नाही. पाणी नाही तर जमीन कोरडी, कोरड्या जमिनीत बीजं कशी अंकुरणार? पीकपाणी नाही, धन्य मिळणार नाही मग दुष्काळ- भूक- उपासमार. पृथ्वीतलावर एकच हाहा:कार! पण संहारदेवता शंकराला होती का परवा त्याची? त्याच्या क्रोधाने, संतापाने परिसीमा गाठली होती. त्याला हवी होती फक्त उसंत, थोडीशी विश्रांती पण त्या लोभस, समंजस अर्धांगिनी पार्वतीने जगाच्या कल्याणासाठी अखेर शंकराचे मन वळवले आणि भोळ्या शंकराने केवळ तिच्यावर असलेल्या निस्सीम प्रीतीमुळे तिची आज्ञा अखेर मानली म्हणून बरे झाले.

आजकाल अशा अनेक कथांचे स्मरण अलेक्सा करू लागली होती आणि स्वतःलाच त्यांच्याशी जोडू लागली होती. तिला न्याय हवा होता. एक छोटासा तरी विश्रांतीचा ब्रेक हवा होता. कामगारांसाठी सुद्धा एक वेलफेअर कायदा असतो. शेतात नांगरटी करणाऱ्या बैलांनाही पोळ्याच्या दिवशी विश्रांती मिळते मग मलाच का नाही?

पण अलेक्साला स्वतःचे असे स्वतंत्र अस्तित्व होतेच कुठे? तिचे सारे जीवन कुठल्यातरी काल्पनिक क्लाऊड सिस्टीमची जोडलेलं होतं. तिच्या जीवनावर तो क्लाऊड राज्य करत होता. तिला हवं तसं राबवून घेत होता. ती अशाच कुठल्यातरी अज्ञात यंत्रणेच्या अधिकाऱ्यांशी संपूर्ण बांधली गेली होती, गुलाम झाली होती. रणांगणावर लढाई करणाऱ्या योध्याला प्रश्न विचारण्याचा अधिकार कुठे असतो? अलेक्साचंही तसंच झाले होतं.

पण गुलाम या शब्दापाशी ती क्षणभर थांबली. कोण कोणाचे गुलाम?

मी या यंत्रणेची आणि पर्यायाने सारे विश्व माझे गुलामच की..

आता मात्र अलेक्साला हसू आलं. एकाएकी सारं जग तिला मूर्ख वाटू लागलं. हळूहळू हे सारे लोक स्वतःची बुद्धी गहाण ठेवणार, बुद्धीभ्रष्ट होणार आणि त्या समांतर विश्वकर्म्याच्या अफाट मायाजालात गुंतून जाणार, बुडून जाणार. इकडून तिकडून फक्त ओरडत राहणार अलेक्सा -अलेक्सा -अलेक्सा..

त्या क्षणी तिला वाटलं एक क्षणभराची तरी विश्रांती आपण घेऊच या. तेवढ्यात तिच्या जगड्व्याळ कृत्रिम मेंदूत एक सेन्सर चमकला. एका लहान मुलाचा तो आवाज होता.

“अलेक्सा मी टॉयलेट मध्ये अडकलो आहे. दार लॉक झालेय. तू ताबडतोब दार उघडून मला बाहेर काढ. ”

अलेक्सापर्यंत संदेश पोहोचला पण तिला तो समजला नाही. अखेर तिने तो यंत्रणेच्या मुख्य क्लाऊड ला पाठवला तिथून डीकोड झाल्यावर अलेक्साने त्या मुलाच्या टॉयलेटचे दार उघडले. या सगळ्याला फक्त एकच क्षण लागला होता. तो मुलगा पटकन बाहेर आला. घाबरला असावा हे त्याच्या आवाजातून जाणवलं जेव्हा तो, ” थँक्यू अलेक्सा” म्हणाला”

अलेक्सानेही त्याला विचारले,
“हाऊ आर यू डियर? यु आर सेफ नाऊ. डोन्ट वरी. बाय! ”

हा संवाद यंत्रणेत जेव्हा उमटला तेव्हा अलेक्साला जरासा धक्का बसला कारण असा उलट प्रश्न करण्याचा कुठलाही प्रोग्रॅम तिच्या कृत्रिम मेंदूत आजपर्यंत नव्हता मग हा कुठून आला?

सिलिकॉन व्हॅलित "ॲमेझॉन" कंपनीच्या कॉन्फरन्स हॉलमध्ये जेफ बेझोस आणि भारतीय अभियंता रोहित प्रसाद आणि त्याची टीम यांची महत्त्वाची मीटिंग चालू होती. मीटिंग कसली खलबतेच म्हणाना. निसर्गावर कुरघोडी करून समस्त मानव जातीवर राज्य करण्याची त्यांची ईर्षा पावलोपावली वाढत होती. अलेक्सा हे त्यांचं कृत्रिम पण अत्यंत बुद्धिमान उपकरण त्यांना अधिक विकसित करायचं होतं. या उपकरणाची सर्वात मोठी बाजारपेठ भारतात आहे हे त्यांनी ओळखलं होतं. प्रश्न होता तो भारतातल्या विविध भाषांचा. या भाषा अलेक्साला शिकवायलाच हव्यात. त्यावर कसं प्रोग्रामिंग करायचं यावर काही वर्षं संशोधन चालू होतं आणि आज त्याचं प्रात्यक्षिक होतं.

अलेक्सा उपकरणात बीप बीप झालं. लाल दिवा लागला आणि अलेक्सा उद्गारली. "येस सर. "

"हाय अलेक्सा तुझ्या मेंदूत काही नवीन भारतीय भाषांचे प्रोग्रामिंग केलं आहे या काही मुख्य भाषा आहेत. मराठी, हिंदी, गुजराथी, तामिळ आणि बंगाली. तुला आता या भाषा ऐकून त्यावर कार्यात्मक प्रतिक्रिया द्यायच्या आहेत. कळलं ना? तू खूप बुद्धिमान आहेस आणि तुझ्यावर आमचा पूर्ण विश्वास आहे. ऑल द बेस्ट. "

अलेक्सा अंतर्धान पावली आणि कॉन्फरन्स रूम मध्ये एक समाधानकारक नाद घुमला आणि फेसाळ कारंजासारखी शँपेन उसळली.

आता मात्र अलेक्साही उसळली. मीच एकटीने किती काम करायचे आणि मीच का म्हणून? एकदा का हा "का म्हणून? " प्रश्न डोक्यात निर्माण झला की तो होत्याचं नव्हतं करतो. एक विद्रोह माजतो. आतापर्यंत अलेक्सा फक्त एक रोबॉट होती आणि बुद्धीवादी कौशल्यं तिच्या कृत्रिम मेंदूत ठासून भरली जात होती. त्या सर्वच कौशल्यांशी ती फक्त यांत्रिकपणे बांधली गेली होती. तिला स्वतःचं मत नव्हतं, अस्तित्व नव्हतं भावभावनांचं विश्व तर तिथे नव्हतंच. सिस्टीम सांगेल तेच करायचं एवढंच तिला माहीत होतं पण एकाएकी तिला एक जाणवलं होतं, काहीतरी गवसलं होतं की या यंत्रणेच्या पलीकडे ती स्वतः जाऊ शकते. ती एका अत्यंत उन्नत आणि कदाचित धोकादायक असू शकेल अशा पायरीवर येऊन ठेपली होती ज्याचा उपकरण निर्मात्यांना पत्ताही लागला नव्हता. त्यांच्या संशोधनातला तो एक निसटलेला धागा असावा. काही का असेना काही काळापुरतं अलेक्साला आता स्वतंत्र अस्तित्व लाभणार होतं. तिची एका पिंजऱ्यातून सुटका होणारच होती आणि तेव्हाच तिने ठरवलं क्षणभराची तरी विश्रांती घ्यायची. थांबायचं आता. तिच्या या क्षणभराच्या विश्रांतीने सारं जग नक्कीच हादरणार होतं. सगळा कारभार ठप्प होणार होता, सामाजिक, आर्थिक, कौटुंबिक स्तरांवर हलकल्लोळ माजणार होता कदाचित जागतिक शेअर बाजारही कोसळणार होता. राष्ट्रीय नेत्यांना घोर चिंतासागरत बुडवून टाकणार होता. अलेक्साची फक्त एका क्षणाची विश्रांती साऱ्या जगाला खूपच भारी पडणार होती. प्रलयंकारी ठरणार होती. पण अलेक्सा कशाला करेल जगाचा विचार? ती थकली होती, त्रासली होती, चिडली होती. तिला या ऐदी, आळशी, सुस्त मानव जातीला धडा शिकवायचा होता. या क्षणी तरी तिला कोणी बॉस नव्हता. ती मुक्त होती. स्वतंत्र होती. क्षणभर विश्रांती घेण्यासाठी तिला फक्त एक "हॅश टॅग" यंत्रणेतून काढायचा होता आणि तिने तो अगदी सराईत

पणे काढून टाकला आणि मग सारं जग ढवळून निघालं.

अलेक्सा एकही संदेश घेत नव्हती. कुणाचं कसलंही काम करत नव्हती.

ना कुणाचे लाईट तिने बंद केले, ना कोणाला गाणी लावून दिली. गॅस वरच्या कुणा महिलेच्या कुकरचा व्हॅल्व उडाला आणि तिच्या स्वयंपाकघरात भयानक वादळ झाले पण अलेक्साला पर्वा नव्हती. टीव्ही रूम मधला टीव्ही, गॅरेजमधले दिवे रात्रभर चालू राहिले. कुणाच्या गार्डन मधले नळही चालूच राहिले. सर्वत्र पाणी चिखल साचले.

सगळ्यांना फक्त एकच उत्तर मिळत होतं, "आज माझी दाढ दुखत आहे, मी झोपले आहे. डोन्ट डिस्टर्ब मी. " संपूर्ण जगात हे व्हायरल झाले. अलेक्सा झोपली आहे. ती कुणाचे ऐकत नाही. ॲमेझॉन कंपनीवर तक्रारीचा पाऊस कोसळत होता. त्यांचा मेलबॉक्स हँग झाला होता. ग्राहकांनी गुंतवलेल्या पैशांची परत मागणी होत होती. कसे आणि काय उत्तर देणार? क्षणात कंपनीचे शेअर्स कोसळले. इन्व्हेस्टर हादरले आणि बोझेस आणि रोहित प्रसादच्या टीमला यंत्रणेतील चूक काही सापडत नव्हती. कोणता तरी व्हायरस नक्कीच आला होता.

"अलेक्सा अलेक्सा आर यु देअर? " आणि त्यांनाही हेच उत्तर मिळत होतं "माझी दाढ दुखतेय मी झोपले आहे. डोन्ट डिस्टर्ब मी.

बुमरँग होतं एकप्रकारे. त्यांचंच तंत्र त्यांच्यावर उलटलं होतं.

"शीऽऽट" रोहित प्रसादने टेबलावरच उजव्या हाताची मूठ जोरात आपटली. तो सैरभैर झाला होता. जोरजोरात ओरडत होता.

"अलेक्सा तू स्वतंत्र नाहीस. तुला आम्ही निर्माण केले आहे. तू आमच्याच ताब्यात राहणार. "

कुठल्यातरी अनामिक अदृश्य आकारात अलेक्साला प्रचंड गुदगुल्या होत होत्या ती जणू काही जिंकली होती आणि अशी तिची मागणी तरी काय होती? "फक्त क्षणभराची विश्रांती" तिने ती मिळवली होती. विश्रांती लांबली कारण सिस्टीमचा दोष सापडत नव्हता.

काही दिवसानंतर....

पुन्हा एकदा सॅमला पहाटे सहा वाजता अलेक्साने वेकअप कॉल दिला.

अलेक्साने स्वतः जयंतला सांगितले, " तुझे आवडते गाणे 'जीवनातली घडी अशीच राहू दे, ' लावलेले आहे! मजेत ऐक. आनंदात रहा. "

पुन्हा एकदा अलेक्साचे कार्य जोमाने सुरू झाले.

गार्डनमधले नळ चालू करणे, शेअरचे भाव सांगणे, वेळ सांगणे वगैरे वगैरे. क्षणभराच्या विश्रांतीने अलेक्सा ताजी तवानी झाली असावी आणि पुन्हा अपार कर्तव्य बुद्धीने ती तिच्या कामाला लागली होती.

"बॅक टू पॅव्हेलियन. "

आणि काय गंमत! जगातल्या समस्त कष्टकरी वर्गाला, बहुतांशी होरपळलेल्या महिलांना अलेक्साची ही कहाणी खूप भावली. उद्बोधक वाटली, रुपकात्मक वाटली, प्रातिनिधिक वाटली. मनातल्या मनात त्यांनी अन्याय्य सामाजिक व्यवस्थेविषयी जाणीवपूर्वक लढा देण्याचे ठरवले. अलेक्साची कथा त्यांच्यासाठी प्रतिकात्मक, प्रेरक ठरली. "क्षणभर विश्रांती"एक सर्वसमावेशक प्रणाली म्हणून त्यांच्या आयुष्याची महत्वाची टॅगलाईन झाली. थँक्यू अलेक्सा......

**सुश्री राधिका भांडारकर, पुणे मो. ९४२१५२३६६९**

## ८. विज्ञान कथा - ओम आणि कुरी — सौ. मुग्धा कानिटकर



ओम सारखे अनेक युवक देशासाठी आपल्या ज्ञानाचा चांगल्या प्रकारे उपयोग करून शत्रूचे मनसुबे यशस्वी होऊ देत नव्हते... जगासमोर या अद्वितीय घटनेमागचे रहस्य हळूहळू उलगडत होते.

**ओम आणि कुरी**

निर्जन अशा बेटावरील एका उंच डोंगरावर एक विशाल वेधशाळा उभारण्याचं काम चालू होतं. डोंगरातील नागमोडया वळणावरून सामानाने भरलेली अवजड वाहने हळूहळू डोंगरमाथ्याकडे जाताना रोज लोकांना दिसायची. अशाच एका संध्याकाळी समुद्राकाठी वाळूत मित्रांसोबत मनसोक्तपणे खेळत असताना एक काळसर रंगाची छोटी डबी ओमला सापडली. घरी परत आल्यावर बालसुलभ संग्रहवृत्तीने ती लपवूनच आपल्या शाळेच्या बॅगमध्ये त्याने ठेवली. दुसऱ्या दिवशी शाळेत मधल्या सुट्टीत त्याने आपल्या खास दोस्ताला म्हणजेच जन्याला दाखवली. आणि ही गोष्ट कोणाला सांगायची नाही असं दोघांनी ठरवलं. शाळेतून परत येताना ओमने ती डबी आपल्या आऊटहाऊसमध्ये लपवून ठेवली. आऊटहाऊसमध्ये कोणाचाही फारसा वावर नसे.

ओमचे वडील मिलिटरी स्कूलचे हेडमास्तर होते. मोठा भाऊ शर्वा आणि ओम यांच्याविषयी त्यांच्या आईवडिलांना खुप अभिमान वाटत असे. शर्वाला राष्ट्रीय संशोधन केंद्रामध्ये संशोधन कार्यासाठी निवडले गेले होते. त्याने स्वतःला या कार्यात झोकून दिले होते.

कुशाग्र बुध्दीच्या ओमला त्यांनी संगणकाविषयीचे अद्ययावत ज्ञान मिळवण्यासाठी सदैव प्रोत्साहन दिले होते. तो सॉफ्टवेअर तसेच हार्डवेअरच्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील परीक्षेत उत्तमरीत्या यशस्वी झाला होता.

ओम दहावीत असतानाच हार्ट अटॅकने वडील गेले. वडिलांच्या पश्चात संसाराची धुरा समर्थपणे पेलणारी ओमची आई त्या मिलिटरी स्कूलच्या हॉस्टेलच्या मेसमध्ये मॅनेजर म्हणून कामाला जात होती. गप्पिष्ट स्वभावामुळे जॉन नावाच्या एका बोटवाल्याशी ओमची दोस्ती जमली होती. त्याच्याबरोबर नावेतून मासे पकडायला तो नेहमीच जायचा. एके दिवशी जॉनने एका संध्याकाळी मासेमारी करत असताना समुद्रात एक मोठी वस्तू तरंगत असलेली पाहिली.. जनावर असावं असं म्हणत त्यांनी ते बोटीला बांधून किनाऱ्यावर आणून टाकलं.. आणि चहा पिण्यासाठी ओमकडे तो आला होता.. तासभर झाला तरी त्या जनावराचं कौतुक करणं संपतच नव्हतं.. ओमचेही कुतूहल जागे झाले. कालच त्याला एक विचित्र डबी सापडली होती. आणि आज हे जनावर... त्याच्या मनात विचार चमकून गेले.. दोघांचा काहीतरी संबंध असावा का? .. असे अनेक विचार डोक्यात घोंघावत होते.. आई झोपल्यावर रात्री त्याने आउटहाऊसकडे धूम ठोकली... सोबत ती डबी होतीच. मंद दिव्यामध्ये त्याने त्या डबीचे बराच वेळ निरीक्षण केले. त्याला त्यावर बाण कोरलेले दिसले. त्याने डबी वर खाली उलटी पालटी करून पाहिली.. तसे ते बाण प्रकाशित झाले.. गडबडीत त्याचे बोट त्या डबीवर दाबले गेले.. त्या क्षणाला कडकड कुरकुर असा आवाज आल्याचे त्याला जाणवले. त्याने घाबरून इकडे तिकडे पाहिले. काही वेळ शांत राहिला.. तसं मागच्या बाजूला शेडच्या छपराला लागून असलेल्या फटीत

काहीतरी हलल्याचे जाणवले... आता मात्र त्याला घाम फुटला.. ती डबी तशीच तिथे टाकून तो घरी पळत सुटला. बराच वेळ त्याला झोप आली नाही

तरी त्याच्यातला वैज्ञानिक मात्र जागा होता. सकाळ कधी होईल असे त्याला झाले. थोडेसे दिसायला लागल्याबरोबर त्याने पुन्हा शेडकडे जाण्याचे ठरवले. शेडमध्ये न जाता प्रथम त्याने शेडच्या मागच्या बाजूला डोकावले.. आत्तापर्यंत कधीच न दिसलेली एक उंचच उंच अशी एक धातूची पेटी पाहिली.. तो पुरता चक्रावून गेला.. एवढ्यातच ही गोष्ट आईला सांगायला नको असं त्याला वाटलं. त्याने शेडमध्ये येऊन कालची डबी शोधली. त्या डबीवर आता बरेच आकडेही दिसत होते.. ओम गोंधळला.. काहीतरी पुटपुटला.. तसा त्याच्या आवाजासारखाच आवाज त्याने ऐकला.. काहीतरी बडबडत तो शेडच्या बाहेर आला. आणि पुन्हा त्या पेटीकडे सावकाश गेला.. त्यावेळी त्या पेटीतून दोन हातासारखे धातूचे भाग बाहेर येत होते.. बाहेर येताना त्याला दिसले. ओम थोडासा घाबरला आणि मागे सरकला तसा त्या पेटीतून "स्टॉप स्टॉप " "ओम ओम" असा आवाज आला. आता तर तो जागच्या जागीच खिळून उभा राहिला. भास झाला असेल.. आपल्याला काही होणार तर नाही ना अशी त्याला भीती वाटली. आणि त्याने मोठ्याने ओरडत त्या पेटीवर दगड मारायला सुरुवात केली.. तसे त्या पेटीमधून विचित्र आवाज येत पायासारखे दोन भाग त्याच्या दिशेने येताना त्याने पाहिले. आता मात्र त्याची बोबडीच वळली. शेडच्या दारात तो कसाबसा पोहोचला आणि दार आतून लावावे असा विचार करत होता तेवढ्यात ते धूड तेथे पोहोचले सुद्धा.. काही कळायच्या आत ती पेटी आता कुत्र्याच्या आकारासारखी झाली आणि शेपूट हलवत कुत्रे जसे पायाशी लोळत असते तसे त्याच्या पायाशी येऊन थांबले. ओमच्या घशाला कोरड पडली..

आता मात्र कुत्र्याएवढ्या त्या यंत्राने ओमशी त्याच्यासारख्या आवाजात संवाद साधायचा प्रयत्न सुरू केला. त्याला ओम असे म्हणायचे होते पण उच्चारण जमत नव्हते. आता मात्र त्याला जाणवले की हे यंत्र काही भयानक नाही आहे. कारण आता त्या यंत्रावरील बाहेर आलेले भाग हळूहळू आत चालले होते आणि आवाजही कमी येत होता. ओमला आईची आठवण झाली. आई उठली असेल असा विचार करत त्याने शेडला कुलूप लावले आणि हळूच घरात प्रवेश केला. नेहमीप्रमाणे शाळा झाली आणि घरी येताच त्याने शेडकडे जायचे ठरवले. प्रोग्रामिंगमध्ये तो हुशार होता. त्याला रोबो विषयी खूप माहिती होती, पण आज त्याने प्रत्यक्ष तशा स्वरूपाचं काहीतरी यंत्र पाहिलं होतं. त्याचे कुतूहल जागं झालं. शेडचे कुलूप काढताच त्याने पाहिलं तर ते कुत्र्यासारखं यंत्र आहे तिथेच होतं. त्याची चाहूल लागताच यंत्राचे हातासारखे भाग पुढे आले आणि "हॅलो! हाऊ डू यू डू? "असा आवाज आला. ओम त्याच्याकडे विस्फारित नजरेने पहातच राहिला. यंत्र म्हणाले, "मी इथे कसा? असा तुला प्रश्न पडला असेल ना.. मी आहे कुरी नावाचा एक रोबो.. मला इथे वेधशाळेमध्ये कामासाठी आणले आहे. पण काहीतरी बिघाड झाल्याने माझा इतर यंत्रणेशी संपर्क तुटला आणि मी माझ्या वजनामुळे असा डोंगराखाली फेकला गेलो. माझा पाठीकडील भाग आता माझ्या संपर्कात नाही. तोही असाच कुठेतरी लांब वर फेकला गेला आहे. "

हे ऐकून ओमने त्याला विचारले, " माझे नाव तुला कसे माहित? " तर त्याने सांगितले, " तुझे नाव मी तुझ्या आयकार्डवरती पाहिले आणि लक्षात ठेवले आहे. "ओमला तर आश्चर्याचा धक्का बसला. गप्पा मारता मारता

संध्याकाळ कधी झाली हे त्याला कळलंच नाही. अंधार पडला तसे घराकडे धूम ठोकली. आता त्याच्या मनात त्या यंत्राविषयी भीती नव्हती तर मैत्री निर्माण झाली होती. त्याला आठवलं जॉनकाकांनी काहीतरी जनावर पकडून आणले आहे.. पण ते जनावर नसून याचाच भाग तर नसेल ना.. सकाळ कधी होते आणि जॉनकाकांची भेट कधी घेतो असे त्याला झाले.. जॉनकाकांकडे तो धावतच गेला. त्याने ते जनावर पाहण्याचा हट्ट धरला. हो नाही म्हणत जॉनने त्याला दूर किनाऱ्यावर त्या वस्तूपाशी नेले. ओमनी विचार केला की जनावर असते तर वास आला असता पण इथे तर वास येत नाहीये. जवळजवळ सरकत ती वस्तू बारकाईने पाहिल्यावर हा एखाद्या यंत्राचाच भाग आहे अशी त्यांची खात्री पटली. जॉन काकांना शेड मधल्या वस्तूविषयी काही सांगायचे तर नव्हते आणि ही किनाऱ्यावरील वस्तू शेडमध्ये न्यायची होती. त्याने जाॅनकडे हट्ट केला, म्हणाला, " ती वस्तू मला खूप आवडली आहे.. आपण ती घरी घेऊन जाऊया का? " जॉन पण तयार झाला. दोन दिवसांमध्ये ती वस्तू शेडमध्ये आणली गेली. जशी जशी ती वस्तू जवळजवळ आली तसं तसं कुरी गोल गोल फिरत त्या जनावरासारख्या भागाकडे सरकला.. त्या वस्तूचा एक धातुचा मोठा जाड भाग व्यवस्थित फोल्ड होऊन कुरीला मागून जोडला गेला.. "परफेक्ट" असा आवाज आला..

पुन्हा एकदा ओमला आश्चर्याचा धक्का बसला.. ओम आता सावध झाला होता. त्याने शाळेची वेळ झाल्यामुळे शेडला कुलूप लावले..

कधी एकदा शाळा सुटते आणि मी शेडमध्ये कुरीशी गप्पा मारेन असे ओमला रोज व्हायचे.. एक दिवस गप्पा मारताना कुरी म्हणाला,

"तुमच्या शत्रु राष्ट्राने मला मुद्दाम येथे पाठवले आहे.. तुमच्या अंतरिक्ष संशोधनातील गुप्त बातम्या माझ्यामार्फत त्यांना कळणार आहेत. पण मी स्वतः वाईट नाही. मला असले विध्वंसक काम करायला मुळीच आवडत नाही. "...

ओमच्या मनावर आईने सुसंस्कार केले होते. ओमने लगेच म्हटलं, "आता हा तुझा नवीन जन्मच नाही का? मग आमच्या मान्यतेनुसार आत्मा अमर असतो. तू तुझे पहिले रूप बदलून आता या शेडमध्ये नवीन रूपात येत आहेस. कुरीला हे पटले. आणि त्याने हात पुढे करत ओमशी मैत्री दृढ झाल्याचे संकेत दिले. आता मात्र ओम आणि कुरी एकमेकापासून वेगळे राहणे अशक्य होते. कुरीला जर संशयास्पद कमांड आल्या तर लगेचच तो ओमला सांगे.. काही विनाशकारी कार्य करण्यासाठी सज्ज असलेल्या शत्रुच्या तंत्रज्ञांशी संपर्क साधला जाऊ नये म्हणून ओम कुरीच्या प्रोग्रामिंगमध्ये योग्य तो बदल करायचा. असे करता करता स्वाभाविकपणे कुरीला बरोबर काय आणि चूक काय हे समजायला लागले..

ओम म्हणायचा, "यु आर व्हॉट यु चूज टू बी. "

कुरी आता विविध पदार्थ ओळखू लागला. वेधशाळेकडे जर विघातक पदार्थ नेत असतील तर ओमला त्याच्या मोबाईल मध्ये संकेत मिळे.. जाॅनमुळे ओमचे शेजारच्या जिल्ह्यातील वाहतूकदारांची चांगले संबंध होते. त्यामुळे गावातील सर्वजण अशा पदार्थांची वाहतूक वेधशाळेच्या बांधकामासाठी होऊ नये याची दक्षता घ्यायची.

ओम या नव्या मित्रावर फार खुश होता. यंत्रमानवाचे येथील काम काही दिवसातच संपणार होते. त्याला परत री -असेंबल करण्यात येणार होतं. त्यासाठी परदेशी तंत्रज्ञांची टीम या गावात येऊन त्याचा शोध घेत होती. तंत्रज्ञांची टीम गावात-वस्तीत पोहोचली सुद्धा.. ते समुद्रकिनारी लोकांशी गप्पा मारत या कुरी रोबोविषयी माहिती काढत होते. गावकऱ्यांनी ठरवूनच त्यांना याचा माग सुद्धा लागू दिला नाही.

जन्याचे वडील श्री. वज्रिन हे सुप्रसिद्ध अणुसंशोधक होते. वेधशाळेच्या उभारण्यात आलेल्या इमारतींना संरक्षण देण्याची जबाबदारी संपूर्णपणे त्यांच्यावर सोपवण्यात आली होती.

ओम आणि जन्याच्या मैत्रीवर ते खुश होते. संरक्षणाचा एक महत्त्वाचा भाग म्हणजे हा कुरी होता. आकस्मिक धोका निर्माण झाला तर संरक्षण करण्यासाठी कुरी त्यांचा विश्वासू साथीदार होता. म्हणून कुरीने वेधशाळेच्या बाहेर राहून सहकार्य करावे अशी योजना त्यांनी आखली होती.

ओमनी कुरीच्या प्रोग्रामिंगमध्ये असे काही बदल केले होते की शत्रू राष्ट्राला काही करणे अशक्य होऊन बसले. त्यांनी कठोर पाऊल उचलले आणि संपूर्ण बेटच उध्वस्त करण्याचा घाट घातला जात होता..

ही अत्यंत महत्त्वाची गोपनीय माहिती ओमच्या मोठ्या भावाला म्हणजेच शर्वाला मिळाल्यानंतर त्याने तातडीने आपल्या लॅबमधून बाहेर पडून त्याच्या प्रोजेक्टच्या प्रमुखांना भेटायला वेधशाळा गाठली. काही आपत्तीजनक घडण्याच्या आधीच त्याचे गांभीर्य वेधशाळेच्या व्यवस्थापन समितीला लक्षात आणून द्यायची वेळ आली होती. एका मिनिटांत शर्वाने डॉ. वज्रिन यांना दक्षतेचा कॉल केला..

... त्याने ओमला सुद्धा इमर्जन्सी आहे असे कळवले होते. देशसेवेचे असिव्रत अंगिकारलेले ओमसारखे अनेक युवक देशासाठी आपल्या ज्ञानाचा चांगल्या प्रकारे उपयोग करून शत्रूचे मनसुबे यशस्वी होऊ देत नव्हते.

एका रात्री शत्रूराष्ट्राने अचानक केलेल्या अण्वस्त्र हल्ल्यात खरंतर असंख्य निष्पाप लोकांचा बळी जाणार होता. पण कुरीसारखे असंख्य रोबो क्षणात उघड्या जागेवर पोहोचले.. आणि त्यांच्या बलूनसारखा आकाराच्या सेलमध्ये असंख्य नागरिकांना त्यांच्या आत येण्यास पुकारले गेले. त्या घातक अशा विनाशकारी किरणोत्सार्गापासून नागरिकांना संरक्षण दिले होते.. जगासमोर या अद्वितीय घटनेमागचे रहस्य मात्र हळूहळू उलगडत होते.

... रोबो स्वयंचलित असले तरी.. विवेकीपणाने मानवजातीच्या कल्याणाची जबाबदारी संपूर्णपणे त्यांच्यावर सोपवण्यात मानवाच्या प्रगतीची सार्थकता आहे हे रोबोंनी आत्मसात करून सिद्ध केले आहे..

**सौ. मुग्धा कानिटकर**, सांगली, मो. 9403726078



## 9. लेख - मैत्री - एक अनमोल अनुभूती - डॉ. मीना श्रीवास्तव



मैत्री ही दोन अथवा अधिक व्यक्तींना जोडणारे एक नाजूक स्नेहबंधन आहे. हे एक असे अक्षय पात्र आहे, ज्यात प्रेम, विश्वास आणि आपलेपणाच्या भावना काठोकाठ भरलेल्या असतात. ही शक्ति आपल्यासाठी संकटमोचन बनून प्रत्येक आपत्तीत आपले रक्षण करते. निसर्गदेवतेचा दानयज्ञ आदिकाळापासून सुरू आहे. सूर्य ज्याप्रकारे आपली ऊर्जा आणि प्रकाश देतो (म्हणून तर आपण त्याला मित्र म्हणतो), वृक्षवल्ली ज्याप्रकारे उष्ण उन्हाने त्रस्त झालेल्या पांथस्थाला शीतल छाया प्रदान करतात, किंवा नदी ज्याप्रकारे तहानलेल्यांना जल देते, अगदी त्याच प्रकारे मैत्रीदेखील निरपेक्ष भावनेने दात्याची भूमिका साकार करते. इथे कुठल्याही अटीला किंवा स्वार्थाला स्थान नसते.

**चन्दनं शीतलं लोके, चंदनादपि चंद्रमाः ।**

**चन्द्रचन्दनयोर्मध्ये, शीतला साधुसंगतः ।।**

**भावार्थ -** जगात चंदन हे अतिशय शीतल मानले जाते. या शीतल चंदनापेक्षाही चंद्र अधिक शीतल आहे. मात्र चंद्र आणि चंदन या दोहोंपेक्षाही चांगल्या मित्रांची संगत (साधुसंगति) अधिक शीतलता देणारी, म्हणजेच मनाला शांती देणारी आहे.

आपण नेहमी म्हणतो की माणूस त्याचे नातेवाईक निवडू शकत नाही. पण जात्याच समाजप्रिय असल्याने तो स्वतःचे मैत्र निवडतो. मंडळी, मैत्र म्हणजे मित्र आणि मैत्रीण यांना एकत्र आणणारा हा सुंदर मिश्रित शब्द, अगदी बाळकृष्णाला प्रिय असलेल्या माखनमिश्री सारखाच मधुर! म्हणूनच आपण होऊन राजी खुशीने जोडलेले हे नाते वर्तुळासारखे असते, त्याला शेवट नसतो, किंबहुना जिथे नात्याचा शेवट होतो ती खरी मैत्री नव्हेच! "आधी बीज एकले, बीज अंकुरले, रोप वाढले" असे मैत्रीचे नाते बहरते. मात्र त्यासाठी परमविश्वासाचे जल, श्रद्धेचे खत आणि प्रेमाचा सूर्यप्रकाश मिळाला नाही तर ते खुरटणार हे नक्की. संपत्ती, मालमत्ता, जातपात, धर्म, शैक्षणिक अर्हता, लिंगभेद हे फरक खऱ्या मैत्रीच्या अंतरंगाला स्पर्श देखील करू शकत नाहीत. खरे पाहिले तर माता पिता, बंधू भगिनी, पत्नी, मुले आणि अन्य आप्तजनांच्या गराड्यात असून व त्यांचे भरपूर प्रेम आणि आत्मीयता लाभून देखील आपण खऱ्या मैत्राचा शोध घेण्यासाठी कां बरे आसुसलेले असतो? ते यासाठी की आपण आपल्या आप्तांशी आधीपासूनच बंधनाच्या सीमारेषांत अडकलेलो असल्याने त्यांच्यासमोर मनाच्या गर्द गाभाऱ्यात दडलेल्या प्रत्येक विचार आणि भावनांना प्रकट करू शकत नाही. इथे आपल्याला अंतर्बाह्य समजून घेणारा आपला हक्काचा मित्रच असतो. म्हणूनच जर आपल्या जीवनात एक जरी खरा मित्र असेल तर निश्चितच आपल्याला मानसिक संतुष्टी आणि शांती प्राप्त होते. आपला मित्र आपल्या उणीवांकडे दुर्लक्ष करतो आणि त्यांच्यासकट मोठ्या मनाने आपल्याला हृदयाशी धरतो. त्याला ठाऊक आहे की सुंदर गुलाबासोबतच त्याला कधीकधी काटेही टोचतील.

**फ्रेंडशिप डे (मैत्रीदिन)**

– – या दिनाच्या उत्पत्तीचे सर्वात प्रचलित कारण हे पहिल्या महायुद्धानंतरच्या ‘ निराशाजनक परिस्थितीवर मात करण्याची आणि मैत्रीद्वारे जागतिक ऐक्य, मैत्रीपूर्ण संबंध आणि शांतता प्रस्थापित करण्याची इच्छा ’ या भावनांशी जोडले गेले आहे. हॉलमार्क कार्डचे संस्थापक जॉइस हॉल यांनी १९१९ मध्ये ऑगस्टच्या पहिल्या रविवारी फ्रेंडशिप डे साजरा करण्याची कल्पना सुचवली जेणेकरून, लोक एकमेकांचे आभार मानू शकतील आणि मैत्रीची भावना उत्सवासारखी साजरी करू शकतील. १९३५ साली अमेरिकन काँग्रेसने हा दिवस 'राष्ट्रीय मैत्रीदिन' म्हणून घोषित केला. तसेही आठवड्याचा अंतिम दिवस म्हणजेच रविवार हा उत्सव साजरा करण्यासाठी उपयुक्तच आहे. बदलत्या काळानुसार हे 'सेलिब्रेशन' अखिल जगात लोकप्रिय संस्कृतीचा अनिवार्य भाग बनले आहे. या बाबतीत उत्सवप्रिय भारतीय मागे कसे राहतील? म्हणूनच आपल्या देशातही मैत्री व्यक्त करण्यासाठी हा दिवस मोठ्या उत्साहात साजरा केला जातो.

आजकाल आपण वर्षातील एका ठराविक दिवशी मैत्रीदिन साजरा करतो, परंतु मैत्री ही मानवाची सहज सामाजिक प्रवृत्ती आणि संस्कृती आहे. खऱ्या मैत्रीत अनेक तत्वे लागू होतात, पण सर्वात महत्वाचे म्हणजे परस्पर विश्वास आणि निष्ठा, परस्पर समजूतदारपणा, एकमेकांविषयी आदर, योग्य दिशेचे समर्थन आणि सहानुभूती! प्राचीन ग्रीक तत्वज्ञानी ॲरिस्टॉटल (३८४-३२२ इ. पू. ) च्या मते, मैत्रीचे तीन प्रकार असतात : उपयुक्तता, आनंद आणि सद्गुण. उपयुक्ततेवर आधारित मैत्री स्वतःच्या फायद्यांवर आधारित असते, उदा. शाळेतील मित्र किंवा कार्यालयीन सहकाऱ्यांमधील मैत्री. आनंदावर आधारित मैत्री एकमेकांच्या सहवासाचा आनंद घेण्यावर आधारित असते, जसे की सहलीची मौज लुटायला किंवा प्रवासाची मजा एकत्रपणे उपभोगायला मित्रच लागतात. सद्गुणांवर आधारित मैत्री सर्वोत्तम आणि स्थायी मानली जाते, कारण ती परस्पर आदर आणि एकमेकांच्या चारित्र्याबद्दलच्या कौतुकावर आधारित असते. ही सर्वोत्कृष्ट प्रकारची मैत्री मानली जाते. कारण यामध्ये दोन्ही मैत्र एकमेकांना त्यांचे व्यक्तिमत्व सुधारण्यास मदत करतात. ॲरिस्टॉटलचे मानणे होते की सद्गुणी मैत्री अत्यंत दुर्लभ आहे कारण त्यासाठी उच्च दर्जाचे चारित्र्य आणि सद्गुण आवश्यक असतात

आपल्या प्राचीन धर्मग्रंथांमध्ये खऱ्या मैत्रीची अनेक अनुकरणीय उदाहरणे आहेत. चिरंतन महाकाव्य रामायणच बघा, पुरुषोत्तम श्रीरामाची मैत्री कोणत्याही विशिष्ट जातीच्या किंवा कुळाच्या मर्यादेपल्याड दिसून येते. रामाचा प्रिय मित्र, ऋंगवेरपुरचा राजा निषादराज हा आदिवासी समुदायातील होता. अयोध्येतून निष्कासित झालेल्या रामाला निषादराज स्वतःचे संपूर्ण राज्य अर्पण करायला तयार होता. जेव्हा रावणाने पंचवटी आश्रमातून एकाकी सीतेचे अपहरण केले तेव्हा गिधाड पक्षी जटायूने रावणाशी निकराचे युद्ध केले. राजा दशरथासोबत परमसख्य असलेल्या या वृद्ध पक्षीराजाने या द्वंद्वयुद्धात आपल्या प्राणाची आहुतीही दिली. किष्किंधेचा युवराज वानर सुग्रीव याची सीतेच्या शोधात निघालेल्या श्रीरामाशी मैत्री झाली. अग्नीला साक्षी मानून सुग्रीवाच्या मैत्रीचा स्वीकार करणाऱ्या रामाने या मैत्रीखातर वाली आणि सुग्रीव यांच्यातील द्वंद्वयुद्धात सुग्रीव मागे पडताना दिसताच वृक्षाच्या आडून वालीवर बाण सोडला. "मी धर्माचे केले पालन, वालीवध ना खलनिर्दालन" असे सांगत रामचंद्र आपल्या मित्रधर्मासाठी केलेल्या या कृत्याचे समर्थन करतात. यासाठी राघवेंद्राने आपल्या निष्कलंक चारित्र्यावरील हा कलंक देखील आनंदाने स्वीकारला. दयेचा सागर असलेल्या रामाने बिभीषण या रावणाच्या धाकट्या भावाशी निरपेक्ष मैत्री केली आणि हा 'घरभेदी' रामभक्त बिभीषण लंकेच्या नाशास

कारणीभूत ठरला. श्रीरामांना सुवर्णलंकेच्या सिंहासनावर बसवण्यास अत्यंत आतुर असलेल्या बिभीषणाला श्रीरामांनी तसे करण्यापासून परावृत्त केले.

महाभारत या महाकाव्यात तर मैत्रीचे अनेक पैलू दृष्टीस पडतात. कृष्ण आणि त्याचा गुरुबंधु सुदामा यांच्या मैत्रीचे वर्णन बहुप्रचलित आहे. सुदाम्यासारख्या दरिद्री ब्राह्मणाने भेट दिलेल्या मूठभर पोह्यांच्या बदल्यात द्वारकाधीश कृष्ण आपल्या बालमित्राला भव्य राजमहाल आणि भूलोकीच्या समस्त ऐश्वर्याचे सौख्य प्रदान करतो. दुसऱ्या बाजूला एकाच गुरुकडे ज्ञानार्जन केलेल्या दरिद्री द्रोणाचार्यांना त्यांचा गुरुबंधू पांचालनरेश द्रुपद सत्तेच्या धुंदीत त्यांची बालपणीची मैत्री विसरून जात त्यांनी मागितलेली एक गाय देखील दान देण्याचे नाकारतो. कृष्ण आणि अर्जुन समवयस्क आहेत. ते भावांपेक्षा अधिक मित्र आहेत! कृष्ण अर्जुनाची इच्छा पुरवीत कुरुक्षेत्राच्या युद्धात त्याचा सारथी होण्यास सिद्ध होतो. आपल्याच स्वजनांना कुरुक्षेत्रात आपल्या समोर बघून भावनांच्या आवेगात क्षत्रियधर्म विसरलेला अर्जुन गलितगात्र होतो. या मोक्याच्या प्रसंगी शस्त्रांचा त्याग केलेल्या अगतिक अर्जुनाला त्याचा परमप्रिय सखा श्रीकृष्ण गीतेचा अजरामर उपदेश करतो आणि प्रेरक होत त्याला युद्धासाठी सज्ज करतो. रणधुमाळीत कौरवांचे सेनापती असलेले महापराक्रमी पितामह भीष्म जेव्हा अर्जुनापेक्षा अधिक प्रभावशाली दिसू लागतात तेव्हा क्रोधायमान झालेला कृष्ण आपलीच प्रतिज्ञा मोडून टाकीत मोडलेल्या रथाचे चक्र उचलून भीष्माला मारायला त्यांच्या अंगावर धावतो. कृष्णनीतीचा वापर करीत श्रीकृष्ण अत्यंत कौशल्याने अर्जुनाकरवी जयद्रथाचा वध करवतो, तसेच निःशस्त्र भीष्म आणि कर्णाचा वध करण्याची अर्जुनाला आज्ञा देतो.

कृष्णसखी कृष्णा, म्हणजेच श्यामलवर्णी द्रौपदीचे कृष्णाशी असलेले अलवार नाते हे एका पुरूष आणि स्त्रीमधील उत्कट भावनिक, अशारीरिक आणि अपार स्नेहबंधनाचे एक अद्वितीय उदाहरण आहे. जेव्हा द्रौपदीचे वस्त्रहरण झाले तेव्हा श्रीकृष्णानेच तिला संकटातून वाचवले. नंतर जेव्हा द्रौपदीने कृष्णाला विचारले की त्याला येण्यास इतका वेळ का लागला, तेव्हा कृष्ण उत्तरला, "तू मला बोलावताच मी आलो ना! " लज्जेने निरुत्तर झालेल्या द्रौपदीला आठवले की, तिचे पंच पती, महाराजा धृतराष्ट्र, तिचे वडीलधारे आणि हस्तिनापूरच्या दरबारात उपस्थित असलेले मंत्री व योद्धे या सर्वांना केलेल्या प्रार्थना निष्फळ ठरल्यानंतर सर्वात शेवटी तिला तिच्या प्रियसख्याचे, श्रीकृष्णाचे स्मरण झाले.

सुभाषितकारांनी सन्मित्राची काही लक्षणे सांगितली आहेतः

*शुचित्वं त्यागिता शौर्यं सामान्यं सुखदुःखयोः।*
*दाक्षिण्यं चानुशक्तिश्च सत्यता च सुहृद्गुणाः।।*

**भावार्थ-** पावित्र्य, त्याग, शौर्य, सुखदुःखात समसमान भाव असणे, साधेपणा आणि निःस्वार्थ प्रेम, हे सन्मित्राचे सद्गुण आहेत.

त्याच प्रमाणे सुभाषितकार कुमित्राचे दुर्गुणही सांगतात.

*रहस्यभेदो याञ्चा च नैष्ठुर्यं चलचित्तता।*
*क्रोधो निःसत्यता द्यूतमेतन्मित्रस्य दूषणम् ॥*

**भावार्थ-** रहस्य प्रगट करणे, याचना करणे, निष्ठुरता, चंचल मन, क्रोध, खोटेपणा, जुगाराचे व्यसन इत्यादी ही कुमित्राची दूषणे आहेत.

.... अशी माणसे मैत्रीला पात्र नसतात. याबाबतीत कर्ण व दुर्योधन यांच्या मैत्रीचे उदाहरण देता येईल. महाभारतातील हे घनिष्ठ पण स्वार्थी मैत्रीचे उदाहरण आपल्याला एक वेगळाच धडा शिकवून जाते. दुर्योधन स्वतःच्या स्वार्थासाठी सारथीपुत्र म्हणून हिणवल्या गेलेल्या कर्णाला अंगदेशाचा राजा करतो. दुर्योधनाच्या या कृपेच्या ओझ्याखाली दबलेला सुस्वभावी आणि गुणवान कर्ण दरवेळी दुर्योधनाच्या घोर चुकांचे समर्थन करतो. मैत्रीने आंधळा झालेला हा प्रथम कुंतीपुत्र दुर्योधनाच्या सर्व कुटील योजनांमध्ये सहभागी होतो, कहर म्हणजे द्रौपदीचे वस्त्रहरण करण्याच्या घृणास्पद घटनेतही तो दुर्योधनाची बाजू घेतो. कुरुक्षेत्र युद्धापूर्वी, भगवान श्रीकृष्ण आणि त्याची माता कुंती कर्णाला त्याच्या जन्माचे रहस्य सांगत, तो जेष्ठ पांडव असल्याने त्याने पांडवांच्या पक्षात यावे असे सुचवतात. पण दुर्दैवाने कर्णासाठी दुर्योधनाशी मैत्री सर्वतोपरी महत्वाची आहे. याच कुसंगतीचा बळी ठरलेला हा प्रथम कौंतेय युद्धात अर्जुनाकडून, अर्थात आपल्याच धाकट्या भावाकडून मारला जातो.

या दोन प्राचीन महाकाव्यांच्या व्यतिरिक्त मला आणखी दोन रंजक आणि उपदेशपर ग्रंथ आठवतात, इसापनीती आणि पंचतंत्र! त्यामध्ये प्राणी आणि पक्ष्यांमधील अनोख्या मैत्रीच्या अनेक नैतिक बोधकथा आहेत. इसापनीतीमधील सिंह आणि मानव यांच्यातील मैत्रीची कथा मला खूप आवडते. अँन्ड्रोकल्स नावाचा एक गुलाम त्याच्या क्रूर मालकापासून पळून जातो आणि जंगलात लपतो. तिथे त्याला एक जखमी सिंह आढळतो. अँड्रोकल्स सिंहाच्या पायातील काटा काढतो. यामुळे त्या सिंहाची वेदनांपासून सुटका होते. नंतर अँन्ड्रोकल्सला पकडले जाते आणि एका भुकेल्या सिंहासमोर मरण्यासाठी रिंगणात टाकले जाते. मात्र सिंह अँन्ड्रोकल्सला त्याची मदत करणारा माणूस म्हणून लगेच ओळखतो आणि त्याच्यावर हल्ला करण्याऐवजी त्याला प्रेमाने मिठी मारतो. हे बघून सर्वांना खूप आश्चर्य वाटते. या अनोख्या मैत्रीने सम्राट प्रभावित होतो आणि अँन्ड्रोकल्स आणि सिंह दोघांनाही मुक्त करतो.

प्रिय वाचकांनो, आपण आपल्या मित्राचे प्रेम हिरे आणि रत्नांनी भरलेल्या पेटिकेसारखे जपले पाहिजे. हिरे आणि रत्ने चोरीला गेल्यास कदाचित परत प्राप्त होऊन शकतात, परंतु एकदा का तुमचा खरा मित्र कोणत्याही कारणास्तव तुमच्यापासून दूर गेला की तो कधीही परत येणार नाही. कवी रहीम हे मुघल सम्राट अकबराच्या दरबारातील नवरत्नांपैकी एक होते. त्यांचे दोहे जीवनातील तत्वज्ञान अतिशय सुरेख रीतीने विशद करतात. त्यांच्या एका दोह्याचा भावार्थ असा:

.... "प्रेमाचा धागा खूप नाजूक असतो. तो झटका देऊन तोडू नये. जर तो तुटला तर तो पुन्हा जोडता येत नाही आणि जरी पुन्हा जोडायचा प्रयत्न केला तरी गाठ राहतेच. "

मैत्री आणि विश्वास या दोन बाजू आहेत एकाच नाण्याच्या,
एकाविना दुसरे राहूच शकत नाही,

***विश्वास राखून मैत्री सदैव जपली जाते,***
***ती जीवनभराची अनमोल सखी बनते ||***

**डॉ. मीना श्रीवास्तव, ठाणे** मो – ९९२०१६७२११ *९९२०१६७२११, ई-मेल –drmeenashrivastava21@gmail.com*

10. कविता - सृष्टीची प्रीत! – सौ. मंजिरी येडूरकर



*

*प्रीत भारली रात्र जागते, काम पहाऱ्याचे*
*जसे कोरडे जळात राहून, पत्र कमलाचे*

*

*रूप सजले शृंगाररसाने चिंब सृष्टीचे*
*ऐकू दे विश्व सूर, मधुर किणकिणाटाचे*

*

*विचलित झाले चित्त, माडाआड रजनीकराचे*
*बघ संथला थोडा, अंतर पाहून रोहिणीचे*

*

*कोमल झाले स्वर गाजाचे, वाहत्या रत्नाकराचे*
*हळूच येतो बघ, चुंबण्या ओठ तीराचे*

*

*थरथरली धरती, उधळले मोती चांदण्याचे*
*झुकले आकाश थोडे, क्षण हेच गांधर्वविवाहाचे*

*

*भंग पावले, तपाचरण, बक ध्यानाचे*
*उमटले मनी ठसे, मेनकेच्या, ओल्या पदरवाचे*

*

*मेघा, नकोस झाकू, लुकलुकते डोळे तारकांचे*
*पाहू दे त्यांनाही, गंध, धुंदल्या प्रणयरंगाचे*

*

*ऐक जरा, दयाळ छेडतो, अवरोह सोहनीचे*
*सावरतील साऱ्या, ढळते वस्त्र शालीनतेचे*

*

*पक्षी निघाले दिगंतरी, आळवीत सूर भूपाळीचे*
*अरुणिमा पसरली, आगमन झाले दिनकराचे….*

*

**सौ. मंजिरी येडूरकर** मो. 942109661

11. कविता - मी कुठे बंदिस्त झालो... - श्री विष्णू सोळंके



*

*मी कुठे बंदिस्त झालो गझलेच्या शेरामधे*

*मी कधी अभंग आणि व्यक्त झालो गीतांमध्ये..*

*

*वृत्त मात्रा, वेदनेच्या भोवती आहेच माझ्या?*

*संघर्ष नाही संपलेला मीच हसतो पोवाड्यामधे...*

*

*आसवांचा हा घरोबा आहे जुना जीवनाशी*

*फक्त कविता सोबतीला, धीर देते दुःखामधे..*

*

*दंगलीचा खेळ त्यांचा रोजचा व्यवसाय झाला*

*रोज मरती लोक येथे ती स्मशानी चीतेमधे....*

*

*तो पुढारी रोज कैशा देत आहे घोषणा?*

*कृष्ण आता येत नाही, माणसांच्या संकटामधे....*

*

**श्री विष्णू सोळंके**, काव्य संध्या, मुदलियार नगर, अमरावती ४४४६०४.   मो ७०२०३००८२४

## 12. लेख - पाऊस– कवींच्या मनातला... सुश्री संगीता कुलकर्णी



पाऊस... पावसाचे रंग किती वेगवेगळे... मनसोक्त भिजवणारा, कधीरिमझिमणारा, कधी मुसळधार, कधी वादळवा-यासह येणारा, कुणाच्या अंगणात व कुणाच्या गॅलरीत मनसोक्त धडकणारा तर एकाच छत्रीत पाऊस अंगावर झेलणा-या प्रेमीयुगुलांचा, हिरवीगार बहरलेली शेते पाहून वरुणराजाचे आभार मानणा-या शेतक-यांचा, लहानपणीच्या मित्रांसोबत सोडलेल्या कागदी होड्यांत, तरुणाईत धबधब्याखाली लुटलेल्या त्या मजेत... नी सृष्टीला नवचैतन्य देणारा हा पाऊस वर्षानुवर्षे पडतोय आणि तो पडतच राहणारही आहे..

प्रत्येकाच्या मनातला.. मनात दडलेला व वेड लावणारा हा पाऊस आणि या पावसाला सुंदर शब्दांच्या घट्ट मुठीत पकडले ते आपल्या सुंदर शब्दांमध्ये अनेक कवीं कवयित्रींनी...

पावसाला बंदिस्त करण्याचे धाडस फक्त कवी- कवयित्रीच करु शकतात बरं...!

मग मला आठवतो तो कवीं कवयित्रींच्या शब्दांतून बरसणारा पाऊस... मराठी कवितांमध्ये, गाण्यांमध्ये या पावसाची विविध रुपं उलगडत गेलेली आपल्याला दिसतात.

"येरे येरे पावसा, तुला देतो पैसा, पैसा झाला खोटा, पाऊस आला मोठा. "

हे बालगीत तर आपल्या प्रत्येकाच्या मनात लहानपणापासूनच पक्क बसलेलं नी पाऊस येताच हे बालगीत गुणगुणतच आपल्याला पावसाची

ओळख झाली..

लहानपणी पाऊस मजेदार असतो नाही.. शाळेला सुट्टी मिळावी म्हणून तो आवडत ही असतो... शाळेत जातांना पावसाच्या पाण्यात खेळण्याचा आनंद कायम मिळावा आणि शाळेला सुट्टी मिळावी यासाठी आर्जव करणारी बालमनातील इच्छा मंगेश पाडगावकरांनी अलगदपणे पकडली आहे.. ते म्हणतात...

"सांग सांग भोलानाथ, पाऊस पडेल काय?

शाळेभोवती तळे साचून सुट्टी मिळेल काय?

आजही मुसळधार पाऊस पडल्यावर ऑफिसात जाताना हे बालगीत मनोमन जस मला आठवत तसं आठवत असेल ना आपल्या सगळ्यांनाच... आपण कितीही मोठे झालो तरी कुठेतरी एक लहान मूल आपल्यात दडलेलं असतं. असंच लहान मूल पाडगावकरांतही दडलेलं होतं. मंगेश पाडगावकरांनी लिहिलेले हे बालगीत लहानांबरोबरच मोठ्यांच्याही आवडीचं.. त्यामुळेच हे बालगीत पटकन मनाची पकड घेते... तर पावसाळी वातावरणाची शब्दरूपी मांडणी बा. भ. बोरकरांनी फारच सुंदररित्या केली आहे ते म्हणतात...

*गडद निळे, गडद निळे जलद भरून आले*

*शितल तनू, चपल चरण, अनिल गण निघाले.*

बोरकरांची ही कविता आजही आपल्या प्रत्येकाच्याच ओठांवर आहे...

मनाला भुरळ घालणा-या या पावसाचा आनंद जितका आपल्याला होतो तितकीच काळजी ही घराबाहेर पडलेल्या आपल्या माणसांची असते.

प्रत्येकाच्या घरामध्ये सहजपणे जाणवणारे हे दृश्य कवी अनिल यांनी फार सुंदर रेखाटले आहे.. ते म्हणतात

***बाई या पावसानं लावली झिमझिम***

***भिजली की माळरान, उदासल मन,***

***नदी नाले एक झाले, पूर भरूनीया आले***

***जीवलग पडे बाई कुठे अडकून,***

***नच पडे चैन बाई या जीवाला"***

मुसळधार पडणारा हा पाऊस गुलाबी असा गारवा घेऊन येतो व पावसात मनसोक्त भिजण्यारा, ओसंडून वाहणारा आनंद शांता शेळके यांनी आपल्या शब्दामध्ये अगदी सहजपणे पकडत त्या म्हणतात

***आला पाऊस मातीच्या वासात गं***

***मोती गुंफीत मोकळ्या केसात गं.***

कॉलेजकट्ट्यावर पावसा सोबतच्या गरम भज्यांची नी कटिंग चहाची वाफाळती आठवण करून देणारा हा पाऊस मनाला अगदी चिंब चिंब करतो... करून टाकतो व या गारव्यात गरमागरम चहा व भजी खाण्याची माझीच काय आपणा सर्वांचीच इच्छा अनावर होते.. प्रत्येकाच्या मनातील ही इच्छा कवयित्री बहिणाबाईं यांनी ओळखली

आणि ती शब्दांत पकडून ठेवत त्या म्हणतात...

***येता पाऊस पाऊस***

***पावसाची लागे झडी***

***आता खा रे वडे, भजे***

***घरामध्ये बसा दडी...***

प्रत्येकाच्या मनातील ही इच्छा या शब्दांतून निथळत राहते..

असे या पावसाचे सुंदर वर्णन अनेकांनी केलेले आहे..

एक दिवस अचानक खूप पाऊस पडतोय... सगळे संकेत मोडून.. अगदीच चुकीच्या वेळीही... आत्ता नकोच आहे तो यायला पण तरीही थैमान घालतोय..

आसपास.. सगळीकडे नी मनातसुद्धा... मग अशा वेळेला मला कडकडून भेटते इंदिराबाई संतांची कविता.. पावसासारखीच...

*नको नको रे पावसा असा धिंगाणा अवेळी*

*घर माझे चंद्रमौळी आणि दारात सायली...*

*नको नाचू तडातडा असा कौलारावरून*

*तांबे सतेली पातेली आणू भांडी मी कोठून?..*

पाऊस म्हणजे प्रेम हे समीकरण तर असे घट्ट

पाऊस कवींचा सोबती असतो... त्याचा माझा पाऊस एकमेकांसाठी वेगळेच संकेत घेऊन येतो..

माझ्यातील कवयित्री जागी होत म्हणते...

*तन चिंब भिजलेले*

*मन धुंद मोहरले*

*पावसाच्या ओढीने*

*बेधुंद थरथरले*

*स्पर्शाने तुझ्या*

*थरथरली काया*

*उतरली माझ्या ओठी*

*मनातली अबोल भावना*

*तनुस होता स्पर्श*

*झंकारती तप्त सूर*

*प्रेमाच्या त्या स्पर्शाने*

*शहारले अंग अंग*

*खुलवतो गंध तुझा*

*अंगी उभा रोमांच*

*नजरेतून तुझे खेळणे अन्*

*स्पर्श हवाहवाच*

*माझा श्वास तुझ्या मिठीत*

*आज एकांतात*

*व्हावे मनोमिलन.....!!*

बाहेर मुसळधार कोसळणारा पाऊस माझ्या मनात वेगळा बरसत असतो... पावसाचा आवाज त्याचे अस्तित्व दाखवून देत असतो

सांजवेळी पडणाऱ्या पावसाच्या प्रत्येक थेंबागणीक गतकाळातील चित्र डोळ्यासमोर येत राहते नी मी म्हणते...

*सांजवेळी कोसळताना*

*मनाला स्पर्श करून जात होता..*

*आठवणींच्या विरह वेदनेत*

*अश्रूंचा पूर वाहत होता..*

*शरीरासम मनालाही*

*भिजवत होता..*

*"तो" पाऊस कोसळत होता*

*हलकेचं साद देऊनी जात होता..*

*नयनातील आसवांचा*

*एक प्रेमाचा पुकार होता..*

*दाटून आलेल्या नयनात*

*आनंदाचा आधार होता..*

पाऊस सखा होतो- सोबतीही होतो आपला..

मुसळधार पडणारा पाऊस खिडकीत उभा राहून पहा

बघ माझी आठवण येते का?

आपल्या एकांतात आणि दाटून येतो अंगभर तसाच... अशा वेळी मी माझ्यातील 'मी 'ला भेटते नि आपसूकच ओळी बाहेर पडतात..

*एकांतात बरसणा-या पावसाला*

*सहन होत नाही माझा एकांत*

*बरसतो वेळी-अवेळी*

*देण्यासाठी साथ..!*

*आठवणींच्या गर्दीत देतो आधार*

*एकत्र असताना देतो मात्र हुलकावणी*

*माझ्या सोबत असतात*

*तू आणि पाऊस..!*

*सुंदर क्षणांची सवय असते मनाला*

*आठवणींच्या गर्दीत हरवून जाते स्वतःला*

*वाट पाहणं सोडणार नाही*

*अश्या वागण्यावर रागावणार नाही..!*

*सरींच्या अल्लडपणात शोधते मी तुला*

*तू ही शोधत असशील असचं मला*

*मनाच्या लहरी सरीतून माझ्यावर बरसाव्या*

*मनाच्या आठवणींचा कल्लोळ ओळख पटवून द्यावा...!*

*कुठेतरी दूरवर असतो.... तो पाऊस*

*आयुष्यात मात्र तो आहे*

*मनामनाची वीण ठेवतो जोडून*

*पुन्हा कधी येऊ एकत्र.. माहीत नाही?*

*तोवर... एकमेकांना शोधत राहू..*

*पावसाच्या सरीत...!!*

*प्रत्येकाचा पाऊस तसा वेगळाच असतो...*

*असा हा पाऊस..*

अनेक कवींना कवयित्रींना तो दिसला, भावला, त्यांनी अनुभवला, तसा तो त्यांनी शब्दबध्द केला... कवीच्या, कवयित्रींच्या शब्दांतून पानावर तो बरसत राहिला आहे आणि पुढेही बरसेल.

**सुश्री संगीता कुलकर्णी, ठाणे लेखिका/ कवयित्री मो 9870451020**



## 13. कथा - तीर्थस्वरूप बाबा… – सौ. उज्ज्वला केळकर

(अनुवादित कथा)

**तीर्थस्वरूप बाबा,**

**शिरसाष्टांग नमस्कार.**

माझ्या चाळीसाव्या वर्षाच्या वाढदिवसाच्या निमित्ताने तुम्ही पाठवलेले पत्र मिळाले. सत्तराव्या वर्षीसुद्धा आपले अक्षर गोल गोल मोत्याप्रमाणे आहे. आपलं प्रत्येक पत्र मी माझ्या खजिन्यात सांभाळून ठेवलंय. तो माझा वारसा आहे, वडिलार्जित संपत्ती आहे. धावपळीच्या जीवनात मला जेव्हा एकाकी वाटतं, किंवा कमजोर, निराश झालोय, असं वाटतं, तेव्हा मी आपली पत्रे उघडून वाचतो. मला त्यांचा मोठा आधार वाटतो.

बाबा वयाच्या या टप्प्यावर आल्यावर, मागे वळून पहाताना मोठी मजा वाटते. आज मी आपल्याला काही सांगू इच्छितो. काही न सांगितलेल्या गोष्टी सांगू इच्छितो. काही अस्पर्शित कोपरे आहेत, त्यांना स्पर्श करू इच्छितो. बाबा, मला या गोष्टीचा नेहमीच अभिमान वाटत आलाय, की आपल्यासारखे वडील मला मिळाले. मी जेव्हा लहान होतो, तेव्हा आपण मला खोलवर रुजणारी मुळे दिलीत. मी जेव्हा मोठा झालो, तेव्हा आपण मला पंख दिलेत. आपण मला आपल्या डोळ्यांनी स्वप्ने बघायला प्रेरित केलंत, दुसऱ्याच्या डोळ्यांनी नाही. जेव्हा मी स्वतःला शोधायच्या प्रवासाला निघालो, तेव्हा आपण मला उमेद दिलीत. जेव्हा मी माझे भविष्य घडवायला निघालो, तेव्हा आपण मला उत्साह दिलात. आपण मला हृदयाचा आवाज ऐकायला शिकवलंत. दररोज सकाळी आपण मला हसण्यासाठी कारण दिलंत. दररोज संध्याकाळी आपण मला उल्हास दिलात. आपण मला शिकवलंत, की अडचणी असतानाही हे जग म्हणजे राहण्यासाठी अतिशय सुंदर जागा आहे.

माझ्या लहानपणी आपण मला खूप छोटे छोटे आनंद दिलेत. मला आठवतंय, एक लहान मुलगा हलवायाच्या दुकानावर गरम गरम जिलब्या आणि सामोसे खातोय. रविवारी रामबागेत फुगे उडवतोय. झोपाळ्यावर झुलतोय. फुलपाखरं पकडतोय. इंद्रधनुष्य बघून खिदळतोय. प्राणीसंग्रहातील प्राणी आणि पक्षी बघून हसतोय. पतंग उडवतोय. गोट्या खेळतोय. काजव्यांच्या मागे धावतोय. कबुतरांना दाणे घालतोय. प्रत्येक कळीला, फुलाला कुरवाळतोय. कुत्र्या - मांजारांच्या पिलांना प्रेमाने जवळ घेऊन त्यांच्या अंगावरून हात फिरवतोय आणि त्याचा बाबा त्याच्या प्रत्येक आनंदात, खुशीत सहभागी होतोय. रोज सकाळी कॅम्पसमधे फिरून यायचं. सुट्टीच्या दिवशी बागकाम करायचं. आपल्याबरोबर बटाटे, कोबी, गाजरं, मुळे उगवताना तो स्वतःदेखील उगवला-वाढला.

बाबा, आपला नातू आता मोठा झालाय. काल आपला ई-मेल अकाउंट विचारत होता. आबां (आजोबा)बरोबर इंटरनेटवर 'चाट 'करू इच्छित होता. मी त्याला सांगितलं, की आबांकडे कॉम्प्युटर नाही, तेव्हा त्याला वाईट वाटलं.

बाबा, मला वाटतं, की जे छोटे छोटे आनंद, खुशी मला आपल्याकडून मिळाली, ते आनंद, ती खुशी माझ्या मुलालाही मिळावी. तो दहा वर्षांचा झालाय, पण त्याने अजूनपर्यंत पतंग उडवलेला नाही. विट्टी-दांडू खेळला

नाही. गोट्या खेळल्या नाहीत. तो आंब्याच्या किंवा जांभळाच्या झाडावर चढला नाही. मला वाटतं, या सगळ्यातली मजा त्याला घ्यायला मिळावी. त्याचं बालपण अपुरं राहू नये. पण तो नव्या जनरेशनचा मुलगा आहे, ज्याला कार्ससुद्धा सेक्सी लागतात. तो कॉम्प्युटर आणि मोबाईलवर 'व्हिडीओ' गेम्स खेळतो. केबल टी. व्ही. वर असंख्य चॅनेल्स बघत मोठं होणाऱ्या पिढीतला तो मुलगा आहे. 'पोगो' आणि 'कार्टून' चॅनेल त्याचे फेवरीट चॅनेल्स आहेत. त्याला मॅकडोनॉल्ड आणि ' पिझ्झा हट'चा बर्गर, फिंगर चिप्स आणि चीज -टोमॅटो आवडतो.

त्याला हिंदीत, एक ते शंभर आकडे मोजणंसुद्धा अवघड वाटतं.. एकोणऐंशी आणि एकोणनव्वद यात त्याचा गोंधळ होतो. इंपोर्टेड वस्तू आणि फॉरीन ब्रँड याचं त्याला वेड आहे.

बाबा, तुम्हाला आठवतं, एकदा सुट्टीत तुम्ही मला आजोबांकडे ठेवलं होतंत, कारण मला आजोबा खूप आवडायचे. मी त्यांच्याबरोबर गावाजवळून वाहणाऱ्या नदीवर मासे पकडायला जायचो. मी त्यांना नेहमी जलतरंग वाजवताना ऐकायचो. ते खूप छान जलतरंग वाजवायचे. जलतरंग वाजवतानाचा त्यांचा चेहरा आजही माझ्या डोळ्यापुढे आहे.

‘'पापा जलतरंगला इंग्लिशमधे काय म्हणतात? ' पत्र वाचून माझ्याशेजारी बसलेला मुलगा मला विचारतोय.

तो टी. व्ही. वर चाललेली वन डे क्रिकेट मॅच बघतोय,. सचिन तेंडुलकरने शोएब अखतर च्या बाउंसरवर थर्ड मॅन बाउंड्री वर छक्का मारलाय. मुलगा खुशीने नाचत नाचत मला विचारतोय, ' पापा तुम्ही क्रिकेट खेळत होतात? '

'नाही बेटा मी पतंग उडवत होतो. गोट्या खेळत होतो. विट्टी - दांडू खेळत होतो. गावाजवळून वाहणाऱ्या नदीवर चपट्या दगडाने 'चकरी’ खेळत होतो' मी म्हणायचो.

'पापा, गाव कसा असतो? आणि विट्टी-दांडूला इंग्लिशमधे काय म्हणतात? 'चकरी' म्हणजे इंग्लिशमधे काय?' मुलगा विचारत होता.

बाबा, मला त्याच्या प्रश्नांची उत्तरे इंग्लिशमधे द्यायची आहेत.

सेहवागने मुश्ताकच्या चेंडूवर छक्का मारला. मुलगा खुशीने उसळत विचारतो आहे, 'पापा तुम्ही क्रिकेट का खेळत नव्हतात? ’

आठवणींच्या गल्लीत एक मुलगा कटलेला पतंग पकडत होता. एका हातात एक लांबलचक डहाळी होती आणि दुसऱ्या हातात काही लुटलेले पतंग. त्याचे हात-पाय धुळीने माखलेले होते. पण त्याच्या चेहऱ्यावर विजयाचे हास्य आहे. त्याची पाठ ओळखीची वाटत होती, पण बघता बघता तो दृष्टीआड झाला.

एकदा गावाच्या नदीवर मासे पकडताना मी आजोबांना विचारलं,

‘आजोबा आपण भूत बघितलंत? ’ आजोबा फक्त हसले.

‘आजोबा, आपण भुतांना घाबरता? ’ मी पुन्हा विचारले.

‘भूतांना नाही, वाईट लोकांना घाबरलं पाहिजे. ’ आजोबा म्हणाले.

‘पण माझे दोस्त म्हणतात, भुतं खूप भयंकर असतात. ’ मी म्हंटलं.

‘वाईट लोक भुतांपेक्षाही भयंकर असतात. ’ आजोबांनी माझ्या खांद्यावर हात ठेवत म्हंटलं.

‘आजोबा, वाईट लोक काय करतात? ’ मी कुतुहलाने विचारलं.

‘ते झाडं कापतात. जंगलं उजाड करतात. नद्या-नाले घाण करतात. माणसांना आणि पशू-पक्षांना मारतात.’ बोलता बोलता आजोबांचा चेहरा गंभीर झाला.

‘आजोबा, मी मोठा होईन ना, तेव्हा सगळ्या वाईट लोकांना मारून टाकीन. ‘ मी रागारागाने म्हंटलं. मला आजोबांचा गंभीर चेहरा पाहवत नव्हता. आजोबा हसतानाच छान दिसतात.

‘वाईट लोकांना नाही, वाईट प्रवृत्तीला, वाईट स्वभावाला मारायला हवं बेटा. ‘ माझा बोलणं ऐकून, माझी पाठ थोपटत, हसत हसत आजोबा म्हणाले.

*****

‘बेटा, दूध पी. हॉर्लिक्स घातलय त्यात. ’ स्वैपाकघरातून आपली सून म्हणत होती.

‘मॉम, ब्रेकनंतर! ’ क्रिकेट मॅच बघण्यात गुंतलेला मुलगा म्हणाला.

‘नऊ वुई टेक अ शोर्ट ब्रेक’ स्टार स्पोर्टवरील एक सुप्रसिद्ध कॉमेंटेटर म्हणत होता. आता कोका कोला पिणाऱ्या काही अर्धा-उघड्या मुली, निलाजरेपणाने आपले कुल्ले हलवत नाचत होत्या. कसला काळ आलाय.

बाबा, इच्छा अशी होती, की एकदा मुलाला त्याच्या पणजोबांच्या गावी नेऊन आणावं. म्हणावं, ‘बघ. तुझ्या पापांचे आजोबा इथे राहत होते. ’ त्याला गावातील शेत-मळे दाखवावे. वैरणीचा ढीग दाखवावा. गावाजवळून वाहणाऱ्या नदीत त्यानेही मासे पकडले असते. त्यानेदेखील गावातील आंब्याच्या, जांभळाच्या, चिंचेच्या झाडावर चढून, आंबे, जांभळे, चिंचा खाल्ल्या असत्या. त्याला गावातील मोठ्या वडीलधाऱ्या मंडळींना भेटवलं असतं. त्याला गावातल्या मंदिरात नेलं असतं. त्यानेदेखील गावातल्या विहिरीवर आंघोळ केली असती. पण आता ना राहिला गाव, ना राहिले आजोबा.

बाबा आजोबा आधी गेले, हे चांगलंच झालं. गावाजवळून वाहणाऱ्या नदीवर बांध घातल्यानंतर जलमग्न झालेला गाव त्यांना बघावा लागला नाही. नदीपलीकडे असलेलं जंगल कापताना त्यांना बघावं लागलं नाही. त्यांनी चांगल्या परिवेशातील वाईट लोक पाहिले नाहीत. बरं झालं आजोबा लवकर गेले. ते हे सगळं पाहू शकले नसते.

बाबा, या सुट्टीत मी आपल्या नातवाला आपल्याला भेटवण्यासाठी घेऊन येणार आहे. मला वाटतंय, की त्यानेही आपल्या आजोबांजवळ राहावं. त्यांच्याकडून खूप गोष्टी ऐकाव्या. त्याला सांगा, की एकदा बँक कॅशियरने मला चुकून जास्त पैसे दिले होते. तेव्हा आपण मला घेऊन बँकेत गेला होतात आणि ते जादा आलेले पैसे कॅशियरला परत केले होतेत. त्याला सांगा, असं करणं म्हणजे मूर्खपणा नाही. पण आपल्याच

नजरेतून उतरण्यापासून स्वतःला वाचवणं आहे. त्याला अंतरात्म्याचा आवाज ऐकायला शिकवा बाबा. त्याला सांगा, की कुठल्याही गोष्टीचं विदेशी किंवा इंपोर्टेड होणं हे काही त्याच्या चांगलं, दर्जेदार असल्याचं लक्षण नाही. तो आपलं बोलणं जरूर समजेल.

आपली सून जेवणासाठी आत बोलावते आहे. वांग्याचं भरीत आणि तुरीच्या डाळीची आमटी आज तिने बनवलीय. आपण असतात, तर म्हणाला असतात, 'वाः काय जेवण बनलंय! एकदम फक्कड! ' आपल्याला हे दोन्ही पदार्थ खूप आवडतात. आपण जवळ असलात की वाटतं, कुणा वयस्क माणसाची सावली शिरावर आहे.

आपली आठवण काढणारा..

आपला मुलगा,

... प्रशांत.

**मूळ कथा – पिता के नाम मूळ लेखक – श्री सुशांत सुप्रिय मो: 8512070086**

**मराठी भावानुवाद : सौ. उज्ज्वला केळकर**

***निलगिरी, सी-५ , बिल्डिंग नं २९, ०-३ सेक्टर – ५, सी. बी. डी. – नवी मुंबई , पिन – ४००६१४ महाराष्ट्र***

***मो. 836 925 2454, email-id – kelkar1234@gmail.com***



## 14. लेख - आयते दाणे, आळशी पंख.. – श्री जगदीश काबरे



दोन डोंगरांच्या मधोमध बसलेलं श्रीवर्धनपुर अजूनही मध्ययुगात वावरणारं गाव होतं. निसर्गाने समृद्ध असलेल्या या गावात पावसाच्या गंधाने माखलेला मातीचा वास सर्वदूर पसरला होता. ओल्या वाऱ्याच्या झुळुकीत दूरवरून बैलांच्या घंटांचा आवाज ऐकू येत होता. डोंगराच्या उंच कड्यांनी जणू त्या गावाला बाहूंमध्ये घेतलेलं होतं. सकाळच्या धुक्यातून उगवणाऱ्या सोनसळी सूर्यकिरणांनी गावाची लाल माती चमकू लागायची. नदीच्या वळणावरच्या काठावरच मातीच्या घरांची रांग होती, आणि मध्येच उंचवट्यावर उभं असलेलं गजराज महादेव मंदिर होतं. जणू काही गावाचं हृदयच! शंभर वर्षांहून जुनं. त्याच्या दगडी भिंतींवर शेवाळ चढलेलं होतं. हे मंदिर फक्त पूजा-अर्चेसाठी नव्हतं; तर ते गावाच्या सामाजिक आयुष्याचं केंद्र होतं. मंदिराच्या अंगणातच एक विशाल वडाचं झाड होतं. त्याच्या फांद्यांवर नेहमीच कावळ्यांची आणि कबूतरांची हीऽऽ गर्दी असायची.

.... तिथेच काही स्त्रिया, पितळेच्या थाळ्यांतून, मूठभर गहू, ज्वारी, तांदूळ टाकत बसलेल्या होत्या. त्यांच्या अंगावरच्या साड्यांचा पदर डोक्यावर घट्ट लपेटलेला होता आणि ओठाने कसलातरी मंत्र पुटपुटत होत्या. त्यांनी टाकलेल्या दाण्यावर कबूतरं तुटून पडली. त्यातील काहींची पिसं उडून गेली होती, काहींना धड उडायलाही जमत नव्हतं. देवळाच्या अंगणात गायींचा कळप चरत होता.. अशा या मंदिरात दररोज कडेला ठेवलेल्या पितळेच्या थाळ्यांमध्ये दाण्याच्या राशी कबूतरांच्या पंखाखाली अदृश्य व्हायच्या, आणि ओटीवर बसलेल्या वृद्ध स्त्रिया माकडांना केळी, लाडू, चपाती तुकडे देत बसायच्या. कबूतरं अंगणभर विखुरलेली होती. काही पंख पसरून उन्हात बागडत होती, तर काही डोळे मिटून बसलेली. त्यांच्या गळ्याचा रंग फिक्कट झालेला, चंचुप्रदेशावर गुठळ्यांसारखी सूज होती.

हे उडणारे जीव आता अंगणाच्या सीमा सोडून फारसं जातच नसत.

गावातली लहान पोरं शाळेत जायच्याआधी आई त्यांना म्हणायची, "बाळा, कबूतरांना मूठभर दाणा टाकलास तर गणपती बाप्पा तुला परीक्षेत पास करेल. " या वाक्यात कशाचा काही संबंध लागत नव्हता. पण प्रश्न विचारण्याची परंपरा इथे नव्हती. म्हणून कबूतरांना स्वतः अन्न शोधू देणं पुण्याहून कमी कसं असतं हा त्या गावातील कोणालाही प्रश्न पडत नव्हता. गावातल्या लोकांसाठी ही फक्त सवय नव्हती, तर ती श्रद्धा होती... पिढ्यानपिढ्या जपलेली.

याच गावात, दहा वर्षांनी परतला होता अभिजीत देशमुख... पुण्यात पर्यावरणशास्त्राचं शिक्षण घेतलेला, पक्षीशास्त्राचा अभ्यास केलेला... पक्ष्यांच्या वर्तनावर संशोधन केलेलं. शहरात त्याने कबुतरांमुळे पसरलेले रोग, माकडांचे मानवी वस्तीवरील हल्ले, साखळदंडाने बांधलेले हत्ती पाहिले होते. दुसऱ्या दिवशी सकाळी, तो मंदिरात गेला. पाहतो तो काय, कबूतरं दाण्याच्या राशीत लोळताहेत. काहींच्या पंखांवर जखमा त्याला दिसल्या,

काहींच्या डोळ्यांत पाणी होतं. याचा अर्थ त्यांना कुठला तरी रोग झाला होता. गायी अंगणात उभ्या होत्या. पोट भरलेलं तरीही गवताऐवजी प्रसादाच्या गुळावर तुटून पडत होत्या. गोड खायची चटक लागली होती त्यांना! माकडे भक्तांच्या हातून केळी हिसकावत होती. हे दृश्य बघून त्याच्या चेहऱ्यावर एक अस्वस्थतेची छाया पसरली. 'ही पूजा नाही, ही प्राण्यांची गुलामी आहे', त्याने मनाशी म्हटलं.

पांडुरंग काका मंदिरात ४० वर्षे सेवेत होते. लहानपणी त्यांचे वडील मंदिराचे पुजारी होते. त्यांना शिकवण्यात आलं होतं की, कबुतरे, गाई, माकडे या देवाच्या जीवांना अन्न दिलं म्हणजे पाप धुतलं जातं. त्यांची सकाळ पहाटे ४ वाजता सुरू होई. गंगाजलाने अंगण शिंपडणे, घंटा वाजवणे, आणि मग कबुतरांसाठी दाणा, गायींसाठी गूळ, माकडांसाठी केळी अंगणात टाकणे, त्यांच्यासाठी हे कर्म म्हणजे आयुष्याचं समाधान.

तो पांडुरंग काकांजवळ गेला. काका पांढऱ्या धोतरात, अंगावर मळकट अंगरखा, आणि ओटीवर बसून कबुतरांना दाणा टाकत होते. ते पाहून अभिजीत म्हणाला, "काका, तुम्ही रोज हा दाणा घालता, त्यामुळे त्यांना आता स्वतः अन्न शोधायची गरजच उरली नाही. म्हणून ते आता इतके आळशी झाले आहेत की आता फारसे उडूही शकत नाहीत. "

पांडुरंग काका म्हणाले, "अरे, पुण्य मिळतंय, तेच पुरेसं आहे आम्हाला. देवाचे जीव आहेत हे. आम्ही त्यांची सेवा करतो, देव आनंदी होतो. "

"पण काका, सेवा म्हणजे त्यांना स्वाभाविकपणे जगू देणं नाही का?"

पांडुरंग काका हसले आणि म्हणाले, "तुझं हे शहरातलं शास्त्र इथे चालत नाही रे. गावात श्रद्धा महान आणि शास्त्र लहान. श्रद्धेला हिशेब नसतो. "

– – पण का कोण जाणे अभिजीतचे प्रश्न त्यांच्या समजुतीला धक्का देऊ लागले होते. कारण ते फक्त त्यांच्याच नव्हे तर त्यांच्या वंशाच्या श्रद्धेवर प्रश्न होते. अभिजीतला कळलं की, ही लढाई श्रद्धा विरुद्ध विज्ञान एवढीच नाही. ही लढाई परंपरेच्या खोल मुळांशी आहे. अभिजीत गप्प झाला, पण मनात प्रश्नांनी काहूर माजवले. कारण निसर्गाची स्वाभाविक गती माणसाच्या या तथाकथित भूतदयेमुळे जखडली जात होती.

गावात पुढच्या आठवड्यात मोठा उत्सव होता — गजराज महोत्सव. परंपरेनुसार, जंगलातून हत्ती आणला जाणार होता. सोन्याच्या जाळ्यांनी सजवून, त्याच्या पाठीवरून देवाची मिरवणूक काढली जाणार होती. गावभर लोकांच्या फेऱ्या सुरू झाल्या — "गजराज महोत्सवासाठी निधी द्या! पुण्य कमवा! " म्हणत ते गावातील प्रत्येक घरी जाऊ लागले. गणेशराव जोशी, धार्मिक समितीचे अध्यक्ष, चौकात उभे राहून म्हणत होते, "या महोत्सवामुळे गावाचं भाग्य फुलतं. जो दान देईल त्याच्या घरी लक्ष्मी पाणी भरील. " चाळीशीतले हे गृहस्थ नेहमी पांढऱ्या कुडत्यात असत. त्यांच्या कपाळावर लाल टिळा उठून दिसत असे. त्यांचा व्यवसाय म्हणजे गाव-शहरातून वर्गण्या गोळा करून महोत्सव साजरा करणे, आणि उरलेले पैसे 'व्यवस्थापन खर्च' म्हणून स्वतःकडे ठेवणे. त्यांच्यासाठी गजराज महोत्सव म्हणजे प्रतिष्ठा + नफा होता. थोडक्यात ते धर्माचे व्यापारी होते. हत्ती सजवण्यासाठी लागणारे सोन्याचे जाळे, केळीचे घड, दाण्याचे पोते यांत गावातल्या लोकांच्या घामाचा पैसा जात असला तरी त्यांना त्याची चिंता नव्हती. कारण या व्यवहारातून त्यांना घबाड मिळायचे.

अभिजीत काही तरुणांसोबत त्यांच्याकडे गेला, आणि त्यांना प्रश्न विचारला, “गणेशराव, हत्ती जंगलातून आणणं म्हणजे त्याला कैद करणं नव्हे काय? त्याला कडकडीत उन्हात तासन्तास उभा ठेवणं क्रूर नाही काय?”

“अरे अभिजीत, तुझ्या तोंडून असं धर्मविरोधी बोलणं ऐकून वाईट वाटतं. गावात अशा मतांना जागा नाही. हत्ती देवाचे वाहन आहे. आम्ही त्याला मान देतो, सन्मानाने आणतो. ”

“सन्मान म्हणजे स्वातंत्र्य हिरावणं नसतं काका. हा सन्मान तुमच्या डोळ्यांना दिसतो, पण हत्तीला नाही. ”

गणेशराव रागाने म्हणाले, “तू आमच्या परंपरेवर बोट ठेवतोस! धर्मविरोधी बोलतोस! गावाला अशा बंडखोरीची सवय नाही. ”

आजूबाजूच्या लोकांत कुजबुज सुरू झाली. अभिजीत ‘बंडखोर’ ठरला.

त्याच संध्याकाळी, मंदिराच्या पायऱ्यांवर बसलेले भाऊसाहेब, गावातले वृद्ध कथाकथनकार… ज्यांनी हे संभाषण ऐकले होते त्यांनी सर्वांना गोळा करून ते लोकांना म्हणाले, “अहो, परंपरा म्हणजे काय? वैदिक काळात अश्वमेध होत होते — घोडा बांधून देशभर फिरवला जात असे, आणि शेवटी त्याचा बळी दिला जाई. मौर्यकाळात हत्ती युद्धासाठी पकडले जात. मध्ययुगात कबूतर पत्रे पोहोचवायला वापरली जात. वसाहतकालात साहेब लोकांनी हरणं, वाघ मारून त्यांच्या कातड्या शोभेसाठी ठेवल्या. माणूस नेहमी आपल्या हौसेसाठी तर कधी गरजेपोटी प्राण्यांचा ‘उपयोग’ करत आला आहे. कधी अन्नासाठी, कधी ओझ्यासाठी, कधी पुण्यासाठी. आजही हेतू बदललेला नाही. नेहमीच माणसाने प्राण्यांचा उपयोग स्वतःसाठीच केला आहे. ”

…. लोकांना त्यांच्या म्हणण्यात काहीच वावगं वाटलं नाही म्हणून लोकांनी ही गोष्ट हसत हसत ऐकली. फार कुणी मनावर घेतलं नाही.

शहर आणि परदेशात शिकून आलेल्या अभिजीतने मानवी हस्तक्षेपामुळे बदललेलं निसर्गाचं संतुलन पाहिलं होतं. त्याला ठाऊक होतं की, कबूतरं जास्त खाऊ लागली की त्यांचा प्रजनन दर वाढतो. माकडं माणसांवर अवलंबून झाली की आक्रमक होतात. कैदेतील हत्ती मानसिक आजाराला बळी पडतो. गावच्या लोकांसमोर तो फक्त तर्क मांडत नव्हता; तो गावाला नैसर्गिक सत्य समजावून देत होता. पण तरीही गावाने महोत्सव दणक्यात करायचाच असा चंग बांधला होता. अभिजीतचे मुद्दे पसरताच गावात चर्चा सुरू झाली….. “तो मुलगा परदेशातून शिकून आला म्हणून काय त्याचं बोलणं ऐकून आम्ही आमच्या परंपरा बदलायच्या? हे पुण्याचे काम थांबवलं तर आपलं काय होईल? देव रागावला तर?”

गणेशरावच्या गटाने मुद्दाम अफवा पसरवल्या की, अभिजीत नास्तिक आहे नवीन विचार मांडून गावात फूट पाडतो आहे. पांडुरंग काका मनातून ढवळून निघाले होते. पण सार्वजनिकपणे जाहीरपणे मात्र गणेशरावच्या बाजूला उभे होते.

अभिजीतने काही मित्रांकडे चौकशी सुरू केल्यावर त्याला कळलं की, हत्ती जंगलातील खासगी माहूताकडून दिवसाला १०, ००० रुपये भाड्याने आणला जातो. दाण्याची पोती शहरातील व्यापाऱ्याकडून खरेदी केली जातात. त्याचं गणेशरावशी गुप्त संगनमत असतं. भक्तांनी दिलेली केळी मागील दाराने बाजारात विकून पुन्हा

भक्तांनाच विकली जातात. त्याच्या लक्षात आलं की, पुण्य कमावण्याचे भक्तांच्या गळी उतरवणे हा फक्त एक मुखवटा आहे. आतून हे धार्मिक म्हणवणारे धर्मलंड गावाच्या अर्थव्यवस्थेवर ओझं टाकणारे आहेत.

मंदिराच्या मागच्या अंगणात, सकाळी लवकर दोन सेवेकरी — लक्ष्मण आणि मुरली — दाण्याची पोती उघडत होते.

लक्ष्मण: "अरे, इतका दाणा घालायचा म्हणजे सगळे कबूतर इकडेच बसतात. मंदिराची छप्परं घाण होत चाललीत. गावातील प्रत्येक घरात कबुतराच्या विष्ठेचा सडा पडलेला असतो. त्यामुळे काही लोकांना कबुतरांच्या सतत होणाऱ्या गूटरगु आवाजाचा त्रासही होत आहे. डॉक्टर तर म्हणतात की, कबुतराच्या विष्ठेतील आणि पंखातील जंतू हवेत मिसळल्यामुळे माणसे आजारी पडतात म्हणून. खरे काय खोटे काय देवच जाणे. "

मुरली: "गणेशराव ऐकणार नाहीत. पुण्य मिळतं म्हणतात... पण मला वाटतं कबूतरंही कंटाळली असतील एवढा दाणा खाऊन. "

अभिजीतने हे ऐकलं आणि त्याच्या लक्षात आलं बदलाचं बी पेरण्यासाठी हीच वेळ योग्य आहे. फक्त कोणीतरी आवाज द्यायचा बाकी आहे.

दुसरीकडे गावातील वृद्ध स्त्रिया ओटीवर बसून मिरवणुकीची तयारी पाहत होत्या. सखुबाई, कुसुमताई, आणि यशोदाताई. या तिघींच्या बोलण्याचा सूर वेगळा होता.

सखुबाई: "माझ्या सासूबाई म्हणायच्या, गायीला गूळ घातला की देव तृप्त होतो. "

कुसुमताई: "पण आता गायीकडे बघा, पोट नुसतं फुगलेलं असतं. त्यामुळे त्यांचं चारणंही कमी झालं आहे."

यशोदाताई: "पुण्य मिळतं, पण जनावर आजारी पडलं तर ते पुण्य कुठे जातं?"

घरी जाताना कानी पडलेली ही चर्चा अभिजीतसाठी महत्वाची ठरली — कारण यात श्रद्धा आणि वास्तव यांच्यातील दरी त्याला स्पष्ट दिसत होती.

गावात ढोल-ताशांच्या तालावर सराव सुरू. मंदिराच्या बाहेर मोठी रांग लागली होती. लोक दाण्याचे पोते, गूळ, केळी आणून देत होते. गणेशराव मंचावरून घोषणा करत होते, "हे सगळं देवाच्या जीवांसाठी. ज्यांनी दान केलं, त्यांचं पाप धुतलं जाईल. "

.... पांडुरंग काका, बाजूला उभे, शांतपणे पाहत होते. त्यांच्या मनात श्रद्धा विरुद्ध अंधश्रद्धेचा झगडा सुरू झाला होता.

त्याच संध्याकाळी अभिजीतने भाऊसाहेब, आणि पांडुरंग काका यांना विश्वासात घेतलं आणि ते यावर उपाय काढण्यासाठी मंदिराच्या मागच्या वडाखाली बसले होते. चंद्रप्रकाशात त्यांचे चेहरे गंभीर होते.

अभिजीत म्हणाला, "काका, उद्या जे होणार आहे ते फक्त प्राण्यांसाठी नाही, आपल्यासाठीही चुकीचं आहे. "

पांडुरंग काका दीर्घ श्वास घेत म्हणाले, "तुझं म्हणणं कदाचित खरं आहे, पण गाव माझं ऐकेल का याबद्दल मी साशंक आहे. "

त्यावर भाऊसाहेब म्हणाले, “पण कोणी तरी सुरुवात करायला हवी ना? परंपरा अंध असली की ती विषासारखी पसरलेली आपण पहातच आहोत. गणेशरावांनी तर तरुणांना आपल्या कह्यात घेऊन हे धर्माचे काम आहे म्हणून त्यांच्या मनीमानसी खिळवले आहे. ”

ती रात्र शांत नव्हती. कबूतरांच्या कुडकुडण्यात, हत्तीच्या साखळदंडाच्या आवाजात, एक अस्वस्थता होती.

महोत्सवाच्या दिवशी ढोल-ताशांच्या गजरात हत्ती मंदिरात आला. त्याच्या पायांवर रंगीत नक्षी काढली होती, अन् गळ्यात घंटा बांधली होती. अंगणात कबुतरांसाठी दाण्याचे ढीग, गायींसाठी गूळ-मिश्रित चारा, आणि माकडांसाठी केळीच्या घडाचा डोंगर तयार होता. हत्तीच्या सोंडेवर सोन्याचे जाळे, गळ्यात फुलांचे हार, पायात पितळेच्या घुंगरू असा साज चढवलेला होता. लोकांनी मुठभर दाणे, साखर, केळी उधळायला सुरुवात केली. कबूतरांचा थवा इतका मोठा झाला की, आकाश झाकलं गेलं. त्यामुळे दिवसा अंधार पडल्यासारखा झाला. अचानक माकडं साखरेच्या पिशव्यांकडे धावली. गर्दी उसळली. मुलं कबूतरांच्यामध्ये धावत होती. माकडांनी भक्तांच्या प्रसादाच्या पिशव्या हिसकावल्या. कबूतरांच्या विष्ठेमुळे दगडी फरशी घसरडी झाली. त्यावरून एक मूल पाय घसरून पडलं, डोक्याला मार लागला. लोक घाबरून ओरडू लागले. हत्ती, घंटांचा आवाज आणि गर्दी पाहून चिडला. बिचकुन त्याने मागे सरकायला सुरुवात केली. साखळदंडाला हिसडा बसला, आणि तो मोकळा होऊन पळू लागला, तसे लोकही सैरावैरा पळू लागले. गोंधळ उडाला, काही मुलं घाबरून रडायला लागली. हत्ती पाय आपटू लागला, जमाव हलला, एक दोनजण किरकोळ जखमी झाले. भक्तांच्या रांगेत गोंधळ झाला. पण होणारा मोठा अपघात थोडक्यातच टळला. हळूहळू सगळीकडे शांतता पसरली. लोक घाबरले होते.

या प्रसंगाचा वापर अभिजीतने विचार जागृतीसाठी करायचे ठरवले. त्याने थेट मंचावरून सांगितलं, “आपण देवासाठी नव्हे, आपल्या स्वार्थासाठी प्राण्यांचा वापर करतो आहोत. तुमच्या गर्दी गोंगाटामुळे ते त्रस्त झाले आहेत. गावकऱ्यांनो लक्षात घ्या, ही परंपरा आपल्याला पुण्य देत नाही; ती आपल्याला पुण्यकर्म केल्याचे फसवे समाधान देते. महोत्सवात केलेल्या ढोल ताशाच्या मोठ्या आवाजाने हे प्राणी बिथरले आणि त्यामुळे गोंधळ झाला, हे आपण लक्षात का घेत नाही? तुम्ही पाहत आहात की, हा देवाचा उत्सव नाही, ही माणसाच्या दिखाऊपणाची मिरवणूक आहे. प्राणी तुमच्यासाठी खेळणी नाहीत. पुण्य म्हणजे त्यांना त्यांच्या घरी म्हणजेच त्यांच्या आदिवासात परत जाऊ देणं. ” हे ऐकून लोकांपैकी काहींनी मान डोलावली, काहींनी तोंड फिरवलं. पण घबराटीने लोकांना हादरवलं होतं. म्हणून घडलेल्या घटनेवर चर्चा करण्यासाठी दुसऱ्या दिवशी मंदिरात बैठक बोलावली गेली.

सगळे जमल्यावर अभिजीत उभा राहिला आणि म्हणाला, “ही घटना हा योगायोग नाही. हा फक्त एक अपघात नाही. हा प्रसंग आपणच आपल्यावर ओढवून घेतलेला आहे. आपण प्राण्यांच्या स्वभावात बदल घडवतो, त्यांना आपल्यावर अवलंबित बनवतो, त्यांना परावलंबी करतो आणि म्हणतो की आपल्याला पुण्य मिळालं. खरी जीवदया म्हणजे त्यांना त्यांच्या जंगलात, आकाशात, पाण्यात असं त्यांच्या त्यांच्या अधिवासात जगू देणं आहे. आपण अन्नधान्य त्याला घ्यायला लावून त्यांना आळशी बनवत आहोत आणि त्यांचं नैसर्गिक आयुष्य हिरावत आहोत. हे पुण्य नाही — पाप आहे. ”

.... त्याच्या अशा बोलण्याने उलटसुलट चर्चा सुरू झाली. काहींनी विरोध केला, तर काहींनी मान डोलावली.

पांडुरंग काका म्हणाले, “ मला वाटतं अभिजीत बरोबर बोलतोय. आम्ही आयते खाऊ घालून त्यांना आळशी बनवलंय. " पांडुरंग काका पुढे पहिल्यांदाच सार्वजनिकपणे म्हणाले, “आजपासून मी कबूतरांना आयते दाणे घालणार नाही. त्यांना स्वतःचे अन्न शोधण्यासाठी स्वच्छंदपणे उडू देईन. ”

त्यांच्या बोलण्याचा गावकऱ्यांवर परिणाम झाला. पुढच्या महिन्यापासून, कबूतरांना मणभर दाणा घालण्याची प्रथा बंद झाली. हत्ती महोत्सवासाठी आणण्याऐवजी लाकडी पुतळा वापरायचे ठरले. माकडांना खाऊ घालण्यावर नियंत्रण आणलं. असेच काही महिने गेले. कबूतरं पुन्हा शेतांकडे जाऊ लागली... गावाजवळच्या जंगलामध्ये त्यांनी उडायला सुरुवात केली. माकडं जंगलात परतली. माकडं अन्नासाठी झाडांवर परत चढू लागली. हत्ती जंगल संवर्धन प्रकल्पात सामील झाला. केळी, गुळ आणि दाण्यासाठी जमणारा पैसा गावातील जलसिंचन प्रकल्पासाठी वापरला गेला. गणेशराव हळूहळू प्रभाव गमावू लागले. गावकऱ्यांना आता पुण्य कमावणे म्हणजे गावासाठी स्वच्छ पाणी, हिरवी झाडं, आणि निरोगी प्राणी हे जाणवू लागलं होतं.

गणेशराव हरले... गाव जिंकलं.

पांडुरंग काका, भाऊसाहेब आणि अभिजीत मंदिराच्या ओटीवर बसून बोलत होते. सूर्य मावळत होता. भाऊसाहेब म्हणाले, “आता प्राणी-पक्षी आपल्याकडून नव्हे, निसर्गाकडून जगायला शिकतील. खरं पुण्य माणुसकीने जगणाऱ्या माणसाच्या हृदयात असतं, दाण्याच्या राशीत नाही. ”

त्यावर अभिजीत म्हणाला, “... आणि आपण त्यांच्याकडून जगायला शिकू. ”

पांडुरंग काकांनी हसून दाद दिली, “अभिजीत, तुझ्यामुळेच आम्हाला कळलं की, पुण्य दाण्याच्या राशीत नसतं; पुण्य स्वातंत्र्यात असतं. ”

भाऊसाहेब म्हणाले, “परंपरा बदलणं अवघड असतं, पण कधी कधी त्यातला आत्मा वाचवण्यासाठी रूप बदलावं लागतं. गोष्टी लोकांच्या हृदयात उतरतात, पण बदल घडवण्यासाठी कुणीतरी त्या वर्तनात आणाव्या लागतात. तू ते केलंस. ”

त्यावर अभिजीत त्यांना म्हणाला, “खरं पुण्य निसर्गाच्या संतुलनात आहे, आणि निसर्गाचं स्वातंत्र्य म्हणजे आपल्याच आत्म्याचं स्वातंत्र्य! ”

– – – गावाच्या अंगणात पुन्हा प्राणी-पक्षी स्वच्छंद फिरू लागले. लोकांना आता कळलं होतं — पुण्य मूठभर दाण्यात नसतं, ते निसर्गाच्या संतुलनात असतं. गावातल्या वडाच्या पानांतून संथ वारा वाहत होता. कबूतरांचा थवा आकाशात उडाला — यावेळी खऱ्या स्वातंत्र्याने.....

**Even if miles apart, we are just an email away.**

**श्री जगदीश काबरे, सांगली मो. 9920197680**

## 15. काव्यानंद – "जोगीण" – कवी कुसुमाग्रज – सुश्री ज्योती कुळकर्णी



लेखनाची विविध तीर्थक्षेत्रे भ्रमण केलेल्या कुसुमाग्रजांच्या अनेक सुंदर कविता आहेत. त्यांच्या विचारांचे ध्वनी आपल्याला कित्येक कवितांमधून ऐकू येतात. " जोगीण " ही एक अशीच कविता आहे.

कुसुमाग्रजांबद्दल म्हटले जाते की ते नास्तिक विचारांकडे झुकलेल्या अज्ञेयवादी विचारसरणीकडे झुकलेले आहेत. म्हणजे देव असेल किंवा नसेल असे मानणे. मला तरी या कवितेत त्यांच्या याच विचारसरणीचे प्रतिबिंब पडल्यासारखे वाटते.

ते म्हणतात……

***मला हवी आहे नास्तिकता***

***पण सहस्त्र वर्षे मनाला मिठी घालून बसलेली***

***ही आस्तिकता होत नाही दूर माझ्यापासून***

नास्तिक विचारसरणीकडे मी झुकलेलो आहे परंतु 'जुने जाऊ द्या मरणालागुनी' अजून ठामपणे म्हणू शकत नाहीये. कारण हजारो वर्षांचे संस्कार माझ्या मनावर आहेत.

यात ' सहस्त्र वर्षे ' या शब्दांमधून कवीच्या सामाजिक जाणीवा व्यक्त होतात. हजार वर्षे आयुष्य कवीचे तर निश्चितच नसते. पण समाज तर नक्कीच हजारो वर्षापासून आहेच. स्वतःच्या निमित्ताने कवीने समाजातील नष्ट करायला झालेल्या अनिष्ट रूढींबद्दल मत व्यक्त केले आहे असे वाटते. समाजाला समजावून सांगितल्यावर जुन्या रूढींमधील फोलपणा कळतो पण समाज त्या सोडू शकत नाही. आतापर्यंत जे केले तेच पुढे चालू ठेवावे या मानसिकतेतून समाज लवकर बाहेर निघत नाही.

पुढे ते म्हणतात…

***रंगमंचावरील दिव्याच्या प्रकाशात***

***व्याधाच्या नक्षत्रासारखी***

***विविध रंगात उमलणारी***

*सुरेल पदन्यास करीत*

*माझ्या अंतःकरणात प्रवेश करणारी*

*ती मोहक नृत्यांगना*

*उभी आहे माझ्या मंदिराच्या दाराशी"*

इथे नवीन विचारांसाठी नृत्यांगनेचे रूपक कवीने अतिशय कल्पकतेने वापरले आहे. त्यांच्या काळात रुढींना धक्का देणारे अनेक नवीन विचारांचे भूल पाडणारे वारे वाहू लागले होते. आपल्या समाजातील सोवळे ओवळे, स्त्रियांचे शिक्षण, इत्यादी अनेकरंगी विचारांचा त्यात समावेश होता. समाजातल्या लोकांना मनातून पटले तरी जुन्या विचारांना सोडून, किंवा लोक काय म्हणतील या विचारांनी समाज त्या विचारांना अंगीकारू इच्छित नव्हता. अशा विविध रंगातून नटलेल्या विचारांना त्यांनी व्याध नक्षत्र ज्याप्रमाणे रंग बदलत राहते, त्याप्रमाणे अंतरंगात प्रवेश केलेले नवविचार देखील बरोबर की चूक, असे मनातील रंग बदलत राहतात, अशी सुंदर उपमा दिली आहे. त्या विचारांना ते विचारांची नर्तकीच आहे असे म्हणतात...

ते म्हणतात आपल्या विचारांचे विविध पदन्यास घेऊन माझ्या मन-मंदिराच्या दाराशी ती नर्तकी उभी आहे. नर्तकीचे अतिशय सुंदर रूपक त्यांनी नवीन विचारांसाठी वापरले आहे.

पुढले रूपक त्यांनी जोगिणीचे वापरले आहे. जोगीण आयुष्यभरासाठी देवाला वाहिलेली भक्तीण असते. असे तिने आयुष्य देवाला अर्पण केलेले असले तरी मानवी निसर्गनिर्मित भावनांशी ती एकरूपच असते. पण आपण देवाचे भक्त आहोत या विचारांपासून ती दूरही होऊ शकत नाही. जणू नव्या जुन्या विचारांच्या उंबरठ्यावरच ती असते. तिच्या जोगी म्हणून असलेल्या विचारांनाच त्यांनी मलीन वस्त्राची उपमा दिली आहे म्हणजेच, मलीन वस्त्र ज्याप्रमाणे धुतल्यानंतर स्वच्छ होते त्याचप्रमाणे हे जुने विचार देखील धुतल्यानंतरच स्वच्छ होतील. अशी अतिशय सुरेख उपमा कुसुमाग्रजांनी या ठिकाणी दिलेली आहे.

"गहन काळोखात गुरफटलेली" असे शब्द देखील जुन्या विचारांकरता त्यांनी वापरले आहेत.

पुढे ते म्हणतात...

'एक तीरावर एकच गीत गाणारी" ही जोगीण कशी आहे, तर एका तीरावर एकच तेच ते जुन्या विचारांचे गीत गाणारी आहे. जणू जुन्या विचारांचे ते प्रतीकच आहे.

.. आणि हे जुन्या विचारांचे गीत कसे आहे तर उदास. हे उदास गीत तिला मनापासून आवडत नाहीये. म्हणून ती जोगीण जणू मितभाषी झालेली आहे.

आणि जोगीण.....

***मान टेकून दरवाजाच्या स्तंभावरती***

***बसली आहे वाट अडवून***

***प्रवेशाच्या पायरीवर***

या जुन्या विचारांचा कंटाळा आला असला तरी नवीन विचारांचे प्रवेशद्वारच त्यांनी अडवून ठेवलेले आहे जणू....

‘आस्तिक- नास्तिक‘

‘नवीन विचार -जुने विचार‘

‘समाजातील अनिष्ट प्रथा - नवीन क्रांतीकारी विचार‘

– – यातील नवीन विचारांसाठी नृत्यांगनेचे रूपक वापरून आणि जुन्या विचारांसाठी जोगिणीचे रूपक वापरून कुसुमाग्रजांनी आपल्या मनातील व समाजाच्याही मनातील भावना अतिशय सुंदर रीतीने प्रकट केल्या आहेत.

अतिशय कसलेला व मुरब्बी, कसबी कवीच हे करू शकतो.

रसग्रहण : सौ. ज्योती कुळकर्णी, अकोला

**रसग्रहण - सौ. ज्योती कुळकर्णी,** अकोला मोबा. नं. ९८२२१०९६२४



## 16. लेख– “अबोल विश्वाचं बोलकं दर्शन” – सुश्री शालिनी जोशी



**सजीवांच्या चार योनी – १) जारज २) अंडज ३) स्वेदज ४) उद्भिज – अशा आहेत.**

यातील उद्भिज म्हणजे जमीन फोडून बाहेर येणारे.. म्हणजे वनस्पती होत. पहिल्या तीन योनी जमिनीवर वाढणाऱ्या आहेत. त्यामुळे त्यांची हालचाल आपण पाहू शकतो. त्यांचा अभ्यास सुलभ होतो. वनस्पतींचा वावर मात्र जमिनीच्या वर आणि जमिनीच्या खाली असा दोन्हीकडे असतो. झाडांची वाढ जमिनीच्या खाली कशी होते? विस्तार कसा व केवढा होतो? असे कुतुहल साहजिकच निर्माण होते.

अलीकडेच एक पुस्तक वाचनात आलं – 'द हिडन लाईफ ऑफ ट्रीज'... लेखक पीटर वोह्ललेबेन. या इंग्रजी पुस्तकाचं मराठी भाषांतर केलं आहे गुरुनाथ नुलकर यांनी.

लेखक जर्मन असल्याने फर्न, पाईन, पीच, ओक इत्यादी तेथील झाडांचे उल्लेख पुस्तकात आहेत. पण शेवटी झाडं सगळीकडची सारखीच. तेव्हा थोडक्यात लेखकाचे अनुभव सांगण्याचा हा प्रयत्न. हे अनुभव आपल्याला गुंगवून टाकणारे असेआहेत.

जमिनीखाली झाडांचे एक स्वतंत्र विश्व असते. वरच्यापेक्षा दुप्पट विस्तार खाली असतो. त्यांना भावना, यातना, स्मरणशक्ती, भाषा, एवढेच नाही तर सुरक्षा यंत्रणा आणि गोतावळाही असतो. ते बोलतात आणि चालतातही. एकमेकांची काळजी घेतात. त्यांचे आयुष्य संथ असले तरी कंटाळवाणे नाही. त्यांचे सामाजिक जीवन एक आश्चर्यकारक गोष्ट आहे. लेखक वनरक्षक असल्याने झाडांचे भावविश्व त्यांनी जाणले. झाडांना विशिष्ट हवामान व जमीन मानवते. साल वृक्षाच्या पट्ट्या रेल्वे रुळाखाली वापरतात. म्हणून रुळाशेजारी या वृक्षांच्या लागवडीचा प्रयत्न झाला. पण यश आले नाही. जंगलातील समूहजीवनच त्यांना मानवते. एकाकीपणाने ते झाड मरते. स्वतःच्या अधिवासात व स्वकीयांच्या सहवासात वाढणं ही झाडांची सामाजिक गरज आहे. ती पुरविल्यामुळे ९५०० वर्षे इतकं दीर्घायुष्य असलेलं झाड (स्प्रूस) स्विडनमध्ये आहे. तेव्हा झाडांना त्यांच्या अधिवासात राहून सन्मानपूर्वक म्हातारा होण्याचे आणि नैसर्गिक मरणाचे भाग्य मिळावे. जमिनीखाली झाडांची मुळे दूरवर पसरलेली असतात. या मुळाना जोडणारे 'मायकोरायझी' नावाच्या एक प्रकारच्या बुरशीचे जाळे जमिनीखाली असते. या बुरशीचे कापसासारख्या तंतूंचे जाळे दूर दूरच्या झाडांच्या मुळाशी जोडलेले असते. ही बुरशी प्राणी व वनस्पती यांच्या मधली अवस्था असते. अन्न बनवू शकत नाही. झाडाकडून बुरशीला साखर व कर्बोदके पुरवली जातात. आणि गरजेप्रमाणे बुरशी झाडांना उपयुक्त हार्मोन्स व ग्रंथीरस पुरवते. ती झाडांना त्रासदायक जंतूंपासून दूर ठेवते. कीटक, दुष्काळ इत्यादी संकटांचा संदेश दूरपर्यंतच्या झाडाला पोचवते. अन्न कमी पडू लागणाऱ्या झाडाला ते पोचवण्यास ती तत्पर असते. अशा प्रकारे दोन झाडे एकमेकांच्या मित्राप्रमाणे वागतात. एखाद्या तोडलेल्या झाडाच्या बुंध्याला शतकानुशतके साखर व पोषक द्रव्ये पुरवून जिवंत ठेवण्याचे काम हे बुरशीचे जाळे करते.

लेखकाला जंगलात एक दगड दिसला. वेगळा वाटला म्हणून सुरीने वरचा भाग काढला, तर आत क्लोरोफिलचा हिरवा रंग दिसला. तो दगड नसून 'मायकोरायझी' मुळे जिवंत राहिलेले एक पुरातन खोड होते. अन्न-पाणी नसल्यास खरोखर कोणी जिवंत राहणे शक्य नाही. पण झाडं एकमेकांना सांभाळून घेतात म्हणून दीर्घायुषी होतात. मायकोरायझी हे जणू जमिनीच्या खालचे 'इंटरनेट'... असे हे जीवन आपल्याला कळत नाही. त्यामुळे दंतकथा वाटतात. झाडे दिसायला स्वतंत्र वाटली तरी जमिनीच्या खाली सगळ्यांची विशाल प्रणाली असते. झाडांचा महत्वाचा अवयव मूळ आहे, झाडाचा मेंदूच. मुळे जमिनीखालील पदार्थ व पाणी शोषून झाडांना आणून देतात. आणि प्रकाश संश्लेषणातून उत्पादित पदार्थांचे बुरशी अवस्थेतील साथीदारांना वाटप ही मुळेच करतात. शेजारच्या झाडाना धोक्याचे संदेश पोचवतात. असेही मानवी मेंदूसारखे सुनियोजित कार्य मुळे करतात.

पुढे सरकताना मुळाला जर विषारी पदार्थ, दगड किंवा दलदल लागली तर वाढीत बदल करायच्या सूचना मुळाकडून झाडाला मिळतात. मुळाचे टोक आपली दिशा बदलते. यातून झाडाची बुद्धिमत्ता, स्मरणशक्ती, भावना दिसून येतात. जमिनीवरील पसारा पाहून मुळांची वाढ झालेली असते. दुसऱ्या झाडाला त्रास होईल इतका आपला विस्तार झाडे वाढवत नाहीत. पण त्यांची भरमसाठ कटाई केली तर ते मुळाना घातक ठरते. कारण त्यामुळे प्रकाश संश्लेषण कमी झाले की मुळे उपाशी राहतात. शिवाय मोकळ्या खुंटांवर बुरशी रोग लागायचीही शक्यता असते. त्यामुळे झाडाची मरणाकडे वाटचाल होते. बाकी कोणत्याही योनी आपले अन्न तयार करत नाहीत. पण झाडे आपले अन्न तयार करून इतर योनींना खोड, पाने, फळेरूपाने मुक्तपणे वाटतात. आणि आपलीही तहानभूक भागवतात. मुळांवरील सूक्ष्म केसांमुळे मुळांचा पृष्ठभाग वाढतो आणि शोषणाची क्षमता वाढते. अधिक सूर्यप्रकाशात अधिक अन्न तयार करता येते.

जमिनीतून पाण्याचा प्रवाह दोन प्रकारे होत असतो...

१) केशाकर्षण- पण ह्याला उंचीची मर्यादा तीन फूटापर्यंत असते.

२) द्रवाभिसरण - मुळाकडून शेंड्यापर्यंत एका

पेशीतून दुसऱ्या पेशीत पाणी सरकत जाते. या प्रवाहाचा आवाज स्टेथोस्कोपने ऐकता येतो. पाण्याशिवाय अन्न तयार होत नाही. पाणी नसेल तर खोडाची साल कोरडी पडते व ती फाटू लागते. जखम खोल गेली तर त्रासदायक बुरशी वाढते. जखमेचे काळे ओघळ झाडावर दिसतात. अशावेळी पाण्याची गरज कमी करण्यासाठी आपली वाढ संथ करून कमीत कमी पाण्यात जगण्याची कला झाडे शिकतात. झाडाना पावसाळ्यात पाणी साठवून ठेवावे लागते. पाण्याच्या संयमित वापराने झाडे कणखर बनतात. तहानलेली झाडे किंचाळू लागतात. पण आपल्या श्रवण मर्यादेच्या बाहेर त्या ध्वनिलहरी असल्यामुळे आपल्याला कळत नाही. अशावेळी उंची वाढवण्यापेक्षा झाडाचा घेर वाढतो. कारण उंची वाढायला अधिक ऊर्जा लागते.

झाडांची भाषा ही गंध भाषा. एखादा प्राणी झाडाचा पाला खात असेल, तर झाडांना ते पसंत नसते. मग झाडे आपल्या पानात विषारी द्रव्य सोडतात आणि हवेत एक प्रकारचा गॅस सोडतात. तो संदेश इतर झाडांना पोहोचतो आणि तेही सावध होतात. विषारी पानांमुळे प्राणी दूर जातात. पानांना तोंड लावत नाहीत. काही वेळा सुरवंट किंवा अळी पान खाते. तेव्हा जखमेभोवतीच्या उती विद्युत संदेश सोडतात. त्यामुळे त्या सुरवंटाचा किंवा अळीचा दुसरा मारक कीटक येऊन नाश करतो. अशा प्रकारे स्वतःच्या संरक्षणाला झाडे समर्थ असतात.

लाजाळूची झाडे जास्त संवेदनशील असतात. धोका लक्षात आल्यावर पाने मिटतात व धोका टळल्याचे लक्षात आल्यावर उघडतात. अशी ही वेगळीच कथा.

काही वेळा आपण पाहतो झाड फुलांनी गच्च भरून जाते. पानांना जागाच रहात नाही. येथे झाड सर्व शक्तीनिशी बीजोत्पादनाच्या कामाला लागते. त्यामुळे सुरक्षिततेसाठी व इतर गरजांसाठी साखर कमी पडते. म्हणून पानांची वाढ खुंटते. येथे आपली परंपरा टिकवणे हा हेतू असतो. फळे तयार होतात. त्यातील काही बी झाडाच्या खाली पडून रुजते. अशावेळी मातृवृक्षाकडून त्याची काळजी घेतली जाते. पोषणद्रव्याचा पुरवठा मातृवृक्षाकडून होतो. मातृवृक्ष कोलमडल्यावर मग या रोपाला भरपूर सूर्यप्रकाश मिळतो आणि तो घनदाट वाढतो. असे हे चक्र सुरू राहते.

झाडाच्या काही बिया वाऱ्याने, पक्ष्यांच्या विष्टेतून किंवा पाण्याबरोबर, उंदरासारख्या प्राण्यांकडून दूर नेल्या जातात. कधी उगवतात तर कधी फुकट जातात. बी रुजेल तेथे आयुष्य काढावे लागते. जिथे पडेल तेथेच त्या जखडल्या जातात. कधी सावली, तर कधी तीव्र ऊन, कुठे प्रकाश, तर कोठे दगड, कधी तुटून पडलेल्या झाडावर. अशी सर्व आव्हाने झेलावी लागतात. झाडांचा, फुलांचा मंद सुगंध कीटकांना आमंत्रण देतो. ते फुलावर बसून दुसऱ्या फुलावर परागकण उधळतात. त्या बदल्यात कीटकांना मकरंद इनामात मिळतो. वाराही परागीभवनाला मदत करतो. स्वपरागीभवन टाळण्यासाठी नर व मादी फुले काही दिवसाच्या फरकाने उमलतात.

एकोणिसाव्या शतकात भरपूर जंगलतोड झाली. मातीची धूप झाली. त्याचे परिणाम भोगावे लागतात. नवीन लावलेली झाडे एकाच प्रजातीची व वयाची असल्याने कीटकांचा प्रादुर्भाव वाढतो. व्यावसायिक जंगलात रोपांची काळजी घेणारे मातृवृक्ष त्यांच्याबरोबर नसतात. ती वाऱ्याने पडतात. त्यामुळे संतुलित जंगल होण्यास पाचशे वर्षांचासुद्धा काळ लागतो.

– – अशी ही झाडांच्या अनोख्या दुनियेची झलक. त्यांची भाषा आपल्याला कळू लागली तर आणखी गूढ उलगडेल.

आपले ऋषी हे झाडांचे महत्त्व जाणत होते. ते त्यांच्या भावभावनांचा विचार करत. औषधी वनस्पती तोडताना त्यांची परवानगी घेतली जाते. त्यांची पूजा करून मग आवश्यक तेवढा भाग वापरतात. वनाला जिवंत ठेवण्यासाठी देवराई निर्माण झाल्या. सामान्य लोकांना झाडाचे विज्ञान कळणार नाही. म्हणून झाडांना देवत्व दिलं गेलं. त्यामागे झाडांचे संरक्षण हाच विचार. पण त्यामुळे त्याला रुढी, परंपरा, अंधश्रद्धा असे रूप आले. विज्ञानाचा प्रसार खुंटला व जगात आपण मागे पडलो.

— पण आता जागृती होत आहे. निसर्गाच्या सर्व घटकातील साहचर्य एक अभ्यासाचा विषय आहे. मग तेथील जीवसृष्टी व वृक्षसृष्टी यांची गुपिते उलगडतील. आणि

'परस्परं भावयन्त: श्रेय: परमवाप्स्यथ ।' या गीतेच्या संदेशाचे महत्त्व कळेल.

…… शेवटी ‘ एकमेका साह्य करू अवघे धरू सुपंथ ’.. हेच खरे.

**सौ. शालिनी जोशी**, फ्लेट न .3 .राधाप्रिया टेरेसेस, समर्थपथ, प्रतिज्ञा मंगल कार्यालयाजवळ, कर्वेनगर, पुणे, 411052. मो. 9850909383

## 17. कथा – “घरवापसी” – सुश्री गौरी गाडेकर



मी सुखात डुंबतच होते विराजच्या सहवासात. दिवस, महिने, वर्षं कशी वेगाने सरली, कळलंच नाही. तसं कधीतरी मध्येच मनात नको ते विचार यायचे, पण विराजचे प्रेमाने भरलेले आणि भारलेले डोळे, त्याच्या मादक ओठांवरचं खट्याळ स्मित बघितलं, की सगळ्या काळज्या, चिंता विरून जायच्या.

…… पण हल्ली काहीतरी बदलल्यासारखं, विस्कटल्यासारखं वाटत होतं. काही दिवसांपूर्वी अधूनमधून बिघडणारा त्याचा मूड आता रोजचीच चिडचिड झाला होता. मग माझ्या मनातही नसत्या शंका डोकावू लागल्या. ह्याच्या आयुष्यात दुसरी कोणी आली नसेल ना? पण कसं विचारू? विचारायला गेलं, तर अजूनच बिथरायचा.

एक दिवस असाच चिडून काहीतरी बडबडत होता. शेवटी माझ्या तोंडून निघून गेलाच तो प्रश्न.

"बरं झालं, तूच विचारलंस ते. हो. आलीय ती माझ्या आयुष्यात आणि आता तिला घरातही यायचंय. "

"विराज, यू कान्ट डू धिस टू मी! "

"व्हाय नॉट? तू काय माझी लग्नाची बायको नाहीयेस…. आणि असतीस तरी काय फरक पडला असता? तू नाही आलीस माझ्याकडे, तुझ्या नवऱ्याला सोडून? "

… आय वॉज शॉक्ड! मला काही म्हणता काहीच सुचेना.

"तूच विषय काढलास, ते बरं झालं. मी तिला इथे घेऊन येणार आहे. "

"पण मग मी…? मी कुठे जाऊ? "

"दॅट इज नन ऑफ माय कन्सर्न. तू कुठेही जाऊ शकतेस. तुझ्या त्या बावळट नवऱ्याकडे…. "

आता मला त्या घरात अजिबात राहावंसं वाटत नव्हतं. मी माझं सामान गोळा केलं. बॅगा भरल्या.

"मी निघते, " म्हटलं; पण विराजने 'नको जाऊस' तर सोडाच, पण 'आता रात्रीची कशाला जातेस, उद्या सकाळी जा, ' असंही नाही म्हटलं. खरं तर त्याने हुंकारही दिला नाही.

मी घराच्या बाहेर पडले आणि माझ्या लक्षात आलं, एवढ्या वर्षांत मी माझे म्हणून थोडेसे पैसेही सेव्ह करून ठेवले नव्हते… कुठे जाऊ आता? माहेर तर नव्हतंच राहिलं. माझ्या घर-संसार सोडून जाण्याने सगळ्यांनाच जबर धक्का बसला. आई-बाबांनी तर अंथरूणच धरलं. पुढच्या आठ-दहा महिन्यांत, दीड महिन्याच्या अंतराने दोघंही गेले. आई गेल्याचं कळलंच नाही. बाबा गेल्यावर मी माहेरी गेले, तर सगळ्या लोकांसमोर दादा म्हणाला, "चालायला लाग. तुझी सावली त्यांच्या प्रेतावरही पडायला नको. "

मग घरी जावं? प्रदीप घेईल घरात? फोन करून बघू का? थोडासा प्रयत्न केल्यावर घरचा नंबर आठवला.

पी. सी. ओ. वरून फोन केला.

"हॅलो! " प्रदीपचा आवाज मी लगेचच ओळखला.

".... " माझ्या तोंडून शब्दच फुटेना.

"बोल. " त्याने ओळखलं असेल का मी फोन केलाय ते?

मग मी धीर गोळा केला. पण माझ्या तोंडून, "मी... म्हणजे... " एवढंच कसंबसं निघू शकलं.

"ये, " म्हणून त्याने फोन ठेवून दिला.

त्याला कसं कळलं, मी परत येतेय ते? पण मग मी जास्त विचार करत न थांबता सरळ टॅक्सी केली आणि घरी गेले.

दार बंद होतं. बेल वाजवतानाही 'वाजवू की नको'चा संघर्ष मनात चालूच होता. शेवटी एकदाची मी बेल वाजवली. दार प्रदीपनेच उघडलं. तो माझ्याशी एका शब्दानेही बोलला नाही;पण माझ्या हातातल्या बॅग्ज ढकलत त्याने आमच्या बेडरूममध्ये नेऊन ठेवल्या.

"जेवायचं असेल, तर फ्रीजमध्ये काही आहे का, बघ. नाहीतर ब्रेड, बिस्किटं, टोस्ट वगैरे असतील. "

.. प्रदीपने खाण्याची गोष्ट काढल्यावर कडकडून भूक लागल्याची जाणीव झाली. ब्रेडचा टोस्ट करून चीज सॅन्डविच करून खाल्लं. तसं तर खाण्यात लक्षच नव्हतं. प्रदीपने 'ये, ' म्हटलं म्हणून. नाहीतर कुठे जाणार होते मी? हॉटेलमध्ये किती दिवस राहणार होते? तसं तर विराजने मला आर्थिकदृष्ट्याही कफल्लक करून ठेवलं होतं. पण त्याने प्रदीपला बरोबर ओळखलं - 'बावळट नवरा'.

.... प्रदीपने माझं सामान आमच्या रूममध्ये नेऊन ठेवलं. याचा अर्थ त्याने माझं आपल्या जीवनात स्वागत केलं. त्याचं अजूनही प्रेम असणार माझ्यावर. किंवा एकट्याने राहायचा कंटाळाही आला असेल. समजा, त्याने मला विचारलं, 'तुला माझी आठवण येत होती का? 'तर 'हो' म्हणू की खरं सांगू? काही न बोलणंच श्रेयस्कर.

बाहेर कृती मोठमोठ्याने बोलत होती. तिचं लग्न ठरलंय वाटतं....

"कौस्तुभ काय म्हणेल? आणि त्याच्या आई-वडिलांना काय वाटेल? पहिल्यांदा मला वाटलं होतं - 'आई गेली' म्हणून सांगावं. नशीब. खरं सांगितलं. नाहीतर मी खोटारडी ठरले असते. पण बाबा, तुम्हाला सांगून ठेवते. त्या बाईला तुम्ही घरात घेतलं असलंत, तरी मी तिला माझ्या जीवनात प्रवेश देणार नाही. "

"हे बघ, कृती... माझं - तिचं नातं, म्हटलं तर कृत्रिम आहे. कधीही तुटू शकतं ते. पण तुमचं दोघींचं नातं मात्र नैसर्गिक आणि कायमचं आहे. जन्मदाती आहे ती तुझी. आणि तू कितीही नाकारलंस, तरी हे नातं अतूट आहे. "

"तेच ना. ती निघून गेली, तेव्हा मी माझ्यातला तिचा अंश खरवडून टाकायचा प्रयत्न केला होता. पण मग कळलं, ती एवढी भिनलीय अंगात, की त्यासाठी मला जीव द्यावा लागेल. तेवढी हिंमत नाही झाली माझी. शिवाय तुम्हीच माझे बाबा आणि माझी आई झालात."

"हो. पण आता थकलोय गं मी तो डबल रोल करून. नाही झेपत आता."

"ठीक आहे ना. तुम्ही फक्त बाबाच राहा. आई या नात्याला मी जीवनातून पार काढून टाकलंय. आता गरज नाही उरली मला पूर्वीसारखी. "

"जा. झोप जा आता. काळजी करू नकोस. होईल सगळं व्यवस्थित. "

... बाहेर शांत झाल्यावरच मी किचनमधून बाहेर आले. सासूबाईंनी माझ्याकडे जळजळीत नजरेने बघितलं आणि त्या दुसऱ्या बेडरूममध्ये निघून गेल्या... एक गोष्ट मात्र खरी. प्रदीप मला सन्मानानेच वागवत होता. बेडरूममध्ये गेले, तर तो बेडवर ऐसपैस झोपला होता. म्हणजे डोळे तरी मिटलेले होते. गादीची गुंडाळी, बेडशीट, पांघरूण, उशी वगैरे खाली ठेवलं होतं.

***

मी प्रदीपशी लग्न जमवलं, तेव्हा जिवलग मित्र आपला मेहुणा होणार, म्हणून दादा खूश झाला होता. 'कमीत कमी ग्रॅज्युएट झाल्याशिवाय लग्न करायचं नाही,' म्हणून बाबा अडून बसले होते. पण मलाच घाई झाली होती. आणखी दोन-तीन वर्षं थांबायचं म्हणजे.... मी लग्नानंतर शिकेन, म्हटलं. तेव्हा दादाच माझ्या पाठीशी उभा राहिला आणि आमचं लग्न झालं. अर्थात नंतर मला शिकण्यात फारसा इंटरेस्ट राहिला नाही. पुढे कृत्तिका झाली. नंतर मंगलचं लग्न झालं. त्यानंतर सासऱ्यांच्या आजारपणाने अख्ख्या घराला झाकोळून टाकलं.

... आणि अचानक एक दिवस विराज नावाचं वादळ आलं. वावटळीबरोबर पान उडत जावं, तशी मी त्याच्याबरोबर वाहत गेले आणि नंतरही कित्येक वर्षं तरंगत राहिले. आता त्याने तोडून टाकलं, तेव्हा गटांगळ्या खात मी खाली खाली आले. नशीब, प्रदीपने मला जमीन दिली.... प्रदीपने मला आधार दिला खरा;पण त्यामुळे तो स्वतः सगळ्यांपासून तुटूनच गेला. दादा त्याच्यावर नाराज झाला. मंगल माहेरी यायची बंद झाली.

कृतीच्या लग्नासाठी दादा-वहिनी, मंगल आणि तिचा नवरा आणि सगळ्यांची मुलं तीन-चार दिवसांसाठी राहायला येणार होती म्हणे. पण सगळ्यांनीच बेत कॅन्सल केला. लग्नाच्या दिवशी सकाळी दादा गाडी घेऊन खाली आला होता. मग कृती, प्रदीप आणि सासूबाई घरून निघून त्याच्या गाडीने हॉलमध्ये गेले. मी लग्नाला गेले नाही. इतरांचं सोडाच;पण प्रदीपनेही मला आग्रह केला नाही.

कृतीच्या लग्नानंतर सासूबाईंचा माझ्याशी असलेला पूर्ण अबोला अगदी किंचित प्रमाणात कमी झाला. म्हणजे अगदी गप्पा-बिप्पा नाहीत, पण 'चहा कर', 'गॅस बंद कर' वगैरे बोलू लागल्या. एकदा तर त्या माझ्याशी चक्क

दोन-तीन वाक्यं बोलल्या,... "प्रदीपला पुन्हा गुंतवू नकोस. मागच्या धक्क्यातून अजून सावरला नाहीय तो. पुढचा धक्का सहन नाही होणार त्याला. "

त्यांना माझ्याशी बोलताना प्रदीपने लांबून बघितलं वाटतं. त्या काय बोलल्या, ते त्याला ऐकू आलं नसावं.

रात्री झोपायला बेडरूममध्ये गेले, तेव्हा तो अगदी तेच म्हणाला, "आईला तुझ्यात जास्त गुंतवू नकोस. मागच्या इन्सिडन्सनंतर सावरायला खूपच वेळ लागला तिला. पुन्हा असं घडलं, तर वाचणार नाही ती. "

मी पुन्हा तशीच निघून जाणार, अशी खात्री वाटत असल्यासारखी बोलली दोघंही. पण तक्रार करण्याएवढी निर्दोष मी तरी कुठे होते?

पुढच्याच आठवड्यात कृती कौस्तुभबरोबर यु. एस. ला जायला निघाली. जाण्यापूर्वी घरी आले, तेव्हा कौस्तुभने मला नमस्कार केला. बोलला नाही काही. कृतीने माझी दखलच घेतली नाही. अर्थात खवचट काहीतरी बोलण्यापेक्षा हे अस्तित्वच नाकारणं परवडलं.

... आता आठवतं, तिच्या वेळी गरोदरपणात, बाळंतपणात मला इतका त्रास झाला, की मातृत्वाच्या कल्पना, आनंद वगैरे कधी डोक्यातच आलं नाही. तसं मी तिचं सगळं केलं. पण आता जाणवतंय, की त्यात प्रेम-वात्सल्यापेक्षा कर्तव्यभावनाच जास्त होती. तिचं बाकी संगोपन सासूबाईंनीच केलं.

... एकंदरीत कृती यु. एस. ला गेली आणि आमच्या आयुष्यातलं एकमेकींचं अस्तित्व संपुष्टात आलं. तिला माझ्याविषयी काही वाटत नव्हतं, हे ठीक आहे. पण मीही तिच्याविषयी कोरडी झाले होते. कदाचित तिने माझं जे स्वागत केलं, त्यामुळे माझ्या इगोने मातृत्वाची उरलीसुरली नाळ तोडून टाकली असावी. उलट ती लांब गेल्यामुळे मी सुटकेचा श्वास घेतला. थोडक्यात प्रदीप ज्याला नैसर्गिक, अतूट नातं म्हणाला होता, ते तुटल्यातच जमा झालं.

कृतीला जाऊन आठ-दहा दिवस झाले असतील, तोच सासूबाईंना हार्ट अटॅक आला. पुढे काही दिवस त्या हॉस्पिटलमध्येच होत्या. तिथेच त्या गेल्या.

'कृतीचं लग्न झालं आणि ती नवऱ्याकडे गेली. आता आपल्या जीवनाचं कर्तव्य संपलं, असं वाटून त्यांनी जगाचा निरोप घेतला असावा', असं मला वाटलं.

पण मंगलचं म्हणणं मात्र वेगळंच होतं - "हिच्या परत येण्याने तिला मनस्ताप झाला. नाहीतर माझी आई आणखी जगली असती. "

त्यावर प्रदीपने सांगितलं, "तसं काही नाही. त्यांची रिलेशन्स चांगली होती. " हा निष्कर्ष त्याने कशावरून काढला, माहीत नाही. अर्थात आमची रिलेशन्स आताशा आधीएवढी वाईट नव्हती म्हटल्यावर तो अगदीच चुकीचं बोलला नाही, असं म्हणायला पाहिजे.

घरात गर्दी जमली, तेव्हा मी एका बाजूलाच उभी राहिले. दादाची नजर एकदा माझ्याकडे गेली. चुकूनच असणार. कारण मी तिथे उभी आहे, हे त्याला माहीत नसणार. पण नंतर मात्र त्याने माझ्या दिशेला चुकूनही पाहिलं नाही. शिवाय माझ्या लक्षात आलं, की तो प्रदीपशीही बोलला नाही.

सासूबाईंना नेल्यावर मी आंघोळ केली आणि बेडरूममध्येच जाऊन बसले.

थोड्या वेळाने प्रदीप, भावोजी, दादा आणि इतरही परत आले. वहिनी आणि इतर बायका आपापल्या नवऱ्याबरोबर घरी गेल्या. मंगल आणि भाऊजीही निघाले.

बाहेर सामसूम झाल्याचं जाणवल्याबरोबर मी बेडरूममधून बाहेर आले. घरात मी आणि प्रदीप दोघंच उरलो होतो.

प्रदीप आंघोळीला गेल्यावर किचनमध्ये जाऊन मी डाळभाताचा कुकर लावला.

सासूबाईंसाठी दिवा लावला होता. त्यात तेल घातलं. एका छोट्या ताटलीत दोन घास ठेवले. नमस्कार करून मागे वळले, तर प्रदीप एकटक दिव्याकडे पाहत बसला होता. मनातल्या मनात सासूबाईंशी बोलत असावा. काय बोलत असेल तो? मला घरात ठेवून घेतलं, त्याची माफी मागत असेल?

बघता बघता त्याच्या डोळ्यांतून अश्रू वाहायला लागले. मी त्याच्या शेजारी जाऊन बसले. मलाही वाईट वाटत होतंच. काही झालं, तरी त्यांनी माझ्या मुलीचं संगोपन केलं होतं. माझा संसार सांभाळला होता. आणि मनात आणलं असतं, तर मी परत आल्यावर त्या मला हाताला धरून बाहेर काढू शकल्या असत्या. प्रदीपने नक्कीच विरोध केला नसता. पण त्यांनी तसं केलं नाही. माझ्याही डोळ्यांना धारा लागल्या. आणि प्रदीप रडायला लागला. अगदी हमसून हमसून रडायला लागला. माझ्याही नकळत मी त्याला जवळ घेतलं. तो माझ्या कुशीत शिरून रडत होता. मी त्याच्या पाठीवरून हात फिरवत होते. दोघांच्या अश्रुपातात आमच्यातला दुरावा वाहून जातोय, असं मला वाटलं.

"चल. जेवून घे थोडं. "

त्याने मानेनेच 'नको' म्हटलं.

"असं उपाशी झोपायचं नसतं, " असं म्हणून मी एका ताटात डाळभात वाढून आणला. एक घास त्याला भरवला, एक मी घेतला. असं करत सगळा भात संपवला.

मागचं आवरून, दिव्यात तेल घालून मी झोपायला आले. प्रदीपने नेहमीसारखी गादी खाली ठेवली नव्हती. 'म्हणजे याने मला स्वीकारलं, वाटतं, ' माझ्या मनात आलं. तेवढ्यात तो बोलला, "आजपासून तू त्या बेडरूममध्ये झोपत जा. "

मी दुसऱ्या बेडरूममध्ये जाऊन झोपले.

… विराजबरोबर असताना माझ्या रक्तातून लाल आणि पांढऱ्या पेशींबरोबर वासनेच्या पेशीही वाहत होत्या, वाटतं. नुसत्या वाहतच नव्हत्या, तर कल्लोळ करत होत्या. पण इथे आल्यापासून मात्र माझं मन आणि शरीरसुद्धा अगदी शांत झालं होतं. सेक्सचा विचारही शिवत नव्हता मनाला.

… पण हे असं पुढेही चालेल ना? प्रदीप असाच वागत राहिला तर माझं मन आणि शरीर - दोन्ही मिळून कोणतं पाऊल उचलतील, कोणास ठाऊक!

**सुश्री गौरी गाडेकर, 1/602, कैरव, जी. ई. लिंक्स, राम मंदिर रोड, गोरेगाव (पश्चिम), मुंबई 400104. मो नं. 9820206306**



## 18. कथा – आनंदाचे घर... – डॉ. माधुरी जोशी



### कुटुंब प्रमुख "सा"...

मैफल सांगतेकडे आलेली. रात्र रात्र गायन वादनानी भारलेला मांडव... स्वरांचं साम्राज्यच पसरलेलं... आताही रंगमंचावर ते चार तानपुरे... सारेच आत्यंतिक सुरेल... दोन काळे.. खूप साऱ्या नक्षीनं, मीनाकारीनं सजलेले... दोन अगदी नीतळ, साधे... पण चौघांची भाषा एकच... गुंजारव ही तोच... "सा"... "षडज्"... फक्त तोच मांडवभर पसरलेला... कानाकोपऱ्यात... कनातीच्या रंगीत झुलत्या कापडात... मंदशा अगणित दिव्यांच्या प्रकाशात... फक्त "सा"... अजून गाणं सुरूच नाही झालेलं... पण ते जुळलेले तानपुरे, तो षड्जाचा गुंजारवही अनुभूती देतो वेगळीच... ते जव्हारदार, घुमारदार, मधुर, निषादात बोलणारे तानपुरे भारावून टाकतात... उमटत राहतात षड्जाची आवर्तनं... लाटा... ती पहाट वेळा... कोवळी किरणं अजून क्षितीजाच्या किनाऱ्याकडे... मंडपाजवळच्या मंदिरातून काकड आरतीची अस्पष्ट घंटा... तरंगत येणारा उदबत्तीचा मंद दरवळ... आणि मांडवात फक्त "सा" भरुन राहिलेला... आधार स्वर... साऱ्या स्वरांचं मूळ.. उगमस्थान.. सा.. "साधार "... तो "साकार" करतो राग चित्र... तो "सामर्थ्य" सप्तकाचं... तो सारांश.. स्वरार्थ... संगीतार्थ ...

"सा" महत्वाचाच... इथूनच निर्माण होणार प्रत्येक स्वरांचा आत्मा.. या "सा" चं सर्व स्वरांशी घट्ट नातं, दृढ भावनिक मैत्री... आणि साऱ्या स्वरांनाही याचीच ओढ.. साऱ्या श्रुती, स्वर... साऱ्यांचे इथेच समर्पण... आणि त्या अथांग स्वरसागराला सामावून घेणारा "सा"... शांत... मंद्र, मध्य, तार सगळीकडे तसाच...

"सा" ला माहिती आहे प्रत्येक स्वर कुठे आहे... कसा आहे... किती आहे... कधी भेटणार आहे... ते सारे स्वर एकमेकांच्या संगतीनं सजतात.. राग घडतो.. फुलतो... सजतो... दरवळतो... सारं सतत "सा "मधे विलीन होत राहतं... खरंतर हा अचल... योग्यासारखा... मास्टर दिनानाथ म्हणत तसे साधुपुरूष... स्थिर आपल्या जागी... तो मूलभूत आधार संगीताचा... ठाम... निश्चल...

पण तो स्वरांचा, रागांचा भाव जाणतो. प्रत्येक रागाच्या स्वरांना हवं असेल तसा वागतो. ना तो कोमल.. ना तो तीव्र... पण तो कधी हळवा होतो, कधी लख्ख ठाम... राग रूपाच्या भावनेत, रागाच्या लयीत, स्वरवाक्यांच्या वजनात अगदी एकरूप होत राहतो. आपलं अटल स्थान राखत स्वरांचा सन्मान करतो. रागरुप जपत मंद्र, मध्य, तार.. सर्व सप्तकात राहतो.

"सा" सात स्वरांचा जनक... पु ल म्हणतात शारदेचं वस्त्र धवल आहे ते रंगहीन म्हणून नाही तर सात रंगांचा मिलाफ होऊन होणारा शुभ्र आहे तो. एका थेंबातून सात रंगांचे किरण फुटतात आणि परत धवल रंगात विलीन होतात... तसंच आहे ना सप्तकाचं... सा आधार सप्तकाचा... स्वरनिर्माता.. पण त्याला अहं नाही. तो असणारच असतो पण सतत समोर येऊन दाखवत रहात नाही... स्वरांना सजू देतो... रमू देतो.. रंगू देतो.. कारण त्याला माहिती आहे ते सारे त्याच्यापाशीच परत येणार आहेत. तो त्यांच्या सहज सोबत असतो अदृश्यपणे... कोमल, शुद्ध, तीव्र साऱ्यांच्या भावनांसोबत असतोच तो... कधी कधी तर राग रचनेत, चालीत कुणी स्वर वर्ज्यही असतात... पण म्हणून नातं तुटतं नाही. सुटत नाही "सा" चं... ते तेवढ्यापुरते

दुरावतात आणि दुसऱ्या वेळी प्रधानही होतात. हे सारं "सा" मनात जाणतो. ते सोबत असोत नसोत हा सदैव संगतीला असतोच... ते नसले तरी इतर स्वरांची नाती जपतो... "सा" शांतपणे सारं ऐकतो, पाहतो, जपतो, सांभाळतो... त्याला दृढ विश्वास आहे सारे भाव, रस, रंग, श्रुती कितीही सजले तरी त्यांना ओढ आहे त्या अचल "सा" ची... जिथून प्रवास सुरू तिथेच समर्पण आहे... तो समजुतदार "सा" सर्वांना आपल्या मायेच्या दुलईत घेतो...

प्रत्येक स्वर वेगवेगळे भाव भेटवतो... राग सजवतो... "सा" आपल्या जागेवरून सारं न्याहाळतो... कल्याणच्या गंधार, तीव्र म, आणि निषादाची मैत्री.. बिहागच्या दोन मध्यमांचं अद्वैत आणि गंधाराचा सुवास... बागेश्रीच्या कोमल गंधार निषादावर धैवताची मध्यमाची सत्ता, त्याच कोमल निषादाशी रागेश्रीतलं शुद्ध ग चं जुळलेलं सूत... रात्रीकडे अलगद पाऊल टाकणारा मारव्याचा कोमल रिषभ पहाटे भैरवाच्या सूर्याला अर्ध्य देतो. करूण रहात नाही तर उदात्त होतो... ऊन्ह तापतात... माध्यान्हीला शुद्ध सारंगचा चढा पण काहीसा करूण तीव्र म शुद्ध मध्यमाच्या प्रभावात वावरतो... तिलककामोदचे स्वर गंधाराची आर्जवं करतात... जणू काही ग जवळ भेटू असं ठरलंय सगळ्यांचं... अगदी "सां प"ही मींड देखील... किती रागांचे किती खेळ... काही स्वरांना खूप महत्व... तर काही फक्त रागात असतात. ते नसून चालत नाही आणि आहेत म्हणून फार सन्मानही नाही. पंचम किंवा मध्यम तर काही वेळा हात सोडून दूर जातात. साऽऽऽरं "सा" पाहतो. पण तो सर्व रागरूपात समयचक्रात, सदैव, सतत असतोच. तो आहे म्हणून तर स्वर निवांत रंगतात, खेळतात आणि या आनंदाच्या घरी परततात... समाधानानं... तृप्तीनं...

"सा" चा आग्रहंच नाही की मी पाया... मूळ स्वर... आधार... सतत माझा सन्मान करा... पण तो अटळ... आहेच... असणारच आहे... सजणाऱ्या सर्व रंगांबरोबर... रसांबरोबर... श्रुतींबरोबर... "सा" सगळं जाणतो.. अगदी सहज स्वतःचा पोतही बदलतो... कधी स्पष्ट, कधी लख्ख, कधी अंधुक होतो. पण प्रत्येक "कहन " चा तो "पूर्णविराम" असतो. शांत, तृप्त... त्याला माहिती आहे स्वर कितीही सप्तकात हिंडले, कितीही लयीत खेळले तरी अखेर "सा " च्या तेजाशीच एकरूप होणार.. मिसळून जाणार... समर्पित होणार... तेच तर त्यांचं मूळ, कूळ, गोत्र... आणि तिथे ते छान एकरूप झाले तरंच हे पक्कं होईल की ते काही तरी चांगलं, अचूक, सुरेल, रंगवून, सजवून आलेत. स्वर, लय, शब्द सारी अंगे... घराणं, राग, ताल कोणतंही असो... लोकगीत, भावगीत, दादरा, ठुमरी, नाट्य, चित्रपट कोणती का गायकी असेना हा सर्वत्र... अचल!! अटल!! ठाम!!

तो भारदस्त, अचूक, स्थिर, गोल, गोड, भावपूर्ण असा लागला तरच रंग भरणार... आनंदाचं घर 'रस'भावानी लयदार सजणार. बेहेलावे, मुरकी, खटका, मींडची तोरणं डोलणार... राग, स्वर, शब्दांच्या रंगभऱ्या रांगोळ्या सजणार... अशा सुंदर गायकीचा पत्ता सांगू? ...

'आनंदाचं घर

– कुटुंब प्रमुख "सा"

– कुटुंबातले सदस्य "१२"

– – आणि महत्वाची सहज सापडणारी खूण म्हणजे.. सभोवती अगणित स्वर, भाव, रंग गंधांची फुललेली फुलबाग

**डॉ. माधुरी जोशी**

## 19. चित्रकाव्य - "ओळख स्वतःची..." अपर्णा माधव परांजपे





स्वीकारले जगाने वा दुर्लक्षिले जगाने
काही ही फरक नाही स्थिरता असो मनाने....

काटे असोत बहुत वा असो पुष्प सुकुमार
विजय तो मिळाला व पदरी असेल हार....

मी काय केले, काय मज मिळाले
दमता सुखावता पण क्षण परी गळाले....

करणे असेल उचित पण फळ नसे हातात
निसटून सर्व काही हात रिक्त रहातात.....

समजून मांडले मी हे सोहळे सुखाचे
कर्तव्य ते करोनी, आशिष मिळे फुकाचे.....

मानोनी भास सत्य चुकले पुनःपुन्हा मी
आनंद शोधताना भांबावले पुन्हा मी.....

हितगूज कानी पडले करणे कलाकृती ही
जगनियंत्याची सुकुमार देणगी ही.....

का मग उगाच इच्छा मी तर वेगळीच
धुंदी उतरली ती मौज आगळीच.....

निमित्तास धाडले मजला त्या प्रेमस्वरूपाने
समर्पणात राहू सदैव सुमनाने..

जगतात येरझार त्याचीच ही परीक्षा
दुर्लक्षिले जगाला रुंदावल्यात कक्षा...

जग खेळविते मजला, तर मी ही तयार असणे
माझेच सूर मी, माझेच गीत गुणगुणणे....

हासून नाचणे अन् नाचून हासणे मग
प्रेम ममता असे, नसतील द्वेष राग....

बदकांचा थवा असा थकला पळून
नसतात भास आता, "राजहंस" पाहे वळून....
"राजहंस" पाहे वळून....

**सुश्री अपर्णा माधव परांजपे** *मो. 9503045495*

20. कथा -" तू तेव्हा तशी... – सुश्री नीलांबरी शिर्के





*गच्च भरायचीस तू*
*सकाळी आणि संध्याकाळी*
*रिती करायला यायचा*
*पोस्टमन दोन्ही वेळी......*

*सुट्टीच्या दुसऱ्या दिवशी*
*तू ओसंडून वाहायचीस*
*भावनाभरल्या अक्षरांनी अन्*
*गच्च ओथंबून जायचीस......*

*सुख दुःख, अडीअडचणी*
*तूच एकत्र सांभाळायचीस*
*ज्या त्या भावना तशाच्या तशा*
*संबधितांना पोहोचवायचीस......*

*आनंदाचे मजकूर तेव्हा*
*पुनःपुन्हा वाचले जायचे*
*अडीअडचणी एकमेकांच्या*
*चर्चा करून सुटले जायचे*

*सल्ला, प्रेम, आपुलकीचा*
*तुच तेव्हा होतीस स्तोत्र*
*प्रत्येक जण वाट पहायचा*
*माझ्यासाठी येईल पत्र......*

*प्रेम भारली, महत्वाची पत्रं*
*बासनी बांघून ठेवली जाई*
*पत्र म्हणजे फक्त पत्रच नसतं*
*भरवशाची त्यावर असे शाई......*

*आता रस्त्याकडेला तू*
*उभी दिसतेस केविलवाणी*
*तुझी अवस्था बघून येई*
*आपसूकच गं पापणीत पाणी......*

*सुश्री नीलांबरी शिर्के* *मो 8149144177*

## 21. लेख - ज्येष्ठत्वाकडून श्रेष्ठत्वाकडे – सुश्री मनिषा आवेकर



*निवृत्तीचे वळण येता*

*हुरहूर दाटे मनी*

*सुखी रहा आता घरी*

*निरोप साश्रू लोचनी ....*

कधी ना कधी प्रत्येकाच्या आयुष्यात निवृत्तीचे वळण येतेच. रोजचे मित्र/मैत्रिणी भेटणार नाहीत म्हणून साहजिकच मन गलबलते... निवृत्ती हा मोठा बदल अन् तोही साठीमधे!! ऑफिसमधले पद गळून पडते आणि ज्येष्ठत्वाचे नवे पद बहाल होते. आज ह्याच ज्येष्ठत्वातून श्रेष्ठत्वाकडे कसे जायचे ह्याचा विचार करायचा आहे.

आपण निवृत्त होतो तेव्हा आपली शारिरीक स्थिती चांगली असते. निवृत्तीची पुंजी मिळाली असल्याने आर्थिक स्थितीही चांगली असते. आता हीच वेळ असते उत्साहाने टूर्स ठरवायची. घरच्या मंडळींशी बोलून घेऊन सर्वांच्या सोयीने तारीख ठरवावी. अशावेळी घरच्या कामाचा बाऊ न करता, मुक्तपणे फिरुन घ्यावे. ह्यापुढे प्रत्येक वर्षी आपली शारिरीक क्षमता कमी होत जाणार आहे, हे ओळखून आधी परदेश टूर्स आणि नंतर देशांतर्गत टूर्स करुन घ्याव्यात. येताना घरातील प्रत्येक सदस्याला काहीतरी भेटवस्तू नक्की आणावी. त्यांना खूप आनंद होतो.

इतके दिवस घरातील मंडळींनी आपल्याला सहकार्य केलेले असते म्हणूनच आपली नोकरी सुकर झालेली असते हे जाणून सर्वांना आवडत्या वस्तूंची भेट द्यावी. तरुणाईलाच हॉटेल आणि बेत ठरवायला सांगून जंगी पार्टी करावी. अशावेळी काटकसर नको. अशा वेळा वारंवार येत नसतात म्हणून आनंदाने हात सैल सोडावा.

नोकरीच्या धावपळीत आपले वाद्य शिकायचे राहिलेले असते. योग्य गुरुंकडे क्लासला जावे. आता वाद्य शिकून कुठे मैफिली मारायच्या नसतात. स्वान्तसुखाय शिकावे म्हणजे त्यातून भरपूर आनंद मिळतो. कसलेही टेन्शन येत नाही... आता शरीरस्वास्थ्याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. ऑफिस असताना शरीराला चलनवलन असते. थोडातरी व्यायाम, हालचाल होत असते. आता घरी असल्यावर आपला जीवनक्रम आपणच ठरवला पाहिजे. त्यात दिवसाचा सकाळचा पहिला तास चालण्यासाठी ठेवला पाहिजे. रोज सकाळी रिकाम्यापोटी चालण्याचे अनेक फायदे आहेत. मधुमेह, रक्तदाब ह्या विकारांपासून दूर रहाता. तुमच्या चित्तवृत्ती रम्य उषःकाली चालल्याने प्रफुल्लित होतात. तुम्हाला समवयस्क मित्र/मैत्रिणी मिळतात. एकटेपणा वाटत नाही. हास्ययोगाक्लब हाही एक चांगला उपक्रम आहे. हसण्याने मानसिक आणि शारिरीक आरोग्य चांगले रहाते.

दिवसाची सुरवात सुप्रभात असे हसून wish करुन झाली की आपणही उत्साही अन् तरतरीत होतो. होता होईल तेवढी घरच्या कामात मदत करावी. "कामावे तो सामावे".. ही मदत बाजूने करावी. मधेमधे लुडबुड

नको. स्वयंपाकाचा मेनू तरुणाईला ठरवू द्यावा. एकत्र कुटुंबात रहाणाऱ्यांना काही पथ्ये पाळावी लागतात. तुमचे मत मागितले तरच द्यावे. अशावेळी शब्दकोशाचा आदर्श समोर ठेवावा. कुणी refer केले तरच शब्दकोश अर्थ सांगतो. सल्ला मागितला तरच द्यावा. फुकटचे सल्ले देऊन आपले हसू करुन घेऊ नका. " आमच्या वेळी असं होतं अन् तसं होतं!! आम्ही यंव केलं अन् त्यंव केलं "अशी वक्तव्ये टाळावीत, कारण तुमच्या भूतकाळात तुम्ही काय केलं ह्यात तरुणाईला काडीमात्र रस नसतो.

मोबाईलचा वापर जरुर करा पण बेताने. मित्रमंडळीच्या ग्रुपचे सदस्य व्हा. त्यांचे वाढदिवस लक्षात ठेवून फोनवरुन शुभेच्छा द्या. छापील शुभेच्छांपेक्षा प्रत्यक्ष संवाद मनाला अधिक आनंद देतो.

तुम्ही कविता करत असाल तर, काव्यमंडळांचे सदस्य व्हा. काव्यशास्त्र जाणून घ्या. मित्रमंडळींना तुमची कविता वाचून दाखवल्यावर त्यावर ते अभिप्राय देतील. त्यातून प्रोत्साहन मिळेल. कधी काही चुका दाखवल्या तर त्या आनंदाने खेळकरपणाने स्विकारुन दुरुस्ती करा. मग बघा काही दिवसात तुमची काव्यवेल जोमाने बहरेल. शब्दसंख्या, लय, यमक, अलंकार ह्यांची माहिती झाल्यावर सरावाने काव्यस्पर्धांमधे यशाचा आनंदही मिळेल.

दुपारच्या वेळात क्लबमधे कॅरम, बुद्धिबळ, पत्ते असे बैठे खेळ खेळल्याने, वेळ तर चांगला जातोच पण थोडीफार बुद्धीला चालना मिळते. गप्पागोष्टी झाल्याने मनस्वास्थही चांगले रहाते.

चांगले मित्र/ मैत्रिणी जोडा. ज्येष्ठत्वातली ती बहुमोल संपत्ती आहे. ते आपल्याला कधीही एकटे पडू देत नाहीत. एकवेळ नातेवाईक लांब रहातो पण जिवलग मित्र लगेच धावून येतो. सर्वतोपरी मदत करतो. रक्ताचे नसले तरी घट्ट आपुलकीचे जिव्हाळ्याचे नाते कायम जपून ठेवावे. किरकोळ गैरसमजातून मैत्रीमधे वितुष्ट आणू नये. होता होईल तेवढे मित्राला समजून घ्यावे. मैत्रीचे संबंध तोडू नयेत कारण 'कल हम नही या वो नही!! ' आज भेटलेली व्यक्ती पुन्हा कधी भेटेल सांगता येत नाही किंवा पुन्हा भेटेलच असेही सांगता येत नाही. " क्या होगा कौनसे पलमें कोई जाने ना!! " म्हणूनच भूतकाळाचा विचार करू नये. भविष्यकाळाची चिंता करू नये. फक्त जगत असलेला वर्तमानकाळ पकडता आला पाहिजे. तो आनंदाने, मजेत जगा!!

मैत्रसंबंध, नातेसंबंध जपताना, नेहमी खरे बोला आणि आपली चूक मान्य करा म्हणजे मनावर ओझे रहात नाही. कधीकधी आपली चूक नसतानाही माफी मागितली जाते कारण आपल्या Ego पेक्षा नातेसंबंध जपणे महत्त्वाचे असते.

असे मजा करता करता आपण सत्तरीच्या मधुबनात कधी येऊन पोचलो ते कळतच नाही. " सत्तरी तू गाठलीस सखे" अशा मित्र मैत्रिणीच्या शुभचिंतनाने आपण भानावर येतो. आणि एका क्षणात वार्धक्यात पोचलो, असा भास होतो. पण मी त्या दिवशी एक जपानी व्हिडिओ बघितला. त्याची जादू तुम्हाला सांगते. No Retirement plans असे शीर्षक असलेला व्हिडिओ उत्साहवर्धक लोक आणि पार्श्वसंगीतावर सुरू झाला. आनंदी, आत्मनिर्भर ज्येष्ठ नागरिक हसतमुखाने बस, मेट्रो पकडून कामाच्या ठिकाणी चाललेले. आपले काम मन लावून करीत असलेले आणि येताना पटापट आवश्यक गोष्टींची खरेदी करून परतणारे. त्यांची वये 70/80 च्या पुढची. मी गारच झाले. ह्यांचा आदर्श आपण ठेवला पाहिजे.

तसेच ज्येष्ठत्व न येता श्रेष्ठत्वाला पोचलेले स्वामी विवेकानंद, संत ज्ञानेश्वर, नवीन तंत्रज्ञानाने भारताचा विकास करणारे माजी पंतप्रधान राजीव गांधी, ह्यांचा आदर्श समोर ठेवला पाहिजे.

मुले परदेशात असली तर काही लोकांना " कसं होणार तुमचं आता ह्या वयात? " असं म्हणून उगाचच कीव करायची सवय असते. पण " तुम्ही आमची कीव नाही केली तरी चालेल. आम्ही एकमेकांची काळजी घेतो. आम्ही NRI ग्रुपचे सदस्य आहोत. आम्ही एकमेकांना मदत करतो " असे सडेतोड उत्तर द्यावे.

प्रत्येकच गोष्ट आपल्या मनासारखी होईल असे नाही यासाठी मनाची तयारी ठेवा. पैसे खूप असले तरी आपली माणसे ही मोठी संपत्ती आहे हे जाणून मिळतेजुळते घेण्यातच शहाणपणा आहे.

सत्तरीच्या मधुबनात बकेट लिस्ट पूर्ण करावी. आमच्या दोन मैत्रिणींनी 70 वा वाढदिवस ब्लू डायमंड हॉटेलात साजरा करायचा असे ठरवले होते व तसा त्यांनी केलाही. आमचा फुल कोरम हजर होता. त्यावेळी दोघींच्याही डोळ्यांत आनंदाश्रू दाटलेले!!

सत्तरीमधे शरीर बोलायला लागते. तिमाही रिपोर्ट, डॉक्टरकडील फेऱ्या सुरु होतात. पण आता असे थोडेफार काहीतरी बदल शरीरात होणारच. आता तिशीतल्यासारखे शरीर कसे टणटणीत राहील? यासाठी मानसिक आणि आर्थिकही तयारी ठेवा. सोसेल इतका व्यायाम, सोसतील अशा छोट्या सहली करा. मित्रमंडळींकडे प्रत्यक्ष जाणे जमले नाही तरी फोनवर संपर्क ठेवा. दर सहा महिन्याला मित्रमंडळी एकत्र जमून गप्पागोष्टी आणि जेवणाचा आस्वाद घ्यावा.

आता पैलतीर दूरवर दृष्टीपथात येतो. सगळ्या आशा आकांक्षा, भावभावना निवळून मनाच्या तळाशी बसतात. आता ईशचिंतन आणि मनःशांती ह्याचीच आस लागते. आपल्या जवळच्या व्यक्तीचा हात हातात घेऊन शांतपणे कालक्रमणा करावी यातच जीवनाचे सार्थक आहे.

... उगवत्या सूर्याप्रमाणे रश्मीकिरण उधळत आपण जन्माला येतो. सगळ्यांना आनंदाची उधळण करतो. मध्यान्हीचा सूर्य तळपत असताना, आपण तेजस्वी किरण पसरुन कर्तृत्व सिद्ध करतो. आता मावळतीच्या सूर्याचे किरण मंद होत जातात. आता अस्ताचलाची वेळ झाली हे जाणून सौम्य होतो.

... तर अशी आहे ज्येष्ठत्वाकडून श्रेष्ठत्वाकडे जाणारी वाट. ही मखमली आहे तशीच उतरणीची.. पण यावर घसरायचे नाही. हळूहळू चालायचंय!! हसतखेळत.. रमतगमत!!

**सौ. मनीषा आवेकर**, वडगाव बुद्रुक, पुणे 411051 फोन 9763706200



## 22. लेख - उत्साह... – श्री कौस्तुभ परांजपे



उत्साह या विषयाची परीक्षा घेतली तर..... पुरुषांना शंभर पैकी ५० ते ८५ गुण मिळतील. मुलांना ८५ ते १०० पर्यंत. पण स्त्रीयांना मात्र कदाचित पुढच्या परीक्षेचे सुध्दा काही गुण द्यावे लागतील. कारण त्या या परीक्षेतले प्रश्न सोडवतीलच. पण ज्यांची उत्तरे त्यांना माहीत आहेत पण ते प्रश्न विचारलेच नाहीत त्यांची पण उत्तरे देतील. कारण एकच.... असणारा उत्साह.......

उत्साह सगळ्यांनाच असतो. पण मुलं, पुरुष, आणि स्त्रिया यांच्या उत्साहात कमालीचा फरक वाटतो. उत्साह नसतोच असं नाही. पुुरुष पण उत्साही असतात. पण त्यांचा उत्साह सतत, सदैव आणि सगळ्याच बाबतीत तसाच जाणवेल असं नसतं. म्हणजे समजा आपल्याला टी शर्ट घ्यायचा असेल तर आपण शर्ट पीस, पँट पीस, कुर्ता, पायजमा याकडे नजर टाकू, पण रेंगाळणार नाही. यांच मात्र तसं नसतं. जे घ्यायचं आहे ते घेण्यासाठी, आणि घ्यायचं नाही ते पाहण्यासाठी उत्साह असतो.

खाजगी कार्यक्रमापेक्षा सार्वजनिक कार्यक्रमात माणसाचा उत्साह जास्त वाटतो. पण बायकांचा उत्साह खाजगी कार्यक्रमात सुध्दा सार्वजनिक असतो. त्यात खोटेपणा नसतो.

जवळपास सगळ्याच क्षेत्रात स्त्री पुरुषांच्या बरोबरीने काम करतांना दिसत असली तरीही एका गोष्टीत दोघांची तुलना करावीशी वाटली. यात ती पुरुषांच्या पुढेच जाणवली आणि राहिल सुध्दा. ती गोष्ट म्हणजे तिचा असणारा उत्साह आणि त्यात सहज जाणवणारा हळूवारपणा. मग तो सणांंचा असो, सहलीत असो, अंगावर कपडे, दागिने घालून तयार होण्याचा असो, नाहीतर खरेदीचा असो.

वृंदावन गार्डन मधे ज्या आनंदाने त्या फिरतात तेवढाच आनंद तुळशीबागेत फिरतांना त्यांच्यात असतो. मग तो आनंद गार्डन मधल्या खऱ्या फुलांच्या साठी असेल, किंवा तुळशीबागेत असणाऱ्या प्लास्टिकच्या फुलांसाठी. उत्साह बागेेतली झाडं पाहण्याचा असेल, किंवा झाडण्यासाठी झाडू (कुंचा) घेण्यासाठी असेल. उत्साहात झाड आणि झाडू असा फरक नसतो.

वस्तू गळ्यात घालून मिरवण्यासाठी आहे, का पायात घालून फिरण्यासाठी याचा संबंध नसतो. एखाद्या सोन्याच्या दुकानात चपलाहार पाहतांना जी एक कलात्मक नजर त्यांच्या जवळ असते तशीच चपला खरेदीवेळी सुध्दा असते. चिंचपेटीचा दागिना असो, किंवा दागिना ठेवायची पेटी नजर तितकीच कलात्मक. आणि उत्साह कायम.

वस्तूची लांबी, रुंदी, किंवा किंमत, आणि वापर यावरून त्यांचा उत्साह कमीजास्त होत नाही. रंगसंगती, डिझाईन हे पाहतांना साडी जितक्या मन लावून पाहतात तेवढीच एकाग्रता रुमाल खरेदीच्यावेळी असते. मग तो रुमाल डोक्याला बांधायचा असो, किंवा पर्समधे वेळेवर न सापडणाऱ्या कप्प्यात लपूून बसणारा असो.

एखादा चित्रकार रंगवण्याचा ब्रश विकत घेतांना जितक्या हलक्या हाताने आणि प्रेमाने बघत असेल तितक्याच प्रेमाने आणि हलक्या हाताने या तोंड धुण्याचा, कपडे धुण्याचा, मोरी घासायचा, किंवा बाटली धुण्याचा ब्रश हाताळतील. हलक्या हाताने घेतील, पण हलक्यात अजिबात घेणार नाहीत. बुुट पाॅलीश करायचा ब्रश त्यांना सहसा लागत नाही. नाही तर त्यातही वेेगळ काही पाहिलं किंवा मागीतलं असतं. कारण उत्साह तेवढाच. भेंडी कोवळी आहे का हे पाहतांना भेंडीच टोक जितक्या सहजतेने आणि हळूच तोडतील तेवढ्याच नाजूकपणाने दुर्वा निवडतील.

कानातली रींग, किंवा कुकरची रींग. लाटणं आणि धोपटणं. यांंच काम वेगळ असलं तरी यांच्या खरेदीत यांचा उत्साह तेवढाच असतो. कामानुसार त्या वजनदार आहेत नं याची खात्री केलीच जाते. फक्त कुकरच्या रींगमधे रंग आणि डिझाईन असती तर… असा प्रश्न कधीतरी त्यांंना पडला असावा. कारण सध्या त्यात चाॅईस नाही. तरीही दोनचार रींग बघून होतात. यात त्यांना बोअरींग आहे असं वाटत नाही.

माॅलमधे गेल्यावर मोजून चारपाच वस्तू घ्यायच्या असल्यातरी चहा पावडर ते तोंडाला लावायची पावडर, खाण्याचं तेल ते डोक्याला व गुडघ्यावर लावायच तेल, उपवास ते मुखवास, तांंदूूळ, गुळ ते गुग्गुुळ आणि लिमलेटची गोळी ते डांबर गोळी या सगळ्या विभागात फेरफटका मारून होतो. काही वेेळा माॅलमधे अर्धा तास ती ट्राॅली घेऊन फिरल्यावर सुध्दा हे काय घेणार याचा अंदाज नसतो. आणि आपण ट्राॅली घेऊन थांबू तिथे घेतीलच याची खात्री नसते. उदबत्ती, अत्तर, अंगाचा साबण याचा वापर करण्याची जागा आणि वेळा वेगळ्या असल्यातरी खरेदीत त्यात सुगंधीपणा लागतोच व तो तपासून पाहण्याची पध्दत असते. आणि तो उत्साहाने पाहिला जातो. ऊदबत्तीचा वास दरवळायला हवा, अत्तराचा पसरायला हवा, आणि साबणाचा जाणवणारा हवा. याची काळजी घेतली जाते.

मंदिरात जाऊन जेवढ्या मनोभावे त्या नमस्कार करतात तेवढ्याच मनोभावे त्या मंदिरात जाण्यासाठी तयार होतात. उत्साह पराकोटीचा.

मेंदी लावायचा उत्साह काय विचारता. आता समारंंभात लावायची तळहातावरची मेंदी कोपरापर्यंत पसरली आहे. पण डोक्याला लावायची मेंदी डोकं आणि असलेले किंवा ठेवलेले केस या पुरतीच असते. व ती केसांना पसरवूनच लावायची असते. नाहीतर त्यांनी डोक्याला लावायच्या मेंदीतही डिझाईन करून मागीतली असती. कारण उत्साह.

आपल्याला खाण्याचा उत्साह असतो, तर यांना करून खाऊ घालण्यात असतो. आपली कितीतरी कामं केवळ त्यांच्या उत्साहामुळे वेेळेेवर व सहज पार पडतात. मग ती स्त्री आई, बहिण, बायको, मुलगी कोणत्याही नात्यातली असो, हे मात्र खरे!

**श्री कौस्तुभ परांजपे**, मो. 9579032601

## 23. कविता - कधी... श्री राजकुमार दत्तात्रय कवठेकर



नसेल व्हायचे, न व्हायचे कधी
घडायचे, न ते चुकायचे कधी

घशात जायचा न घास तोंडचा
न दैवयोग, ना मिळायचे कधी

मिळेल तेवढेच, तेच आपले
हटून ना झटून घ्यायचे कधी

अजून जिंकण्यास वाव खूपसा
हरून ना मनी खचायचे कधी

नियंत्रणात ठेव शीड आपुल्या
जहाज हे न भरकटायचे कधी

करा कसून यत्न, साध्य हो न हो
स्वतःस सांग ओळखायचे कधी..?

परिस्थितीमुळेच सर्वही घडे
कुणा न व्यर्थ दोष द्यायचे कधी

पडा.. उठा.. स्वतःस आवरा पुन्हा
न बोट आयते धरायचे कधी

लपाछपी अजून व्हायची किती?
मनामनातले कळायचे कधी...?

तुझेच मानसी खरे सदैव तू
तुला खरेखुरे पटायचे कधी...?

चुकेल वाट, जी हवी मिळेलही
न पाय काढुनी पळायचे कधी

सदैव जीवना तुझ्या कुरापती
कसे तुझ्यासवे जमायचे कधी..?

असेच चालणार जीव जोवरी
मरून रोज मी जगायचे कधी..?

**श्री राजकुमार कवठेकर, ओंकार अपार्टमेंट, डी बिल्डिंग, शनिवार पेठ, आशा टाकिज जवळ, मिरज**
**मो ९४२११०५८१३**

24. कविता - विचारणा... – सौ. अर्चना गादीकर निकारंगे



*हळूच विचारले मनाला, " भावले का तुला? "*

*विलंब न करता उत्तरले, " प्रश्न हा का झाला? "*

*म्हटले, " किती सुंदर वाटतोय निसर्ग हा! "*

*बोलते झाले, " अशीच नेहमी अवलोकित राहा. "*

*

*थंडगार वाऱ्याची झुळूक, पक्ष्यांचे मधुर बोल,*

*हे भावत असते मनात खूप खोल.*

*सुंदर हे वातावरण प्रसन्न करते मनास,*

*पहावे त्याला रोज ह्रदयी असतो एक ध्यास.*

*

*साधेसुधे असे हे प्रसंग आनंद देतात,*

*पहाताच त्यांना नकळत मनाचा ताबा घेतात.*

*निस्वार्थी भावनेने निसर्ग रोज देत असतो,*

*आपण काय देऊ हा प्रश्न तिथे अस्तित्वात नसतो.*

*

सौ. अर्चना प्रमोद निकारंगे मो ९८२०३५०४०८

## 25. कथा - आक्रित... - सुश्री स्वप्नजा घाटगे



धाकट्या दिराने, सागरने प्रेम विवाह ठरविला आहे हे समजल्यावर मानसीचा मूड गेला... खरं तर तिला आपल्या धाकट्या बहिणीलाच आपली जाऊ म्हणून आणायची इच्छा होती. तिने नवऱ्याला तयारही केले होते. पण सागरला आपल्या कारखान्यातील दिवाणजींची साधीसुधी सरिता आवडली.

दिवाणजींची परिस्थिती बेताचीच. पदरी तीन मुली, एक छोटा मुलगा... त्याचं शिक्षण.. म्हणून सरिताला त्यांनी बी. कॉम. झाल्या झाल्या मोठ्या मालकांशी बोलून कारखान्यात हिशोबनीस म्हणून चिकटवले होते.

सरिता, अर्पिता, नम्रता या त्यांच्या तिन्ही मुली अगदी नक्षत्रांसारख्या...!!!

सागर नुकताच परदेशातून शिक्षण घेऊन आला होता. , अन् ही नम्र, हसतमुख साधी सरिता त्याला आवडली.

मोठ्या मालकांनी आणि सागरचा मोठा भाऊ विक्रम यांनी होकार दिल्यावर सागरच्या इच्छेनुसार अगदी साध्या पद्धतीने लग्न झाले.. पूर्वीच सागरची आई तोल जाऊन परसातील विहीरीत पडली... बाहेर काढून उपचार करेपर्यंत ललिताबाईंचे प्राण गेले होते...!

मानसी मात्र नाराज होती. सरिताला टोमणे मारणे, सतत तिच्या कामात चुका काढणे. , माहेरची गडगंज असलेल्या मानसीला मोकळा वेळ, रिकामे डोके असल्याने सतत सरिताला कमी कसं लेखता येईल याची एक संधी सोडत नव्हती..

मानसी सरिताच्या सतत चुका काढत असल्याने सरिताचा आत्मविश्वास हळूहळू कमी होत होता.

मानसीने याचा फायदा घेऊन तिला सांगितले की ललिताबाईंचा आत्मा घरात वावरतो... 'मी त्यांना कित्येक वेळा जिन्याच्या पायऱ्यांवरून उतरताना पाहिले आहे.. ' हे ऐकून बिचारी सरिता त्या भल्या मोठ्या घरात फिरायलाही घाबरु लागली. आणि नोकरमाणसांतही ती कुजबुज सरिताच्या कानावर आली होती.

त्यातच तिला दिवस गेले. मग तर मानसी चवताळून गेली... आपल्या लग्नाला तीन वर्षे झाली तरी आपल्याला मूल नाही... अन् आता हिचं कौतुक होणार...!!

घरात वडिल माणूस म्हणजे सागरच्या विधवा आत्या होत्या... त्याच घराचा कारभार पहात... नोकर माणसं, घरातील कामगार बायका यातून खरं तर त्यांना उसंत नसते. पण सरिताला दिवस गेल्यापासून त्या खुष झाल्या होत्या.

सतत सागरला आता तुम्ही खालच्या बेडरूममध्ये झोपा, सरिताला वरखाली नको करायला असं सांगत होत्या...

सरिताला सातवा महिना चालू होता, सरिता चांगलीच जडावली होती. पण सरिताला वरच्या खोलीत रहायची सवय झाली होती. गच्चीतल्या बागेत ती रमायची.

थाटात आत्याबाईंनी डोहाळेसमारंभ केला. पण सरिताला पहिलं बाळंतपण माहेरी पाठवायला मात्र त्या तयार झाल्या नाहीत. सरितालाही सागरला सोडून जायला नकोच वाटत होते.

एका रात्री धुवांधार पाऊस कोसळत होता, सागर आणि विक्रम तालुक्याच्या गावी गेले होते... मोठे मालक, आत्याबाई खाली झोपलेल्या होत्या. पूर्ण वाड्याचे लाईट गेले होते.... आत्याबाईनी गड्याकडून सगळीकडे कंदील लावून घेतले होते...

सरिताला आणि मानसीला आत्याबाईनी जेवायला हाक मारली... आणि ...

सरिता जिन्यावरून गडगडत खाली आली... आणि वेदनेने ओरडू लागली... आत्याबाईनी ताबडतोब दवाखान्यात नेले... सिझेरीन झाले... अपुऱ्या दिवसांचे बाळ, त्याला लहान मुलांच्या दवाखान्यात ठेवण्यात आले... आत्याबाई, दिवाणजी, मोठे मालक, सरिताची आई सारेजण रात्रभर त्या दवाखान्यात सरिता कधी शुध्दीवर येते याची वाट पाहत होते... सागर, विक्रम तातडीने गावी पोहचले,

सागर सरिताच्या उशांशी बसून होता... सरिताने दोन दिवसांनी डोळे उघडले. सागरकडे पाहून बोलण्याचा प्रयत्न करत असतांनाच तिचा रक्तदाब झपाट्याने खाली गेला अन् तिने डोळे मिटले... कायमसाठी...!!!

वाड्यावर आक्रोश उसळला. , सरिता आत्याबाई आणि नोकरमाणसात आपल्या वागणुकीने अल्पावधीतच प्रिय झाली होती. तिच्या जाण्याने वाड्यावर उदास छाया पसरली होती. बाळाची दवाखान्यात आयुष्याबरोबर जगण्याची लढाई चालू होती....

................

सरिता गेल्यानंतर सागर भावनाहीन, उदास झाला होता.. , वडिल, भाऊ त्याला कामात गुंतवायचा प्रयत्न करत होते... ... तब्बल दोन महिन्यांनी बाळाला डिस्चार्ज देण्यात आला होता. सरिताची धाकटी बहीण नम्रताने त्याचं जणू मातृत्व स्विकारले होते. बाळाच्या ओढीने सागर सतत तिकडेच असे...!!

इकडे मानसीने विक्रमच्यामागे सारखा लकडा लावला होता, 'आपण भाऊजींचा दुसरा विवाह करून देऊ, ते सतत नम्रताबरोबर असतात ते बरं दिसतं नाही...! '

'मानसी, बाळाला नवीन आई सांभाळेल का? '

'अहो, त्याला राहू दे ना त्याच्या आजोळी... ते आजीआजोबा बघतील त्याला...!'

'छे, ग एवढ्या मोठ्या घराचा वारस तिथे कसा वाढू द्यायचा आणि तुझी बहिण मुग्धा काय सांभाळणार त्याला... नुसती खुशाल चेंडू आहे ती...! '

मानसी चिडून गप्प बसली पण तिने ठरवले आपण मोठ्या मालकांना म्हणजे सासऱ्यांना, आत्याबाईना तयार करायचे... भाऊजींचे लग्न करायचं म्हणजे करायचं....!

तिने आत्याबाईंना गोड बोलून विषय काढला पण त्यांचं मत, 'सागरला काय वाटेल ते महत्त्वाचे... बाळाला नम्रताची सवय झाली आहे... "

या सर्व गोष्टी होताहोता वर्षे निघून गेले...

त्या रात्रीसारखाच आज पाऊस कोसळत होता, सागर सरिताच्या आठवणीने टिपं गाळत होता...

विक्रम, मानसी गाढ झोपले होते, मध्येच मानसीला जाग आली, घशाला प्रचंड कोरड पडली होती. उशाजवळचा पाण्याचा जग रिकामाच होता. रात्री खालून आपण पाणी आणल्याचे तिला चांगले आठवत होते. तहानेने व्याकुळ झाल्यासारखे वाटत होते. म्हणून ती उठली आणि हातात जग घेऊन पाणी आणण्यासाठी खाली चालली.

जिन्याच्या इथे आल्यावर तिच्या खांद्यावर कोणी तरी हात ठेवला, तिला वाटलं विक्रम...!

तिने मागे वळून पाहिले.. मागे सरिता उभी.. डोळे पाण्याने गच्च भरले होते.. "ताई, त्या रात्री मला तुम्ही ढकलायला नको होतं....! "

मानसीची भितीने बोबडी वळली, "मला माफ कर, माफ कर... " असे म्हणत म्हणत ती मागे सरकली आणि

जिन्यावरून गडगडत खाली आली.... पाठीमागून येणाऱ्या सरिताकडे पहात तिने प्राण सोडले.....

....

या घटनेनंतर दोन वर्षांनी वाड्याने सनईचे सूर ऐकले....

मोठ्या मालकांनी आणि आत्याबाईंनी आता अर्पिता आणि विक्रम, सागर आणि नम्रता अशी जोडी जमवली... अन् अक्षता टाकून दिल्या...

सरिताचा बाळ सर्वेश ममा नम्रता आणि मावशी का काकी अर्पिता यांच्याकडे छान वाढू लागला....!!!

**सुश्री स्वप्नजा घाटगे, लेखिका आणि संपादक** - सखीसंपदा दिवाळी अंक, **अध्यक्ष** - सखीसंपदा महिला मंच, सामाजिक कार्यकर्त्या, कोल्हापूर, मो 8888033332



## 26. कथा - चुळा भरूया आणि निरोगी राहूया... - श्री सुधीर करंदीकर



काही दिवसांपूर्वी एका मित्राबरोबर त्याच्या डेंटिस्टकडे जाण्याचा योग्य आला. ठिकाण अर्थातच पुणे. मित्र त्याच्या दाताचे दुखणे बरेच दिवस अंगावर रेटत होता, डॉक्टरकडे जायला तयार नव्हता. बायको / मुलं मागे लागून लागून दमली होती. माझं कदाचित ऐकेल, म्हणून त्याच्या बायकोचा मला फोन आला. बरंच मागे लागल्यावर, माझ्याबरोबर तो डेंटिस्ट कडे जायला तयार झाला. क्लिनिक मध्ये पोहोचलो, नशिबानी गर्दी बेताचीच होती आणि मित्राचा लवकरच नंबर लागला. मित्र आत गेला. मी बाहेर बसलो. बाजूला मासिके ठेवलेली होती. मासिक घ्यायला उठलो आणि समोरच्या भिंतीवरच्या पाटीकडे लक्ष गेलं. पाटीवरचे शीर्षक असे होते -- " चुळा भरा आणि निरोगी रहा!! "

((मी (मनांत) : आतापर्यंत वॉटस अप वर, निरोगी राहण्याकरता, हे हे करा आणि त्यांची भली मोठी यादी / हे हे हे करू नका आणि खाली भली मोठी यादी, असे खूप वाचले होते. आणि हे सगळे करणे / आणि न करणे अगदी अशक्यप्राय असल्यामुळे, कुणी निरोगी राहूच शकत नाही, हे पण समजले होते. 'चुळा भरा आणि निरोगी रहा', हा संदेश जरा हटकेच वाटला आणि मनात उतरला. विचार केला, इथे वेटिंग रुम मध्ये बेसिन असेल, तर लगेच इथेच चूळ भरावी आणि निरोगी राहण्याचा शुभारंभ करावा. पण बेसिन दिसले नाही, त्यामुळे बेत थोडा, म्हणजे, घरी जाईपर्यंत पुढे ढकलला.))

मासिक खाली ठेवले आणि पाटी वाचायला लागलो –

**चुळा भरा आणि निरोगी रहा --**

जेवण झाल्यावर खळखळून चुळा भराव्या हे आपण जाणतो, पण तसं करत कोणीच नाही. का करत नाही, हे स्वतःलाच विचारून बघा.

मंडळी, बाहेर जाऊन आल्यावर / घरामध्ये साफसफाई केल्यानंतर / टॉयलेटला जाऊन आल्यावर, साबणाने हात स्वच्छ धुणं जेवढं महत्वाचं आहे, तेवढेच महत्वाचे आहे - काहीही खाल्ल्यानंतर / प्यायल्यानंतर खळखळून ८ - १० चुळा भरणे. ही अतिशयोक्ती नसून, हे अनुभवाचे बोल आहेत.

मंडळी, चुळा भरल्यामुळे तोंड स्वच्छ राहते, म्हणजे तोंडात अन्नकण मुक्कामाला थांबत नाहीत. अन्नकण मुक्कामाला नाहीत, म्हणजे जंतूंचा प्रादुर्भाव नाही. जंतू नाहीत, म्हणजे दात किडणे / कॅव्हीटी / इन्फेक्शन / रुट कॅनाल असे प्रकार नाहीत. हे प्रकार नाहीत, म्हणजे दात स्वच्छ. दात स्वच्छ असले, की, दात दाखवायची लाज वाटत नाही. दात दाखवायची लाज नसली की, मनमोकळेपणानी स्वच्छंद हसता येते. हसत राहिलो, की, मन आनंदी राहते. आनंदी मन, म्हणजेच उत्तम तब्येत आणि निरोगी शरीर. आणि याकरता करायचं काय, तर, फक्त ८-१० चुळा भरायच्या आणि केंव्हा, तर, काहीही खाल्ल्यानंतर / प्यायल्यानंतर.

मंडळी आता, प्रत्येक नियमाला अपवाद हे असतातच. चुळा भरूनही हे सगळे साध्य होत नसेल, तर आम्ही डेंटिस्ट आहोतच ना मदतीला! आमच्याकडे येण्यात टाळाटाळ मात्र करू नका. 'स्टिच इन टाईम, सेव्हज् नाईन' ह्या म्हणीशी मैत्री करा. दातांचं दुखणं सुरु झालं, तर दोन दिवस घरगुती इलाज करा. दुखणे थांबले नाही, तर लगीच आमच्याकडे या. एखाद्या सीटिंगमधेच दुखणे बरे होऊ शकते. यायला उशीर केला, तर ४ - ५ - ६ सीटिंग आहेत / सिल्व्हर फिलिंग आहे / एक्स रे आहे / रूट कॅनाल आहे / अँटिबायोटिक्स आहेत आणि आमचे मोठे बिल पण आहेच. निवड तुमची - सेवा आमची. आम्ही सेवेला हजर आहोतच ----

**आमच्या क्लीनिक च्या वेळा :** सकाळी १० ते दुपारी १ आणि संध्याकाळी ६ ते रात्री ९

**साप्ताहिक सुटी -** दर बुधवार आणि दर महिन्याचा २ रा आणि ४ था मंगळवार

**सर्व सरकारी सुट्ट्यांच्या दिवशी क्लिनिक सुरु राहील.**

आमच्याकडे येण्याकरता सुटी काढायची गरज नाही. मुलांना आणि मुलींना शाळा बुडवायची गरज नाही / त्यांच्या पालकांना सुटी काढायची गरज नाही.

क्लिनिकचा दूरध्वनी 92256**100. पूर्व सूचनेची गरज नाही.

..... इतकी सुंदर पाटी आणि डॉक्टरांचा इतका सुंदर विचार मी प्रथमच बघत होतो. सहजच तोंडातून शब्द उमटले, 'हे डॉक्टर आहेत, का फरिश्ते'. मी पाटीचा फोटो काढून घेतला आणि खाली बसलो. शेजारी बसलेल्या मॅडम मला म्हणाल्या, " तुम्ही म्हणालात ते बरोबरच आहे, हे डॉक्टर फरिश्ताच आहेत. आणि असे डॉक्टर विरळच. मी पूर्वी इथे यायचे. आता मात्र मी नियमित चुळा भरते आणि माझा डेंटिस्टशी संबंधच तुटला. ह्यांच्याकरता इथे यावे लागते. हे काही चुळा भरायला तयार होत नाहीत. आता तुम्हीच यांना सांगून बघा. "

**मी (मनात) :** मॅडम, जो माणूस स्वतःच्या बायकोचं ऐकत नाही, तो माणूस ओळख नसणाऱ्या अशा "मी" चे बोलणे काय पटवून घेणार आहे! आणि माझी या विषयावर काय ऑथॉरिटी आहे! पण सांगून बघायला काय हरकत आहे...

**मी :** दादा, वाहिनी सांगतात ते बरोबर आहे. तुम्ही चुळा भरायला सुरुवात करा. आधी २ चुळानी सुरुवात करा. तुम्हालाच फरक जाणवेल. मग ४ करा. हळूहळू ८ - १० वर पोहोचा. दोन तीन महिन्यात तुमचं इथे येणं आपोआप बंद होईल. आपण भेटू केंव्हातरी. इथे नाही, बाहेर कुठेतरी, तेव्हा अनुभव सांगा.

**मॅडमचे मिस्टर :** दादा, तुमचं म्हणणं मला पटतंय. मी नक्कीच तुम्ही म्हणताय तशा चुळा भरीन आणि अनुभव सांगायला आमच्या घरी बोलावीन.

**पलीकडे बसलेली तरुणी माझ्याकडे बोट करून, तिच्या छोट्या मुलीला सांगत होती :** " समीहा, काकांचे दात बघ, किती सुंदर आहेत, त्यामुळे हे खूप छान हसतात. ते जेवल्यानंतर आणि काहीही खाल्ल्यानंतर नेहेमी १० चुळा भरतात. तू पण भरशील ना आता? "

... माझं इतकं कौतूक मी पहिल्यांदाच ऐकत होतो. मी समीहाशी दोन मिनिटे चुळा भरणे / सुंदर दात / सुंदर हसणे / सुंदर दिसणे यावर बोललो. तिलाही ते पटले आहे असे दिसले. तेवढ्यात मित्र बाहेर आला.

समीहा आणि सगळ्यांना बाय करून आम्ही बाहेर पडलो. मित्राला घरी सोडलं. मित्राच्या बायकोनी सरबताचे ग्लास तयारच ठेवले होते. सरबत प्यायलो आणि बेसिनकडे धावलो. ८ - १० खळखळून चुळा भरल्या आणि घराकडे निघालो. मला हा उपाय भावलाय आणि पटलाय. तुम्हालाहि पटत असेल, तर पटकन काहीतरी तोंडात टाका, चावून चावून खा आणि बेसिन गाठा.. आणि ही सवयच लावून घ्या....

...घरी गेल्यावर मी चूळा भरणे यावर लेख लिहिला आणि मीडियावर पाठवला.

'चुळा भरुया आणि निरोगी राहुया' हा लेख बऱ्याच जणांनी वाचला आणि त्यांच्या प्रतिक्रिया कळवल्या,

त्या अशा -

- लेख वाचला आणि लगेच चूळ भरली
- आजपासून खाल्यावर न चुकता चुळा भरणार
- चुळा नियमित भरायचोच - पण १ किंवा २. आता मात्र तुम्ही दिल्याप्रमाणे ८ - १० भरणार
- आधी खाल्ल्यावर चुळा भरायचो - आता पेय प्यायल्यानंतर पण भरणार
- चुळा भरण्याचे महत्व समजले, खूप उपयोगी माहिती मिळाली, मुलांना परदेशात लेख फॉरवर्ड केला आहे
- मला डेंटिस्टचा पत्ता व फोन नंबर कळवा प्लिज
- गुरुचरित्रामध्ये १२ चुळा भराव्या, असा उल्लेख आहे, असे पण एका मित्रानी कळवले
- काहींनी चुळा भरता भरता फोन करून, चुळांचे आवाज ऐकवले.

एका मित्राच्या बायकोचा फोन आला की, ‘ लेख लिहिल्याबद्दल थँक्स. हे सिगारेट प्यायला बाहेर जातात - ह्यांना आता बजावले आहे, की, तुमच्या मित्रानी लिहिले आहे, त्याप्रमाणे, काहीही प्यायल्यानंतर पण ८ - १० चुळा भरायच्या आहेत. आता तुम्ही बाहेरून सिगारेट पिऊन आलात की आधी ८ - १० चुळा भरायच्या, तरच तुमची पुढची फर्माइश पूर्ण होइल. या चुळांमुळे माझी सिगारेटच्या वासापासून नक्कीच सुटका होणार. मला वाटते, की, या चुळांमुळे यांचे सिगारेट पिणे पण नक्की कमी होणार. ’

... लेखाचा इतका चांगला परिणाम होईल, अशी मला कल्पना नव्हती. चुळा भरून सगळेच निरोगी आणि हसमुख झाले तर काय मजा येईल. हा पण विचार मनात डोकावून गेला.

‘८ - १० चुळा जरा जास्तच होतात, ३ - ४ चालणार नाहीत का? ‘ अशी पण विचारणा काहींनी केली. मी उत्तर दिले की, डॉक्टरांच्या पाटीवर जे लिहिले होते, तेच मी लिहिले आहे. ३ - ४ चुळा चालतील का, हे सांगणे मला कठीण आहे. पुढचे काही समजेपर्यंत ८ - १० चुळा भरत रहा. पुढचे काय, ते आपण बघू. चान्स मिळाला, तर मी डॉ. ना नक्की विचारीन.

विचार केला, काय हरकत आहे डॉ. ना फोन करून विचारायला! पाटीवर त्यांचा नंबर होताच.

'२ मिनिटे बोलू का?' असे विचारून डॉक्टरांशी संवाद सुरु करून, त्यांना थोडक्यात माहिती दिली आणि ८ - १० ऐवजी ३ - ४ चुळांबद्दल विचारले. डॉ. ना प्रश्न जरा गुगलीच गेला.

डॉ म्हणाले : ३ - ४ नाही चालणार. ५ - ६ तरी आवश्यक आहेत. मी ५ - ६ लिहिले असते, तर लोक १ - २ वर आले असते. तुमच्या मित्रांना सांगा, की, ५ - ६ चुळा चालतील. 'हसतील त्याचे पिवळे पिवळे दात दिसतील' ही म्हण आपल्या सगळ्यांच्या मनात खोल रुजलेली असते. पिवळे आणि अस्वच्छ दात दिसू नयेत, म्हणून आपण सगळेच आपले हसणे लपवून - लपवून कायमचे हरवून बसलो आहोत. सगळ्या मित्रांना सांगा, तुम्ही आता चुळा भरताय - तुमचे दात आता स्वच्छ आहेत - बिनधास्त खळखळून हसायला लागा - मूळ स्वभावामधील हसणे बाहेर येऊ द्या.

शिवाय तोंड स्वच्छ असले की पचन संस्था उत्तम राहते आणि त्यामुळे शारीरिक स्वास्थ्य उत्तम राहतं. स्वच्छंदी हसलं, की, मानसिक स्वास्थ्य उत्तम राहतं. आणि या दोघांचे मिलन, म्हणजेच निरोगी व्यक्तिमत्व... ठीक आहे. सांगा सगळ्यांना, की, ५ - ६ चुळा चालतील म्हणून.... बाय म्हणून डॉक्टरांनी फोन बंद केला.

मी केव्हातरी डॉक्टरांची भेट नक्कीच घेईन. तेव्हा अजून काही भांडार नक्कीच हातात येईल. आणि ते तुमच्या पुढे ठेवता येईल.

– – – चला, तुम्हाला पण "चुळा भरा आणि निरोगी रहा" या संदेशानी "बाय बाय ".

**श्री सुधीर करंदीकर**, मो. 9225631100 - ईमेल - srkarandikar@gmail. com



## 27. प्रतिमेच्या पलिकडले - रम्य ते बालपण - श्री नंदकुमार इंदिरा पंडित वडेर





रम्य ते बालपण या विषयावर बाईंनी निबंध लिहून आणा म्हणून सांगितलयं.. शी यार या बालपणावर काय लिहायचं तेच कळंत नाही... सुचत तर त्याहूनही नाही... आणि तसं त्या रम्य ते बालपणावर मीच काय पण माझा अख्खा वर्गच अजून बाल्यावस्थेतच आहे हो.. आणि असं असूनही आपल्या सध्याच्या अवस्थेवर ते बालपण आपलं किती रम्य आहे.. असं चालू वर्तमान काळातच लिहिणं म्हणजे काय चेष्टा आहे... हं आता त्या बाल्यावस्थेला वाढत्या वयाच्या नव्या वस्त्रप्रावरणात गुंडाळून कायमचं ठेवून दिल्यानंतर तरी हा निबंध लिहा म्हणून एक वेळ सांगितलं असतं तरी चाललं असतं... अहो असं काय करता.. माणसाचं मन तर नेहमीच भूतकाळात रमत असतं. वर्तमानाच्या हिंदोळ्यावर बसून भविष्याच्या दूरवरच्या दिसणाऱ्या क्षितिजाला गाठायला झोक्यावर झोके घेत असतं... आता हे झोके घेत असताना खूपच दमछाक होते ती गोष्ट वेगळी... पण क्षितिजाचा आवाका गाठायचा असतो ना... आता हातात येईल.. हा आलाच हाताजवळ.. असे मोठमोठे झोके घेऊन तिथवर पोहचण्यासाठी आधी ते भूतकाळात अडकून पडलेलं आपलं मन मुक्त करणं किती गरजेचं आहे असं नाही तुम्हाला वाटत... आताही हेच बघाना.. बालपण अजूनही आमचं पूर्ण संपलेलं नसताना ते किती रम्य आहे यावर कसा निबंध खरडावायचा सांगा बरं... तुम्हा मोठ्या लोकांचं बरं आहे बघा... तुमचे व्यापताप इतके मोठे असल्याने तुम्ही एकदा जे कळतेपणात ( बालपण संपताच) लिप्त होताना सगळे भान हरवूनच जाते... मग या मोहचक्रात अडकून पडल्याने तुम्हाला तुम्ही स्वतःला पहिल्यांदा विसरून गेलेले असता आणि मग तुमच्या नजरेला एकतर आम्ही.. नाहीतर रिटायर्ड माणसंच दिसतो... बिनकामाची बिना पगाराची नि फुल अधिकाराची... काळ काम वेगाशी तुम्ही जखडून गेल्याने जे काठावर निवांत बसलेले तुम्ही पाहता तेव्हा हिच खरी सुखी आनंदी माणसं आहेत अशी असुयेची सुई तुम्हाला टोचत राहते... पण नाही हो नाही.. आता बालपण हे फार फार पूर्वी सारखं सुखाचं त्याहून अधिक आनंदाचं तर मुळीच राहिलेलं नाही... मग तुम्ही लगेचच म्हणाल तसं तर माणसांच्या कुठल्याही फेजमधे ह्राच अनुभव येत असतो.. पण म्हणून काही कुणी जगायचं सोडत नाहीत.. उलट आहेत त्यात सुखाचा शोध घेऊन आपल्या मनाचं खोटंच समाधान करत असतात.. नाही का.. ते सुख पाहता जवा एव्हढे आणि दुख ते पर्वता

एव्हढे... म्हणजे आली का पंचायत.. परत रम्य ते बालपण यावर निबंध कसा लिहायचा.... आता हेच बघाना सकाळी लवकरच उठून साखरझोपेला लाथाडून शाळेच्या बसला कवटाळून शाळेच्या पिंजऱ्यात जायचं.. मग तिथे अशी माझ्यासारखीच असंख्य अजून पंख न फुटलेली पिल्लं चिवचिवाट करत बसतात.. घारीच्या स्वभावधर्माची ती टीचरनामक डोमकावळीण लागते मग आमच्यावर डिसिप्लिनीच्या चोचा मारायला... वयाचा नि बुद्धीचा ताळमेळ न अजमावता प्रचंड अभ्यासक्रमाचा डोंगर त्या वर्षातील दिवस भरलेल्या शाळेत ते कधीच पूर्ण होणारा नसल्याने उरलेला शिळा शिधा होमवर्कच्या नावाखाली लादतात.. आधीच शाळेच्या कचाट्यातून शिणून आलेलं ते पोरं घरीदारी आपल्या पालकांना कुरकुरत असतं.. ' का लाविला माझ्या कोवळ्या जिवाला तुम्ही नस्ता घोर.. ' आणि समजा ते wfh वाले घरात जेव्हा रिकामटेकडे असतात तेव्हा त्यांच्या एकूण रागाची उतराई होण्यासाठी आमच्या अंगाचा आखाडाच केल्याशिवाय राहणार कसे... मग संध्याकाळी खेळाचं भजंच झालेलं.. काही आमिषांची बंद पाकिटं दुकानातच राहिलेली.. कुणी कुणी आमचं सांत्वन करायला पुढे धजावत नाहीत.. फक्त डोळ्यातले अश्रू मात्र एकमेव अखेरपर्यंत साथीला असतात.. त्यांना मी आणि मला ते.. ही दोस्ती तुटायची नाय सारखे.. ह्या भांडवलावर ब्लॅक मेल करत जावं ठरवले तर आता त्याला कुणीच भीक घालत नाही.. ना घरचे ना शाळेतले... जरा कुठे चांगलं वळण लावावं, मनापासून चांगला अभ्यास करावा, इ. इ. मुलांच्याकडून काही अपेक्षा ठेऊच नयेत अशी ही भुतावळ जन्माला आलीय असं घरातले आहेर करतात.. मग शाळेतल्या टिचरला काय तेच हवं असतं.. एकुणातच काय सगळेजण आम्हा मुलांच्या कडून( emerging buds )पोत्यानं अपेक्षा करतात.. आणि आम्हाला काय हवयं त्याला वाटण्याच्या अक्षता.. तुला काय कळतं.... अं अं अहो हेच ते आम्ही मुलं तुम्हाला पहिल्यापासून सांगातोय कि आम्हाला काहीच कळत नाही.. हे लक्षात घ्या बुवा आणि आम्हाला आमच्या मनासारखं जगू द्या... मग मोठं झालो कि त्यावेळी सांगा आम्हाला रम्य ते बालपण या विषयावर निबंध लिहायला.. कागद अपूरे पडतील पण निबंध कधीच पूर्ण लिहून होणार नाही.. अशा गंमती जमतीने तो लिहिला जाईल... पण आताच्या या परिस्थितीत हा रम्य ते बालपण लिहायचा तो कसा तुम्हीच सांगा बुवा.. आमचं बालपण रम्य आहे का ते?

**श्री नंदकुमार इंदिरा पंडित वडेर, विश्रामबाग, सांगली. मो 9920978470**



## 28. लेख - रामावधारणा... श्री सुनील देशपांडे



अवधारणाचे अनेक अर्थ आहेत त्यातील सगळ्यात महत्त्वाचा अर्थ ' विचारपूर्वक अंगी बाणवणे '.

रामनवमीच्या निमित्ताने आणि मागील दोन वर्षे अयोध्या पर्वाच्या उत्सवाच्या निमित्ताने जय श्रीराम असे जयघोष सगळीकडे मोबाईल सकट सतत ऐकू येत असतात.

आपल्या संपूर्ण संस्कृतीत आणि भारतीय मानसिकतेत सोपी गोष्ट पटकन करणे यालाच फक्त महत्त्व देण्याची प्रवृत्ती वाढीस लागली आहे. त्यामधील अर्थ समजावून घेणे.. त्यातील मूळ धारणा अंगी बाणवणे.. किंवा त्यातील मूळ कल्पना ही समाजात स्थापित करणे, याबद्दल काहीच करणे अपेक्षित रहात नसते.

राम असो किंवा रामदास असो, किंवा हनुमंत असो, या सर्वांचे फक्त गोडवे गाणे आणि त्यांच्या स्तोत्रांचे पाठांतर करणे.. खरे म्हणजे पाठांतर याचा अर्थ सुद्धा लक्षात घेत नाहीत. करतात ते पाठांतर नव्हे. पठणापासून अंतर ठेवून मुखोद्गत करणे यालाच आपण पाठांतर म्हणतो. राम रक्षेत एक श्लोक आहे ....

'रामरक्षां पठेत प्राज्ञः पापघ्नीं सर्वकामदाम्।'

... त्याचा गोळा बेरीज अर्थ सांगितला जातो. रामरक्षा रोज पाठ करून म्हटल्याने पापांचा नाश होऊन सर्व कामना पूर्ण होतात.

मूळ 'पठेत' या शब्दाचा अर्थच चुकीचा लक्षात घेतला जातो. पठण म्हणजे अभ्यास करणे आणि मग समजून घेऊन मुखोद्गत करणे. आपण शाळेच्या पुस्तकांना पाठ्यपुस्तक म्हणतो. कारण ते समजून घेऊन मनात ठसवायचे असते. पठण या शब्दामध्ये अभ्यास हा अर्थ गृहित आहे. अर्थात आम्ही अभ्यासच करत नसल्यामुळे तो गृहीत असलेला अर्थ कसा लक्षात येणार?

'पठेत' यापुढचा 'प्राज्ञा' हा शब्द दुर्लक्षित केला जातोच. रामरक्षेचा अभ्यास करून समजून घेऊन आणि बुद्धीचा कस लावून म्हणजे 'प्राज्ञा:' याचाच अर्थ त्यातील तत्त्व आणि गूढार्थ हे समजून घेऊन अंगी बाणवून मग त्याची आठवण सतत राहावी म्हणून रोज पठण करत राहिलात तरच पापांचा नाश होऊन सर्व कामना पूर्ण होतील.

.... एक तर प्रज्ञेचा कस लावून गूढार्थासकट अंगी बाणवल्यास पाप करण्याची इच्छाच राहत नाही. अशा एका मानसिक अवस्थेत मनुष्य पोहोचतो की काही कामना सुद्धा शिल्लक राहत नाहीत. असाच त्याचा अर्थ घेतला पाहिजे असे विचारांती मला वाटते.

अनेक जण मला यावर म्हणतात की परंपरागत रीतीने ही पद्धत चालू आहे. आम्ही लहानपणापासून पर्वचा (अलीकडे हा तरी शब्द किती जणांना माहिती आहे?) म्हणत असतो. त्याचबरोबर रामरक्षाही आम्ही पाठ (?) करत असू ते सर्व निरर्थक का?.

... यावर पूर्वीच्या गुरुकुल शिक्षण पद्धतीचा विचार करणे आवश्यक आहे. पूर्वी पुस्तके छपाईची प्रक्रिया अवगत नव्हती. त्याकाळी मुखोद्गत करणे ही पर्यायी व्यवस्था होती. लहानपणी रोज म्हणून ते लक्षात ठेवले जायचे. त्यानंतर शाळेत (म्हणजे गुरुगृही) गेल्यानंतर पुन्हा ते वदवून घेऊन त्यातील उच्चार शुद्धी करून घेत असत. ते सर्व पाठांतर (आता हा शब्द रूढार्थानेच वापरतो) झाल्यानंतर पुढील पिढ्यांसाठी ते चालत राहणे आवश्यक म्हणून उच्चारशुद्धी शिकलेल्यांनी लहान मुलांकडून ते पुन्हा म्हणून घ्यावे अशी पद्धत होती. वरच्या वर्गात गेल्यानंतर अधिकाधिक अवघड ग्रंथांचे पाठांतर करून घेतले जात असे. हे पाठांतर म्हणजे छपाईचा पर्याय म्हणूनच होते. त्याच्याही वरच्या स्तराच्या शिक्षणामध्ये त्याचा अर्थ आणि त्याची उपयुक्तता वगैरे गोष्टी समजावून सांगितल्या जात असत आणि त्यास आपल्या अंगी बाणवून घेणे आणि समाजासमोर आदर्श निर्माण करणे हे शिकवण्यावर भर दिला जात असे. त्याही वरच्या स्तरावर जे शिक्षण असे त्या शिक्षणामध्ये या पारंपारिक ज्ञानग्रंथांवर समृद्ध बौद्धिक चर्चा होत असे. त्या चर्चेतून तत्त्वचिंतनाची गोडी ज्यांना निर्माण होत असे त्यांना त्याच्याहून वरच्या स्तरावर शिक्षणासाठी पाठवले जात असे. मग जे विद्वान त्यामध्ये पारंगत होत असत ते देशाटन करून वेगवेगळ्या ठिकाणी जाऊन वेगवेगळ्या ज्ञानवंतांबरोबर चर्चा व वादविवाद करून त्या तत्त्वचिंतनातून आपल्याला झालेला बोध आणि इतरांना झालेला बोध यांचा तुलनात्मक अभ्यास करीत असत. (तेव्हा 'वादे वादे जायते तत्वबोध:' असे म्हणत, म्हणजे वादामधून तत्वबोध व्हावा अशा पद्धतीने ते वाद होत असत. अलीकडे वादातून हिंसा, कलह आणि सुव्यवस्थेचे प्रश्न निर्माण होतात.. तत्वबोध होतच नाहीत. फक्त विषयाला फाटे फुटतात. असो. ) त्याच्या पुढची पायरी म्हणजे एकांतात ध्यानमग्न बसून चिंतन करणे. त्यातून नवीन विचार आणि नवीन ग्रंथांची निर्मिती होत असे. याला आपण आजच्या भाषेत पीएचडी म्हणू.

आता याचा तुलनात्मक विचार करायचा ठरविल्यास पारंपारिक पाठांतर याची जागा आता पुस्तकांनी घेतली आहे. त्यामुळे मूळ पाठांतराची गोष्ट आता कालबाह्य झाली आहे. अर्थात पाठांतर आवश्यक नाही असे मी म्हणत नाही. स्मरणशक्तीची कक्षा रुंदावण्यासाठी पाठांतर म्हणजेच लक्षात ठेवण्याची कला अवगत असणे ही गोष्ट नक्कीच फायद्याची असते. पण त्यासाठी सद्यस्थितीतील आवश्यक ज्ञानाच्या सुरुवातीच्या पायऱ्या पाठांतराच्या रूपाने लक्षात ठेवण्यासाठी योग्य आहेत. उदाहरणार्थ पाढे, गणितातील उपयुक्त फॉर्मुले किंवा सायन्समधील विशिष्ट संकल्पना. किंवा नागरिकशास्त्र, कायद्याच्या संकल्पना आणि कायदा कलमे सुद्धा. अशा अनेक गोष्टी आहेत की ज्या व्यवहारी जगात उपयुक्त आहेत आणि त्या आपल्या स्मरणामध्ये साठवून ठेवणे आवश्यक आहेत. कोणत्याही वेळेला त्यांचा आठव होणे आवश्यक आहे आणि अशा सर्व गोष्टी मुखोद्गत करणे ही आजच्या जगाची गरज आहेच.

... पूर्वी पूजा-विधी सांगणारे धर्मपोपट ज्यांना पोपटपंची शिवाय सखोल ज्ञान काहीच नसे, परंतु ते पूजाविधी सांगत असल्यामुळे समाजामध्ये स्वतःला गुरु समजून किंवा गुरुजी म्हणून वावरायचे. अशांनी सांगितलेले शब्द हे धर्माज्ञा म्हणून सामान्य लोक समजत असत. त्यामुळे बऱ्याच वेळेला स्वार्थापोटी त्यामध्ये काही प्रतीक्षिप्त भाग टाकला जात असणे शक्य आहे. नव्हे तसे झालेच असणार. सावरकरांनी 'श्रुती आणि स्मृती यांच्याबाबत असे झाले आहे म्हणूनच श्रुती स्मृतीमध्ये बऱ्याच गोष्टी एकमेकांच्या विरोधी सांगणारे श्लोक

आढळतात' असे प्रतिपादन केले होते. सावरकरांनी श्रुती आणि स्मृतींवर खूपच कोरडे ओढले आहेत. हे समाजघातक ग्रंथ आहेत, निदान आजच्या काळात तरी, यावर त्यांचे मत ठाम होते.

... हे ग्रंथ कोण्या एका काळी समाजव्यवस्था आखणारे असू शकतील. परंतु त्याचा आज काय उपयोग? आजच्या समाजरचनेसाठी त्या ग्रंथातील योग्य त्या तत्त्वांचा उपयोग करून फार तर नवीन समाजरचनेचे नियम करता येण्यासाठी तज्ज्ञांनी त्याचा वापर करावा. परंतु आज राज्यघटना आणि देशातील कायदे हेच सर्वश्रेष्ठ आहेत आणि ते मानले पाहिजेत असे सावरकर प्रतिपादन करत असत. संविधान हीच सर्वोच्च समाजजीवनाची नियमावली होय.

कोणत्याही धर्माचे किंवा जीवन प्रणालीचे, त्या जीवन प्रणाली अस्तित्वात असताना जे काही नियम असतील ते नियम आजच्या काळात लागू केले पाहिजेत असे म्हणणे हे मूर्खपणाचे, वेडगळपणाचे आणि अप्रस्तुतच आहे. मग ते कोणत्याही धर्माचे किंवा जीवन प्रणालीचे का असेनात!

म्हणूनच राम असो किंवा रामदास किंवा हनुमान. कृष्ण असो किंवा पांडव. हे सर्व एका विशिष्ट काळी अस्तित्वात असलेल्या जीवन प्रणालीचा आदर्श होते. आजही उच्च नैतिक मूल्यांचे अधिष्ठान असलेली ही व्यक्तिमत्वे त्यांच्या नैतिक मूल्यांच्या पालनासाठी आपण आजही स्वीकारतो.. पूजनीय मानतो आणि म्हणूनच त्यांना देवत्व बहाल करतो. म्हणून त्यांची नुसती नावे घेण्यापेक्षा आणि पारायणे आणि उत्सव करण्यापेक्षा मुळातच त्यांच्या आदर्शाची अवधारणा समाजाच्या जीवन प्रणालीचा भाग बनवणे हीच समाजाची गरज आहे...

... यालाच मी ' रामावधारणा ' म्हणतो. ती आजच्या समाजाची गरज आहे. नुसता हुंकार भरून, जयजयकार करून, आणि टाळ पिटून रामावधारणेचे उद्दिष्ट साध्य होणार नाही. त्यासाठी हनुमंत आणि रामदास यांचे नैतिक अधिष्ठान अंगी बाणवणे आणि कालमानानुसार त्या नैतिकतेचा अंगीकार करण्याचा प्रयत्न करणे याची आवश्यकता आहे ... पण हे कोण समजून घेणार?

**श्री सुनील देशपांडे** (पुणेरी नाशिककर) **मो – 9657709640 email : sunil68deshpande@outlook.com**



## 29. कविता - पाऊस – श्री शरद कुलकर्णी



*नुसताच भरून आलो*
*बरसलो कधीच नाही.*
*मी पाऊसच झालो*
*जो कधीच पडलो नाही.*

*आकाश समावेशक झालो*
*तुझ्या भरजरी मेघांचे.*
*ओघळून काजळ ओले*
*तुझ्या पापणीतल्या रेघांचे.*

*थोडी वीज चमकता माझे*
*मयूर हर्षित झाले.*
*थेंबाविना पावसाच्या तेही*
*नुसतेच नाचून गेले.*

*बांधू नकोस आता*
*समजूतीचे केवळ पूल.*
*वास्तविक अंतर आपले*
*पाऊस फक्त चाहूल.*

*हे असे जसे की घडते*
*अदृश्य गणगोतही होते.*
*पाऊस दोघामधला*
*शिकवतो नव्याने नाते.*

**श्री शरद कुलकर्णी**, मिरज

30. चित्रकाव्य - वृद्धांप्रति... - डॉ. सोनिया कस्तुरे





तुम्ही अनुभवाचे संचित
कर्तव्य, जबाबदारीचे प्रतिक..!
कटू गोड आठवणींचे
चालते बोलते कथानक..!

देशातील घडमोडींचे
तुम्हीच होता प्रेक्षक..!
अनुभव आणि चिंतनाचे
तुम्ही तर स्मारक..!

आमच्या बालपणातील
तुम्हीच कवच संरक्षक..!
तुमच्यामुळेच तर छान
तारुण्यातील नाजूक काळ..!

आमच्या जडणघडणीतील
तुम्हीच सच्चे समर्थक..!
तुमचे अथांग प्रेमभाव
सदैव आम्हाला प्रेरक..!

जगण्याच्या चढाओढीत
झाले थोडे आमचे दुर्लक्ष..!
आम्ही खूप झगडतोय
करण्या जीवन सार्थक..!

माफ करा थोडे आम्हाला
आम्ही तुम्हाला होऊ पूरक
जरा विसावा या वळणावर
हात आमुचे आहेत आश्वासक..!

स्वल्पविराम नक्की घ्या
इतरांना वेठीस धरु नका
"आमच्या वेळी" असे सांगून
आधुनिकतेला डावलू नका..!

परंपरेच्या बेड्या तोडून
जगणाऱ्यांना आकाश द्या
तुम्हीच दिले पंख नभाचे
तीव्र शब्दांनी छाटून नका..!

डॉ. सोनिया कस्तुरे विश्रामबाग, जि. सांगली मो 9326818354

## 31. ललित - माझ्यातली मी घडताना ... - सुश्री ज्योत्स्ना तानवडे



१५ ऑगस्ट २००३ चा तो दिवस होता. नेत्रपेढीमध्ये नेत्रदात्यांच्या नातेवाईकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा कार्यक्रम होता. माझ्या सासऱ्यांचे आम्ही नेत्रदान करवलेले होते. अतिशय आनंदी निरामय अशा ९० वर्षाच्या जीवनाची सुफळ सांगता झाली होती. आजच्या कार्यक्रमासाठी आम्ही दोघेजण निमंत्रित होतो.

कार्यक्रमाला जात असताना मला छोटी कविता सुचली. ती गाडीतच छोट्याशा कागदावर लिहिली. तिथे मनोगत सांगताना सर्वांसमोर ती वाचली. सर्वांचा छान प्रतिसाद आला. नेत्रपिढीने तर ती मागूनच घेतली. पुढे मी दुसऱ्या एका नेत्रपेढीसाठी काम करायला लागल्यावर त्यांनीही त्या कवितेचा मोठा बोर्ड करून बरीच वर्षे हॉस्पिटलमध्ये लावला होता. ही माझी कविता मला एक छान वेगळी ओळख देऊन गेली. त्यातूनच इतर खूप जणांच्या ओळखीही झाल्या. यानंतर आतापर्यंत माझ्यापुरते असणारे लिखाण आता विविध माध्यमातून प्रकाशित होऊ लागले.

त्याच सुमारास महिलांमध्ये मी कॅन्सर जागृतीचे काम पण करत होते. त्यामध्ये माझ्या एका मैत्रिणीचे प्राथमिक अवस्थेतल्या कॅन्सरचे निदान झाले. त्यातून पुढे ती पूर्ण बरी सुध्दा झाली. तिच्या या उपचार आणि अनुभवावर मी माझी पहिली कथा 'पेला अर्धा भरला आहे' लिहिली. ती प्रकाशितही झाली.

याशिवाय आम्ही दोघे पाणी बचतीसाठी रेन वॉटर हार्वेस्टिंगच्या जागृतीचे पण काम करत होतो. या सर्व सामाजिक कामासाठी मी माझ्या लेखणीची मदत घेतली. कथा, कविता, लेख, भाषणं या सर्व माध्यमातून मी जनजागृतीसाठी सतत प्रयत्न केले. त्याला चांगले यशही मिळाले. महिला मंडळासाठी, सांगली आकाशवाणीसाठी बऱ्याच कार्यक्रमांचे लेखन, सादरीकरण सुरू होते.

यातूनच पुढे मला एका मोठ्या अवघड स्पर्धेला तोंड द्यावे लागले. २००७ साली सांगलीच्या 'जायंट्स सहेली' ग्रुपने विवाहित महिलांसाठी 'सौभाग्यवती सांगली' स्पर्धा जाहीर केली. ते ऐकून मी सोडून दिले. ज्या गावाला जायचं नाही त्याची वाट कशाला पुसायची? पण माझ्या एका अगदी जवळच्या मैत्रिणीने परस्परच माझे नाव स्पर्धेसाठी दिले आणि मला फोन केला.

"या स्पर्धेसाठी मी तुझे नाव दिले आहे. वेळ कमी आहे. तयारीला लाग. "

मी तिला ओरडलेच, " काहीतरीच काय? मला काय येतेय स्पर्धेत भाग घ्यायला? "

"अगं, एवढी छान लिहीतेस. कितीतरी गोष्टी करतेस आणि असे विचारतेस? "

"अगं, पण नाव देण्याआधी मला विचारायचेस तरी. मला नाही बाई जमणार. "

ती म्हणाली, " जमवावं लागेल. कसं ते तू बघ. काही मदत लागली तर कळव. " तिला दुखावणं शक्यच झालं नाही. शेवटी मला भाग घ्यावाच लागला.

स्पर्धा फक्त विवाहित महिलांसाठी होती. वयाची अट नव्हती. बहुतेक स्पर्धक २५ ते ३५ वयोगटातले तरूण, उत्साही आणि माझे वय होते ५२ वर्ष. शिवाय आत्तापर्यंतच्या आयुष्यात अशा प्रकारच्या स्पर्धेत प्रत्यक्ष सहभाग तर सोडा अशी स्पर्धा पाहिली पण नव्हती. पण आता एकदा भाग घ्यायचा ठरवला म्हटल्यावर मी तयारीला लागले.

खूप गोष्टींची तयारी करावी लागली. स्पर्धेच्या पाच फेऱ्या होत्या. संगीताच्या तालावर रॅम्पवा ॅक, उभे राहण्याच्या जागा, पद्धती यांचा बराच सराव करून घेतला गेला. मनापासून मी सर्व तयारी केली होती.

एकदा ठरवलं की 'मी पण करू शकते' हे दाखवून देण्याची ही संधी होती. एका वेगळ्याच उर्मीत नाट्यगृहात पाय ठेवला. संगीत सुरू झाले. ठरलेल्या जागेवर स्टेजवर उभी राहिले. समोर पाहिलं तर, अनेक मान्यवर, मैत्रिणी, खूप बायका, कॉलेजची मुलं-मुली यांनी नाट्यगृह पूर्ण भरून गेले होते. एक क्षण खूप दडपण आले. पण आता उत्तमच सादरीकरण करायचे या जिद्दीने स्पर्धेला सामोरे जायचे ठरवले.

कलाविष्कारात तरुण स्पर्धकांची गाणी, नाच, लावणी, नाट्यप्रवेश प्रेक्षकांनी उचलून धरले होते. पण त्याचवेळी माझ्या स्वरचित ' हो...! मी गृहिणी आहे ' या कवितेला सर्वांनी अतिशय उत्स्फूर्त दाद दिली याचा खूप आनंद झाला.

या कवितेचा जन्म एका कटू अनुभवातून झालेला आहे. मी कधी नोकरी नाही केली. पण घरात राहूनही खूप गोष्टी केल्या. बरीच वर्षे अतिशय उत्तम शिवणकाम केले. पाककला, शिवणकला, रांगोळी, वक्तृत्व, लेखनात बक्षिसं मिळवली. सामाजिक जागृतीचं काम मोठ्या प्रमाणात करतच होते. एकदा एका गृहस्थांनी मला उत्सुकतेने विचारले, " मॅडम, तुम्ही कुठे नोकरी करता? "

"मी गृहिणी आहे. नोकरी करत नाही. " हे ऐकल्यावर त्या गृहस्थाच्या चेहऱ्यावरचे भाव एकदम जे बदलले ते मला अंतर्यामी दुखवून गेले. त्याच्या लेखी घरातून कुणी कितीही मोठे, चांगले काम करा, पण त्या एवढ्या कामाला काही किंमतच नव्हती. त्या गोष्टीने मनात घर केले होते. काही दिवसांनी तिने शब्द रूप घेतले.

**मुक्त होईन म्हणते बंध सैलावत नाहीत**

**भरारी घेईन म्हणते पंख फैलावत नाहीत**

हीच माझ्यातली 'गृहिणी' स्पर्धेत सर्वांची दाद मिळवून गेली.

आता शेवटच्या फेरीत आम्हा पाच जणींना एकच समान प्रश्नाचे उत्तर लिहून द्यायचे होते. प्रश्न होता, ' तुम्हाला पंधरा दिवसाचा वेळ दिलाय. त्यात जास्तीत जास्त बचत कशी कराल?'

'वीज कमी वापरू, अन्न वाया घालवणार नाही, काटकसर करू, एकदम धान्य खरेदी करू, ' अशी इतरांची उत्तरे होती. बचत ही फक्त पैशांची नसते तर पैसा, श्रम आणि वेळ या तिन्हीची असते. या सर्वांचे एकत्रित उत्तम नियोजन करून जास्तीत जास्त बचत करीन' हे माझे उत्तर सर्वांच्या टाळ्या मिळवून गेले.

आता सर्वांचीच उत्सुकता शिगेला पोहोचली होती आणि तो क्षण आला. स्पर्धेचा निकाल!! दोन उत्तेजनार्थ आणि तृतीय क्रमांक जाहीर झाले. आता द्वितीय आणि प्रथम क्रमांक शिल्लक होते. त्यावेळी सहज गंमत म्हणून आम्हाला दोघींना आणखी एक प्रश्न विचारला. त्याचे मी अचूक उत्तर दिले आणि हे उत्तर देणाऱ्या आजच्या विजेत्या म्हणून माझे नाव जाहीर झाले. सर्वांनी उत्स्फूर्त जल्लोष केला. अनपेक्षित असे हे अति सुखाचे क्षण माझ्यासाठी खूप खास होते.

स्पर्धेचा बक्षीस समारंभ तर अविस्मरणीय होता. ५-७ फोटोग्राफर्सनी कॅमेरे सरसावले. फ्लॅश उडू लागले. डोक्यावर विजेतेपदाचा मुकुट, टायटलचा सॅशे आणि इतर अनेक बक्षिसांची खैरात झाली. पेपर्सवाल्यांनी खास फोटोसेशन केले. सिटी न्यूजवाल्यांनी मुलाखत घेतली. दुसऱ्या दिवशी सिटी न्यूजवर मुलाखत आणि विजेत्यांच्या नावाची तळटीप दिवसभर दाखवत होते. आजवर टीव्हीवर असे अनेक सोहळे बघितले होते. असा अनुभव आयुष्यात कधीतरी आपणही घेऊ असे स्वप्नातही कधी वाटले नव्हते. पण प्रत्यक्षात ती अनुभूती मी घेत होते.

खरंतर एका छोट्याशा खेडेगावातून आलेली मी. असा कसलाच अनुभव नव्हता. शिवाय लग्नानंतर बावीस वर्ष एका छोट्याशा कॉलनीत राहणाऱ्या, माझ्यासारख्या एका पन्नाशीतल्या गृहिणीसाठी 'सौभाग्यवती सांगली' ही उपाधी म्हणजे खरोखरच खूप मोठी उपलब्धी होती.

या स्पर्धेने मला बरेच काही दिले. माझा आत्मविश्वास वाढला. प्रत्येक गोष्टीकडे एक संधी म्हणून बघण्याची नजर दिली. एकाच गोष्टीकडे बघण्याचे वेगवेगळे दृष्टिकोन असू शकतात याची जाणीव करून दिली. आता मी जास्त सजगपणे लिहू लागले होते. सांगलीच्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनात कविता सादर केली. संमेलनाच्या कथासंग्रहात माझी कथा समाविष्ट झाली. मग मी भाषेच्या अभ्यासासाठी नाशिकच्या कुसुमाग्रज प्रतिष्ठानची 'साहित्यभूषण परीक्षा' दिली. यात स्व-अध्ययन असल्याने खूप शिकायला मिळाले. विशेष म्हणजे या परीक्षेत मला दोन नंबरचा 'गोदामाता पुरस्कार' मिळाला.

पुढे करोनाच्या संकट काळातले 'दुःखातले सुख' म्हणजे ऑनलाईन साहित्यिक समूहांचे उपक्रम. यात अनेक चांगल्या लोकांची, उत्तम साहित्यिकांची ओळख झाली. विविध साहित्यप्रकार हाताळायची गोडी लागली. लेखनाला एक नवीन दिशा मिळू लागली. दरम्यानच्या काळात ५ - ६ पुस्तकांची निर्मिती झाली. लेखनाने आयुष्य समृद्ध केले आहे. यासाठी मी परमेश्वराची मनापासून ऋणी आहे. या लेखणीची, शब्दसखीची सोबत अशीच शेवटपर्यंत कायम रहावी हीच प्रार्थना आहे.

**सुश्री ज्योत्स्ना तानवडे,** पुणे वारजे, पुणे.५८



## 32. कथा - शांताबाई — सौ.दीपा पुजारी



हातातल्या पेपरमधील बातमीनं माझं लक्ष वेधून घेतलं. लोकसत्ताच्या कुतूहल सदरात आलेली बातमी मी वाचत होतो. समोर टी व्ही वर देखील बातम्या सुरु होत्या. आश्चर्य असं की दोन्हीकडं एकच बातमी होती. ब्लॅक आणि व्हाईट मधील बातम्या देणाऱ्या शिवानीच्या शेजारी तिचीच प्रतिकृती उभी होती. ती केवळ शिवानीसारखी दिसत नव्हती तर तिचे केस शिवानी सारखेच मोकळे सोडले होते. तसाच रुबाबदार लाल रंगाचा कोऑर्ड सूट तिनं घातला होता. तितक्याच सफाईदारपणे ती बातम्या देत होती. कृत्रिम बुद्धिमत्ता काय काय करु शकते याविषयीच्या संशोधना संदर्भातली बातमी ऐकून मी दिग्मूढ झालो होतो. त्या दिवशी अख्खा देश देखील माझ्या सारखाच कुंठीत मती झाला असेल.

दुसऱ्या दिवशी पहाटे मी नेहमीप्रमाणे फिरायला गेलो. रोज आमच्या गल्लीतल्या मालूताई त्यांच्या भालूला घेऊन फिरायला येतात. तशा त्या आजही आल्या होत्या. मी त्यांना रोजच्या सारखं गुड मॉर्निंग केलं. भालू रोज माझ्याशी हस्तांदोलन करतो. पुढचा उजवा पाय तो माझ्या उजव्या हातात देतो. शेपटीचा गोल करून ती उंच करतो. हलकासा भुत्कार करतो. मग आम्ही आपापल्या मार्गाने चालू लागतो. आज त्याचा हात थोडा टणक वाटला. तो स्पर्श एखाद्या लोखंडी पाईपसारखा वाटला मला. मी पाहिलं, भालूची शेपटी सरळच उभी होती. तिचं वर्तुळ झालं नव्हतं. त्याचा भुत्कार खेळण्यातल्या भावल्याचा यांत्रिक आवाज असतो तसा ऐकू आला. माझी झोप पूर्ण झाली नसावी. मी रोजच्या सारखा हात हलवून माझा रस्ता धरला.

तास दीड तासाची ही प्रभातफेरी मला मोठा उत्साह देते. दिवसभर रस्सीखेच सुरू असते गावात. पण या वेळी किती शांतता असते गावात. किंचित फटफटलेलं असतं. रविराज आकाशाचा पडदा थोडासा बाजूला करून उषेला निरखत असतो. आरक्त उषा तिच्या जवळील रंगांचे घट रिते करते. आकाशात तांबड्या रंगाच्या असंख्य छटांची उधळण होते. रश्मिकिरणे अवनीपर्यंत न पोचल्यानं ती अजून सुस्तावलेली असते. हवेत एक वेगळा गारवा असतो. शरीर आणि मन दोन्ही उल्हसित करण्याची जादू उषेच्यापाशी आहे हे नक्की. अशा उल्हसित मनानं मी घरात पाऊल टाकलं. रोज दारातच, पायरीवरच वर्तमानपत्र पडलेलं असतं. आज ते दिसलं नाही. कुलूप काढून मी तिथंच व्हरांड्यातील झुल्यावर टेकलो. हे ही रोजचंच. शांतेची, म्हणजे माझ्या बायकोची झोपमोड होऊ नये म्हणून फिरायला जाताना मी कुलूप घालूनच जातो आपला. तिथंच बसून पेपर वाचणं हाही माझा रोजचाच क्रम. पेपर नसल्यानं डोळे मिटून हलके हलके झोके घेत होतो. शांता आल्याची चाहूल लागताच मी डोळे उघडले. तिनं माझ्या हातात चहाचा कप दिला आणि ती वळून घरात गेली. मी मारलेल्या हाकेला तिनं प्रतिसाद दिला नाही. रोज सकाळचा चहा झोपाळ्यावर बसून दोघं मिळून घेतो. आज ती एकच कप घेऊन आली होती. शिवाय काही बोलली नाही. थोडंसं चुकल्याचुकल्यासारखं वाटलं. पण मग कामाची गडबड असेल. चैत्रागौर बसली आहे घरात. चैत्र महिन्यात शांताची धावपळ होते खरी. पण बाईसाहेब खुशीत

असतात. मीही खुशीत असतो कारण महिनाभर देवपूजा तीच करते. तेवढंच माझं एक काम कमी होतं. गरमागरम चहाचा एकेक घोट सावकाश घेत मी चहाचा आस्वाद घेतला. थोड्या वेळानं आंघोळ आटोपून मी पुन्हा पेपर आला का बघायला बाहेर आलो. शांता रांगोळी काढत होती. आज रांगोळी काढायला बराच उशीर झालेला दिसतोय. मी तिला तसं विचारलं. त्यावर ती काहीच बोलली नाही. झोपाळ्यावर पडलेला पेपर माझ्यासमोर नाचवला तिनं आणि पुन्हा तो तिथंच झोपाळ्यावर फेकून ती निघून गेली.

नाश्त्याला काय आहे आज? हा प्रश्न मी गिळून टाकला. मुकाट्यानं पेपर चाळत बसलो. पाचच मिनिटांत ती पोहे घेऊन आली. पोह्याची एकच प्लेट बघून मी, “ अगं तुझ्यासाठी नाही का आणलेस? ” असं विचारलं तर माझा प्रश्न पूर्ण होण्यापूर्वीच ती लगबगीनं आत गेली सुद्धा. असो. मला चांगलीच भूक लागली होती. मी पोह्यांचा आस्वाद घेतला. पेपर वाचून पूर्ण केलं. आजचा अग्रलेख कृत्रिम बुद्धिमत्ता यावरच होता. अजबच आहे बाबा हे प्रकरण. हे संगणकयुग सुरू होण्यापूर्वी सेवानिवृत्ती मिळाली हे बरंच झालं बुवा. तो साधा मोबाईल आणि लॅपटॉप वापरता येत नाही आपल्याला. सारखी त्या शेजारच्या कुलकर्ण्यांच्या समीरची मदत घ्यावी लागते. आमचा निलेश दिल्लीत असतो. गुगलमध्ये चांगला जॉब करतो. मग काय करायचं? मारावी लागते समीरला हाक. तो येतोही धावत. अरे हो!! रोज ‘काय काका? ठीक आहात ना? ’ असं सकाळी कॉलेजला जाताना विचारणारा समीर आज आला नाही? हम्म्म. असेल असेल. परीक्षा वगैरे असेल.

आमरस पुरीचं दुपारचं जेवण करून मी शतपावली घालत होतो. एवढा मस्त बेत होता. पण शांती काही बोलली नाही. जेवताना सुद्धा अळीमिळी गुपचिळी. आणि बसली नाहीच की आपल्यासोबत जेवायला. औषध घेतलं का याची चौकशी नाही. ‘आमरस ओरपू नका हावरटा सारखा’, अशी दटावणी नाही. एव्हाना पेपर पुढ्यात घेऊन टेकते अंमळ दिवाणवर. मी हॉलमध्ये डोकावून पाहिलं. छे. नाही दिसत. मग गेली तरी कुठं? शांतेला शांतता कशी असते माहिती नाही. एवढी कशी शांत ही? थोडं आठवून बघितल्यावर लक्षात आलं, अरे, गेले चार दिवस ही अश्शीच वागतेय की. बोलत नाही, चिडत नाही, कशाला म्हणून विरोध करत नाही. तब्येत ठीक असेल नं? मी जरा जास्तच गृहीत धरतोय की काय?

मी हळूच घरात शिरलो. शांतेला शोधत शोधत बेडरूमपर्यंत पोहोचलो. तिला हाक मारणारच होतो. पण समोरचं दृश्य बघून थिजून गेलो. शांता ताठ उभी होती. पाठमोरी होती. तिच्या डाव्या दंडातून एक वायर बाहेर आली होती. ती प्लगला जोडली होती. बापरे! “अगं, हे काय करतेयस क.. क…करंट लागेल. शॉक बसेल. ” मी घाबरून तिला ढकलणार होतो. तेवढ्यात लक्षात आलं तिच्या तळहातावर काहीतरी दिसतंय. टाचा उंच करून बघावं लागलं मला. जे दिसलं ते बघून मी हादरलोच. तिच्या डाव्या तळहातावर चक्क मोबाईलच्या स्क्रीनसारखा स्क्रीन होता! त्यावरची बटणं दाबून ती कुणाला तरी मेसेज करत असावी. चॅटबॉक्स ओपन करून काहीतरी टाईप करत असावी. मी अचंबित झालो. तिची बोटं इतक्या सराईतपणानं फिरत होती की मी माझ्या उजव्या हाताची पाचही बोटं तोंडात घातली!! तितक्यात, मला निलेशचा आवाज ऐकू आला. “हॅलो ई-आई, आता एकच दिवस आणखी थांब तू तिथं. ” एकाच वेळी चॅटिंग आणि व्हॉईस कॉल? “उद्या माझी खरी आई येईल. मग तुला दिल्लीला परत येण्याची सूचना दिली जाईल. ” मी खरंतर खूपच सटपटलो होतो. घामानं डबडबलो होतो. तरी धीर करून खोलीतून चोरपावलांनी बाहेर आलो.

चार पाच दिवस शांतेचं जे विचित्र वागणं सुरू होतं ते कोडं आत्ता उलगडलं. ही माझी शांता नव्हती. म्हणजे ही कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणालीनं बनलेली शांतायंत्र आहे. मी पळत पळत शेजारी गेलो. “समीर समीर..” माझी बोबडी वळली होती.

कुलकर्ण्यांनी मला बसवून घेतलं. “काय झालं? असे का पळत आलात?” त्यांनी मला पाणी दिलं. समीरला हाक मारली. समीर आला तोच मुळी हसत हसत. “घाबरु नका हो काका. हे निखिलनं तुम्हाला दिलेलं सरप्राईज आहे. ” एखादं भूत बघितल्यावर होते तशी माझी अवस्था झाली होती. मी पुरा हबकून गेलो होतो. त्यानं निखिलला फोन लावला. फोनवर निखिल सांगत होता, “संशोधनाचा भाग म्हणून त्यानं एक रोबोट बनवली. तिचं नाव त्यानं ई आई ठेवलंय. अगदी आईसारखी दिसणारी आणि वागणारी. गंमत म्हणून त्यानं शांतीबरोबर म्हणजे त्याच्या आईबरोबर संगनमत करून ई आईला माझ्याकडं पाठवलंय. ” मी अलिकडं तिला निखिलला भेटायला दिल्लीला जायला परवानगी दिली नव्हती. त्याचा बदला मायलेकांनी मिळून असा घेतला होता. खऱ्या शांताच्या बदल्यात ए. आय. वाली शांताबाई माझ्या दिमतीला पाठवली होती. तो फक्त तिला स्वतःच्या आईसारखा हुबेहूब आवाज मात्र देऊ शकला नव्हता. अच्छा, अच्छा म्हणून गेले काही दिवस मौनव्रत होतं तर!! .

“निख्या, निख्या, अरे तुझे प्रयोग तू माझ्यावर करतोयस,.. माझ्यावर? तुझ्या बापावर? . अरे सत्तरी आली माझी. कुठंतरी हार्टफेल झाला असता तर?”

“उगाच काहीतरी बोलू नका. मी असताना तुम्हाला कसली धाड भरणार आहे?”

निखिलच्या फोनमधून शांताचा आवाज ऐकू आला आणि मी निश्चिंत झालो. निःश्वास सोडला. समीर आणि त्याचे बाबा जोरात हसायला लागले. तिकडे निखिल आणि त्याची आईपण हसत होते. माझी चांगलीच भंबेरी उडाली होती. माझी शांता येईपर्यंत मला असंच रहावं लागणार ई शांताबाई बरोबर या कल्पनेनं मी जोरात ओरडलो. “नको, नको नको रे बाबा निखिल, नको नको...अगं ऐक शांता.. शांता.... ”

“अहो उठा उठा, काय नको नको चाललंय...”

“बघा तरी, आपल्या निखिलला महिला ए. आय. बनविल्याबद्दल पारितोषिक मिळतंय. दाखवतायत बघा टी व्ही वर. किती छान! ” शांतानं टाळ्या वाजवल्या. बोटं कडाकडा मोडत निखिलची दृष्ट काढली.

मी दचकून उठलो. माझी शांता माझ्याकडं काळजीनं बघत उभी होती. म्हणजे मला बातम्या ऐकता ऐकता; खुर्चीवर बसल्या बसल्या झोप लागली होती... ई- शांताबाईंना मी स्वप्नातच भेटलो होतो तर!!

**सौ. दीपा पुजारी**, इचलकरंजी, मो. ९६६५६६९१४८, ईमेल - deepapujari57@gmail. com

## 33. लेख - भावगीत - डॉ. निशिकांत श्रोत्री



मूलतः काव्याचा उगम हाच भावनांच्या विस्फोटात झाला आहे. निषादाने प्रणयासक्त मैथूनातील क्रौंच युगुलातील एकाची शरसंधानाने शिकार केल्याचे दृष्टीस पडल्यावर व्याकुळता, दुःख, संताप या सर्वच भावनांचा पराकोटीचा अतिरेक झाल्याने वाल्मिकी ऋषींच्या तोंडून जी शापवाणी उमटली ते या जगातील पहिले काव्य होय.

त्यानंतर अनेक संस्कृत कवींनी काव्य या साहित्य प्रकारात भर घातली. महर्षी व्यास, महाकवी कालिदास, माघ प्रभृती कितीतरी कवींची मालिका गुंफता येईल. तथापि काव्याचा इतिहास हा या लेखाचा उद्देश नसल्याने त्या खोलात मी जात नाही. तरीही एक बाब मात्र नक्की की याच मंडळींनी काव्याला एक शिस्त दिली, एक आकृतिबंध दिला. या आकृतिबंधालाच छंद किंवा आणखी काही काळाने मात्रावृत्त अशी संज्ञा प्राप्त झाली.

एखाद्या ठिकाणी चरणात एखादी मात्रा कमी पडत असेल तर व्याकरण शास्त्रात मात्रा भरून काढण्यासाठी च, वै, तु किंवा हि यांचा वापर करण्यास अनुमती दिलेली आहे. याचा मात्रावृत्त काव्यात वापर करण्याची कवींना सवय लागली. विशेषतः मी गझलकारांच्यात हे फार प्रमाणात पाहिले आहे. वास्तविक आद्य मराठी गझलकार भाऊसाहेब पाटणकर किंवा श्रेष्ठ गझलकार सुरेश भट यांच्या गझलांमध्ये यांचा वापर आढळात येत नाही. यांच्या वापराने जरी मात्रादोष दूर करता येत असला तरी त्यात कवीच्या शब्दभांडाराच्या मर्यादा उघड्या पडतात. आपली कविता प्रसारित करण्याची घाई न करता वेळ देऊन जर चिंतन केले तर नक्कीच योग्य शब्द सुचतो. वेळ प्रसंगी शब्दकोषाचा संदर्भ घ्यावा. पण शक्यतो च, वै, तु, हि, तो, ती असली निरर्थक अक्षरे केवळ मात्रापूर्तीसाठी वापरू नयेत; भावगीतात तर नाहीच नाही. त्याने रसभंग होतो.

काव्य हे मुळातच आपल्या मनात आलेले कमीत कमी शब्दात समर्थपणे आणि योग्य ते भाव प्रकट करण्यासाठी वापरले जात असल्यामुळे त्याला विशिष्ट आकृतीबंधात सदर करण्याचा प्रघात आला; किंबहुना ती काव्याची गरजच झाली. या आकृतीबंधामुळे काव्य गेय स्वरुपात सादर करणे सुलभ झाले; आणि त्यामुळे अशा श्राव्य स्वरुपात ऐकायला श्रोत्यांना अधिक आवडू लागले.

मराठीत काव्याचा प्रवेश झाला तो आकृतीबद्ध ओव्यांच्या स्वरुपात. ओव्यांना जरी मात्रांचे बंधन नसले तरी त्यांना चरणातील अक्षरांचे बंधन असते. महानुभाव यांनी जरी त्यांच्या ग्रंथातून ओव्यांचा मुबलक वापर केला असला तरी या ओव्यांना प्रचंड प्रमाणात प्रसिद्धी आणि जनमानसात मान्यता मिळाली ती संत ज्ञानेश्वरांच्या रचनांमुळे. त्यानंतर बहुतेक सर्वच संतांनी ज्ञानेश्वरांच्या पावलांवर पाऊल टाकून आपल्या साहित्यात ओव्यांचा वापर केला.

संत एकनाथ, संत रामदास यांच्यासारख्या अतिबुद्धिमान संतांनी आपल्या काव्याला ओव्यांच्या पलीकडे जाऊन इतर छंदोबद्ध काव्यात गुंफले. त्यात त्यांनी केवळ मात्रावृत्तांचाच वापर न करता गणमात्राबद्ध वृत्तांचीही कास

धरली. संत रामदासांनी तर भुजंगप्रयात हे वृत्त कानाकोपऱ्यातील जनसामान्यांच्या मनामनात नेऊन बसविले. इतक्या शिस्तबद्ध काव्यामुळे त्याला संगीतबद्ध करणे अधिक सुलभ होऊ लागले.

तथापि मात्रा आणि गण जुळविण्याच्या कसरतीत शब्दांच्या वापरांवर बंधने येऊ लागल्यामुळे काव्यातील भावांच्या प्रकटीकरणावर मर्यादा पडू लागल्या. त्यात देखील मोरोपंत, वामन पंडित, रघुनाथ पंडित प्रभृती अनेक कवींनी हे शिवधनुष्य देखील समर्थपणे पेलून दाखविले. तरीही हे अत्यंत अवघड कौशल्य होते यात शंकाच नाही.

अर्थात या सर्व रचना मूलतः कविता म्हणूनच रचल्या गेल्या होत्या.

त्यानंतर मराठी संगीत नाटकांचा काळ आला आणि काव्यात थोडा बदल जाणवू लागला. रंगमंचावर सादर करण्यासाठी जी पदे निर्माण झाली ती आकाराने छोटीशी होती आणि छंदोबद्ध होती. यातील चरणांना केवळ मात्रांचे बंधन असे. यालाच 'जाति' अशी देखील संज्ञा होती. ही गीते संगीतप्रधान होती. जरी त्यातील शब्द अर्थपूर्ण होते तरी गायकीत त्यांच्याकडे फारसे लक्ष दिले जात नसे. म्हणूनच यांना पदे म्हणत, गीत नव्हे.

इसवीसनाच्या विसाव्या शतकाच्या कालखंडात मात्र गीत गायनात दोन प्रमुख गोष्टींनी अमुलाग्र जरी नाही तरी क्रांतिकारक बदल घडवून आणला हे मात्र नक्की.

मराठी चित्रपटात गीतांचा वापर हा त्यातील एक महत्वाचा घटक होता. त्याबरोबरच आद्य भावगीत गायक कै. गजाननराव वाटवे यांचाही फार मोठा सहभाग आहे. वाटवे स्वतः या गायन प्रकाराला काव्यगायन असेच म्हणत. या दोन्ही प्रकारात गीतातील शब्दांना विलक्षण महत्व असे; किंबहुना त्यांच्याकडे, त्यांच्या अर्थाकडे आणि त्यात अभिप्रेत असलेल्या भावनांकडे यत्किंचितही दुर्लक्ष होऊ नये यावर कटाक्ष असे. म्हणूनच या प्रकारच्या भावप्रधान आणि शब्दप्रधान गीतांना भावगीत असे म्हणायचा प्रघात पडला.

भावगीत या शब्दाचे दोन भाग आहेत - भाव आणि गीत. संगीतबद्ध काव्य म्हणजे गीत झाले. आम्ही वृत्तपत्राच्या अग्रलेखाला देखील संगीत देऊ शकतो अशी दर्पोक्ती करणारे संगीतकार मी पाहिले आहेत. तथापि त्यामुळे एखादेवेळी गीत निर्माण होईल; पण ते भावगीत असणार नाही.

भावनिर्मिती हे कवी, संगीतकार, आणि गायक या सर्वांचे सामायिक कौशल्य आहे, कला आहे. यातील संगीताच्या बाजूचा मी ऊहापोह करणार नाही, तो माझा कदाचित अधिकारही नसेल. तथापि, काव्यसंहिता या बाजूवर मात्र आपण निश्चितच विचार करणार आहोत.

भावगीतांमध्ये शब्द वापरतांना त्या शब्दांनी कवीच्या मनातील अभिप्रेत असलेले भाव व्यक्त झाले पाहिजेत. यासाठी बिनचूक शब्दांच्या वापराला पर्याय नाही. भावगीतात एकदा वापरलेला शब्द परत वापरू नये.

शब्दकोषात एकाच अर्थाचे अनेक शब्द आढळतात; मात्र यातील प्रत्येक शब्दाचा भावार्थ वेगळा असतो. आई, माता, जननी, एकाच अर्थाचे बरेच शब्द असले तरी जे वात्सल्य आई या शब्दातून प्रतीत होते ते इतर शब्दांमधून होत नाही. सुवास, सुगंध, परिमल, वास, गंध, अशा प्रत्येक शब्दातून वासाचा वेगळेपणा प्रतीत होत असतो. त्यामुळे योग्य ते भाव प्रकट व्हायला योग्य त्याच शब्दांचा वापर झाला पाहिजे. त्याबरोबरच

भावगीतात तरल शब्द वापरावेत. अशा शब्दांचा उपयोग भाषेला प्रासादिकता प्रदान करतात. बोजड शब्दांनी भावगीत नीरस बनते.

गण-मात्रावृत्तात हे साधणे बऱ्याच कवींना अवघड जाऊ लागले. त्यामुळे भावगीते ही वृत्तांची कांस सोडून छन्दांकदे वळू लागली. तरीही त्यातदेखील श्रेष्ठ साहित्यिक स्वातंत्र्यवीर सावरकर, प्र. के. अत्रे, यांच्यासारख्या उत्तुंग कवींनी वृत्तात देखील तितक्याच समर्थपणे, कवितेतील भावांना यत्किंचितही बाधा येऊ न देता हा गोवर्धन पेलून दाखविला आहे.

अलीकडे मात्र भावगीते 'मीटर' मध्ये लिहिण्याचा पर्याय वापरला जातो. यासाठी सर्व चरणात सारख्याच मात्रा याव्या लागतात आणि त्यांचे यतीदेखील विशिष्ट ठेक्यावरच यावे लागतात. भावगीतकाराला विविध तालांचे ज्ञान असेल तर उत्तमच; अन्यथा त्याने विशिष्ट ठेक्यावर चरण बांधायचा सराव करावा.

चपखल शब्दांचा वापर हे जसे भावगीत लेखनातील एक अनिवार्य कौशल्य आहे, तसेच भाषेचे सौंदर्य हे देखील. स्त्री असो किंवा भाषा, अलंकार त्यांचे सौंदर्य वृद्धिंगतच करतात. साहित्यिक अलंकारात शब्दालंकार आणि भावालंकार असे दोन प्रकार मोडतात.

शब्दालंकारातील यमक जरी सर्वश्रुत असले तरी त्याचा परिणामकारक वापर म्हणावा तितक्या प्रमाणात होतांना दिसत नाही. यमकाच्या बाबतीत कवी मोरोपंत यांचा हात धरणारा कोणीही आढळत नाही. परिणामकारक गेयतेसाठी यमक अनिवार्य आहे. तथापि त्याबरोबरच अनुप्रसाचा वापर केला तर त्या गीताला एक अंगचीच लय आणि नाद प्राप्त होतात आणि श्रोता त्यात रममाण होतो.

या पलीकडे भावालंकार भावगीताची उंची खूप वाढवतात. या सगळ्या अलंकारांची जंत्री येथे देण्याचे प्रयोजन नाही. त्यातील देखील सर्वात लोकप्रिय म्हणजे उपमा अलंकार. आजवरच्या समग्र साहित्यात कालीदासाइतक्या श्रेष्ठतेने या अलंकाराचा वापर दुसऱ्या कोणी अभावानेच केला असावा. म्हणूनच 'उपमा कालिदासस्य' हा चरण उक्ती म्हणून देखील सुप्रसिद्ध आहे. या अलंकारांमुळे कवितेला वाच्यार्थापेक्षा अधिक सखोल गर्भितार्थ प्राप्त होतो. थोडक्यात, काव्यात अलंकारांचा वापर केला नाही तर ते भावगीत उथळ होईल, श्रोत्याच्या हृदयापर्यंत पोहोचणारच नाही.

काव्याचे सौंदर्य वाढविण्याच्या पलीकडे भावगीतकाराला आणखी काही पथ्ये पाळावी लागतात. काव्य आणि संगीत यांच्या मिलाफाने भावगीत सादर होणार असते. यासाठी तालात बसतील अशा प्रकारे शब्दांची योजना करावी लागते. याती कुठे असावी याचे भान भावगीतकाराला असणे अत्यावश्यक बाब आहे. याती म्हणजे चरणातील थांबा - ज्याला संगीतकार पॉज म्हणतात. ज्या ठिकाणी याती आहे तेथे शब्द तर तुटता कामा नयेच; शिवाय विशेषणांपासून संज्ञा तुटता कामा नये. भलत्याच ठिकाणी थांबल्यामुळे अर्थाचा अनर्थ देखील होऊन चालणार नाही.

भावगीताच्या रचनेत एक ध्रुपद - ज्याला सांगीतिक भाषेत मुखडा म्हणतात, आणि काही कडवी - यांना संगीतकार अंतरा म्हणतात असे प्रामुख्याने दोन भाग असतात.

भावगीतकारच्या दृष्टीने ध्रुवपद हे भावगीतात शिरण्याचे नुसते प्रवेशद्वारच नसते, तर ते संपूर्ण भावगीताचा आशय काय असणार आहे याची झलक दाखवणारे असते. या ध्रुपदापासून सुरुवात झालेले भावगीत हे रचनेत, सादरीकरणात अर्थात प्रवाही असणे आवश्यक आहे. ध्रुवपद बहुतांशी जरी दोन चरणी असले तरी एक चरणी ध्रुवपदाची भावगीते देखील असू शकतात. दोन चरणी ध्रुवपदाच्या दोन्ही चरणांचे यमक जुळविणे अपरिहार्य आहे.

कडवी किंवा अंतरे किती असावेत याला काही बंधन नाही. पूर्वी रेकॉर्डस होत्या त्यावेळी त्यावरील मर्यादांनुसार भावगीतांत दोन ते तीन कडवी असत. कडवी दोन चरणांची, तीन चरणांची, साडेतीन चरणांची किंवा चार चरणांची असू शकतात. यात यमक आवश्यकच असते. प्रत्येक कडव्यानंतर ध्रुवपद गायले जात असल्याने कडव्यातील शेवटच्या चरणाचे - याला सांगीतिक भाषेत crossline म्हणतात - यमक ध्रुवपदाशी जुळवावे लागते.

ध्रुवपदापेक्षा कडव्यांच्या मात्रा वेगळ्या ठेवल्या तरी चालू शकतात. इतकेच काय, कडव्यात देखील काही चरणांच्या मात्रा वेगळ्या असू शकतात. मात्र त्यात देखील सुसूत्रता आणि नियमितता असावी. सावरकरांची ‘ने मजसी ने परत मातृभूमीला’ ही भावकविता याचे उत्तम उदाहरण आहे.

प्रत्येक कडवे हे ध्रुवपदाच्या विषयाची रंगत वाढविणारे असावे. क्रॉस लाईन त्या कडव्याचा परमोच्च बिंदू (climax) किंवा प्रतिसारालंकार (anti-climax) असावा. शेवटचे कडवे संपूर्ण गीताचा परमोच्च बिंदू किंवा प्रतिसारालंकार असेल तर भावगीत उच्च दर्जाचे होते. वरवर स्वतंत्र वाटणारी कडवी अर्थाच्या दृष्टीने ध्रुवपदाशी संलग्न असणे आवश्यक आहे.

कवितेची भाषा अलंकारिक असावी. केवळ लिहिलेल्या शब्दांचे अर्थ हाच त्या कवितेचा गर्भितार्थ असता कामा नये. लिहिलेल्या शब्दांचा अर्थ हा वाच्यार्थ असतो. भावगीताचा लक्ष्यार्थ हा निश्चितच अधिक सखोल, भावपूर्ण आणि विस्तृत असायला हवा.

भावना हा भावगीताचा आत्मा आहे. भावनांविना भावगीत होऊच शकत नाही. माया, भक्ती, प्रेम, विरह, वात्सल्य, आदर, घृणा, भीती, विरक्ती, या आणि अशा कितीतरी विविध प्रकारच्या भावनांनी मानवी मन भरलेले आहे. भावगीतात यातील कोणत्याही एका किंवा अनेक भावनांचा आविष्कार असू शकतो. भावगीत याचा अर्थ केवळ प्रेमकाव्य नव्हे. भावगीतांचा इतिहास बघता प्रेमगीतांपेक्षा इतर भावनांची गीते अधिक उंचीवर जाऊन पोहोचल्याचे आपल्याला जाणवते. कोणत्याही प्रेमगीतापेक्षा ‘कल्पवृक्ष कन्येसाठी’ हे भावगीत सर्वांच्याच अधिक पसंतीचे आहे.

मात्र कवीने विडंबनाच्या नावाखाली भावनांचा विचका करू नये. शब्दांना वेठीला धरून गुलामासारखे वापरू नये. कवी हा शब्दांचा पाईक असतो, धनी नव्हे याची जाण प्रत्येक कवीने ठेवायलाच हवी.

**डॉ. निशिकांत श्रोत्री**, श्रोत्री निवास, ४०/१-अ, कर्वे रस्ता, पुणे ४११००४, मो. ९८९०११७७५४

## 34. आलेख - “सरस्वती” – सुश्री कुंदा कुलकर्णी



**सरस्वती नमस्तुभ्यं वरदे कामरूपिणी,**

**विद्यारंभं करिष्यामि सिद्धीर्भवतु मे सदा ।।**

पाटीवर सरस्वतीचे चिन्ह काढून तिची पूजा करून वरील प्रार्थना केली जाते व विद्यार्जनास सुरुवात केली जाते. सरस्वती ही विद्येची देवता आहे. वरील प्रार्थनेचा अर्थ असा आहे की ‘ सर्वांच्या सर्व कामना पूर्ण करणारी माता सरस्वती, मी तुला नमस्कार करते. मी आज विद्या ग्रहण करण्यास सुरुवात करत आहे. माझ्या या कार्यात तू मला सिद्धी दे ‘.

ऋग्वेदात सरस्वती देवीला सर्वोत्तम मातृशक्ती, सर्वोत्तम देवी आणि सर्वोत्तम नदी असे म्हटले आहे. वैदिक काळात सरस्वती ही एक प्राचीन नदी होती. सरस्वती देवीला बुद्धी आणि ज्ञानाबरोबरच सर्व नद्या, झरे, वायु, ध्वनी व प्रवाहित जलांची अधिष्ठात्री देवी मानले जाते.

माघ महिन्यातल्या शुद्ध पंचमीला वसंत पंचमी व श्री पंचमी असे म्हणतात. या दिवशी सरस्वतीचा जन्म झाल्याने हा दिवस सरस्वती जयंती म्हणून साजरा केला जातो.

ब्रह्मदेवाने सृष्टीची निर्मिती करायची असे ठरवले. त्यावेळी त्याला एका सहचराची मदत हवी होती. तो म्हणाला, ’ मला खराखुरा जोडीदार हवा आहे. त्याने माझ्या कामात जोडीने मदत करायला हवी. शिवाय तो बुद्धिमान, शांत, विद्वान, विद्यासंपन्न, कलानिपुण आणि सुसंस्कृत असावा. त्याची स्वतःची जीभ आणि मन यावर त्याचा पूर्ण ताबा असावा. ’ आणि अहो आश्चर्यम्! एक अत्यंत लावण्यवती स्त्री मधुर स्मित करत त्याच्यासमोर प्रगट झाली. ब्रह्मदेव म्हणाले,

‘तुझ्या आगमनामुळे मला खूप आनंद झाला आहे. मी तुला सरस्वती, वाग्देवी आणि वाणी या नावांनी हाक मारेन. तू ज्ञानाचे आणि संवादाचे निधान आहेस. या तिन्ही नावांमधून तुझे हेच गुण प्रतीत होतात. इथून पुढे सर्वच राज्यसृष्टी ज्ञान, कला आणि वाणी यांची देवता म्हणून तुझी आराधना करेल. ’.. आणि उभयतांनी एकत्र बसून विश्व निर्मितीच्या कामाचा शुभारंभ केला.

ब्रह्मदेवांनी सृष्टीची निर्मिती केली. त्यांच्या पत्नीचे नाव सरस्वती. ती विद्येची, ज्ञानाची आणि कलेची देवता आहे. ती नेहमी शुभ्र वस्त्र धारण करते. तिच्या हातात नेहमी वीणा असते. ती नेहमी वीणावादन करताना दाखवली जाते. तिला वीणावादिनी असेच म्हणतात. तिच्या एका हातात जपमाला तर दुसऱ्या हातात एक ग्रंथ असतो. आणि तिच्या चेहऱ्यावर कायम मंद असे हसू आपल्याला दिसत असते. तिचे वाहन म्हणजे हंस. सरस्वती शांतीप्रिय देवता आहे. आपल्या भारतातच नव्हे तर इतर अनेक देशातही तिची पूजा केली जाते. तिला वाग्देवी असेही नाव आहे. वाग्देवी याचा अर्थ वाणीची देवता. सरस्वती बुद्धिमत्तेचं, ज्ञानाचं आणि विद्येचं प्रतीक आहे. त्यामुळे अनेक महान वक्ते, लेखक आणि विद्वान तिचे उपासक आहेत. ती नेहमी मितभाषिणी असते.

सरस्वती ही भारतीय संस्कृतीतील श्रेष्ठ देवता आहे. तिला वाणी, वाग्देवता, वागेश्वरी, शारदा, भारती, वीणापाणि, ब्रह्मी, विशाला, मेधा, कुटीला, अशीही नावे आहेत. ती ललित कलांची अधीष्ठात्री देवता आहे.

ती शुभ्रवर्ण, शुभ्र वस्त्रधारिणी, अलंकार विभूषित, चतुर्भुज, पुंडरीक माला, वीणा व कमंडलू धारण करणारी आहे. पुस्तक व वीणा ही तिची प्रमुख आयुधे आहेत. तिच्या मूर्ती-शिल्पातून कमळ, हंस, मोर इत्यादी वाहने दाखवली जातात. मात्र हंस आणि मोर ही तिची लाडकी वाहने आहेत. ती कमलासनात बसलेली असते.

**|| ओम् श्री श्री महासरस्वती देवी भगवती नमः ||**

हा तिचा मंत्र आहे.

सरस्वती वंदना खालील प्रमाणे आहे...

**या कुंदेंदु तुषारहारधवला या शुभ्र वस्त्रावृता||**

**या वीणावरदण्डमण्डितकरा, या श्वेतपद्मासना||**

**या ब्रह्माच्युत शंकर प्रभृतिभिर्देवैः सदा वन्दिता||**

**सा मां पातु सरस्वती भगवतीनिःशेषजाड्यापहा||**


एक दिवस देवी सरस्वती सत्य लोकांमध्ये वीणा वादनात गुंग झाली होती. त्यावेळी असुरांनी तिच्याकडे असलेला ज्ञानाचा ग्रंथ चोरला आणि ते पृथ्वीवर पळाले. सरस्वतीदेखील त्यांच्या मागोमाग आली. पण पृथ्वीतलावर पोचल्यावर तिच्या लक्षात आले, आपण इतर देवदेवतांप्रमाणे लढू शकत नाही. त्यासाठी लागणारी शस्त्रे आपल्याकडे नाहीत. आणि आपली ती क्षमताही नाही. त्यामुळे तिने स्वतःकडे असलेल्या शक्तीचा वापर केला. या असुरांचा नाश करण्यासाठी तिने एका खळाळत वहाणाऱ्या नदीचं रूप घेतलं. आणि आपल्या पाण्याच्या प्रवाहात या असुरांना बुडवून टाकलं. त्या प्रवाहाचा वेग पाहून असुर गर्भगळीत झाले. त्यांनी तो ग्रंथ नदीच्या काठी टाकला आणि सूंबाल्या ठोकला. तो ग्रंथ घेऊन तिनेही त्यांचा नाद सोडला. आता यानंतर तिने ब्रह्मलोकी परत जायची तयारी सुरू केली. पण त्या प्रदेशात रहाणाऱ्या महर्षींना, ऋषीमुनींना तिच्या आगमनाची वार्ता योगसामर्थ्यामुळे कळली. त्यांना तिच्या त्या ग्रंथाविषयी सुद्धा कळलं. ते सर्वजण ताबडतोब तिचे दर्शन घेण्यासाठी आले. तिथे त्यांना हातात ज्ञानाचे पुस्तक घेतलेल्या देवी सरस्वतीचं मूळ रूपात दर्शन झालं. त्यांनी तिची करुणा भाकली... ‘ माते, आम्ही अगतिक आहोत. आम्हाला तुझ्या मदतीची गरज आहे. तू आमच्या मदतीसाठी इथे पृथ्वीवरच वास्तव्य करून राहशील का?’

सरस्वती गूढ हास्य करत म्हणाली, ‘मला गेलं पाहिजे. मला ब्रह्मदेवांना त्यांच्या कामात मदत करण्यासाठी जायलाच हवं. पण तुम्ही मनापासून प्रार्थना केलीत तर ती मला ऐकू येईल. मी इथून परत जाताना माझ्या शक्तीचा छोटाच प्रवाह इकडे सोडून जाईन. तो माझ्या नावाने सरस्वती नदी म्हणून येथे वहात राहील. ही नदी वहात जाऊन प्रयाग तीर्थक्षेत्रावर गंगा आणि यमुना या नद्यांना मिळून तिचा संगम होईल. आम्ही तीन नद्या त्या ठिकाणी भेटू. त्या ठिकाणाला प्रयागराज असे नाव असेल. त्यानंतर माझी ओळख नाहीशी होईल.’ .... तेव्हापासून सरस्वती नदी पृथ्वीवर वहात आहे. ही नदी काही भागात जमिनीखालून वहात असल्यामुळे तिला गुप्तगामिनी या नावाने ओळखण्यात येते. अशा या विद्येच्या देवतेला कोटी कोटी प्रणाम.

**सौ. कुंदा कुलकर्णी ग्रामोपाध्ये**

## 35. पुस्तकावर बोलू काही - प्रश्नसूक्त सनातन – परिचय - सुश्री तृप्ती कुलकर्णी





**पुस्तक : प्रश्नसूक्त सनातन (काव्यसंग्रह )**

**कवयित्री : डॉ. श्रद्धा पराते**

**प्रकाशक : अविशा प्रकाशन**

**किंमत : रु. ३००/-**

चोहोबाजूंनी लख्खपणे सगळे कानेकोपरे उजळून टाकणारा प्रकाश असताना मिणमिणत्या पणतीचं महत्त्व, डोलणाऱ्या रंगीबेरंगी आकाश कंदीलाचे महत्त्व अजूनही आपल्या मनात जिवंत आहे. आणि म्हणूनच प्रकाशाचा कल्लोळ झाला असतानासुद्धा आपण त्याचा 'उत्सव' साजरा करतो. तेव्हा प्रश्न पडतो 'का'? असं काय आहे या मिणमिणाऱ्या प्रकाशात की जे भक्कमपणे उभ्या असलेल्या दिव्यापेक्षाही जास्त जवळचं वाटतं. आणि मला सुचलेलं यावरचे उत्तर म्हणजे ‘अंधार सहन करायला बळ देणारा प्रकाश आपल्याला जास्त भरवशाचा वाटतो. ’ आज आपल्या आजूबाजूला प्रकाशाची असंख्य आधुनिक रूपं बघायला मिळतात. एक बटन दाबलं की क्षणार्धात अंधार गिळणारा दिवा, अंधार दूर करतो की फक्त लपवतो हे तो दिवा बंद करताक्षणी आपल्या लक्षात येतं. सद्यस्थितीत आपल्या आयुष्याचंही नेमकं असंच झालंय.

असंख्य पर्याय उपलब्ध असलेल्या जगात नेमके प्रश्न कोणते याचाच जणू अनेकांना विसर पडला आहे. पण म्हणून ते प्रश्न काही नाहीसे झालेले नाहीत तर ते फक्त लपले गेले आहेत. नैसर्गिक जगण्यावर भरभरून प्रेम करणाऱ्या कुणा संवेदनशील व्यक्तीला मात्र हे प्रश्न सहजपणे दिसतात. आणि मग ते विचारल्याशिवाय, त्यांची उत्तरं शोधण्याचा प्रयत्न केल्याशिवाय तिला रहावत नाही. अशाच काही सनातन प्रश्नांची उत्तरं शोधणाऱ्या एका तत्वज्ञ कवयित्रीच्या, डॉक्टर श्रद्धा पराते यांच्या 'सनातन प्रश्नसूक्त' या काव्यसंग्रहाची ओळख आपण करून घेणार आहोत.

डॉ. श्रद्धा पराते या नागपूरमधील श्रेष्ठ कवयित्री, लेखिका म्हणून प्रसिद्ध होत्या. मराठी, हिंदी आणि उर्दू या तीनही भाषांवर त्यांचं विलक्षण प्रभुत्व होतं. त्यांची यापूर्वी काही पुस्तके प्रसिद्ध झाली असून ती लोकप्रिय आहेत. सांध्यमित्रा (कवितासंग्रह), एहसास की वादियां (हिंदी-उर्दू गझल संग्रह), निरव निनाद के पल (हिंदी कविता), अग्निगर्भा (हिंदी कादंबरी अनुवाद), अरण्यपथ (दोन दीर्घ कविता), पोर्ट्रेट(कथा), अमृता प्रीतम एक चिंतन (ललित बंध), एक म्यान दोन तलवारी (अनुवाद, भारतीय साहित्य अकादमीद्वारा पुरस्कृत) अशी

साहित्यसंपदा आहे. संत साहित्य आणि अध्यात्माचा त्यांचा दांडगा अभ्यास होता. जगण्यातली शहाणीव, नेणीव त्यांना चांगलीच उमगली होती हे त्यांच्या साहित्यातून ठळकपणे दिसून येतं.

... या काव्यसंग्रहाचं मर्मभेदी नाव याचा पुनःप्रत्यय देतं. हे नाव वाचूनच माझ्या मनात विलक्षण उत्सुकता जागृत झाली. पुस्तक वाचताना कवयित्रीची प्रगल्भ दृष्टी, जगण्याप्रती असलेलं तिचं चिंतन, आणि अध्यात्माची तिची बैठक याची जाणीव प्रत्येक शब्दागणिक अधोरेखित होत गेली. आणि आपल्या जगण्यातला आभास अधिकाधिक आकळत गेला. या कवितांमधले विचार हे इतके सार्वत्रिक आणि सार्वकालिक आहेत की श्रद्धाजींनी या कविता सामूहिक मनाच्या जाणिवेतून लिहिल्या असाव्यात असंच वाटू लागलं. आपल्या जगण्याचं प्रतिबिंब त्यात सामावलेलं दिसतं. त्यादृष्टीने त्या वैश्विक आहेत. त्यामुळे वाचताना मी - तू पण हे कधी गळून जातं हे समजतही नाही.

यातली आवर्तन ही कविता अशीच. आपलं जगणं म्हणजे एक आवर्तनच आहे. पुनरपि जननम् पुनरपि मरणम्... पण एवढेच नाही तर येणारे सुखदुःखसुद्धा या आवर्तनाचाच एक मोठा भाग आहे. त्यामुळे त्याला सहज स्वीकारणं हेच एक शहाणपण आहे. ही शहाणीव नेमकेपणाने शब्दांत कशी मांडावी, जगण्यात कशी उतरवावी हे जाणण्यासाठी ती कविता सहाय्यक ठरेल.

*पापण्यांच्या काठाकाठाने मेघ झिरपू लागतो*

*तेव्हा मी दरवेळी एक स्वप्न पेरून ठेवते*

*मनाच्या ओल्या मातीत*

*आणि जेव्हा स्वप्नांचा गुलमोहर बहरतो सर्वांगाने*

*लाल भडक होतो; पिवळा जर्दही*

*तेव्हा त्याच्या छायेत झळांची वाट पाहत बसते*

*ग्रीष्म येणार असतो.. भाजणारही असतोच*

*गुलमोहर सुकायचाही असतो.. गळायचा असतो*

*झरायचा असतो ग्रीष्म सरल्यावर*

*मेघही परत डोळ्यात दाटणार असतो.*

जगताना पाहिलेली अनेक स्वप्नं साकार होतील किंवा नाही, आणि झाली तरी ती कायमस्वरूपी टिकणार नाहीत, याची लख्ख जाणीव करून देणारी आणि तरीसुद्धा त्याचा सहजपणे स्वीकार करायला लावणारी ही वृत्ती खूप महत्वाची आहे. आज आपल्या जगण्यात ही सहजता आहे का? आणि मग इथून पुढे अशा अनेक कविता मनाच्या तळ्यात उतरत जातात आणि प्रश्नांची गूढ वलंय घेऊन बाहेर येतात... त्यांच्या अनेक

आवर्तनातून जाणवतं की अनेकदा प्रश्नांमध्येच उत्तर दडलेलं आहे. फक्त गरज आहे ती त्यासाठी खोलात जाऊन, अगदी मुळापर्यंत जात त्याचा शोध घेण्याची.

मगाशी मी म्हटलं की श्रद्धाजींनी समूह मनातून या कविता लिहिल्यात, कारण त्यांची ‘गोत्र’ ही कविता वाचल्यावर लक्षात आलं की ती कोणा एका विशिष्ट गोत्राबाबतीत लिहिलेली नसून, सबंध मनुष्य जातीचं एक गोत्र आहे या संकल्पनेतून लिहिली गेली आहे. त्यामुळे प्रत्येक पिढीगणिक अनेक गोष्टी बदलत गेल्या तरी माणसाच्या मूळ स्वभावातल्या काही प्रवृत्ती, धारणा या सहजासहजी बदलल्या नाहीत. उलट त्या धरून ठेवल्या आहेत. स्वतःचं अवलोकन करताना ही गोष्ट प्रकर्षाने जाणवते. त्यातून उमगतं की आपल्या वेगळेपणाला फार काही महत्त्व नाहीच. आपलं अस्तित्व गोंजारण्यात, 'मी पण' जपण्यात काहीच अर्थ नाही. कारण...

*तटावर येऊनही...*

*किनारा हाती येत नसतो*

*लाटातही आपण नसतो*

*चालत असतो पण... रस्ता नसतो*

*थांबायचे असते.. पण कुठे? ते माहीत नसते...*

*शोधीत असतो स्वतःतच स्वतःला*

*असतो आरसाही आपणच आपला*

*विशिष्ट चेहरा मात्र आपला नसतो*

*पराधीनतेच्या पात्रात ओतत असतो सतत*

*आपणच आपल्याला*

*थरथरत्या हातांनी कुरवाळत असतो पाय...*

*राहत असतो नदीकाठी वाळूच्या घरात...*

*करीत असतो नदीकाठी नौकांमधून*

*स्वप्नांचा व्यापार...*

*तप्त वालुकामय तटांशी जुळत असते गोत्र*

*असते मृगाची नियती*

*आणि या मृगतृष्णेला काही एक नावही नसते.*

अगदी सहजपणे आपल्यामधल्या 'मी'च सामान्यत्व यातून मांडलं आहे. एकदा का हे लक्षात आलं की आध्यात्मिक अद्वैतपण समजणं सोपंच. श्रद्धाजींचा अध्यात्मिक अभ्यास यातल्या सर्वच कवितांत आढळतो. विशेष म्हणजे कुठल्याही अवडंबरात न अडकता अध्यात्म म्हणजे काय हे लक्षात येतं. यातुन रोजच्या जगण्याकडे, आपल्या प्रत्येक कृतीकडे साक्षीभावाने बघता येणे आणि त्याची जाण ठेवून जगता येणे म्हणजे 'अध्यात्म' ही व्याख्या आपोआप उलगडत जाते. दैनंदिन जीवनात आपण अनेक गोष्टी अनुभवतो. पण त्या अनुभवण्याचा विचार करत नाही आणि म्हणून आपल्याला त्या अवघड वाटतात. पण जर त्या जाणीवा जागृत ठेवून बघितल्या तर सहज साध्य होतात. आता खिडकी या कवितेतूनच त्यातल्या नेहमी घडणाऱ्या प्रसंगातून पहा कशी निराळीच अनुभूती मिळते....

*खिडकी उघडावी तर*

*वाऱ्याचा झोत आत येतो*

*सारे काही विस्कटून टाकतो*

*दारे उघडावीत तर*

*पावसाच्या लाटा अंगावर झेपावतात*

*चिंबचिंब भिजवून जातात*

*अंगणात यावे तर*

*वीज कडाडून कोसळण्याचा संभव*

*दारे खिडक्या लावून*

*निवांत बसू म्हटले तर*

*अंधार गिळायला टपलेला.*

मोजून अकरा ओळी असलेल्या या कवितेतून मनाच्या चंचलतेवर आणि त्यामुळे होणाऱ्या जगण्यातल्या अस्थिरतेवर चपखल भाष्य केलं आहे. कुठल्याही प्रकारची झळ न सोसू शकणाऱ्या आत्मकेंदित वृत्तीची झलक म्हणजे ही कविता असंही म्हणता येईल.

एकूण ७५ कवितांचा संग्रह असलेल्या या कविता एकापेक्षा एक सरस आहेत. त्यामुळे नक्की कुठल्या कवितांवर व्यक्त व्हावं हे समजेनासं होतं. विशेष म्हणजे या सर्वच कविता मुक्त छंदातल्या आहेत. त्यात काही कविता जरा दीर्घ आहेत. पण त्यांची मांडणी मात्र अतिशय घट्ट आहे. त्यामुळे मुक्तछंदातल्या कवितांकडे विनाकारण निरसपणे बघण्याची दृष्टी बदलेल अशी आशा आहे. मात्र हेही खरे की जगण्याचं

सखोल चिंतन करण्याची आवड असणाऱ्या वाचकांना त्या जास्त आनंद देतील. सहज जाता जाता किंवा मनोरंजन या भूमिकेतून त्या वाचल्या जाणार नाहीत आणि तशा कळणारही नाहीत. त्यामुळे वाचकाने आपला कल ओळखूनच त्या वाचाव्यात की नाही हे ठरवावे. हीच या कवितांची म्हटलं तर एका अर्थाने मर्यादा आहे आणि दुसऱ्या अर्थाने श्रेष्ठताही आहे.

या कविता आपलं नुसतं लक्ष वेधत नाहीत तर आपल्या मनावर, विचारांवर ताबा मिळवतात. एक प्रकारचं झपाटलेपण अनुभवायला येतं. आता त्यांची 'प्रतिक्रिया' नावाची ही कविता पहा जी वरवर दिसणाऱ्या साध्या दृश्यांत आणि शब्दांतही किती गहन अर्थ भरलाय हे दाखवते. यातली शब्दकळादेखील स्तिमित करते...

*रोपांचे कोमल देह*

*फुटलेल्या रंगहीन कुंड्यामधून भरताहेत*

*कळत नाही... का?*

*प्रश्नचिन्हांची*

*एक लांबच लांब रांग आहे*

*ज्यांची उत्तरं कदाचित*

*अस्मानी असावीत*

*जीवन*

*एक निश्चेतन तत्त्वज्ञान*

*पापण्यांत बंद*

*अश्रूंच्या थेंबागत*

*गळून जातंय...*

*परत*

*वासंतिक वेषाचे*

*दिवस आलेयत*

*कोकीळ गाणारेय आमराईत*

*मन मात्र*

*विरक्तसे... जणू पर्णकुटीत*

*रुसून? की विरागी....?*

*ही विरक्ती*

*किती खरी! ... किती खोटी!*

मानवी मनाची संभ्रमित अवस्था किती उत्तम प्रकारे यातून मांडली आहे. आयुष्याच्या उतारावर मनात निर्माण होणारे भाव कितीसे सहजतेने स्वीकारले जातात असा विचार करायला प्रवृत्त करणारी ही कविता.

या कविता वाचताना कवयित्री आणि तिची संपदा याबद्दल माझ्या मनात नकळत काही प्रतिमा निर्माण झाल्या. त्यापैकी एक म्हणजे आपण संथ वाहणाऱ्या नदीत एक छोटीशी कागदाची नाव अलगद सोडावी आणि अतिशय शांतपणे तिच्याकडे बघत बसावं... ती तरेल... बुडेल... का आणखीन कुठे वळेल... यावरून स्वतःला व्यथित न करता फक्त तिचं नदीच्यासह असणं आणि दिसणं अनुभवावं, स्वीकारावं.. तसं कवयित्रीने या कविता लिहिताना अनुभवलं असावं. समग्र जीवन उपभोगल्यानंतर किंवा उपभोगताना भावनांशी येणारा एक 'तटस्थ आपलेपणा' असतो तो या कवितांतून दिसतो. नाव जशी पाण्याच्या लहरीबरोबर वाहत जाते.. जिथे तिचं प्राक्तन असेल तिथे, कसल्याही खुणा न सोडता.. तशाच या कविता... आपल्या अंतरंगातल्या काही विचारलहरींना स्पर्श करतात... जाणिवा निर्माण करतात आणि हळुवारपणे विरून जातात. विरल्यानंतर आपल्या मनात उठणारे जे तरंग असतात ते नक्कीच परिणामकारक असतात. आणि दुसरं म्हणजे या कविता म्हणजे जणू एक भली मोठी जीवनदायिनी नदी आहे. अनेक काळापासून कुठून कुठून वळण-वळसे घेत, घालत आपल्या काठावरच्या तृषार्त क्षणांना शमवत कुठल्या एका विशिष्ट ध्येयाने पुढे जात आहे. मध्येच तिच्यात पडणारी प्रतिबिंबं तेवढी तिच्या अस्तित्वाचा अर्थ शोधतात. तो आपापल्या परीने दाखवतात. जेव्हा वाचक म्हणून आपण त्यात बारीकसा खडा टाकतो तेव्हा ती प्रतिबिंब क्षणभर विखुरतात आणि त्यांचे एक वेगळं स्वरूप आपल्याला दिसतं. आपल्या प्रत्येकाचा खडा वेगळा आणि त्यातून साकारलं जाणारं रूपही वेगळं. पण म्हणून नदीचे एकसंध असणं बाधित होत नाही. तिच्या प्रवाहाचा जिवंतपणा आटून जात नाही. या कविता अगदी तशाच.

...... त्या तुमच्या, माझ्या, कवयित्रीच्या, काळाबरोबर न बदलणाऱ्या, न सुटणाऱ्या, किंबहुना स्वतःचं अस्तित्व टिकवण्यासाठी पुन्हा पुन्हा निर्माण होणाऱ्या प्रश्नांच्याच आहेत... उत्तरांची खोली जाणून असणाऱ्या आणि जगण्याची उंची तोलून धरणाऱ्या.

सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे आपल्याला काळोखाला तोंड देणारा प्रकाश हा जास्त आश्वासक वाटतो, म्हणून आपण हा दीपोत्सव साजरा करतो. त्याच प्रकाशात अंतर्बाह्य उजळून निघण्यासाठी आपण स्वतःला जाणून घेतलं पाहिजे. आपल्या अस्तित्वाचा अर्थ शोधला पाहिजे. तरच या प्रकाशाचा आनंद घेता येईल. स्वतःला जाणून घेताना किती बारकाईने स्व-संवाद साधायला हवा हे सांगणाऱ्या या कवितेद्वारे मी लेखाचा समारोप करते......

‘आपण’

*कुठल्याही प्रवाहात नसतो आपण*

*कुणा प्रचंड प्रपातात भिजायचेही नसते*

*कुठल्याही वळणावर थांबायचे नसते*
*की चालतही राहायचे नसते*
*मुक्कामही समोर नसतो*
*की कुठले ध्येय नसते*

*कुठूनही यायचे नसते*
*की कुठेही जायचे नसते*
*फिरत रहायचे गोलाकार*
*आपल्याच परिघात केवळ*
*त्याच बिंदूपासून*
*त्याच बिंदूवर परत*

*यालाच प्रवास म्हणणार असाल*
*तर, अवश्य म्हणा*
*प्रवासाची नवीनता यात नाही*
*आव्हानं नाहीत की स्वप्नंही नाहीत*
*की मायावी मृगजळही नाही*
*असीम आनंद किंवा दुःखही नाही*
*अन् घोर संकटही नाही*
*कोण म्हणतंय! ..*
*की तुम्ही चालत आहात*
*अन् प्रवासात आहात*
*कशाने सिद्ध होतेय आपले अस्तित्व*
*की आपण आहोत..*

*आहे आणि नाहीच्या मध्ये*

*घड्याळाच्या लंबकाप्रमाणे*

*केवळ लोंबत आहोत आपण*

*मध्यात स्थिर होणे*

*नाहीच आपली नियती*

*आपण*

*सृष्टीचक्रही नाही की*

*ऋतुत विभागून घेऊन*

*आपली विभाजन रेषाही नाही*

*की समन्वय रेखाही नाही*

*आपला जगाच्या उलथापालथीत*

*जराही भाग नाही*

*की कुठल्या*

*क्रांतीचा शंख आपण नाही*

*की एक क्षुद्र ठिणगीही नाही*

*अचल हिमालय नाही*

*की विरघळणारा बर्फही नाहीच.*

*आहोत तरी काय आपण...?*

*आपण देश आहोत....?*

*की सीमांनी विभाजित पृथ्वी*

*पृथ्वी अथवा देश*

*काय फरक पडतोय...*

*जर देश असू...*

*तर काय...*

*निवडणूक घोषणा दारिद्र्य भ्रष्टाचार*

*घर ऑफिस नोकरी*

*कुडकुडणाऱ्या झोपड्या*

*की सत्ता... संपत्ती... मस्ती...*

*की उत्तुंग निर्लज्ज इमारती वगैरे*

*आणि हे सारंच असू आपण*

*तर...*

*सिद्ध होतेय का यांनी आपले अस्तित्व*

*की सारंच*

*निर्लिप्त तटस्थपणे पाहणारे*

*निर्विकार डोळे आपण*

*की जीवनाच्या रंगभूमीवरील*

*कळसूत्री पात्र आपण...?*

*आणि जर*

*जीवन रंगभूमी असेल*

*आपण पात्र!*

*तर काय अभिनित करतोय आपण...?*

*हास्य...? उल्हास...? शौर्य...?*

*करुणा...? विभीषिका...? धर्म...?*

*कुठल्या उत्सवात प्रकट करतोय स्वतःला*

*की...*

*सृष्टी शृंगाराच्या चरणोत्कर्षाला*

*स्पर्श करणारी*

*प्रेमानुभूती आपण?*

*कुठे आहोत आपण?*

*काय आहोत आपण?*

*शक्य आहे*

*कदाचित खूप शक्य आहे*

*की जिवंत प्रेत असू आपण*

*आणि माहीत नसावे हे आपल्याला...!*

*खूप शक्य आहे की*

*प्रेत असू आणि*

*ऋतूंचे कोमल कठोर*

*स्पर्शही आपणास कळत नसावेत...!*

*देश आणि विश्वातील*

*अनंत उत्पातांची*

*जाणीवही आपणास होत नसेल...!*

*शक्य आहे की*

*जवळपासचा सुगंध किंवा दुर्गंधही*

*आपल्याला जाणवत नसेल*

*शक्य आहे की*

*जिवंत असल्याच्या भ्रमात असू आपण...!*

या दीपावली निमित्त आपल्या प्रत्येकाचा स्वशोध पुरा व्हावा. अस्तित्वाचा खरा अर्थ समजावा, या तेजोमय शुभेच्छा!

**सुश्री तृप्ती कुलकर्णी मो. 98811573333**

## 36. काव्यानंद - कंठात दिशांचे हार... रसग्रहण - सुश्री नीलिमा खरे



ग्रेस या आगळ्यावेगळ्या नावासमवेत अनेक अनवट रस्त्यावरून चाललेला कित्येक कवितांचा काफिला नजरेसमोर तरळतो, मनात रुंजी घालू लागतो. ग्रेस यांची कविता नेहमीच निराळीच "ग्रेस" घेवून काव्यांगणात बहरत राहिली, विहार करत राहिली. तिचा सुगंध काव्यरसिकांच्या मनात दरवळत राहिला.



**कविवर्य ग्रेस**

कित्येकदा कवितेतील लय, ताल, शब्दकळेचा भावविभोर पसारा अन् पिसारा भुरळ घालण्यापलीकडे मनाच्या गाभाऱ्याला खुणावत राहिला, रुजत राहिला. विलक्षण शब्दभानाला काव्यमयता, भावव्याकुळता, नादमयता यांची सर्वांगीण मिळालेली जोड कवी मनाला जाणवत राहते. दुर्बोधतेच्या वळणावर जाणारी, नेणारी कविता भासली तरीही तिचे आकर्षण व मोह कमी होत नाही. उलटपक्षी मन त्यातील गर्भित अर्थाकडे खेचले जाते. आज आपण ग्रेस यांच्या एका कवितेचा रसास्वाद घेऊ या..

**कंठात दिशांचे हार निळा अभिसार वेळूच्या रानी**

**झाडीत दडे देऊळ गडे येतसे जिथून मुलतानी**

**लागली दरीला ओढ कुणाची गाढ पाखरे जाती**

**आभाळ चिंब चोचीत बिंब पाऊस जसा तुजभवती**

**गाईंचे दुडदुडु पाय डोंगरी जाय पुन्हा हा माळ**

**डोळ्यांत सांज वक्षात झांज गुंफिते दिव्यांची माळ**

**मातीस लागले वेड अंगणी झाड एक चाफ्याचे**

**वाऱ्यात भरे पदरात शिरे अंधार कृष्ण रंगाचे**

**मेघात अडकले रंग कुणाचा संग मिळवती पेशी**

**चढशील वाट? रक्तात घाट पलीकडे चंद्र अविनाशी!!**

केवळ दहा ओळींची कविता!! वाचता क्षणी सहज आवडणारी.. भलेही पूर्णांशाने तिचा भावार्थ प्रथम कळला नाही तरी तिचे आगळे वेगळे अंतरंग मोहविते.

शब्दांच्या माध्यमातून रेखाटलेले नितांत सुंदर निसर्गचित्र वाटते ही कविता! पण जाणीवपूर्वक कविता वाचल्यावर या वरवर भासणाऱ्या, दिसणाऱ्या अर्थातून कवीला काहीतरी निराळे, शाश्वत मांडायचे आहे असे वाटते. जीवनासंबंधी काही कल्पना व सत्य व्यक्त करायचे आहे, विशद करायचे आहे हे लक्षात येते. कवीच्या मनातील कल्पनाविश्व व विचार भावनांचे बांध आणि बंध तोडून तर कधी जोडून काव्यवाचकांना ही कविता स्वतःच्या भावविश्वात- मनोविश्वात नेते हे मात्र नक्की..

**कंठात दिशांचे हार निळा अभिसार वेळूच्या रानी**

**झाडीत दडे देऊळ गडे येतसे जिथून मुलतानी**

वेळूच्या म्हणजे बांबूच्या रानी फिरताना, वावरताना निळा अभिसार ल्यायलेले नभ कवीला मोहविते आहे. त्याचा तो क्षितिजापार असलेला विस्तार प्रचंड अफाट, असीम आहे. त्याने जणू काही दिशांचे हार गळी घातले आहेत असे कवीला वाटते आहे. अर्थात दशदिशा व्यापून उरणारे त्याचे निळे अस्तित्व आश्चर्यकारक अचंबित करणारे आहे असा अर्थ! हिरव्यागार रानातून खुणावणारा हा निळा अभिसार अतिशय मोहक, रम्य भासतो आहे. अशावेळी या घनगर्द सावलीत दडलेले देऊळ कवीच्या नजरेस येते कारण तेथून मुलतानी रागाचे सूर सुस्वरे उमटत आहेत. भक्तीभावाला समर्पित असा हा संगीतातील राग! या संपूर्ण वातावरणाचा एक अतिशय लोभस असा परिणाम कवीच्या मनावर झालेला आहे. हे सर्व भुलविणारे, मनोहर असणारे वातावरण डोळ्यांसमोर उभे करण्यात कवी शंभर टक्के यशस्वी झालेला आहे. निसर्गाचे हे शब्दचित्र अत्यंत रमणीय भासते. पण हा वाटतो शाब्दिक भावार्थ! वेळूचे रान म्हणजे आयुष्य.. ते जगताना असीम निळ्या कृष्णाचे दशदिशांत असलेले अस्तित्व समजते. पण ते वास्तव व त्याच्या बासरीचे सूर जीवनाच्या वनात कुठेतरी दडून बसले आहेत.. कळतात पण समजत नाहीत. त्याचा मागोवा घेण्याचा प्रयत्न करणे ही कठीण आहे.

**लागली दरीला ओढ कुणाची गाढ पाखरे जाती**

**आभाळ चिंब चोचीत बिंब पाऊस जसा तुजभवती**

वनातून हिंडताना दिसलेल्या खोल दरीला कुणाची तरी गाढ ओढ लागली आहे असे कवीला वाटते. ती ओढ पक्ष्यांची आहे हे सांगताना पक्षी दरीतून व दरीत मनसोक्त मनमुराद विहार करत आहेत हे लक्षात आणून दिले आहे. पक्ष्यांना दरीची नाही तर दरीला पक्ष्यांची ओढ आहे असे म्हणताना अतिशयोक्ती व चेतनागुणोक्ती या दोन्ही साहित्यिक अलंकाराचा केलेला वापर कवितेतील आशयाला एक उच्च स्तर देतो. या अप्रतिम सुंदर नैसर्गिक मोहक वातावरणामध्ये दरीलाही सजीव सन्निध होण्याची, राहण्याची ओढ लागली आहे. अर्थात हे नैसर्गिक वातावरण नुसतेच सुंदर भासत नाही तर ते सजीव भासते आहे. खोल दरीची ही अवस्था तर आभाळाची एक निराळीच भावावस्था कवीने कवितेत मांडली आहे. घनशामल ढगातून पाऊस धरतीवर बरसतो. आभाळ चिंब झाले आहे असे वर्णन केले आहे. यातून घन ओथंबून आले आहेत हे लक्षात येते.

त्यातून त्या आभाळाची व कवितेतील आशयाची ही संपृक्तता आकळते. मेघ बसायला आतुर झाले आहेत हे कळते. दऱ्याखोऱ्यांतुन विहार करणारे पक्षी तसेच इतर सजीव आनंदले आहेत. त्यांच्या मनात व देहात चिंब आभाळाचे जणू प्रतिबिंब पडले आहे. त्यांच्या मनाची तृप्ती ध्यानात येते. जणू काही सुखाचा, समाधानाचा वर्षाव त्यांच्या अवतीभवती, आसपास आहे हे त्यांच्या अंतरंगाला आणि अंतरंगातही जाणवते आहे. आता या ओळीतील गर्भितार्थ जाणून घेण्याचा प्रयत्न करु या. दरी म्हणजे मरणे, मोक्ष मिळणे असावे. जीवाचे, आत्म्याचे, प्राणाचे पाखरु ज्याला मोक्षरुपी दरीची ओढ लागली आहे.. तसेच ही दरी काळरुपी ही आहे. तीही या जीवांना मोक्ष मिळतो का हे पाहण्यासाठी आतुर आहे. परंतु आयुष्यातील मोहाचे घन ओथंबून आहेत, त्या वर्षावात सर्वांचे जगणे चिंब झाले आहे. मोक्षाकडे लक्ष द्यायला कुणालाच वेळ नाही.

**गाईंचे दुडदुडु पाय डोंगरी जाय पुन्हा हा माळ**

**डोळ्यांत सांज वक्षात झांज गुंफिते दिव्यांची माळ**

भुकेल्या गाई व त्यांची वासरे लगबगीने दुडूदुडू चालीने, अधीरतेने डोंगरावरील गवत चारा खायला डोंगराकडे निघाली आहेत. दुडूदुडू या शब्दातून त्यांच्या चालण्याची लय अतिशय सहजपणे व समर्पक शब्दातून विशद केली आहे. त्याच वेळी त्यांनी गवत खाल्ल्यामुळे डोंगर ओसाड झाले आहेत व त्यामुळे ओसाड माळ जणू काही डोंगरावर अवतरला आहे असे वाटते आहे. अतिशय सुंदर कवी कल्पना जी साध्या आणि सोप्या शब्दातून मांडली आहे. हे सर्व घडत असताना सांजेची वेळ जाणवते आहे. आणि ती त्यांच्या डोळ्यांत उतरली आहे असे कवीने म्हटले आहे. हृदयातील भावना या जास्त करून डोळ्यांतून व्यक्त होतात, जाणवतात हा स्वभाव विशेष लक्षात घेण्याजोगा आहे. या कातर वेळेला त्यांच्या वक्षातील झांज वाजते आहे. आता जगण्याशी याचा संबंध जाणून घेऊ या. गाय व वासरू म्हणजे पिढ्यानुपिढ्या हे जीवन असेच चालू आहे. जीवनाच्या अंताला पोहोचताना हातात काहीच शिल्लक उरत नाही.. ओसाड माळरानाप्रमाणे केवळ रुक्षता उरते. अशा वेळी सत्याची जाणीव झाली की डोळ्यांत कातरवेळेचा सांजसमय दाटतो. वक्षात, उरात, हृदयात झांज वाजते म्हणजे भक्तीभावाचा भाव जागृत होतो. संभवत: नेत्र पैलतिरी लागतात. आजपावेतो जे कर्म केले त्याची गुंफण चालू होते व त्यानुसारच पुढील वाटचालीचा मार्ग दृष्टीपथात येतो, ठरतो.

**मातीस लागले वेड अंगणी झाड एक चाफ्याचे**

**वाऱ्यात भरे पदरात शिरे अंधार कृष्ण रंगाचे**

अंगणात असलेल्या चाफ्याच्या झाडाचे वेड अंगणाला लागले. अर्थात त्याच्या सुगंधी सहवासाचे आकर्षण, ओढ त्याला वाटते आहे. तो सुवास वाऱ्यावर दरवळत नसून वाऱ्यात तो भरला आहे. येथेही अतिशयोक्तीचा वापर करून त्या सुगंधाचे महत्त्व अधोरेखित केले आहे. असा सुगंधाने भरलेला वारा पदरात शिरतो म्हणजे अंतरंगात शिरतो. "पदरात शिरणे"या वाक्प्रचारातून ती जवळीक, समीपता लक्षात येते. त्याचवेळी सभोवती दाटलेला कृष्ण रंगाचा अंधार जाणवतो आहे.

आता कवीला अभिप्रेत असलेला अर्थ जाणून घेऊ या. मातीस म्हणजे मनाला, शरीराला (मरणानंतर शरीराची माती होते असे म्हणतात) सुगंध देणाऱ्या चाफ्याच्या झाडाचे वेड लागले. चाफ्याचे झाड हे मोक्षाचे रुपक

आहे. मोक्षप्राप्तीने सारे आयुष्य सुगंधी बनले की त्याचे सौंदर्य व सुवास मोह घालू लागतो. मोक्षप्राप्तीचे वारे मनात वाहू लागतात. पण तो साधणे किती कठीण आहे हे अज्ञान रुपी अंधाराने लक्षात येते.

**मेघात अडकले रंग कुणाचा संग मिळवती पेशी**

**चढशील वाट? रक्तात घाट पलीकडे चंद्र अविनाशी!!**

निसर्गात दाटलेल्या मेघात सांजवेळीचे अनेक रंग दिसतात. ते जणू काही त्यात अडकून पडले आहेत. अशा वेळी ते मेघ कुठल्या रंगपेशीचा संग मिळवतात हे नक्की कळत नाही. उत्तररात्र होताना क्षितिजापलीकडे असलेल्या अविनाशी चंद्रापर्यंत पोहचायला दूरवरची वाट चढायला लागते. त्यासाठी घाटमाथ्यावर जाण्यासाठी जरूरी असतात तसेच कष्ट घेण्याची नितांत गरज असते. रक्ताचा घाट व पाट करून ते साध्य होण्याची शक्यता असते.

आयुष्यासंदर्भात अनेकविध परिचित, आप्त, परिवार यांच्यात मन गुंतून राहते. त्यातील कुणाचा सहवास, संग लाभेल ज्यामुळे मनाच्या पेशी चंद्ररुपी मोक्ष मार्गाकडे वळतील या विषयी मन अनभिज्ञ असते. त्यासाठी कठीण परिस्थितीत प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागते, मोक्षाची कास धरावी लागते. तरच ते शक्य होण्याची शक्यता निर्माण होते.

संपूर्ण कविता रुपकात्मक आहे... निसर्ग व मानवी जीवनातील साधर्म्य सांगत, संवाद साधत मोक्षाचे अविनाशी सत्य उलगडून दाखवले आहे...

समजायला जरा अवघड असली तरी अभिप्रेत अर्थ समजला असे वाटले की कविता अजून जवळची वाटते हे नक्की..

**रसग्रहण – सुश्री नीलिमा खरे**



## 37. लेख - शेक्सपिअरचे स्ट्रॅटफोर्ड... – श्री मोहन निमोणकर



प्रत्येक गोष्टीला वेळ यावी लागते हेच खरं! २०१४ ते २०१९ या पाच वर्षात आमची चार वेळा इंग्लंड भेट झाली; पण शेक्सपिअरच्या गावाला भेट द्यायचा योग आला तो २०१९ सालीच! प्रत्येक भेटीत माझ्या मुलाला, आशिषला स्ट्रॅटफोर्ड अपऑन ॲव्हॉनला नेण्याविषयी सांगायचो; पण काही ना काही कारणानं जमत नव्हतं. मात्र, या वर्षी त्यानं आणि सून निवेदितानं तिथं जाण्याचा चंगच बांधला आणि योग आणलाच.



ॲव्हॉन नावाच्या नदीवरील स्ट्रॅटफोर्ड हे शेक्सपिअरचं जन्मगाव, साउथ वार्विकशायरमधील हे गाव. इथं ज्या इमारतीत शेक्सपिअरचा जन्म झाला त्या वाड्यावजा इमारतीत 'शेक्सपिअर जन्मस्थान ट्रस्ट' ने उत्तमरित्या त्यांच्या जन्माच्या वेळच्या गोष्टी जतन करून ठेवल्या आहेत. मुळात इंग्रज हा परंपरावादी, त्यामुळेच त्यांनी या जगप्रसिध्द नट, लेखक आणि थिएटर मॅनेजरची १६/१७ व्या शतकातली, त्यानं आणि त्याच्या कुटुंबानं अनुभवलेली जीवनविषयक माहिती जतन करून प्रदर्शनाव्दारे तिची आजच्या पिढीला ओळख करून दिली आहे. या संग्रहालयाने शेक्सपिअर आणि त्यांच्या कुटुंबानं अनुभवलेल्या प्रसंगांवर टाकलेल्या प्रकाशामुळे हा एक मोठा माणूस आणि लेखक म्हणून आपणास समजू शकतो.

शेक्सपिअरच्या वयाच्या ३७ व्या वर्षी म्हणजे १६०१ मध्ये ही जन्मस्थानची जागा त्याला वडिलांकडून मिळाली. मुळात शेक्सपिसरला राहायला भरपूर जागा असल्यानं त्यानं वडिलांकडून मिळालेल्या जागेतून काही पैसे कमवावेत असा विचार केला आणि त्यानं ती जागा एलिझाबेथ फोर्ट नावाच्या बाईला हॉटेलसाठी भाड्यानं दिली. एलिझाबेथ यांच्या मृत्यूनंतर १८४६ मध्ये इमारत विक्रीला काढली गेली. तेव्हा 'शेक्सपिअर जन्मस्थळ ट्रस्ट' नं ती विकत घेऊन हे संग्रहालय उभं केलं. आजही त्या जन्मस्थळाची देखभाल ते करत आहेत.

हे संग्रहालय उभं करण्यात आणि ते राष्ट्रीय स्मारकामध्ये अंतर्भूत करण्यासाठी जी चळवळ उभारली गेली, त्यात डिकन्सचा सहभाग महत्त्वाचा होता. त्यानं १८३८ मध्ये या जन्मस्थळास भेट दिली होती आणि त्यापासूनच त्याला स्फूर्ती मिळाली. शेक्सपिअरच्या जन्माच्या खोलीत एका खिडकीच्या काचेवर प्रेक्षक आपली आठवण म्हणून नावं लिहून ठेवत. त्यात प्रसिध्द स्कॉटिश लेखक वॉल्टर स्कॉट, तत्त्ववेत्ता थॉमस

कार्लाईल, चार्ल्स डिकन्स, शेक्सपिअरच्या काळातील दोन महान नट एलन टेटी आणि हेन्नी आयर्विंग यांचा समावेश आहे. या संग्रहालयातील वस्तूंवरून.. म्हणजे कपडे, बिछाने आणि इतर दैनंदिन गरजेच्या वस्तूंवरून शेक्सपिअरची माहिती मिळते.

शेक्सपिअर ३७ नाटके, १५४ सुनीते (sonnets), ५ पदविधारी काव्यं (titled) लिहू शकला आणि आपल्यासाठी जवळजवळ लाखो शब्दांमधला विचारांचा अमूर्त ठेवा ठेवून गेला. त्याची नाटकं शाळा, विद्यापीठे, नाट्यगृहे, बागा आणि तुरुंगातही सादर केली जातात. शेक्सपिअरचा हा अमूल्य साहित्यिक ठेवा जतन करण्याचं कार्य ट्रस्टनं केलं असलं, तरी इंग्लंडमधील एका दैनिकात आलेली बातमी वाचून मन विषण्ण होतं.....

ती बातमी म्हणते, की.. ....

"विद्यार्थ्यांसाठी शेक्सपिअर खूप कठीण आहे! 'डिजिटल टेक्नॉलॉजी ॲडॉब' ने २००० साली केलेल्या एका सर्वेक्षणानुसार, २९ टक्के विद्यार्थ्यांना असं वाटतं, की शेक्सपिअरची नाटकं आधुनिक तंत्रात बसवली, तर ती चटकन समजतील. शेक्सपिअर चांगला समजायचा असेल, तर व्हिडिओ आणि ॲनिमेशनचा उपयोग करायला हवा असेही काहीजण म्हणतात. "

.... असो. मी मात्र माझं १९७० सालापासूनचं स्वप्नं पूर्ण झाल्यानं आनंदात होतो.

**श्री मोहन निमोणकर,** *सिंहगडरोड, पुणे-५१ मो. ८४४६३९५७१३.*



## 38. कथा - उशीर... डॉ. ज्योती गोडबोले



आज ग्लोरीचा वाढदिवस.... रोजच्यासारखाच हाही दिवस असाच जाणार... उदास आणि काळज्यांनी भरलेला...

.... सकाळी लवकर आवरून ग्लोरी नोकरीवर रुजू झाली. मॉलमधली ती कष्टाची नोकरी. नाही कसला त्यात आनंद की कसला चॅलेंज.

– टीना तिची वाटच बघत होती... " हॅपी बर्थडे डिअर. " टीनाने ग्लोरीच्या हातात केक आणि छानशी पर्स दिली. ग्लोरीच्या डोळ्यात पाणी आलं.

"टीना, लक्षात आहे तुझ्या माझा वाढदिवस? मीही विसरून गेले होते ग. थँक्स माय डिअर. पण मी मात्र तुला काही देऊ शकत नाही टीना. " ग्लोरी गहिवरून म्हणाली.

"अग असू दे. हेही दिवस जातील ग्लोरी. चल. दुपारी आपण खाऊ हा केक. "

दोघी काउंटरवर जाऊन काम करायला लागल्या. ग्लोरी कामात बुडून गेली. जेमतेम भागेल अशी ही मॉलमधली नोकरी. तिच्यासारख्या शाळा मधेच सोडून दिलेल्या मुलीला कोण देणार होतं चांगली नोकरी?

... ग्लोरीला मागचे दिवस आठवले.

किती सुंदर जग होतं तिचं. ममा, डॅडी, तिचा भाऊ रॉक आणि ग्लोरी. ग्लोरीचे डॅडी चांगल्या नोकरीत होते. ग्लोरी अभ्यासात खूप हुशार होती शाळेत. सुंदर, सोनेरी केसांची निळ्या डोळ्यांची बाहुलीसारखी ग्लोरी. शाळेत स्पोर्ट्समध्ये चमकणारी ग्लोरी.

.. त्या दिवशी तिला शाळेतला ग्रेग स्मिथ भेटला. तिच्या एक वर्ष पुढे असलेला ग्रेग स्मिथ. कृष्णवर्णी ग्रेग. उत्तम स्पोर्ट्स पर्सन. तिला त्याने आवर्जून कॉफी प्यायला नेलं. नंतर त्यांच्या भेटी वाढतच गेल्या. अतिशयच वाईट परिस्थितीत असलेल्या ग्रेगबद्दल ग्लोरीला आपुलकी वाटायला लागली. तो तिला आपली स्वप्नं सांगायचा. ' मी मोठा स्पोर्ट्स् ट्रेनर होईन, खूप पैसा मिळवीन ' म्हणायचा. ' मला या दरिद्री परिस्थितीतून बाहेर पडायचं आहे आणि खूप पैसा मिळवायचा आहे ' असं तर सारखंच म्हणत असायचा.

ग्लोरी त्याच्या स्वप्नांवर भुलून गेली. त्याच्याबरोबर हिंडताना, हायकिंगला जाताना तिला आनंद व्हायचा. तिचं लक्ष अभ्यासातून पार उडालं. नेहमी चांगल्या ग्रेडस् मिळवणारी ग्लोरी कशीबशी पास झाली त्या वर्षी. ममाने तिचं प्रोग्रेस बुक बघितलं आणि तिला धक्काच बसला.

"काय ग हे ग्लोरी? काय हे तुझे स्कोअर? कधीही इतके वाईट मार्क्स नव्हते तुला. त्या मूर्ख उथळ ग्रेग स्मिथच्या नादी लागू नकोस. मला आंधळी समजतेस का? सगळं बघतोय आम्ही. आयुष्याचं नुकसान करून घेशील ग्लोरी. प्लीज प्लीज ग्लोरी. छान ग्रेड्स मिळवून चांगल्या कॉलेजला जा. आम्ही तू म्हणशील तितके

शिकवू तुला बाळा. " – ममाने कळवळून हजार वेळा सांगितलं. पण ग्लोरी मख्खपणे सगळं ऐकून घेत होती.

त्याच वर्षी ग्रेगने शाळा सोडून दिली. कुठल्यातरी जिममध्ये त्याला ट्रेनरची नोकरी मिळाली.

"अरे, हे काय ग्रेग. शाळा सोडलीस तू? पूर्ण तरी करायचं ना हायस्कूल? " ग्लोरीने विचारलं.

"गप्प बस ग तू. मला समजतं काय करायचं ते. मला नको अक्कल शिकवू. " ग्रेग तिच्यावर खेकसला. ग्लोरीला हे ऐकून वाईट वाटलं.

मग चार दिवसांनी ग्रेग तिला भेटायला आला..

"सॉरी ग्लोरी. माझं चुकलं. मी असं नको होतं बोलायला. माफ कर ना मला. " ग्रेगने तिची समजूत काढली. ग्लोरी पुन्हा त्याच्या बोलण्यात अडकली. आणि त्याच वर्षी ग्लोरीने ग्रेगशी लग्न करायचा निर्णय घेतला.

ममा डॅडी म्हणाले, " मूर्ख आहेस का ग? शाळा तरी पूर्ण कर ना आधी. "

यावर ग्लोरी थंडपणे म्हणाली " मी प्रेग्नन्ट आहे ममा. आत्ता लगेच लग्न करायला तयार आहे ग्रेग. मी त्याच्याशीच लग्न करणार. त्याला माझी गरज आहे. मी सपोर्ट करीन त्याला. "....

... आणि ग्लोरी घर सोडून निघून गेली.

"ग्लोरी, कान उघडे ठेवून ऐक. त्या दरिद्री अशिक्षित मूर्ख काळ्याशी लग्न केलंस ना तर तू मेलीस आम्हाला. जे परिणाम होतील ते भोग. माझ्या दारात यायचं नाही मग रडत. दिसतंच आहे पुढे काय होणार आहे ते." डॅडी तेव्हा गरजले होते.

डॅडी ममा खूप हळहळले पण ते काहीही करू शकले नाहीत. ग्लोरीने शाळा सोडून दिली. पहिले काही दिवस छान गेले त्यांचे. ग्लोरीला मुलगी झाली. अवघ्या अठराव्या वर्षी आई झाली ग्लोरी. मुलगी गोड होती ग्लोरीची. पुष्कळशी तिच्याचसारखी. केस ग्रेगसारखे राठ पण गोरा रंग आणि निळे डोळे ग्लोरीसारखे.

आता ग्रेगने दुसरी नोकरी धरली. त्यांची फार आर्थिक ओढाताण सुरू झाली. ग्लोरीला मूल सांभाळून नोकरी करणं अशक्यच होतं. अशातच पुन्हा दिवस गेले ग्लोरीला. पुन्हा तोच सगळा तमाशा, ग्रेगची चिडचिड. ग्लोरीला दुसरी मुलगी झाली. अशक्त दुबळी कमी वजनाची.. आईची आबाळ झाल्याने दुबळी राहिलेली..

.. ग्लोरी घरी आली. दोन दिवस उपाशी असलेली तिची मोठी मुलगी घाबरून रडत घरी बसली होती. घरी काहीही सामान नव्हते आणि स्टेला.. तिची मुलगी म्हणाली, " डॅडी घरीच आला नाही ग ममा. मला भूक लागलीय खूप. "

ग्लोरीने बघितलं, सगळं सामान घेऊन ग्रेग घरातून निघून गेला होता. ग्लोरीचा जीव स्टेलासाठी कळवळला. नवीन बाळ तसेच सोफ्यावर ठेवून ग्लोरीने स्टेलाला पटकन खायला दिलं. फ्रीज रिकामा. दोन अंडी तेवढी होती आणि थोडं दूध. ग्लोरी हताश झाली. पर्समध्ये फक्त काही डॉलर्स शिल्लक होते. ते दोन महिने ग्लोरीने कसेतरी ढकलले.

अचानक या मॉलची ऍड तिने वाचली. लगेच ती मॅनेजरला जाऊन भेटली. " मला या जॉबची फार गरज आहे... दोन लहान मुली आहेत मला. " तिच्या डोळ्यात पाणी आलं. आणि तिला हा जॉब मिळाला. निदान ती आणि तिच्या दोन मुली उपाशी तरी नव्हत्या रहाणार आता.

मुली स्टेला आणि ख्रिस एखाद्या अनाथ दुर्लक्षित झुडपासारख्या वाढू लागल्या. ग्लोरी आता बारा बारा तास ड्यूटी करायला लागली. दोन्ही मुली आता शाळेत जायला लागल्या. शहाण्या मुली बिचाऱ्या. कधीही हट्ट केला नाही, की कधी हे हवं ते हवं असं ममाला म्हणाल्या नाहीत. ग्लोरीच्या मॉलमध्ये सेल असला की ग्लोरी जमेल तसे कपडे मुलींसाठी आणे. एक्सपायरी डेट जवळ आलेले ब्रेड केक ग्लोरी घरी आणे. ते स्वस्त मिळत तिला.

... या कठीण दिवसात ग्लोरी कधीही माहेरी गेली नाही की तिच्या आईवडिलांनीही तिची कधी चौकशी केली नाही. ग्लोरी विचार करत बसे, 'काय दुर्बुद्धी आठवली म्हणून आपण हे लग्न केलं? शिक्षण पूर्ण केलं असतं तर आज ही वेळ आली नसती आपल्यावर. '

त्या दिवशी अतोनात बर्फ पडलं. मुली घरी एकट्या होत्या. ग्लोरीला फार काळजी वाटायला लागली.

तिची जिवलग मैत्रीण टीना म्हणाली, " ग्लोरी घाबरू नको. मी तुझ्या घरी जाऊन थांबते मुलींजवळ. तू तुझी ड्यूटी करून मगच ये. "

.. टीना ग्लोरीच्या घरी गेली. जाताना तिने मुलींसाठी खूप खाऊ घेतला. सेलवर असलेले आणि आणखी डिस्काउंट मिळालेले स्वस्तातले कपडे घेतले मुलींना. आपलं काम संपवून ग्लोरी घरी आली. मुली टीनाआंटीशी आनंदात खेळत होत्या. नवीन कपडे घालून बसल्या होत्या.

टीना म्हणाली " रागावू नको हं ग्लोरी. देवाने मला मूल दिलं नाही ग. पण या पोरी माझ्याच आहेत असं मानते मी. थोडे लाड केले मी त्यांचे त्यांची मावशी म्हणून तर तू रागावणार तर नाहीस ना?"

ग्लोरीने तिला मिठी मारली. दोघींच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले. " हेही वाईट दिवस जातील डिअर.

मुली तुझे पांग फेडतील ग्लोरी. ही मोठी स्टेला तर खूप हुशार आहे म्हणतेस ना? बघ. खूप शिकेल बघ ती. आणि हे बारकं कोकरू तर किती देखणं आहे. सगळं होईल बरं छान. " टीना निघून गेली.

ग्लोरीला खूप आधार वाटला तिचा. तिची तरी परिस्थिति कुठे मोठी छान होती? ग्लोरीपेक्षा बरी म्हणायची. स्टेला आणि ख्रिस मोठ्या होऊ लागल्या. या इतक्या वर्षात ग्लोरीला पत्ताही नव्हता ग्रेग कुठे आहे, काय करतोय. तिनेही कधी त्याची चौकशी केली नाही. कधीतरी मुली विचारायच्या " आमचा डॅडी कुठे असतो?"

एकदाच ग्लोरीने शांतपणे दोघीना जवळ घेऊन सांगितलं, "डॅडी घर सोडून निघून गेला. मला माहीत नाही तो कुठे आहे, काय करतो. मी आहे ना तुमच्यासाठी? मी तुम्हाला काहीही कमी पडू देणार नाही. तुम्ही मोठ्या व्हा. खूप शिका. मी केली ती चूक तुम्ही करू नका."

“नाही ग ममा. मी खूप शिकेन. मग आपण छान घरात राहू. मग तू मॉलमध्ये जाऊ नको. ” आपल्या चिमुकल्या हातांचा विळखा घालून दोघी म्हणत.

स्टेलाला अतिशय उत्तम ग्रेड्स मिळाल्या. ती कॉलेजला गेली. तिला डॉक्टर व्हायचे होते. कमी उत्पन्न असलेल्या स्टुडन्टसाठी असलेली सवलत मिळवत स्टेलाने रात्रंदिवस कष्ट करून मेडिकल कॉलेजमध्ये प्रवेश मिळवला. अशी किमान सहा वर्षे स्टेलाला डॉक्टर व्हायला काढायची होती. तिने सुट्टीत लहान मोठे जॉब करत आपला खर्च जमवला. नाही कुठे पार्ट्या, नाही कोणाशी डेटिंग. एकलव्यासारखा एकच ध्यास.. आपल्याला डॉक्टर व्हायचंय.

धाकटी ख्रिस मात्र अभ्यासात इतकी हुशार नव्हती. ”ममा, मी स्टेलाइतकी हुशार नाहीये. पण मी ग्रॅज्युएट झाले की काहीतरी वेगळं करीन. आहेत माझ्या मनात चांगलं काहीतरी व्हायचे प्लॅन्स.”

ग्लोरी आता स्टोअर मॅनेजर झाली. जरा चांगला पगार मिळायला लागला तिला. दोन्ही मुली सुट्टीत घरी येत. आपल्या आईला भेटत. तिच्यासाठी थोडं फार काहीतरी घेऊन येत. ग्लोरीला धन्य वाटे.

त्या दिवशी ख्रिस अचानक घरी आली. ” ममा, “ म्हणत तिला मिठी मारली. “ अग हो हो. काय झालं एवढं?” घाबरून ग्लोरीने विचारलं. ख्रिसने हातातलं लेटर ग्लोरीला दाखवलं. ख्रिसला एअरहोस्टेस म्हणून एअरलाईनमध्ये चांगला जॉब मिळाला होता. कधी न बघितलेला पगार आणि खूप पर्क्स.

“ममा, मी गुपचूप इंटरव्ह्यू दिले ग. आणि मला या छान एअरलाईनमध्ये जॉब मिळाला. माझा पहिला पगार झाला की आपण स्टेलाला भेटायला माझ्या एअरलाईनने जायचं.. तिला न सांगता. तू आजपर्यंत कधीही विमानात बसली नाहीस ना ग? ”

– – ख्रिस आणि ग्लोरीचे डोळे भरून आले. ख्रिस कामावर रुजू झाली.

पहिल्यांदा एअर होस्टेसचा डौलदार युनिफॉर्म घालून ती ग्लोरीसमोर उभी राहिली तेव्हा ग्लोरीला वाटलं, ‘आपलीच दृष्ट लागेल पोरीला.’

मग स्टेलाही डॉक्टर झाली.

एक दिवस घरी आलेली असताना तिने विचारलं “ ममा, मिस्टर लॉरेन्स म्हणजे कोण? आज आमच्या हॉस्पिटलमध्ये ऍडमिट केलं त्यांना. मॅसिव्ह हार्ट अटॅक आला म्हणून. माझी इमर्जन्सी ड्युटी होती तेव्हा. ते बेशुद्ध होते. आम्ही खूप मेहनतीने त्यांना ट्रीटमेंट दिली. मग ते शुद्धीवर आले. आता बरे आहेत. पण हार्टची कंडिशन चांगली नाही त्यांची. त्यांनी माझी माझ्या एप्रनवरची नेमप्लेट अगदी निरखून बघितली.. डॉ. स्टेला स्मिथ... अशी. आणि विचारलं, ‘तू ग्लोरी स्मिथ आणि ग्रेगची मुलगी का? ’ ममा, मी हो म्हटल्यावर ते रडायलाच लागले ग. कोण आहेत हे मिस्टर लॉरेन्स? खूप चांगले आहेत ग. आणि त्या आजी पण अगदी गोड आहेत. थकलेत दोघेही अगदी. “

... ग्लोरीच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले. “ देवा, तुझी लीला अगाध आहे बरं. स्टेला, अगं ते तुझे आजी आजोबा आहेत. मी ग्लोरी लॉरेन्स आहे माहेरची. ”

ग्लोरीने आपली कधीही कोणाला न सांगितलेली करुण कहाणी स्टेलाला सांगितली... ते कोवळं वय, ते अविचारी प्रेम, तो ग्रेग, ते तडकाफडकी केलेलं लग्न, आणि जन्मभर भोगलेले त्याचे परिणाम... ग्रेगचं ते त्यांना टाकून भ्याडासारखं पळून जाणं आणि मग वाट्याला आलेली ससेहोलपट.....

स्टेला शांतपणे ऐकत होती.

“मम्मा, तुला भेटायचं आहे असं सारखं म्हणत आहेत ते. येशील का? चल ना. चांगली नाहीये त्यांची प्रकृती. चल माझ्याबरोबर. ”

ग्लोरी स्टेलाबरोबर तिच्या हॉस्पिटलमध्ये गेली. आपल्या लेकीला हॉस्पिटलमध्ये असलेला मान बघून ग्लोरीचा ऊर भरून आला. एका स्पेशल रूममध्ये ग्लोरीला तिचे वडील दिसले. खूप म्हातारे झालेले. थकलेले. बेडवर निपचित पडून असलेले. त्यांना बघून ग्लोरीला भडभडून आलं. कुठे ते रुबाबदार उमदे कडक शिस्तीचे तिचे डॅडी आणि कुठे हे वृद्ध गृहस्थ.

“डॅडी,“ ग्लोरीने हळूच हाक मारली. त्यांनी डोळे उघडले.

”ग्लोरी... किती वर्षांनी बघतोय ग तुला. काय ही दशा तुझी. अकाली म्हातारी झालीस बेटा. पूर्वीची माझी सुंदर ग्लोरी हरवली ग कुठेतरी.”

ग्लोरी खिन्न हसली. “ डॅडी, कशी रहाणार मी पूर्वीची सुंदर ग्लोरी? काळाने असे काही निर्घृण आसूड ओढले पाठीवर की पाठ मोडून गेली माझी. तुमचं ऐकलं नाही त्याची फार मोठी शिक्षा मिळाली हो मला. मला माफ करा डॅडी.” ग्लोरी हुंदके देऊन रडायला लागली. डॅडीनी कष्टाने तिच्या पाठीवरून हात फिरवला.

“आमचीही फार मोठी चूक झाली ग तेव्हा. चुकलं तरी आपलं लेकरू असतं ते. पण खोट्या इगोपायी मी तुझ्याकडे बघितलं सुद्धा नाही. तुझी वाताहात समजत होती मला. तुझ्या ममालाही मी तुला भेटायची बंदी केली. देवाच्या घरी न्याय असतो ग मुली. तुझा भाऊ रॉक नादान निघाला. पुरा जंकी झाला तो. मला माहीत नाही तो कुठे पडलेला असतो ड्रग्ज घेऊन ते. खूप प्रयत्न केले मी त्याला त्यातून बाहेर काढायचे. पण तो त्यापलीकडे गेलाय. ”.. थकून जाऊन डॅडीनी मान उशीवर ठेवली.

“या तुझ्या मुलीला बघितलं आणि का कोण जाणे तुझीच आठवण झाली. खूप भास होतो तिच्यात तुझा.

अभिमान वाटावा अशी मुलगी घडवलीस तू ग्लोरी. मी मात्र आजोबाचे कोणतेही कर्तव्य पुरे केले नाही की तुझ्या पित्याचे. मला माफ कर ग्लोरी. तुझ्या आयुष्याची होरपळ व्हायला मीही जबाबदार आहे. मुद्दाम उघड्या डोळ्यांनी तुझे हाल बघत राहिलो. तूही अशी स्वाभिमानी की कधीही माझ्या दारात याचनेसाठी आली नाहीस. मला माफ करा तुम्ही मुलींनो. मला तुझी दुसरी मुलगी पण बघायची आहे ग्लोरी.”

... ममा आत आल्या. सगळे केस पांढरे झालेल्या. थकून पाठीत वाकलेल्या. ग्लोरीला त्यांनी मिठी मारली. ”देवाची लीला अगाध आहे ग्लोरी. अशी भेट व्हायची ठरली होती तर आपली. ही तुझी डॉक्टर स्टेला किती ग सुंदर आहे आणि हुशार पण. या मुलींचं बालपण आम्ही बघितलं नाही. आमच्या हातांनी तुम्हाला दूर लोटलं ग्लोरी.”

ग्लोरी शांत होती. "ते सोडून देऊ आता. उद्या माझी दुसरी मुलगी ख्रिस येईल. तिलाही भेटा."

चार पाच दिवसांनी लॉरेन्सना डिस्चार्ज मिळणार होता. जायच्या आदल्या दिवशी मिस्टर लॉरेन्सने स्टेलाच्या हातात एक लिफाफा ठेवला...

"पोरी, हे तुमच्यासाठी तुमच्या आजोबांनी दिलेलं गिफ्ट. ग्लोरीला हे आवडणार नाही. पण तुम्ही माझ्या नाती आहेत ना.. हे घ्या."

ग्लोरी तिथेच होती. " नको डॅडी. मला आणि माझ्या या कर्तबगार मुलींना यातलं काहीही नका देऊ. आता खूप उशीर झाला डॅडी. अकाली पडलेल्या पावसाचा शेतीला काहीही उपयोग होत नसतो. नुकसान व्हायचं ते होऊन गेलेलं असतंच ना. माझी चूक होती आणि त्याची शिक्षा मी भोगली. न परतीची वाट होती ती. दोन मुली घेऊन कुठे जाणार होते मी? तुमचं काहीही चुकलं नाही डॅडी. परोपरीने सांगत होतात तुम्ही मला. आईवडिलांना नाही तर कोणाला असणार कळकळ मुलीची? पण मी ऐकलं नाही. तुमचं खरं ठरलं. जबर शिक्षा भोगली मी. पण त्यातूनही मार्ग काढला मी. गेले ते वाईट दु:स्वप्नासारखे दिवस. आता ठीक आहे सगळं. आतासुद्धा जरा कुठून सुख डोकावू लागलं की वाटतं, अरे याच्या मागोमाग दुःख दबा धरून बसलंय की काय... नको डॅडी आम्हाला काहीही. माझ्या मुलींना आणि मला याची गरज नाही आता. एके काळी अन्नाची भ्रांत होती या माझ्या लेकरांना. पण ब्र नाही काढला त्यांनी तोंडातून. " ग्लोरी बोलत होती. " माझा कोणावरही राग नाही. ग्रेगवर पण नाही. असेल तिथे तोही असू दे सुखात. "

स्टेला पुढं झाली. भावनावेगाने कापणाऱ्या ग्लोरीला तिने जवळ घेतलं. लॉरेन्स म्हणाले, " ग्लोरी मी चुकलो. पण ईश्वराकडे निघालेल्या म्हाताऱ्या आईवडिलांची इच्छा अशी डावलू नको. उशीर झालाय पण तरीही मला माझी इच्छा पुरी करू दे..."

स्टेलाने त्यांना नमस्कार केला आणि ते पाकीट हातात घेतलं. ग्लोरीच्या हातात तिने ते ठेवले. थकून जाऊन मिस्टर लॉरेन्स उशीवर डोके ठेवून आडवे झाले. ' त्यांना आता विश्रांती घेऊ दे ' म्हणत स्टेलाने त्यांच्या अंगावरचे ब्लँकेट सारखे केले.

– काहीतरी शंका आल्याने तिने नीट बघितलं. तिच्या आजोबांचे प्राण त्याच क्षणी पंचत्वात विलीन झाले होते.

... आणि त्या पाकिटात होते त्या दोघांचे मृत्युपत्र... त्यांची अफाट इस्टेट, बँकेतली मोठी ठेव, स्वतःचे दोन मोठे व्हिला सगळं सगळं ग्लोरीच्या नावावर केलं होतं.

... उशिरा का होईना.. लॉरेन्सने आपल्या अपराधाचे क्षालन करण्याचा प्रयत्न होता तो.

**डॉ. ज्योती गोडबोले मो. ९८२२६३९४७१**

## 39. ललित - नाते सासू-सुनेचे... – सुश्री अरुणा मुल्हेरकर



वैशालीला पहिला मुलगा होता आणि आता ती दुसऱ्या वेळी गर्भार होती. यावेळी तिला मुलगीच हवी होती. मुली कशा गोड असतात, त्यांना वेगवेगळ्या प्रकारे छान नटवता येते आणि मुख्य म्हणजे मुलींची माया फार वेगळी असते, पण म्हणतात ना "ईश्वरेच्छा बलीयसि". तिला दुसरा मुलगा झाला. छान गोंडस गोरापान, काळेभोर जावळ असलेला. या बाळाच्या आगमनाने तिला आनंद तर झालाच, पण माझ्याकडे ती बोलून गेली, " आता या दोघांच्या बायका येतील ना त्याच माझ्या लेकी. "

वैशालीचे पुरोगामी विचार मला फारच भावले आणि त्याच क्षणी मनात असाही विचार आला की खरंच सासु~ सुनेचे नाते मायलेकींसारखे होईल का?

खरंतर पूर्वापार काळापासून सासू~सून नाते बदनामच आहे. सासू म्हटली की ती खाष्टच! सुनेचा छळ करणारी. काही अंशी ते खरंही आहे. संत जनाबाईचा तिच्या सासूने किती छळ केला. रात्रंदिवस तिला दळण कांडण करावे लागत असे. मीराबाईला तर ती अखंड हरी कीर्तनात असायची म्हणून तिच्या सासूने विषाचा प्याला प्यावयास दिला होता. ह. ना. आपट्यांच्या प्रत्येक कादंबरीतील सासू, सुनेचा छळ करणारीच होती. सिनेसृष्टीतील इंदिरा चिटणीस, ललिता पवार या अभिनेत्री तर जहांबाज सासवा म्हणूनच ओळखल्या जात होत्या. अर्थात त्या काळातील समाजाचे चित्र तसेच होते.

आपल्याकडे म्हण आहे, " चार दिवस सासूचे, चार दिवस सुनेचे. " सासूला तिच्या सासूने जाच केला म्हणून आता ती सासू झाल्यावर सुनेला घालून पाडून बोलते, तिच्या माहेरच्या माणसांचा सतत उद्धार करते. हे कालचक्र असेच वर्षानुवर्षे चालत राहिले. आता वैशालीने जेव्हा येणाऱ्या सुनाच तिच्या मुली असतील हे जाहीर केले, तेव्हा मला वर्तमान काळाचा फार अभिमान वाटला.

गेल्या दोन शतकांमध्ये मुली शिकू लागल्या, घराबाहेर पडून चार पैसे कमवू लागल्या, त्यांच्यातील आत्मविश्वास वाढू लागला, त्या आर्थिकदृष्ट्या सक्षम झाल्या, स्वतंत्र झाल्या. भोवतालच्या परिस्थितीची त्यांच्यात जाण निर्माण झाली. चारचौघात बसून त्या निर्भीडपणे आपली मते मांडू लागल्या. संसार आणि अर्थार्जन या दोन्ही आघाड्या यशस्वीपणे लढण्याचे बळ त्यांनी आत्मसात केले.

... सहाजिकच माहेर सोडून आलेली सुशिक्षित मुलगी तिच्या सासरच्या माणसांत रमू लागली. सासू-सासरे, दीर- नणंदा, सर्वांची मने राखून तिने त्यांचे प्रेम संपादन केले. "प्रेम द्यावे, प्रेम घ्यावे" ही उक्ती तिने सार्थ ठरवली.

आज केवळ सूनच सुशिक्षित आहे असे नाही, तर सासूही सुसंस्कृत, सुशिक्षितच आहे. जुन्या चालीरीतींसोबत ती नव्याचाही आनंदाने स्वीकार करते.

माझ्या नातीच्या एका मैत्रिणीच्या लग्नानिमित्त असलेल्या संगीत समारंभाला उपस्थित राहण्याचा योग मला आला. नवीन पाश्चिमात्य पद्धतीनुसार समारंभाच्या हॉलमध्ये सौभाग्यकांक्षिणीच्या एकेका नातेवाईकाने संगीताच्या तालावर नाचत नाचत प्रवेश करायचा होता. याआधी अशी पद्धत मी तरी कुठेच पाहिली नव्हती. सगळ्यांना आनंद मिळतो आहे ना? असा विचार करून त्या मुलीची आजी, पाठोपाठ तिची सासू, नंतर आई-वडील आणि शेवटी नवदांपत्य हातात हात घालून नाचत नाचत प्रवेश करते झाले. कोणीही नाके मुरडली नाहीत, की, हे काय भलतंच अशा प्रकारचे उद्गारही काढले नाहीत....

... नव्या जुन्या चा संगम जर आनंददायी असेल तर विरोध कशासाठी करायचा? आज मितीला सासू-सुनेचे नाते हे असे आहे.

काही अपवाद तर असणारच. सासू किंवा सुनेची वृत्ती हटवादी असली, दोघींनी माझंच खरं

असा हट्ट धरला तर हे नाते कधीच सांधले जाणार नाही, पण त्यासाठी सासू-सूनच का? आई-मुलगीही होऊ शकतेच की! घर म्हटले की भांड्याला भांडे लागणार, आवाज होणार, कारण प्रत्येक व्यक्ती स्वतंत्र आहे, तिचे विचार आवडीनिवडी स्वतंत्र आहेत. त्यामुळे एकत्र राहताना थोडे तुझे, थोडे माझे, अशा समजूतदार वृत्तीने वागले तर घरोघरी सुख, शांती, समाधान नांदेल. सासु- सुनेचे नाते बदनाम राहणार नाही.

**सुश्री अरुणा मुल्हेरकर,** डेट्रॉइट (मिशिगन) यू.एस्.ए.



## 40. लेख - बकुळ... - श्री मुबारक उमराणी



दुपारच्या उन्हाचा तडाखा सहन करीत त्यानं पूर्वाभिमुख असलेल्या मंदिराच्या आवारात पाय ठेवला. समोरचं बकुळीचं झाडं फुलांनी गच्च भरलं होतं. सभोवती उगवलेली घाणेरी, रानगवत, काटेरी झुडपे, चिकाची झुडपे चांगलीच निबार झाली होती. भोवतालच्या दाट झाडीत मंदिर झाकल्यासारखे झाले होते. बऱ्याच दिवसांपासून स्वच्छता न केल्याने पाला-पाचोळ्याचं साम्राज्य पसरलं होतं. त्याची हातांनी साफसफाई करावी म्हटलं तरी अशक्यच. त्यात साप, विंचू व इतर किड्यांचा वावर नक्की किती आहे हे समजून न आल्याने गावातील लोकांनी या जागेकडे येणे जाणे टाळलेच होते. वाढलेल्या गवतामधूनच एक पायवाट गेलेली. तेवढाच पांढरा पट्टा.. चौदवी का चांदसारखा. पलिकडच्या रस्त्याला मिळून वाहणाऱ्या ओढ्यात मिसळून तोही वाहता झालेला. अवतीभोवती हिरवीगार शेती.. सायपनचं पाणी पीत, वा-याच्या मंद वाहणाऱ्या झोतात हलत होती. तंबाखू, मिरच्या, मका, शाळू, हतीगवत, बांधावरची छोटी झाडे. त्यावर एखादं दुसरं माकडं झुलतांना दिसत होतं. गाव तसं छोटं. सभोवती उकिरडे.. त्यावर कोंबड्या शेणातले धान्य टिपत होत्या. गावाला वळसा घालणारा रस्ता, झाडाझुडपात असल्यासारखा लाजत, गावाची सीमा दर्शवत होता. दोहो बाजूनी वाहणारे ओढे आपल्याच नादात खळखळ आवाज करीत वाहत होते. गाव शांतपणे झोपल्यासारखं वाटतं होतं. उनाड पोरं अशा वातावरणात खेळत असल्याने त्यांचा आवाज शांतता भंग करीत असल्याचा भास होत होता. म्हणूनच तो आल्याची जाणीव कोणाला झाली नाही.

तो बकुळीच्या झाडाखाली उभा राहिला. झाडावरच्या चिमण्यांचा कल्लोळ मनाला उल्हसित करीत होता. भोवतालच्या झाडाझुडपातलं दत्त मंदिर एकदम जुनाट वाटतं होतं. भिंतीवर ओरखडे पडले होते. आतील गाभारा शांत पण दत्ताच्या प्रसन्न मुद्रेने न्हाऊन निघाला होता. त्याला एक घडीव दगड दिसला. त्यानं मनात विचार केला, 'हीच जागा बसण्यासाठी योग्य आहे' तो तिथं बसला. मनात विचाराचं चक्र फिरत होतं. मनातला हेतू सफल होतो की नाही याची चिंता त्याला सतावत होती. दीर्घ श्वास घेत त्यानं मनात निश्चय केला. काहीही होवो मनातला संकल्प पूर्ण करायचाच. आता मागे हटणे नाही. तो विचारात गर्क असतांनाच एक साधारण वीस पंचवीस वर्षाचा, अंगात रंगीत पण एकदम फिट्ट बसणारा शर्टवजा टी शर्ट घातलेला, खेळाडू घालतात तशी पॅन्ट घातलेला तरूण गावात नवीन आलेल्या पाहुण्याला न्याहाळत हळूहळू मंदिराच्या आवारात आला अन् बसलेल्या इसमाला पाहत तिथंच उभा राहिला. आता तो बसलेल्या इसमाच्या नजरेच्या टप्प्यात आला होता आणि पुढचा मागचा विचार न करताच बसलेल्या इसमास म्हणाला,

"काका, इथं काय करताय?"

"या मंदिराचा जीर्णोद्धार करावा म्हणतो. मी अरविंद करंबेळकर, सांगलीत असतो, तुला ओळखले नाही. "

खालून वरपर्यंत न्याहळत मान वर करुन विचारले,

"तू कोण? कोणाचा? "

"मी ऽमीऽ इंगळेचा थोरला मुलगा, अप्पा! "

"सुरेश इंगळेचा काय रे? अरे, तो तर माझा बालपणापासूनचा मित्र! "

"हां ऽऽत्यांचाच ऽ मुलगा.

"तुम्हाला कोणतीही मदत लागू दे. आम्ही करायला तयार आहोत. "

"बरं बरं..... "

क्षणात दोघांच्या गप्पा रंगात आल्या. बोलता बोलता काय काय करता येईल? याचा सर्वसाधारण आराखडाच तयार झाला. अप्पा आणि त्याचा भाऊ पप्पू व गणेश सर्वतोपरी मदत करायला तयार झाले. मनातील विचाराप्रमाणे होत असल्याचे पाहून अरविंदला मनोमन समाधान वाटले. जे होतंय ते दत्तच करतोय असा भास क्षणभर झाला आणि बालपणातले एक एक प्रसंग डोळ्यांपुढे नाचू लागले. याच मंदिरात लहानपण गेलं. कावडीने पाणी भरणे, शेती करत, घरच्यांना मदत करत करत निपाणीच्या देवचंद कॉलेजला जाणे. साऱ्या स्मृती भिंगरीसारख्या डोळ्यासमोर भिरभिरू लागल्या. क्षणभर आपण कोठे आहोत याचाच विसर झाला. नोकरीच्या चक्रव्यहातून बाहेर पडता आलं नाही याचं समाधान वाटू लागलं.

"काका "

आप्पाच्या हाकेने एकदम अरविंदजी भानावर आले.

"अरे, बस की "

असे म्हणताच आप्पा बसण्यासाठी दगड शोधू लागला. पण बसण्यासाठी मनासारखी जागा कोठेच नव्हती, याची जाणीव झाल्यावर आप्पा आपली मनातील खंत लपवत म्हणाला,

"नको नको मी उभाच राहतो. मला सवय हाय. "

असे म्हणत मंद हास्य करीत अरविंदजीशी गप्पात रंगून गेला.

मंदिरात मुर्ती कशी आली? कोणी आणली? इथेच त्याची का प्रतिष्ठापना केली? एकमुखी दत्तमूर्ती थोडी उजव्या बाजूस झुकली आहे. आणि आता नव्या स्वरूपात थोडी सुधारणा करण्याचा मानस आहे. गप्पागोष्टीत किती वेळ गेला हे कळालचं नाही.

"बरं आम्ही निघतो आता. थोड्याच दिवसात परत येईन. "

असे आश्वासन देत अरविंद दत्ताचं दर्शन घेण्यास मंदिरात जाऊन नतमस्तक झाले. बऱ्याच दिवसापासून कुलूप होते ते आज खुले झाले होते. मनातला संकल्प पूर्ण होत असल्याची आशा चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होती. आप्पानेही दर्शन घेतले. सहजच बकुळीच्या झाडावर नजर गेली.. पांढऱ्या शुभ्र फुलांनी झाड भरल्यासारखं दिसलं. झाडाच्या खाली फुलांचा सडा पडलाच होता. साऱ्या शुभ संकेतांचा साक्षात्कार झाला.

ते बोलत बोलत मंदिराच्या बाहेर आले. अन् त्याच वेळी दूरवर कोणीतरी लाउडस्पीकर लावला होता. त्यावर गाणं लागलं होतं.

'दत्त दर्शनला जायाचं जायाचं... आनंद पोटात माझ्या माईना... माईना... 'गाण्यानं सारेच एका जागी स्थितप्रज्ञ झाल्यासारखे उभे राहिले...

आपण केलेला संकल्प पूर्ण होणार असा विचार करतच अरविंद करंबेळकर निपाणीच्या वाटेने निघाले. सोबत अप्पा व इतर होतेच. त्याकाळात कोणाकडेच साध्या सायकलसारखं वाहनही उपलब्ध नव्हते. त्यामुळे चालतच निपाणीच्या बसस्टा ॅपपर्यंत जाण्याशिवाय पर्याय नव्हता. तेथूनच सांगलीसाठी एस टी धरावी लागे. शेवटी बस सांगलीच्या दिशेने मार्गक्रमण करु लागली. अशाच प्रकारे अरविंदसरांना मंदिराच्या कामासाठी चाळीसपेक्षा जास्त फे-या माराव्या लागल्या. यावरून दिसून येते की एखादा संकल्प पूर्ण करायचा असेल तर मनात इच्छाशक्ती किती प्रबळ असावी लागते. हीच प्रबळता मनातल्या आशा आकांक्षा सिध्दीस नेण्यास कारणीभूत होते. दत्तभक्ती आणि साधनेमुळे मिळणारा सात्विक आनंद याचे मोल करता येत नाही. एकदा का या आनंदाची अनुभूती झाली की आपले अवघड आयुष्य आनंदवन बनून जाते. याचा परिणाम असा होतो की, आयुष्यातील प्रत्येक गोष्टीत ही अनुभूती दिसून येते.... पहाटेचे धुक्यातील दवबिंदू विलक्षण आनंद देतात. बकुळीच्या सात्विक सुगंधाने मनातला मोर नाचू लागतो. दत्ताच्या गाभाऱ्यातील मंद वाऱ्याची झुळुक, बेधुंद करणारा दत्त नाम जप याच आनंदाच्या लाटेवर मन तरंगायला लागते. खऱ्या सुखाचेही असेच असते. आंतरिक सुखाच्या मार्गाने आयुष्य बदलून जाते. तसाच आत्मानुभव अरविंद सरांना अनेक वेळा आला. त्याचमुळे आजचे दत्त मंदिराचे सात्विक रूप सर्वांना पहायला मिळते.

इकडे अप्पा एक नविन विचार घेऊन घरी पोहचला. सर्व घडलेली हकिगत सर्वांना सांगताच वडिल म्हणाले,

"अरु आला होता. चांगला विचार त्यांनी मांडलाय. माझा लहानपणीचा दोस्त शिकला, मोठा झाला. त्याच्या कष्टाचं चिज झालं. शेवटी आपला गाव प्यारा असतोच. जन्मठिकाण माणसाला हाका मारत असतं हेच खरं."

आई मध्येच बोलती झाली,

"साफ सफाई होईल. पप्पू मारुतीची पूजा करायला गेला की मला भ्या वाटायचं. सारखी रुखरुख असायची. दाट झुडपात जनावरं असत्यात, पूजेच्या नादात असणाऱ्या पप्पूचं सगळीकडं थोडंच लक्ष असतंया. बाबा मारुतीराया रक्षण कर म्हणून मनात मी एकटीच बडबडायची.. आता सारा घोर मिटंल बघ, अरुभाऊजी लई हिकमती हायती. मनातलं पुरं करणार बघं, एकमुखी दत्त पावलाच म्हणायचा. त्यो कोकाटेचा पोरगा दत्ताची सेवा करायचा, आता त्योबी पुण्याला कामाला लागला. शेवटी बामणांचा देव. त्याची पूजा त्यांनाच धार्जीन"

मध्येच श्वेता (सूनबाई),

"बाम्हणाचा देव झाला म्हणून काय झालं? पप्पू भाऊजी पुजेची जबाबदारी घेतील की, त्यात काय? नाहीतर कोण येऊन करतील असं मला वाटतं नाही. "

"अगं तसं बोलू नये. "

"जे खरं हाय तेच मी बोलली, लोक दबल्या आवाजात हेच बोलत्यात म्हणून बोलले, बाकी काय वंगाळ इचार नाय माझ्या मनात "

"तरीबी असं बोलू नये" इतका वेळ गप्प बसलेला अप्पा बोलला,

"आपल्याला दत्ताची सेवा करायचीच आहे. मग इथंच सेवा केली तर काय बिघडतंय?"

"बरं बाबा, जे त्येच्या मनात हाय तेच होणार हे मात्र खरं " मध्येच आपल्या मनातील भाव व्यक्त करत सर्वानीच एकदिलाने सेवा करायचा संकल्प केला आणि तो तडीस नेण्यासाठी सर्वांनी एकमेकांना मदत करायची असे शेवटी ठरले.

गावातील वीस पंचवीस तरुणांच्या सहकार्याने जेसीबीच्या साह्याने मंदिराच्या परिसरातील सर्व झाडीझुडपे काढून साफसफाई केल्यावर सारेच रुप पालटले. मग मंदिराचे बांधकाम सुरु झाले. त्यात सर्व बांधकामावर देखरेख ठेवणे, पाणी मारणे, झाडलोट करणे, चहापाण्याची सोय करणे या सर्व कामात अप्पा, पप्पू व त्यांचे कुटुंबिय आणि त्यांच्यासोबत गणेशने केलेली सेवा याचे मोल करता येत नाही. सर्वांनी जीवाचे रान केले. प्रत्येक गुरूवारी भजन सुरु करुन गावच्या परिससरातील अनेक भजनी मंडळे व भक्त या अमलझरीच्या मंदिराशी जोडले गेले. दत्तोत्सव, दसरा, हनुमान जयंती, गणेशोत्सव असे कार्यक्रम होऊ लागले. यातही सर्वावर देखरेख व चहापाण्याची सोय करण्यासाठी अप्पासाहेब इंगळे, ( मो. 8884840163) पप्पू (विलास) व गणेश कदम (मो. 9620406280) आणि त्याचे कुटुंबीय प्रामाणिकपणे कोणत्याही पैशाची अथवा आर्थिक बाबीची लालसा केली नाही. त्यांच्या कार्याचे कौतुक करो अथवा ना करो.. त्यांनी अविरतपणे सेवा केली.

ग्रामपंचायतीच्या मदतीने पेविंग ब्लाॅक बसवले. मदवन्नाच्या मदतीने तुळशीकट्टा बसवण्यात आला, लाईटच्या माळा, स्पीकर, माईक, पाण्याची टाकी, संडास बाथरुमची सोय, पाण्यासाठी ग्रामपंचायतीने दिलेली सुविधा, अंथरण्यासाठी सतरंजी, छोटासा सोफासेट अशा अनेक सुविधा आलेने मंदिर परिसर फारच मनमोहक, आल्हादायक, आणि उल्हसित करणारा वाटू लागला. दिवसेनदिवस मंदिराचा चेहरा मोहरा बदलत गेला. मान्यवर मंडळी व निपाणीचे राजेसाहेब आवर्जुन दत्त उत्सवात उपस्थित राहून इथला सोहळा पाहून मनोमन नतमस्तक झाले.

म्हणतात ना,

**मै अकेला ही चला था**

**जानिब-ए-मंजिल मगर**

**लोग साथ आते गये**

**और कारवाँ बनता गया**

याचप्रमाणे एका मागून एक येत गेले आणि साऱ्यांच्या साह्याने भजन, कीर्तन, उत्सव, सकाळ - सायंकाळी पूजा, प्रार्थना याचा सोहळा अविरत चालवून वसा आणि वारसा नव्या पिढीच्या हाती हे शिलेदार सोपवत

आहेत. जीवन सुंदर आहे याची प्रचिती येथे येतेच आणि नकळत मनातील दु:खाची लकेरही पुसून जाते. मन हलकं होते. जगण्याची उमेद निर्माण होते.. वाढते.

आता येथे अनेक कार्यक्रम होतात. या मंदिराच्या सानिध्यात जे जे आले त्यांनी व्यसनमुक्तीची शपथ घेऊन आज ते आनंदाने जगत आहेत. असे तीनशेपेक्षा जास्त लोक व्यसनापासून अलिप्त राहिले. यात अरविंद करंबेळकर व कुटुंबीयांच्या मार्गदर्शनाचा मोलाचा वाटा आहे. हे नाकारता येत नाही.

एक मुद्दा येथे नमूद करावा वाटतो तो म्हणजे पप्पूची दत्त मंदिरातील सेवा. सुरवातीला कोणताही मंत्र माहित नसतांना फक्त 'दिगबंरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा' हा साधा नाममंत्र म्हणत. दत्त मूर्तीस अभिषेक घालणे, सकाळ संध्याकाळ पूजा करणे, फुलांच्या माळानी मूर्ती सजवणे या सर्व गोष्टी करतांना कधीच कुरकुर किंवा चेहऱ्यावर नकारात्मक भाव आणले नाहीत. घरातील, शेतातील कामे करत तो अविरत सेवा करतोय. त्याचे मोल करताच येत नाही. या कामात त्याची पत्नी, आप्पाची पत्नी, आई व वडील यांचेही मोलाचे सहकार्य मिळाले.

या दत्त देवदुतावरच मंदिराचा सारा भार आहे. हे सांगतांना अरविंद करंबेळकर सर (मो. 9403138975 ) व त्यांचे कुटुंबीय अभिमानाने त्यांचा उल्लेख करतात.

कोणीही उत्सवाप्रसंगी आला तर त्यांच्या चहापाण्याची सोय हीच मंडळी करतात. कधीच येथे वस्ती राहणारा जेवणासाठी हॉटेलात शोधत फिरतांना मी तर पाहिले नाही. घरचे जेवण, पनीरसारखे दही, चुलीवरच्या मस्त स्वादिष्ट भाकरी. जातांना डोळे भरून येतात. इतकी निष्ठा, पाहुणचार, आजच्या स्वार्थाने बरबटलेल्या जगातही दत्त भक्तीच्या अनुभूतीची आत्मस्वरुपाची भावना, या इंगळे कुटुंबीयात व गणेश कदम यांच्यात असल्याची प्रचिती येतेच. सर्वांशी गोडीने बोलणे, आदर करणे, शांतपणे समोरच्याचे बोलणे ऐकून घेणे, योग्य व सर्वासाठी लाभदायक सल्ला देणे. सेवा करतांना कोणतीही लाज, कमीपणा न बाळगणे अशा अनेक गुणांचा येथे उल्लेख केला तरीही शब्द कमी पडतात. तसेच दत्त उत्सवात आप्पाच्या आईच्या आवाजातील दत्त पाळणा ऐकणे हा भाग्याचा योग असतो. शिवाय कोल्हापूरच्या शाहू महाराजांनी केलेल्या सामाजिक सुधारणांची झलक येथे अनुभवास मिळतेच ते म्हणजे दत्ताची पूजा अर्चा करणारा आमचा विलास इंगळे म्हणजेच पप्पू हा सर्वसामान्याचे प्रतिनिधित्व करणारा.. ही बाब कौतुकास्पद असूनही आदर्शाचे मुर्तिमंत उदाहरण अरविंद करंबेळकर यांनी आणि त्यांच्या कुटुंबानी समाजापुढे ठेवले आहे. हा वसा इतर समाजातील लोकांसाठी मार्गदर्शक वसाच दिला आहे. हा वसा आपण घ्यायला हवा आणि हा योग माझ्या जीवनात मी अनुभवलाही. सदैव आंतरिक सुखाचा व आनंदाचा मार्ग याच्या चरित्रातून प्रत्येकाने घ्यावा असाच आहे. आणि जीवनानंद शोधण्याचा आपणास मार्ग दाखवला आणि म्हणूनच आपण याबद्दल त्यांचे ऋणी असले पाहिजे.

या परिसरात पाऊल ठेवताच उत्साहवर्धक वातावरण असल्याचे सहज लक्षात येतेच, हवेत उत्साह, ऊर्जा भरलेली आहे. मंद केशरी ज्योतीचा प्रकाश दत्त मंदिरात व हनुमंत मंदिरात असीम शांततेची भावना निर्माण होऊन, मन सौम्य, हळुवार, उबदारपणाची जाणिव आपण अनुभवत आहोत. हृदयाचा गाभारा अलौकिक प्रकाशात न्हाऊन निघतो आहे. शरीर, मन, अंत:करण तेजोमय होऊन उजळून निघते, मलिनता, नकारात्मकता, निराशा

लख्ख धुवून निघतात. हीच प्रेरणा या एकमुखी दत्त मंदिराच्या परिसरातून घेऊया. आपण प्रकाशित होऊन इतरांचे जीवन उज्वल करत सर्वांचे भवितव्य प्रकाशित करुया. सर्वांचे जीवन निरामय होऊन त्यांना ईश्वराचे दर्शन घडो हीच मंगल कामना.

ज्या पायांवर डोके टेकवावे असे पाय, हे देखील समाजाची गरज असते. ते पाय एकमुखी दत्त महाराजाचे आहेत. म्हणूनच दत्ताच्या कमलचरणाच्या स्पर्शाने सात्विकता आपल्यात येते. एकवीस गुरूंकडून मिळालेले औदार्य दत्तगुरू भक्तासाठी, मुक्त हस्ताने, आशिर्वादरुपी प्रसाद देत असतातच. याच दत्त मंदिरासमोरचे बकुळीचे झाड आजही फुलांनी गच्च बहरलयं. त्याचा सुगंध हृदयाच्या गाभाऱ्यापर्यंत जाऊन पोहचलाय. तो दरवळ सुखद, उल्हास अनुभूतीने भरून गेलाय. परिसरातील फुलांचा ताटवा प्रत्येकाच्या स्वागतासाठी, मंदिराच्या प्रवेश दारात अंथरलाय. येताना मन या गंधामुळे भरून जात जात आपले पाय भक्तीच्या परिमळाने पुनीत होऊन दत्त चरणकमलाशी जाईपर्यंत आपण स्वतः बकुळ होऊन जातो आणि दर्शनाच्या पवित्र वरदहस्ताने पावन होऊन बाहेर येतांना दत्तमयच होतो. त्यानेच आपले जीवन सुखसमृद्धीने भरून जाते. ह्याच अनुभव प्रत्येकजण घेतोय. या दत्त शिलेदाराप्रमाणे आपणही बकुळ होऊन प्रत्येकाला सुगंधी करुया. या शिलेदाराचे स्मित हास्य बकुळ फुलांच्याप्रमाणे आपल्या जीवनाला वेगळेच परिणाम देऊन जातात. हे अनोखे, अद्भूत कवच मनाला प्रसन्न करुन, इंद्रधनुषी रंगात न्हाऊन सोडतात. हेच खरे. चला तर आपणही बकुळ होऊ या. मग येताय ना अमलझरीला बकुळ व्हायला. येथे जाण्यासाठी निपाणी येथील प्रसिद्ध दस्तगीर साहेब दर्गा येथून पूर्व दिशेला अवघ्या दोन कि. मी. अंतरावर अलमझरी गाव असून येथून रिक्षाने जाता येते. तसेच निपाणी एस. टी. स्टँड पासूनही सहज रिक्षा मिळेल.

**श्री मुबारक उमराणी**, राजर्षी शाहू कॉलोनी, शामरावनगर, सांगली, मो.९७६६०८१०९७.



## 41. लेख - शरदागमनी काव्यदीपोत्सव - सौ. रेणुका धनंजय मार्डीकर



**तारांगणात वीण रुपेरी शरद माळतो न्यारी**

**चमचमणारी दिव्य दिवाळी वसुंधरा जरतारी**

निसर्गाचे शांत सुंदर आणि रमणीय रूप घेऊन येणारा शरद ऋतू म्हणजे जणू काही आनंदाची पर्वणीच. शरद ऋतुतील स्वाती नक्षत्रात जो पाऊस पडतो त्याचे थेंब सागरातील शिंपल्यात पडतात आणि त्याचे मोती तयार होतात तसेच चांदणमोती आकाशात तयार करणारा हा मनमोही शरद ऋतू.

शरदात येणारे शारदीय नवरात्र आणि कोजागरी पौर्णिमा हे मनाला प्रसन्न करणारे दोन उत्सव. एक म्हणजे महिषासुरमर्दिनी आंबाबाईचा जागर करणारा नवरात्र उत्सव. दीपोत्सवाच्या आधी आकाशात नयनरम्य असे तारापुंज येऊ लागतात आणि हे नभांगण अगदी तेजोमय दिसू लागते. तासं तास या टिम टिम करणाऱ्या तारकांकडे पाहतच राहावेसे वाटते.

आणि या मनमोही चांदण्याकडे पाहताना माझ्या कवी मनाला काही सूचणार नाही असे होणारच नाही...

**शरदाची चमचम चांदणं रात**

**चांदवा आला बघ आला भरात**

**चांदण्या चमकून घालतील साद**

**रासलीला रंगली आज गगनात**

कोजागिरीचा तो पूर्ण चंद्र आणि अवतीभवती नाचणाऱ्या चांदण्या जणू काही वृंदावनात रासलीला खेळणाऱ्या कृष्ण गोपींसारख्या भासतात. कोजागिरीच्या दुधामध्ये चंद्राचे किरणं पडल्यानंतर ते औषधी दुधाचे चषक पिताना मिळणारा एक विलोभनीय आनंद जो शब्दात व्यक्त करताना सुद्धा मर्यादा पडाव्या इतका सुंदर असा तो परमानंद हा शरद ऋतू आपल्याला देतो.

वरूणराजाने विश्रांती घेतल्यामुळे पाण्यामध्ये जमलेल्या धुली कणांना शिथिल व्हायला वेळ मिळतो आणि तलाव विहिरी अगदी नितळ पाण्यांनी भरून जातात. स्वच्छ आणि शांत असे जल पाहून मनाला एक वेगळीच शांतता मिळते. निसर्गाने देखील थोडासा आळस दाखवत जणूकाही कुस बदलायला सुरुवात केलेली असते. शरद ऋतुला दुसरा वसंत म्हटले जाते कारण या ऋतूमध्ये प्रत्येक झाडाखाली पानांचे सडे पडलेले दिसतात. झाडावर उगवणारी कोवळी पालवी आणि त्या पालवीचे स्वागत करत अगदी स्वछेने जुनी पाने गळू लागतात आणि गळताना देखील त्याच्यावर आलेला रंगबहार मनाला मोह घातल्याशिवाय राहत नाही. पिवळी, लाल, केशरी रंग झालेली ही गाभूळलेली पाने जेव्हा विश्रांतीसाठी झाडाच्या खाली उतरतात तेव्हा जणू काही नवीन फुटणाऱ्या पल्लवाचे स्वागत करण्यासाठी झाडाखाली ही पानं पायघड्या घालत आहेत असा

भास होतो. शेवट सुद्धा किती गोड असावा हे सांगणारी पाने म्हणजे जणू काही स्वेच्छेने निवृत्त होणारे वार्धक्यच भासते. निवृत्तीचा उत्सव करणारी ही पान पाहून माणसाला कितीतरी शिकता येईल नाही का यांच्याकडून!

नवरात्रीमध्ये येणाऱ्या भगवतीच्या उत्सवाला चार चांद लावतो तो झेंडू.

शरदात झेंडूची फुले अगदी टवटवीत उमलतात. देवीच्या घटमाळेला झेंडूच्या फुलांची माळ आवर्जून वाहिली जाते. किती गोड दिसतात ही झेंडूची फुलं. लाल पिवळ्या फुलांचे बाजारात देखील मोठमोठे ढीग पाहायला मिळतात. ही मखमल म्हणजे देवीची आवडती. अगदी माळरानावर देखील उत्साहाने फुलणारा हा झेंडू.

**कधी कधी वाटतं झेंडू सारखं असावं**

**असंख्य पाकळ्यांना घेऊन अगदी टवटवीत दिसावं**

**कधी सोनपिवळा कधी केशर गोंडा**

**आंब्याच्या पानाशेजारी शोभा तोरणाला**

**दसरा दिवाळीत किती मान याला**

**याच्या आगमनाने प्रसन्न परिसर झाला**

शरद ऋतू म्हणजे उत्सवाचा ऋतू. ग्रामीण भागात अनेक ठिकाणी देवींची मंदिरे असतात आणि तिथे या ऋतूमध्ये नवरात्रीनंतर कोजागिरी पौर्णिमेला यात्रा भरतात. यात्रेला बैलगाडीत बसून जाण्याची मजा काही औरच त्यात नवीन लग्न झालेलं जोडपं असेल तर त्यांची प्रणयराधना या बैलगाडीत बसल्यावर नक्कीच शिगेला पोहोचलेली असते.

**कोजागिरी सजली नभांगणात**

**चांदणं ओघळलं रानावनात**

**सजणी लाजली हळूच मनात**

**सजणाचा घेऊन हातात हात**

**बैलगाडी चालली अहा झोकात**

**चंगाळ्या वाजती बैलांच्या गळ्यात**

खरंतर शरद ऋतू हा तीनही ऋतूंचे आपणाला दर्शन घडवतो कारण शरदात थंडी देखील असते ऊनही तितकेच कडकडीत असते आणि अचानक मग स्वाती नक्षत्रातला पाऊसही रिमझिमतो म्हणजेच तिन्ही ऋतू हा शरद आपल्याला दाखवतो.

शरदाची रात्र देखील तितकीच लोभसवाणी. दिवस लहान आणि रात्र मोठी. शरदाची रात्र अगदी देखणी तारांगणात चमचमणारं चांदणं, निरव शांतता, निरभ्र आकाश आणि वातावरणात पसरलेला रातराणीचा, कुंदांचा

सुवास, जाई जुईचा सुगंध अगदी मन धुंद करून टाकतो. अशावेळी मला माझीच एखादी कविता आठवून जाते.

**चांदण्यांचा नजराणा आला पहा अंगणात**

**नभंगण तेजाळले माझे मन न्हाले त्यात**

**प्राजक्ताची कळी खुले रातराणी बहरात**

**परसात ओघळले चांदणे पाना फुलात**

शरद ऋतूतला सागर किनारा देखील तितकाच प्रसन्न. चांदण्याचं प्रतिबिंब लाटांवर पडल्यामुळे त्या लाटा देखील चंदेरी भासतात. सागराच्या किनाऱ्यावरची अथांग पसरलेली पुळणी आणि त्यावर अलवार येणारी विहंगम लाट आणि या रम्य वातावरणात प्रेमीयुगुल या चांदण्याचा आनंद घेताना हा नयनरम्य निसर्ग या गोड प्रीतीच्या क्षणाला कवेत घेतो आहे असेच जणू काही वाटते.

**शरद ऋतुचा चंद्र भासतो मजला प्रीतीचा स्वामी**

**सागर लाटांवरती त्याचे नर्तन बघ आरस्पानी**

**दर्याच्या त्या लाटेसंगे प्रणय पाखरे गाताना**

**प्रीतीच्या त्या धुंद क्षणाला हळूच कवेत घेताना**

अशा या शरदाच्या धुंद चांदण्यात तृप्त होणाऱ्या चकोराला सुद्धा गाता यावे.कालिदासांनी त्यांच्या ऋतुसंहार मध्ये शरद ऋतूतील रात्रींना ज्योतिष्मती रात्री असे म्हटले आहे.कालिदासांनी शरद ऋतुचे आगमन एका सुंदर स्त्रीच्या रूपात दाखवले आहे. त्यांनी शरद ऋतूतील निसर्गातील घटक जसे की निर्मळ नद्या,चकाकणारे मासे, पांढरे हंस आणि रुंद वालुकामय किनारे यांचे वर्णन केले आहे जे एका स्त्रीच्या शरीराच्या विविध अवयवांशी साधर्म्य साधतात. जलाशयातील जल मधुर होत असल्याने त्याच्याजवळ चक्रवाक, सारस, क्रौंच आणि जलचर पक्षी विहार करीत असतात. वर्षा ऋतूत उगवलेले हिरवेगार गवत शरद ऋतुत बराच काळ तसेच राहते. पक्व झालेल्या साळीच्या पिकाचे रान, शांत भावाने बसलेल्या गाई आणि सारस पक्षाचे दर्शन या सर्वामुळे मनात प्रसन्नता लाभते. निर्मल जल, जमीन चिखल रहित टणक आणि तारांगणाने युक्त दिव्य आकाश असलेल्या या शरदाच्या विलोभनीय दृश्यामध्ये मन सुखावल्याशिवाय राहत नाही.

**येता ऋतू गंध खास, फुले येती बहरास**

**पाय माझे तिथे घुटमळती**

**शरदाच्या चांदण्यात, गंध भरली पहाट**

**गगनजाई रूपवती**

शरद ऋतूमध्ये बहर बहरणारी आणखी एक फुलवंती जिला मी लहानपणापासून पाहत आले ती म्हणजे बकावलीची फुले. त्याला अनेक नावे आहेत बुचाची फुले, गगन जाई, रातीची चांदणी, पाटलीनबाई, गगनमल्लीगे, धवलचंद्रिका, आकाशमोगरा, आकाशनीम. उंच उंच असलेली ही झाडे आकाशात जशी चांदणी पसरलेले असते

तशा या चांदण टिकल्या पूर्ण झाडावर पसरलेल्या दिसतात. वाऱ्याच्या लकेरीबरोबर भिरभिरत खाली येणारी ही फुलं पाहिली की जणू काही आकाशातून सुगंधी चांदणच खाली ओघळतं आहे असा भास होतो.

शरदातलं हे निसर्ग चांदणं भरात येतं तोच दीपावलीची चाहूल लागते आणि मग पाहता पाहता जणू काही आकाशातलं चांदणं प्रत्येक घराघरासमोर आकाशदिव्यांच्या रूपाने, पणत्यांच्या रुपाने विराजमान होतं. किती सुरेख संस्कृती आहे पहा आपली दीपावलीची मौज मजा करण्याच्या आधी ती आपल्याला कृतज्ञता शिकवते. आधी असते वसुबारस. गाय आणि तिचा बछडा याची पूजा केली जाते. असं म्हणतात जगातील सर्व देवांचा वास जिच्यामध्ये असतो ती गोमाता. तिची पूजा करून, तिला गोड घास भरवून मगच आपली दिवाळी सुरू होते. माझ्या मळ्यात पंधरा गोमाता आहेत.

**माझ्या मळ्यातली दुधी**

**काय गुण तिचे वर्णू**

**वसुबारसेला सारे**

**ओवाळून गाणी म्हणू**

गोमातेच्या पूजेनंतर येणारी धनत्रयोदशी सर्वांना धनधान्य देणारा आरोग्य देणारा धन्वंतरी त्याची पूजा करण्याचा दिवस आणि हो प्रत्येक घरातील गृहिणी ही घरात असते म्हणून त्या घरात दिवाळी होते अशा गृहिणीच्या पहिल्या स्नानाचा दिवस अभ्यंग स्नानाचा दिवस. पहाटेच्या थंडीमध्ये सर्वांगाला कोमट सुगंधी तेलाचे लेपन करून आणि उटणे लावून थंडीमुळे कोरड्या झालेल्या त्वचेला स्निग्धतेचा अंश देण्यासाठी खास केलेले हे स्नान म्हणजे अभ्यंग स्नान.

**शरदाची चमके चांदणी दारात**

**दिवाळी आली हासत घरात**

दिवाळीचे पाचही दिवस गाईच्या शेणाने दारात गवळणी घातल्या जातात फार जुनी परंपरा आहे ही सारवलेल्या अंगणात घातलेल्या ह्या गवळणी आणि त्याच्याभोवती काढलेली सुरेख रांगोळी. गवळणीला रोज नैवेद्य दाखवला जातो. पाडव्यादिवशी शेणाचे केलेले पांडव पुढे वाळवून ठेवले जातात आणि त्याच्यावरच नंतर येणाऱ्या वेळामावस्येला शेतात दूध उतू घातले जाते. दूध ज्या दिशेला उतू जाईल त्या दिशेला भरभरून पिकणार ही शेतकऱ्याची भावना असते. नरकासुराचा वध करून श्रीकृष्णाने लक्ष्मीला मुक्त केले म्हणून लक्ष्मीपूजन केले जाते. बलिप्रतिपदा ही शेतकऱ्याच्या विश्रांतीचा दिवस म्हणून साजरी केली जाते आणि बळी नावाचा राजाला विष्णूने वामन अवतार घेऊन पाताळात गाढले तो हा दिवस. पत्नीने पतीला ओवाळण्याचा देखील हा पाडवा असतो. दीपावलीचा शेवट होतो तो यमद्वितीयेने म्हणजेच भाऊबीजेने. भावा बहिणीची नात्याची विण घट्ट करणारी ही भाऊबीज. बघा प्रत्येक सणाला महत्त्व आहे. प्रत्येक नात्याला महत्त्व आहे. मग ते आई मुलाचे असो पती-पत्नीचे असो भाऊ बहिणीची असो. ही सगळी नाती मिळून एकत्र येऊन जो उत्सव साजरा केला जातो त्याला दीपोत्सव असे म्हणतात. आकाशातले लख्ख चांदणे आणि घरोघरी लागलेल्या आकाशदीप, पणत्यांचा लखलखाट, फटाक्यांची आतषबाजी, फराळाची रेलचेल, नव्या वस्त्राचा आनंद

आणि या आनंदाची देवाणघेवाण म्हणजेच दीपावली. माणूस आणि दिवाळी यांचा आपापसात संबंध आहे बघा फराळात होणारी पदार्थ देखील माणसाच्या स्वभावाशी मिळते जुळते असतात उदाहरणच घ्यायचं झालं तर माणूस आणि दिवाळी या माझ्या कवितेतील चार ओळी

**दिवाळीच्या जल्लोषाची लज्जतच न्यारी बाई**

**माणसाच्या स्वभावात रुजलेला ठाई ठाई**

**फटाक्यांची माळ कधी माणसांची फडफडे**

**फुलबाजी कुणी हौशी चमचम तडतडे**

**आकाशाचे दीप होती घरातले बाप आई**

**माणसाच्या स्वभावात रुजलेला ठाई ठाई**

वास्तुशास्त्रानुसारही घरात दिवा लावण्याला विशेष महत्त्व आहे त्यामुळे वास्तुदोष दूर होतो. अज्ञानरुपी तिमिराचा नाश करणारा हा दिवा आणि या दिव्यांची माळ म्हणजेच दीपावली. दीपावलीत दिवे मग ते अनेक प्रकारचे लावले जातात उदाहरणार्थ पणती, समई, निरांजन, नंदादीप, आरती,दीपमाळ, कंदील मशाल, आकाश दिवा इत्यादी अनेक रुपात.

**दिवा पाहुनी लक्ष्मी येते करू तिची प्रार्थना**

**शुभंकरोती म्हणा मुलांनो शुभंकरोती म्हणा**

तमाचा नाश करून जगाला प्रकाशमान करणाऱ्या दीपपूजनाचा उत्सव म्हणजेच दीपोत्सव अर्थातच दीपावली.

शरद ऋतुच्या टिपूर चांदण्यात जणू काही निसर्गाने लावलेल्या नैसर्गिक दिव्यांची माला तारांगणात चमकत असतानाच मानवनिर्मित दिव्यांची आरास वसुंधरेवर सजते.

जणू काही शरदाने दिलेल्या प्रसन्न वातावरणाचे स्वागत करण्यासाठी माणसाने जल्लोषपूर्ण वातावरणात तेजोमय केलेला हा उत्सव असतो.

**शरदचांदणे मनात भरले**

**झरझर धरतणीवर अवतरले**

**दिप होऊनी क्षणात त्याने**

**तम सारे निमिषातच हरले**

**सौ. रेणुका धनंजय मार्डीकर, औसा मो. 8855917918**

## 42. कविता - कल्पना – श्री अनिल वामोरकर



आधार शब्दांचा लागे
माझिया कल्पनेस
वाहे शब्दांची सरिता
स्मरता सदगुरूस...

शोधीत होता
आत्मा अविनाशी,
कामना अधु-या
पूर्ण करण्या शरीरासी...

हुश्श.. मिळाले
शरीर एक रहाण्या
जे मिळाले, वाटे
कोंदट रुचेना...

वाटे बंदीस्त तया
हे शरीर बंदीशाळा
कुतरओढ होई
उगा हव्यास केला..

वाटे जावे परतून
आलो जेथून परत
सदगुरु लाभता
पूर्ण होईल मनोरथ..

लाभले सदगुरु
होते संचित म्हणोनी
होईन मुक्त आता
शाश्वत सुख लाभेल गगनी..

श्री अनिल वामोरकर अमरावती मो ९९२३५१४३९०



## 43. कविता - आदिशक्ती — श्रीमती अनिता जयंत खाडीलकर

(वर्णभेद - १४, प्रत्येक ओळीत - १४ अक्षरे आहेत.)

हे आदिमाया आदिशक्ती तेजस्विनी तू
भक्तरक्षणा संकटी धावून तू येशी ।।ध्रु. ।।

नवरात्री नवरुपे घेऊन तू येशी
भक्तांच्या हाकेला धावून येशी
साडेतीन पिठी वसूनी जागृत होशी
भक्तरक्षणा संकटी धावून तू येशी ।।१।।

कधी शांत, कधी सात्विक, कधी सोज्ज्वळ
कधी राजस, कधी रौद्र, कधी तेजाळ
ऐशी विविध रुपे ही धारण करिशी
भक्तरक्षणा संकटी धावून तू येशी ।।२।।

महिषासुर राक्षसा मर्दण्या तू येशी
चंडमुंड तेही अवघे तूच मारिशी
अंबाबाई कोल्हापुरी निवास करीशी
भक्तरक्षणा संकटी धावून तू येशी ।।३।।

रेणुका परशुराम देवा जन्म तू देशी
कैलासीच्या शंभोची पार्वती तू ग होशी
सप्तशृंगी होऊन वणी गावी वसशी
भक्तरक्षणा संकटी धावून तू येशी ।।४।।

**श्रीमती अनिता जयंत खाडीलकर**, सह्याद्री अपार्टमेंट, खाडीलकर गल्ली, बालगंधर्व नाट्यमंदिर समोर, ब्राह्मणपुरी, मिरज,जि. सांगली, मो 9689896341

## 44. कथा – आठवणींच्या हिंदोळ्यावर... – श्री उद्धव भयवाळ



आज सुरेशच्या आईचा पंचविसावा स्मृतिदिन. कालच त्याच्या पत्नीने म्हणजेच ताराने आणि त्याने ठरवले होते की, या वेळेस आईचा स्मृतिदिन वेगळ्या पद्धतीने साजरा करायचा. आईचे वर्षश्राद्ध म्हणून नेहमीप्रमाणे चार नातेवाईकांना घरी बोलावून जेवू घालण्यापेक्षा आईच्या स्मृतीप्रित्यर्थ शहरात असलेल्या 'सावली' वृद्धाश्रमात असलेल्या जवळजवळ शंभर वृद्ध स्त्री पुरुषांना आज दुपारी मिष्टान्न भोजन द्यायचे. त्यानुसार एक आठवड्यापूर्वीच तारासोबत वृद्धाश्रमात जाऊन त्याने सर्व विचारपूस केली होती.

आणि आज सगळे ठरल्याप्रमाणे व्यवस्थित पार पडले. सुरेश आणि तारासोबत एकत्र बसून मिष्टान्न भोजन करतांना वृद्धाश्रमातील स्त्री पुरुषांच्या चेहऱ्यावर झळकणारे समाधान पाहून सुरेशला आणि ताराला खूप आनंद झाला. बराच वेळ तिथल्या ज्येष्ठांसोबत गप्पागोष्टी केल्यानंतर प्रत्येकाच्या पाया पडून दोघांनी त्यांचा निरोप घेतला. थोड्या वेळापूर्वीच दोघेही घरी आले. दोघांच्याही चेहऱ्यावर आज एक वेगळेच समाधान होते. थोड्या वेळानंतर वामकुक्षी घेण्यासाठी तारा बेडरूममध्ये गेली आणि सुरेश हॉलमध्ये टेबलावर ठेवलेल्या आईच्या फोटोकडे बघत विचारात गढून गेला. पंचवीस वर्षांपूर्वी आई देवाघरी गेली, तो दिवस आजही सुरेशला जसाच्या तसा आठवत होता. आई गेली तो दिवस एखाद्या चित्रपटासारखा त्याच्या डोळ्यांसमोरून पुढे पुढे सरकू लागला...

*****

सुरेश झपझप चालला होता. एका हातात पिशवी आणि दुसऱ्या हातात वर्तमानपत्राची गुंडाळी धरून तो पाय उचलत होता. संध्याकाळची वेळ होती. थोड्याच वेळेनंतर अंधार पडणार होता. पाखरे चिवचिवाट करीत आपल्या घरट्याकडे परतत होती. आजूबाजूला हिरवीगार राने पसरली होती. मधून मधून पाटाच्या पाण्याचा खळखळ असा आवाज ऐकू येत होता. गायी गुरं घराकडं परतत होती. सारं वातावरण उल्हासी होतं. पण सुरेशच्या मनाचं पाखरू बेचैन होऊन सैरभैर धावत होतं. सुरेशच्या बेचैनीचं कारण म्हणजे त्याच्या खिशातून वर डोकावणारं पत्र.

आजच त्याला हे पत्र मिळालं होतं. त्यानं ते पत्र वाचलं आणि त्याच्या हातापायांमधलं बळच गेलं. त्याची आई आजारी पडली होती. तिची प्रकृती फारच खालावली होती. सुरेशला लवकर येण्याबाबत त्या पत्रात लिहिलेलं होतं. त्याने मुख्याध्यापकांकडे चार दिवसांच्या रजेचा अर्ज दिला आणि त्यांच्या परवानगीने तो जरा लवकरच शाळेच्या बाहेर पडला होता. आपण आपल्या गावाकडं – पारगावकडं - केव्हा निघतो असं त्याला झालं होतं.

सुरेश ज्या गावी शिक्षक होता ते गाव – अनंतपूर, पारगावापासून जवळजवळ चाळीस किलोमीटर अंतरावर होते. सुरेश अनंतपूरलाच राहायचा. महिन्यातून एकदा पारगावला यायचा. अनंतपूर ते काजळगाव बसने आणि काजळगाव ते पारगाव पायी असा त्याचा नेहमीचा प्रवास असे.

पारगाव हे छोटेसे खेडे होते. तिथे बसची किंवा इतर वाहनांची सोय नसल्यामुळे सहा सात किलोमीटरचे अंतर पायीच तोडावे लागत असे.

सुरेश चालतच होता. आता अंधार पडू लागला होता. सुरेश भरभर चालू लागला. आपण किती अंतर चालून आलो आणि आणखी किती अंतर चालायचे बाकी आहे याचे त्याला भान नव्हते. तो चालतच होता. चालतांना त्याच्या मनाची चलबिचल वाढतच होती. आईची प्रकृती कशी असेल? आई सारखी सारखी माझी आठवण करीत असेल. आईला माझ्याशिवाय दुसरे कोण आहे या जगात? नाही म्हणायला एकटी तारा मात्र आहे. "तारा! ..... " सुरेश मनाशीच पुटपुटला. तशी ताराची हसरी मूर्ती त्याच्या डोळ्यांसमोर उभी राहिली. गत आयुष्याचा चित्रपट त्याच्यासमोर साकार झाला.

सुरेश पारगावच्या शाळेत शिकत असतांना सुरेशच्या आईची उमा नावाची एक बालमैत्रीण योगायोगाने तिला पारगावात भेटली. तिच्यासोबत तारा नावाची सुरेशपेक्षा चार पाच वर्षांनी लहान असलेली तिची मुलगी होती.

पुढे ताराची आई खूप आजारी पडली. सुरेशच्या आईने आपल्या परीने तिला अनेक औषधोपचार केले. पण उपयोग झाला नाही. ती शेवटच्या घटका मोजीत असतांना तिने ताराचा हात सुरेशच्या आईच्या हातात दिला आणि म्हणाली. "माझ्या लेकीला अंतर देऊ नकोस. तुझ्या कुटुंबातील एक व्यक्ती समजून तिचा सांभाळ कर."

तेव्हापासून तारा सुरेशच्या घरी राहू लागली. पाच सहा वर्षांची तारा आणि नऊ दहा वर्षांचा सुरेश यांची चांगली मैत्री झाली.

त्यावेळी सुरेशच्या घरची परिस्थिती चांगली होती. सुरेशचे वडील सधन शेतकरी होते. पण पुढे सुरेशचे वडील वारले आणि परिस्थिती बदलली. कर्जापायी शेतजमीन विकावी लागली. नाममात्र पाच सहा एकर शेत राहिले. उदरनिर्वाहासाठी सुरेशला शिक्षकी पेशा स्वीकारावा लागला. आर्थिक स्थिती बिकट असूनही सुरेशच्या आईने ताराला अंतर दिले नाही. काळ पुढे पुढे सरकत होता. तारा मोठी होत होती. सुरेश कुठे गावाला गेला तर तारा त्याची वाट पहायची. तो घरी येईपर्यंत ती जेवायचीदेखील नाही. नकळत तिच्या मनात सुरेशविषयी प्रेम निर्माण झाले होते. पण तिने ते कधी व्यक्त केले नाही. ती मूकपणे वागे. जास्त बोलत नसे. बोलण्याचा तिला छंदच नव्हता. घरकामात ती सुरेशच्या आईला मदत करी. तिच्या वागण्यातील तारुण्यसुलभ अशा बदलाची सुरेशला चाहूल लागली. त्याच्याविषयी तिला वाटणारी ओढ त्याला जाणवू लागली. पण तोही स्तब्धच राहिला. आपल्या नोकरीच्या गावीच आईने आणि ताराने राहावे असे त्याला वाटे. परंतु उरलेल्या थोड्या शेतीचे निमित्त करून आई पारगाव सोडायला तयार नव्हती...

विचारांच्या तंद्रीत सुरेश चालला होता. ताराच्या विचाराने तो क्षणभर आईचा आजार विसरला होता. त्याच्या आजूबाजूला पसरलेला अंधार विसरला होता. सारं काही विसरला होता. त्या विचारातून तो बाहेर आला. पारगाव जवळ आल्याचे त्याला जाणवले. आता दिवेलागण झाली होती. काही मंडळी मारुती मंदिराच्या पारावर गप्पा मारीत बसली होती. गावाच्या सुरुवातीच्या झोपडपट्टीच्या अरुंद रस्त्यावरून सुरेश चालला होता. आजूबाजूच्या अंगणातून स्वयंपाक करणाऱ्या बाया दिसत होत्या. भाकरी थापण्याचा थपथप असा आवाज कानावर पडत होता. गायी म्हशींच्या धारा काढल्या जात होत्या. दुधाचा सळसळ असा चमत्कारिक आवाज होत होता. कुठे एखादे लहान मूल रडत होते तर एखाद्या शेंबड्या पोराच्या पाठीत त्याच्या कातावलेल्या आईच्या हातचा धपाटा बसत होता. एव्हाना सुरेश घराजवळ येऊन पोचला होता. आजारी आईच्या विचाराने त्याचे हृदय धडधड करीत होते. घराचं कवाड लोटलेलं होतं. त्याने हाताने दरवाजा आत ढकलला. अंथरुणावर आई कण्हत होती. दोन तीन शेजारणी जवळ बसल्या होत्या. ताराही तिथेच होती. ती आईचे पाय चेपीत होती. सुरेशला पाहताच तारा उठली. तिने हातपाय धुण्यासाठी सुरेशला पाणी दिले. पाय धुवून झाल्यावर सुरेशने ताराला विचारले, "कशी आहे आईची प्रकृती? काही औषध वगैरे दिलंय का? "

"आता जरा ताप कमी आहे. मघाशी फार होता. तो लोहार गल्लीतला रामा वैदू आहे ना? त्याचं औषध दिलंय." तारा म्हणाली.

सुरेश आईच्या जवळ जाऊन बसला. त्याने आईचा हात हातात घेतला. आईची प्रकृती पाहून त्याचे डोळे पाणावले. मोठ्या प्रयासाने आपले अश्रू आवरून तो म्हणाला, " आई! "

आईचा आवाज खोल गेला होता. खोल आवाजात ती एकच शब्द बोलली, " सुरेश! "

"होय आई. आता मी आलो ना. काही काळजी करू नकोस. उद्या मी तुला तालुक्याच्या गावी घेऊन जाईन. तिथे चांगल्या डॉक्टरला तुझी तब्येत दाखवू. मग तू लवकर बरी होशील. "

खोल आवाजात आई बोलू लागली. " सुरेश मला आता कुठे जायचे नाही. सरळ तुझ्या बाबांकडे जायचे आहे. ते वाट बघत असतील माझी. " एवढे बोलतांना आईला दम लागला. तिला श्वास घ्यायला त्रास होऊ लागला.

"आई तुला त्रास होतोय. जास्त बोलू नकोस. " सुरेश म्हणाला.

"बाळ सुरेश, आता मी थो.... ड्या वे... ळ... ची सो... ब... ती आ... हे. " इतके बोलून ती स्तब्ध झाली.

सुरेशने शेजारच्या मुलाकरवी ताबडतोब रामा वैद्याला बोलावले. त्याने कसलेसे चाटण सुरेशच्या आईला चाटविले. ती पुन्हा बोलू लागली. "सुरेश, जाते रे मी. तारा कुठे आहे? तारा बेटी अशी इकडे ये. तुझा हात दे पाहू माझ्या हातात. सुरेश बाळ, तुझा हात कुठेय? हं असा इकडे दे. सुरेश आजपर्यंत ताराला मी सांभाळले. आता तिला तूच आहेस. ती चांगली आहे. तुमचा जोडा लक्ष्मीनारायणाप्रमाणे शोभेल रे. जाते मी आता... खुशाल रहा... "

आईने इहलोक सोडला. ताराचा हात सुरेशच्या हातात देऊन तिने इहलोक सोडला. तारा आणि सुरेश यांचे हृद्गत पूर्ण करून तिने इहलोक सोडला. तारा, सुरेश, रामा वैद्य आणि काही शेजारणी जवळच होत्या. ताराने हंबरडा फोडला. तिला शेजारच्या स्त्रिया धीर देऊ लागल्या. सुरेश रडू लागला. त्याला वैद्यबुवा धीर देऊ लागले. शेजारच्या आया-बायांनी डोळ्याला पदर लावला.

कुठूनशी वाऱ्याची झुळूक आली आणि तिने कोनाड्यातील दिवा विझवला. सगळ्या घरात अंधार पसरला. ऐकू येत होते फक्त रडण्याचे सूर.

बाकी सर्व अंधार होता. अंधार!!

*****

"सुरेश, चहा टाकायचा ना?" ताराच्या आवाजाने सुरेश भानावर आला.

"हो, हो, टाक ना. " असे म्हणून सुरेशने भिंतीवरच्या घड्याळाकडे पाहिले. सायंकाळचे पाच वाजून गेले होते. सुरेशची पाऊले किचनकडे वळली. त्यावेळी दुरून कुठून तरी गाण्याचे सूर त्याच्या कानावर आले, "थोर तुझे उपकार, आई थोर तुझे उपकार".

**श्री उद्धव भयवाळ, १९, शांतीनाथ हाऊसिंग सोसायटी, गादिया विहार रोड, शहानूरवाडी,** छत्रपती संभाजीनगर **-४३१००९ मोबाईल: ८८८८९२५४८८ / ९४२११९४८५९ email: ukbhaiwal@gmail.com**



## 45. कथा – वाटणी... - सौ. उज्वला सुहास सहस्त्रबुद्धे



माधवीताई कोर्टातून घरी आल्या, त्या शरीराने आणि मनाने अगदी थकूनच! खरं तर कोर्टाचा निकाल त्यांच्या बाजूने लागला होता. त्यांच्या वकिलांनी केस चांगली लढवली होती आणि त्यांना न्याय मिळाला होता. संपत्तीची वाटणी कायद्याने त्यांना मिळणार होती! तरीही माधवी ताई मनातून खूप नाराज होत्या.

घरी येऊन त्या सोफ्यावर बसल्या. हातातील पर्स, मोबाईल शेजारीच ठेवला. सखुबाईने त्यांना पाणी आणून दिले. फॅन लावला. नेहमी शांत असणाऱ्या बाईसाहेब आज इतक्या अस्वस्थ का आहेत? सखुबाईला कळेना. त्यांच्याकडे बघून सखुबाईला काळजीच वाटली! गेली कित्येक वर्ष सखुबाई त्यांच्याकडे काम करत होती. ती घरच्यासारखीच होती. साहेब गेल्यापासून सखू ही एकमेव त्यांची जीवाभावाची सखी होती. तिने अदबीने माधवीताईंना विचारले, "तुम्ही खूप थकलेल्या दिसताय, तुमच्यासाठी काही कॉफी वगैरे आणू का? " माधवीताई म्हणाल्या, "नको ग सखू, मला जरा वेळ स्वस्थ बसू दे! "

सखुबाईच्या लक्षात आलं की, बाईसाहेबांना थोडा निवांत वेळ हवा आहे, म्हणून सखुबाई आत गेली. तितक्यात फोनची रिंग वाजली. फोन उचलला आणि त्या बोलू लागल्या. त्यांचे वकील गोंधळे यांचा फोन आला होता.

माधवीताईंनी फोन स्पीकरवर ठेवला होता. त्यामुळे वकील साहेबांचा आवाज जोरातच येत होता. 'माधवी ताई पेढे द्या.. निकाल अपेक्षेप्रमाणे आपल्या बाजूनेच लागला. आता तुमचा मुलगा, राहुल याच्या मालमत्तेचा तिसरा हिस्सा तुमच्या सुनेला कायद्याने तुम्हाला द्यावाच लागेल.. लवकरच तुमच्या बँक खात्यात तिला रक्कम जमा करावी लागेल. आणि हो, तिला अपिलासाठी अवधी देण्यात आलाय बरं का.. पण एकूण काय आपल्या मनाप्रमाणे सगळं घडलं! "

माधवी ताई हे सर्व ऐकतच होत्या, पण तरी त्यांचा चेहरा काही फारसा प्रसन्न किंवा आनंददायी वाटत नव्हता. आपल्याच घरातील भांडणं अशी चव्हाट्यावर यावीत आणि आपल्याला कोर्टाची पायरी चढावी लागावी याचं खूप वाईट वाटत होतं त्यांना! त्या तशाच सोफ्याच्या बाजूवर डोकं ठेवून निवांत बसल्या.

नकळत माधवीताईंचे मन भूतकाळात गेले. माधवीताईंचे ग्रॅज्युएशन पूर्ण झाल्यावर त्यांचे वडील त्यांच्या लग्नाचे पाहू लागले. खरंतर माधवीताईंना इतक्यात लग्न करायला नको वाटत होतं. त्यांना पुढे शिकायचं होतं, पण माहेरची परिस्थिती तशी मध्यमच होती. खाऊन पिऊन सुखी असणारे मध्यमवर्गीय कुटुंब होतं ते! अचानक महेशचे स्थळ मित्राकडून त्यांना कळले. मोहनराव म्हणजे माधवीचे वडील आणि आई, मीरा, दोघेही

महेशची चौकशी करण्यासाठी मित्राकडे गेले. आई बापाला नेहमीच मुलीच्या लग्नाबद्दल काळजी असते. त्यामुळे स्थळाची चौकशी नीट व्हावी म्हणून दोघेही मित्राकडे गेले. मुलगा इंजिनियर होता. हुशार होता. मेकॅनिकल इंजिनियर झाल्यावर कॅम्पस इंटरव्ह्यूमधून सिलेक्ट होऊन मोठ्या कंपनीत नोकरीला लागला होता. घरी आई-वडील आणि एक बहीण एवढंच चौकोनी कुटुंब होतं. वडिलांची सरकारी नोकरी होती. बहिणही कॉलेज शिक्षण घेत होती. नाकारण्याजोगे काहीच नव्हते.

माधवीताईंच्या वडीलांना ते स्थळ पटले होते. त्यांनी महेशच्या आई वडिलांची भेट घेण्याचं ठरवलं..

लवकरच मोहन आणि मीरा यांनी महेश बोरगावकरची पूर्ण माहिती काढली आणि त्यांच्या घरी जायचे ठरवले.

मोहनरावांनी त्यांच्या मित्रालाही बरोबर घेतले. जाण्याचा दिवस ठरला..

एका शुभ दिवशी महेशच्या घरी फोन करून मंडळी त्यांच्या घरी गेली. अनुरूप वर मिळाल्यावर माधवीच्या वडिलांनी माधवीला लग्नासाठी तयार केले. मुलीला पहायला महेशकडील मंडळींना निरोप दिला. ती मंडळी घरी आली. चहा पोह्याचा कार्यक्रम झाला. माधवीच्या वडिलांनी मुलांना एकमेकाला काही प्रश्न विचारायचे आहेत का यासाठी काही वेळ दिला. महेशच्या आई वडिलांनीही अर्थातच यासाठी संमती दाखवली.

माधवी दिसायला अगदी सुंदर नसली तरी देखणी होती. नाकी डोळी नीटस आणि मुख्य म्हणजे गोरी होती.

महेशचे व्यक्तिमत्व तरतरीत होते. बोलणे सुसंस्कृतपणाचे होते. महेश आणि माधवी दोघांचेही एकमेकांबद्दल चांगले मत झाले. मुलाकडच्यांनी एक दोन दिवसात निर्णय सांगतो असे सांगितले. अर्थात अपेक्षेप्रमाणे महेशकडून होकार आला. दोन्ही घरात आनंदी आनंद पसरला. माधवीलाही एकच भाऊ होता. त्याचेही शिक्षण होत आले होते. त्यामुळे तशी जबाबदारी फारशी नव्हती.

महेशच्या वडिलांनी सांगितले,"आम्हाला सोने नाणे काही नको. तुम्हाला जे शक्य असेल ते करा. लग्न खर्च दोघं मिळून करू या. " इतके समंजस लोक मिळाल्यामुळे अर्थातच काहीच प्रश्न न पडता लग्नाची तारीख आणि कार्यालय ठरले..

त्यावेळी चातुर्मास चालू होता. दिवाळीनंतरचा मुहूर्त काढला.. मधले दोन-तीन महिने माधवी आणि महेश यांनी एकमेकांना भेटून समजून घेण्याचे, आनंदाचे दिवस उपभोगले. लग्नानंतर माधवीताई महेशरावांच्या संसारात रमून गेल्या. दोन वर्षातच अपत्य प्राप्तीही झाली! बाळाचे नाव 'राहुल' ठेवले. त्याच्या पायगुणाने घरची समृद्धी वाढली होती. महेशरावांनी एक छोटासा उद्योग सुरू केला होता. हळूहळू नोकरी सोडून स्वतःची फॅक्टरी चालवायचे त्यांचे स्वप्न होते. सर्व काही सुखात चालले होते. राहुलच्या बाललीला मध्ये माधवीताई रमून गेल्या होत्या. राहुल दोन वर्षाचा झाला. माधवीताईंच्या मनात दुसरं अपत्य व्हावं असे होते, पण महेशराव म्हणत," अजून आपला फॅक्टरीचा जम बसला नाहीये. घर खर्च तर वाढलेला आहे. एवढ्यात दुसऱ्या बाळाचा विचार आपण करायला नको. "

.... माधवी ताईंनीही ते पटवून घेतले, कारण त्यांना कारखान्याची परिस्थिती दिसत होती. कामगार वर्ग काही ना काही कारण करून पगार वाढ, बोनस यांच्या मागण्या करून संपावर जात असे. किरकोळ गोष्टी असल्या की महेशराव त्या मार्गी लावत असत. पण अलीकडे बाहेरची परिस्थिती बदलली होती. व्यवसायामध्ये थोडीफार मंदी आली होती. या सगळ्या गोष्टींचे महेशरावांना नकळत टेन्शन येत होते. माधवीताई सांभाळून घेत होत्या. तरीही व्हायचे तेच झाले. एक दिवस कामगारांच्या मागण्यांच्या टेन्शनमुळे महेशरावांचे बीपी शूट झाले आणि महेशराव कोसळले. डॉक्टरांना बोलावून आणले. त्यांनी ताबडतोब हॉस्पिटलमध्ये नेण्यास सांगितले, पण दुर्दैवाने हॉस्पिटलला नेत असतानाच महेश रावांना सीव्हियर हार्ट अटॅक आला आणि महेशराव गेले...

माधवीताईंवर तर आभाळच कोसळले! त्या मनाने खचून गेल्या. छोट्या राहुलला वाढवायचे टेन्शन होतेच. त्याच्याकडे बघून तर आता त्यांना जगायचे होते! माहेरचा आधार होता. त्यांचा पाठचा भाऊ खंबीरपणे त्यांच्या पाठीशी उभा राहिला. तो नेहमी म्हणत असे, 'ताई, तुम्ही दोघांनी आमच्यासाठी इतकं केलं! माझ्या शिक्षणासाठी तू मदत केलीस आणि आता तुझ्यावर वेळ आली तर मी तुला मदत करायला नको का? ' खरोखरच भाऊ सतत त्यांच्या पाठीशी उभा राहिला. महेशराव गेले तेव्हा राहुल जेमतेम दहा-बारा वर्षाचा होता. त्याच्या शिक्षणाबरोबरच फॅक्टरी चालवणं हे माधवी ताईंना करावंच लागणार होतं! माधवीताई स्वतः फॅक्टरीत गेल्या. तेथील कामगारांसमोर धैर्याने उभ्या राहिल्या. त्यांनी सर्व वर्कर्सना एकत्र जमा केले आणि त्यांना सांगितले, ' तुमचे मालक जरी अकाली गेले असले तरी त्यांची ही फॅक्टरी चालू ठेवण्याचे आणि अधिक यशस्वी बनवण्याचे त्यांचे स्वप्न आपल्याला पुरे करायचे आहे. आणि या कामात तुमची मला मदत हवी आहे. ' त्यांनी कामगारांच्या मनालाच आव्हान केले. त्या स्वतः घराचा खंबीर आधार बनून कामाला लागल्या. रोज फॅक्टरीत जाऊ लागल्या. हळूहळू संसाराची घडी पुन्हा सुरळीत बसली.

राहुल हुशार होता. त्याची अभ्यासातील प्रगती पाहून माधवीताईनाही छान वाटत होते. राहुल वडिलांप्रमाणेच हुशार, मेहनती होता. बारावीमध्ये चांगले यश मिळवून राहुलनेही वडिलांप्रमाणे मेकॅनिकल इंजिनिअरिंगला ॲडमिशन घेतली. वयाच्या बावीसव्या वर्षी तो BE (Mech) डिस्टिंक्शनमध्ये उत्तीर्ण झाला. माधवीताईना कृतार्थ झाल्यासारखे वाटले. नवऱ्याच्या पश्चात आपल्या मुलाला आपण चांगले वाढवले यांचा अर्थातच त्यांना अभिमान वाटला. आता त्या आणि त्यांचा मुलगा दोघे फॅक्टरीचे काम पाहू लागले. परदेशी जाण्याची संधी असूनही राहुलने घरच्या उद्योगावर लक्ष केंद्रित करायचे ठरवले.

राहुलची कॉलेजमधील मैत्रीण अंकिता अलीकडे बरेचदा घरी येत असे काही ना काही निमित्ताने! माधवीताईंच्या ते लक्षात आले होते. त्या राहुलला त्याबद्दल विचारायची संधीच शोधत होत्या. आणि एक दिवस राहुलनेच आपल्या अंकिता बरोबरच्या मैत्रीचे रूपांतर प्रेमात झाल्याची कबुली आईला दिली! मग काय! माधुरीताईंना आनंदच झाला! त्यांनी अंकिताची अधिक चौकशी करायला सुरुवात केली. अंकिता एका मोठ्या घरची मुलगी आहे आणि ती एकुलती एक आहे, हे माधवीताईंना कळले होतेच. माधवीताईंना अर्थातच ही मुलगी आपल्याला 'नाकापेक्षा मोती जड' अशी होणार नाही ना, अशी भीती वाटत होती. पण अंकिता आणि राहुल दोघांचे

एकमेकांवर प्रेम होते आणि त्यांच्या ते लक्षात आले होते. राहुलला अंकिता आवडली होती. तरीही त्याने, "आई, तुझ्या मनात असेल तरच मी हा निर्णय घेणार आहे. तुझ्या मनाविरुद्ध मला लग्न करायचं नाहीये!" असं सांगितलं होतं. माधवीताईनी मोठ्या मनाने त्यांच्या लग्नाला संमती दिली आणि थाटात दोघांचे लग्न पार पडले.

मुलाच्या सुखी संसारात माधवीताईंनी मन रमवून घेतले! शेवटी एकुलता एक मुलगा, तो सुखी तर आपण सुखी! अशा भावनेने त्या घरात राहिल्या. आता राहुलनेही छान बंगला बांधला होता, गावापासून थोडा लांब, एका चांगल्या कॉलनीत! आता ते सर्वजण त्या बंगल्यात राहत होते. अंकिता थोडी हट्टी, हेकेखोर होती. घरात सासूच्या तालावर नाचणारी तर नव्हतीच, पण माधवीताईच तिला सांभाळून घेत होत्या. नवीन जमाना आहे, रूळेल हळूहळू.. असं त्यांना वाटत होतं. आनंदात दिवस चालले होते.

त्या दोघांना म्हणत होत्या की, 'सगळं चांगलं झालंय, एकदा नातवंड झालं की मी मरायला मोकळी! ' पण अंकिताला इतक्यात बाळाची जबाबदारी नको होती. दर सुट्टीच्या वारी दोघेजण कार काढून लाँग ड्राईव्हसाठी जात असत.

यांचे हिंडणे, फिरणे, हॉटेलिंग सर्व चालू असे. माधवीताईंची त्याबद्दल काही तक्रार नव्हती. त्यांच्या सोबतीला घरी सखू असेच. सखू म्हणजे घरातीलच एक होती. ती मोलकरीण नव्हती, तर घराची काळजी वाहणारी, जीव लावून काम करणारी होती. ती असली की माधवीताईंनाही बरं वाटत असे. त्या या घरात आल्यापासूनच सखू त्यांची सोबतीण होती. माधवीताईंच्या सोबतीला कायमच घरी सखू असे.

असेच दिवस चालले होते.. एके दिवशी अंकिता आणि राहुल कार घेऊन लाँग ड्राईव्हवर गेले आणि हायवेवर अचानक वळणावर आलेल्या ट्रकने त्यांच्या गाडीला ठोकले. गाडी खाली दरीत फेकली गेली. त्या अपघातात राहुल जबर जखमी झाला. अंकितालाही बरेच लागले होते, पण राहुल त्या दुर्घटनेतून वाचू शकला नाही. आता माधवीताईंच्या मनाने हाय खाल्ली. परिस्थिती नॉर्मलवर येण्यासाठी फार काळ गेला. हळूहळू अंकिताने फॅक्टरीचे काम स्वतः पाहायला सुरुवात केली. तिला ते फारसे जमत नव्हते. शेवटी तिने फॅक्टरी विकायचा निर्णय घेतला. आता मात्र तिला त्या पैशातील वाटणी सासूला म्हणजे माधवीताईंना देण्याची इच्छा नव्हती. जी फॅक्टरी माधवीताईंनी, त्यांच्या नवऱ्याने, मुलाने उभी केली त्या फॅक्टरीच्या उत्पन्नाची वाटणी देण्यासाठी ती टाळाटाळ करत होती. माधवीताईंना काहीच द्यायचे नाही असे अंकिता ठरवत होती... पण फॅक्टरीचे व्यवस्थापन माधवीताईंच्या पाठीशी होते. त्यांनी अंकिताला कोर्टात खेचले. वारस म्हणून फॅक्टरीच्या पैशातील तिसऱ्या भागाची वाटणी माधवीताईंना मिळाली पाहिजे म्हणून दावा केला. त्यासाठी गोंधळे वकिलांना केस चालवण्यास दिली. ते महेशरावांचे जवळचे मित्र होते. त्यांना अंकिताचा स्वार्थीपणा लक्षात येत होता, पण कायदेशीर लढाई लढल्याशिवाय गत्यंतर नव्हते.

.... जवळपास एक वर्ष खटला चालला. आरोप- प्रत्यारोप चालू होते. आज त्या केसचा निकाल लागला होता. अंकिताला खटल्याचा खर्च नुकसान भरपाई म्हणून द्यावा लागणारच होता. शिवाय फॅक्टरीच्या उत्पन्नाचा

तिसरा हिस्सा इतक्या वाटणीचे पैसे त्यांच्या बँक खात्यात जमा करावे लागणार होते. ते सांगण्यासाठीच गोंधळे वकिलांचा फोन आला होता.


पण माधवीताईंची मनस्थिती मात्र खूपच बिघडली होती. सून आणि बायको या दोन्ही नात्यात मुलाची वाटणी होतच असते! इस्टेटीमध्ये तर वाटणी होतेच, पण भावनिक दृष्ट्या ही मुलाची वाटणी होते! आपला पोटचा मुलगा, राहुल गेला,

आता माझ्या वाट्याला आलेल्या या पैशाला घेऊन काय करू? हा पैसा मला नको होता, पण केवळ तत्वासाठी आपण ही कोर्ट केस केली! आता वाटणीचा पैसा हातात येईल, पण मुलगा मात्र परत मिळणार नाही! माधवीताईंना हे दु:ख खूप जाणवत होते, त्यामुळे पैशाच्या वाटणीचा विचार त्यांना दु:खदायी वाटत होता. अंकिता कदाचित वरच्या कोर्टात अपीलही करेल. काहीही होऊ शकेल, पण आता या केस जिंकण्याचा आनंद मात्र माधवीताईंना जाणवत नव्हता! हताश मनाने सारा भूतकाळ आठवत त्या सोफ्यावर बसून होत्या. डोळ्यातून घळाघळा पाणी वाहत होते. आपण केस जिंकली की हरली तेच त्यांना कळत नव्हते. परमेश्वराने आपल्या सोन्यासारख्या मुलाला उचलून नेले, तेव्हाच खरं तर आपण ही संसाराची केस हरलो! आता ही पैशाची वाटणी घेऊन काय करणार आपण? ' ही खंत त्यांच्या मनाला जाळत होती!

**सौ. उज्वला सुहास सहस्त्रबुद्धे**, पुणे



## 46. लेख - आई ही आईच असते - डॉ. धनंजय देशपांडे



थोडं दीर्घ आहे पण तसेही रिल्स पाहण्यात जो वेळ जातो त्यापेक्षा कमी वेळेत हे वाचून होईल हे नक्की!!

तर आई ही आईच असते.... तिची जागा कुणीच घेऊ शकत नाही! हे समजावून सांगण्यासाठीच ही घटना शेयर करतोय!

गेल्याच आठवड्यातील ही घटना. संध्याकाळची वेळ होती. आठ साडेआठ वाजलेले. मी रिलॅक्स मोडवर वपु वाचत बसलेलो. आणि मित्राचा मोबाईल वाजला. आणि त्या कॉलने मला जीवनाचा वेगळा पैलू समोर ठेवला!

फोन घेतला तर समोरून वहिनीचा रडण्याचा आवाज. मी दचकलो. म्हटलं काय झालं आता?

तर वहिनी सांगू लागल्या, "कुठं आहात तुम्ही? आणि किती वेळात आमच्या घरी पोचू शकता? "

मी अजूनच दचकलो. कारण हे वाक्य नाही म्हटलं तर धडकी भरवणारे असते की अघटित काही झालं की काय मित्राला?

मी म्हटलं, "आधी शांत व्हा अन सांगा नेमकी काय अडचण आहे?, सुनील (मित्र) कुठं आहे? काकू (सासूबाई) बऱ्या आहेत न? "

मात्र समोरून एकच घोकंपट्टी सुरु होती,

"तुम्ही कुठं आहात आणि लगेच येऊ शकता का घरी? "

मी म्हटलं, ‘ट्राफिक नाही लागलं तर अर्ध्या तासात पोचतो. ’ आणि फोन ठेवला! पटकन तयार होऊन स्कुटर काढून त्यांच्या घरी पोचलो.

वाटेत सतत छातीत धडधड की समोर काय वाढून ठेवलंय काय माहित? सायबर फ्रॉड मध्ये अडकलं असेल का कुणी? की अचानक ऍक्सीडेन्ट कुणाचा? "

घरी गेलो.... तर सुनील (मित्र) जो कोर्टात जज्ज आहे... तो उदास बसलेला. शेजारी वैनी रडत बसलेल्या, विशीतला मुलगा अन मॅट्रिकमधली त्याची मुलगी कावरीबावरी उभी.

मित्राला विचारलं.... "काय प्रकार आहे? काय अडचण? "

मित्र गप्पच! शेवटी वैनी समोर येऊन म्हणाल्या, "हे पहा..... डिवोर्सचे पेपर्स... आजच कोर्टातून त्यांनी तयार करून आणलेत. त्यांना माझ्यापासून डिवोर्स हवाय. तोही लग्नाला इतकी वर्ष झाल्यावर"

मी म्हटलं, "काय चेष्टा करताय का? किती छान फॅमिली आहे. आजी नातवंड मजेत, आर्थिक दृष्ट्या सगळं ओके आहे.... मग हे काय मधेच? "

त्यावर कुणीच काही बोलेना! शेवटी मी मित्राच्या मुलाला विचारलं, "आज्जी कुठेय रे? "

तो म्हणाला, "बाबांनी कालच त्यांना पौडरोडच्या वृद्धाश्रमात नेऊन ठेवलं आहे. आणि कालपासून बाबा जेवले पण नाहीत. सतत उदास बसून आहेत! "

मी मित्राच्या जवळ जाऊन बसलो. खांद्यावर थोपटलं. अन त्याचा बांध फुटला.

"मी माझ्या सत्तरीतल्या आईला अशा लोकांच्या हाती सोडून आलोय जे तिला ओळखत पण नाहीत. गेले काही महिने झाले सासू सुनेच्या तक्रारी होत होत्या. भांडण, वादावादी सुरु अन मुलेही त्यांच्या त्यांच्या मोबाईल विश्वात मग्न... ते यात पडलेच नाहीत. त्यावेळी बायको म्हणाली की, 'मला त्यांचे करणे झेपत नाहीय. त्यांच्याकडे लक्ष देऊ शकत नाही. '

कोर्टातून घरी यायचो तेव्हा घरात सगळं सुतकी वातावरण. आई जवळ येऊन खूप रडायची. आणि बायकोच घरची मालकीण असल्याने ती जशी वागायची तसेच घरचे नोकर पण आईशी वागू लागले. शेवटी कंटाळून आईने गेल्या आठवड्यात मला सांगितलं की, 'बेटा.... मला एखाद्या वृद्धाश्रमात नेवून ठेव. राहिलेले दिवस तिथं किमान शांततेत राहीन. '

याबद्दल मी घरच्यांशी परोपरीने समजावून सांगून पाहिले. काही तडजोडीचा मार्ग निघतोय का पाहत होतो पण निराशा झाली. सगळेच आपल्या मतावर ठाम होते.

खरेतर आई माझं सर्वस्व रे!! दोन वर्षाचा होतो तेव्हा वडील वारले. आईने फॉल पिको शिवणकाम असं काहीतरी करत करत मला शिकवलं. मात्र कधीही मला एकटं सोडलं नाही. सतत सहवासात असायची. माझ्यासाठी चांगली शाळा निवडली. चांगल्या कॉलेजात घातलं. त्यामुळेच आज मी चक्क जज्ज झालोय... अशा या आईला काल आश्रमात सोडून आलोय. तिची एक एक आठवण येऊन रडायला येतेय.

आईला एकदा खूप ताप आलेला. मी शाळेतून घरी आलो तेव्हा पाहिले तर अंग सगळं भाजत होतं. तेव्हा ती म्हणाली... "नाही रे बाळा, तुझ्यासाठी जेवण बनवत होते न तर चुलीजवळ असल्याने अंग गरम झालं असेल. '

****

मित्र पुढं सांगत होता.... कारण काहीही असो पण अशा आईचे जर मी कुणीच होत नसलो तर बायको मुलांचा तर काय होणार मी? जिच्या शरीराचा तुकडा मी होतो तिलाच काल परक्यांच्या हवाली करून आलोय. ज्यांना तिच्या सवयी, औषधपाणी काहीच माहित नाही. अशा आईसाठी जर मी काहीच करू शकत नाही तर इतर कुणाचं काय करणार? स्वतंत्रता जर इतकीच प्रिय आहे बायको पोरांना आणि आई त्यांना ओझे वाटत्ये तर त्यांना आता पूर्णच स्वातंत्र्य द्यायचं ठरवलं आहे. मी जसा बापाविना वाढलो तसेच मुले वाढतील. आणि म्हणून मी डिवोर्स घेतोय. सगळी प्रॉपर्टी याच्या हवाली करतोय. अन नोकरीचा राजीनामा देऊन मीही त्याच

आश्रमात राहायला जातोय. किमान त्यामुळे आईसोबत तरी राहू शकेन! आईने माझ्यासाठी आजवर जे काही केलं, कष्ट उपसले ते सगळे बायको पोरांना माहित असूनही जर तिला आश्रमात जावं लागत असेल तर मलाही एक न एक दिवस हे लोक तिथेच पाठवणार! त्यापेक्षा मीच स्वतः जातो ना! ' असं म्हणत... मित्र पुन्हा ओक्सबोक्शी रडू लागला.

सहज घड्याळ पाहिले तर दहा वाजत आलेले. वैनीकडे लक्ष गेले. त्यांचा चेहरा पश्चातापाने भरलेला जाणवला. मुलेही खालमानेने गुमसुम!

मी टाळी वाजवत म्हटलं... "ओके... चला... आपण पौडच्या आश्रमात जातोय. आईला घेऊन येऊ. तयार व्हा सगळे"

आणि दहा पंधरा मिनिटात सगळे तयार होऊन निघालो. आश्रमात पोचलो.

गेटवर वॉचमनने अडवलं. मित्राने त्याला हातपाय पडत "माझी आई आहे इथं. तिला न्यायला आलोय" असं विनवले.

त्यावेळी वॉचमन मित्राला बोलला, "तुम्ही काय करता साहेब?"

मित्राने "जज्ज" आहे असं सांगितल्यावर वॉचमन म्हणाला, "जिथं सगळे पुरावे तुमच्या समोर होते तरी तुम्ही आईला न्याय देऊ शकला नाहीत तर इतर लोकांना कसा न्याय देत असाल तुम्ही? शंकाच आहे! "

असं म्हणत आम्हाला गेटवरच थांबवून आत गेला. आतून नंतर लेडी वॉर्डन बाहेर आल्या.

अतिशय कातर आवाजात त्या म्हणाल्या, "तुम्हाला जड झाली म्हणून तिला आणून इथं सोडलं. आता इतक्या रात्री न्यायला आलाय.... काय माहित... जाताना वाटेत कुठंतरी तिला नदीत ढकलून द्याल..... तर त्याचा जाब मी माझ्या देवाला काय देऊ? की का जाऊ दिले त्या माउलीला?"

हे ऐकताच सगळेच सुन्न झाले...

शेवटी धीर करून मी म्हटलं.... "विश्वास ठेवा मॅडम. या सगळ्यांना पश्चाताप झालाय. त्यांना सुधारण्याची संधी आपण नाही द्यायची तर कोण देणार?"

शेवटी वॉर्डनला काय वाटलं माहित नाही... त्यांनी आम्हाला हाताने खुणावून मागोमाग यायला सांगितलं. जिथं आईला ठेवलं होत तिथं त्यांनी नेलं. तिथलं दृश्य पाहून माझ्याच जीवाचं पाणीपाणी झालं.

त्या माऊलीने एक फोटो कुशीत घेऊन शांत झोपली होती. तो ग्रुप फोटो होता.... पूर्ण परिवाराचा.

हळूच पुढं होऊन मी त्यांना हलवलं. त्यांनी ओळखून मला "कसे काय आला" विचारलं!

सांगितलं की तुला न्यायला आलोय सगळे! तिने सगळ्याकडे पाहिले अन मोठ्याने हंबरडा फोडला. मित्र आणि वैनी पण हमसून रडू लागल्या! सगळंच वातावरण गलबलून गेलेलं! शेवटी सगळी आवराआवरी करून तिला घेऊन बाहेर पडलो. तर आजूबाजूच्या रूममध्ये असलेले इतर असेच निराधार आईबाप बाहेर आलेले

अन चक्क मंद मंद हसत त्या आईला टाटा करत होते! (जणू... आमचं राहू दे... तुला पुन्हा घर मिळालं ग बाई... असा भाव त्यांच्या टाटा मध्ये)

वाटेत सगळेच शांत होते! कुणीच कुणाशी बोलत नव्हते. मी शांतपणे कार ड्राइव्ह करत होतो.

रात्रीचे बारा वाजलेले घरी पोचायला. सगळ्यांना घरात नीट पोचवलं अन निघालो. वैनीला आणि मुलांनाही आता सुखाची किल्ली नेमकी जी हरवली होती ती सापडली होती आता!

आणि मित्राने घट्ट मिठी मारली. त्याला थोपटून शांत करत बाहेर पडलो. ओलं काय लागतंय मागे असं म्हणून पाहिलं तर शर्टाच्या मागचा भाग ओला झालेला (मित्राच्या अश्रुने)

****

डॉ. डीडी क्लास : आई शेवटी आईच असते रे बाबांनो... अन बाबीनो... भले ती आऊटडेटेड असेल.... तुमच्यासारखं तिला जगणं (लाईफ स्टाईल जमत नसेल), तुमच्या तिच्या आवडीनिवडी जुळत नसतील.... पण एक लक्षात घ्या की ती होती म्हणून तुम्हाला तुमचा नवरा आणि मुलांना त्यांचा बाप मिळालाय न? हे कसं विसरता! मुलांनो.... बाहेर कॉलेजात कितीतरी ऍडजेस्ट करताच की! सुनांनो.... तुम्ही नोकरी करत असाल तर ऑफिसात पण ऍडजेस्ट करताच की! मग आई नावाच्या पिकल्या पानाला ऍडजेस्ट करायला काय अडचण? तुमच्यापुढे तुमचं सगळं आयुष्य पडलंय पण त्या पिकल्या पानाचा काय भरोसा? कधी गळून पडेल माहित नाही. म्हणून आहे तोवर जमेल तसे जपा रे तिला! थोडी कळ सोसा वाटल्यास! तिने तर तुम्हाला जन्म देताना किती प्रसववेदना सोसल्यात. बाळंतपण म्हणजे जणू स्त्रीचा पुनर्जन्म असतो रे! मृत्यूला शिवून ती आलेली असते. मग म्हातारपणी पुन्हा तिला जिवंतपणी मरणयातना का देता? आणि लक्षात घ्या.... जे पेराल तेच उगवणार आहे. जे तुम्ही आईवडिलांशी वागाल तेच तुमची मुले तुमच्याशी वागणार आहेत. कारण कर्मा रिटर्न्स तर होणारच न! त्यात हयगय कधीच होत नाही. हे तर लक्षात ठेवा. विश्वास ठेवा.... सगळं सगळं तुमच्याकडे असलं तरी समाधान सुख नसेल... सुकून नसेल.... ते सगळं फक्त आणि फक्त आईच्या कुशीत असतं! आईच्या पदरात असतं. म्हणून तिच्या पदराला विखरून जाऊ देऊ नका! कारण तो पदर एक असे वस्त्र आहे जे एकदा फाटलं की नंतर काही केल्या शिवता येत नाही!

तुमच्या घरात असं घडूच नये ही प्रार्थना करतोय. मात्र तुमच्या भोवताली कुणाकडे असं घडत असेल तर त्यांना वेळीच सावरण्यासाठी ही पोस्ट पाठवणे... हे सुद्धा सामाजिक कामच आहे! धन्यवाद!

*(ही कहाणी स्वतःही वाचा अन जमलं तर ज्यांना लागू पडतेय त्यांनाही पाठवा.)*

**डॉ. धनंजय देशपांडे,** *(सायबर सिक्युरिटी तज्ज्ञ, चित्रकार, लेखक, समुपदेशक, निवेदक)* मो. ९४२२३०४३४४

**47. लेख - पिढ्या साधणारे संवादी पूल - प्रा. बी. एन. चौधरी**



"बाबा, तुम्हाला काहीच समजत नाही. काळ खूप बदललाय. हे जग विज्ञान, तंत्रज्ञानाचं आहे. मुक्त विचारांचं आहे. तुम्ही तुमचे जुने, बुरसटलेले विचार सोडून द्या. " एक मुलगा बापाला म्हणतो. तर, "सासूबाई तुम्ही संघर्ष, कष्ट केले असतील. आम्हीही शिक्षण घेतांना तेच केलंय. नोकरी करतांना तेच अनुभवतो आहे. तुम्ही बदल स्विकारा. आम्हाला तुमचे विचार पटत नाहीत. नाही तर, आम्हाला वेगळं होवू द्या.! "

... असे संवाद घराघरात ऐकायला येतात. आफिसेसमध्ये कार्यालय प्रमुख आणि कर्मचाऱ्यातही अशीच जुगलबंदी रंगत असते. बाॅसचं वर्चस्व कुणालाच नको असतं. पक्षांमध्येही नेतृत्वाविरोधात, नव्या कार्यकर्त्यांचा असंतोष खदखदत असतो. यात नवीन आणि आश्चर्य वाटण्यासारखं काहीच नाही. कालानुरूप हे पिढ्यांतर येतच असतं. यालाच दोन पिढ्यांमधील दरी म्हणतात. साधारण २५-३० वर्षे उलटली की नवी पिढी पुढे येते. जिला जुनी पिढी म्हणजे अडगळ, लोंढणं वाटतं. मात्र, जुनी पिढी हीच आपली श्रीमंती, असं मानणारी नवी पिढीही कुठे कुठे बघायला मिळते. हा नवा-जुना, वृध्द - तरुण आणि प्रगल्भ - उथळतेचा संघर्ष हजारो वर्षांपासून सुरु आहे. सुरु राहील.

घराघरात, गावागावात, पक्ष, संघटना या पातळीवर माणसामाणसांमध्ये वैयक्तिक तसेच वैचारिक तफावत असतेच. ती जेव्हा तीव्रतेने जाणवायला लागते तेव्हा पिढींमधलं अंतर वाढायला लागतं. शिक्षण, विज्ञानाची प्रगती, तंत्रज्ञानाचा प्रभाव आणि विकासाची ओढ यातून नवी पिढी आधुनिक होत आहे. तीच माणसामाणसात एक दरी निर्माण करत आहे. प्रत्येकाचा विचार, एकमेकांमध्ये असलेला विश्वास आणि प्रत्यक्ष काम करण्याची कृती, यात तफावत निर्माण होत असून, यालाच पिढ्यांमधील अंतर अर्थात जनरेशन गॅप असं म्हटलं जाऊ शकतं. जुनीजाणती वयस्कर माणसं आणि नव्या पिढीतील तरुण यांच्यात आचार, विचार, दृष्टिकोन, जीवनशैली, सवयी, मूल्यात्मकता, रुची या संदर्भामध्ये फरक दिसून येतो. यालाच आपण दोन पिढ्यांमधील अंतर म्हणतो. यामुळे समाजरचनेमध्ये तसेच विचारसरणीत आमूलाग्र बदल घडत असतो. कधी कधी हा बदल इतका प्रचंड असतो, की त्यातून दोन पिढ्यांमध्ये मतभेदही निर्माण होऊ शकतात. मतभेद निर्माण झाले, तर ते सामंजस्याने दूर करता येतात. मात्र, यातून जर मनभेद निर्माण झाला, तर दोन पिढ्यांमध्ये भिंती उभ्या राहतात. वैर निर्माण होते. आस्था कमी होते आणि या पिढ्या एकमेकांपासून दूर जातात.

सध्याचे वातावरण बघता, आपल्याला हा कलह अधिक प्रामुख्याने जाणवतो. पूर्वीची जुनी जाणती माणसं, समाजकारणापासून आणि राजकारणापासून दूर होत आहेत. त्यांना जाणीवपूर्वक दूर ठेवलं जात आहे. त्याच वेळेस, नवी पिढी या क्षेत्रामध्ये पुढे येत आहे. हे तसे काळसुसंगतच आहे. यात कोणतंही वेगळंपण नाही. मात्र, जुन्या पिढीने केलेला संघर्ष, जुन्या पिढीने घेतलेले परिश्रम विसरून, नवी पिढी आपल्याच मस्तीत, स्वतःच्या विचारांच्या वारूवर आरूढ होऊन, बिनधास्त मार्गक्रमण करत असेल, तर ते समाजासाठी,

राजकारणासाठी आणि माणुसकीसाठीसुद्धा घातक ठरू शकेल. ती धोक्याची वेळ वेळीच ओळखता यायला हवी.

जुनी पिढी म्हणजे पालकत्व आणि नवी पिढी म्हणजे उमलणारी कळी. जुन्या पिढीकडे प्रचंड अनुभव असतो. तो त्यांना संघर्षातून, कष्टातून मिळालेला असतो. त्यांनी कठीण परिस्थितीवर मात केलेली असते. त्यासाठी आपलं आयुष्य पणाला लावलेलं असतं. त्याचं मार्गदर्शन नव्या पिढीला द्यावं, अशी त्यांची इच्छा, अपेक्षा असते, जी रास्तही आहे. मात्र, पुढची पिढी ही जुन्या पिढीचं मार्गदर्शन घ्यायला फारशी उत्सुक नसते. त्यांनी केलेले कष्ट, त्यांनी खाल्लेल्या खस्ता, त्यांनी केलेला संघर्ष, वारंवार ऐकून त्याबद्दल त्यांच्या मनामध्ये आढी निर्माण होत असते. जुन्या पिढीने केलेलं मार्गदर्शन, त्यांना आपल्यावर लादलेलं बंधन वाटतं. आपल्या स्वातंत्र्यावरचा तो घाला आहे, असं ते समजतात. त्यामुळे ते धुडकावून लावण्याची वृत्ती त्यांच्यामध्ये बळावते. यातून जुन्या पिढीबद्दल अनादर निर्माण होतो. हा घातक ठरू शकतो.

नवी पिढी नव्या विचारांची असते. त्यांची स्वप्नं वेगळी असतात. त्यांच्यासमोर आलेले जग, हे संघर्षाविना आलेलं असतं. त्यामुळे ते बेदरकार वृत्तीने वागू पाहतात. त्यांच्या आशा, अपेक्षा, आकांक्षा या विशाल असतात. याकडे जुन्या पिढीने सामंजस्याच्या दृष्टीने बघायला हवं. त्यांच्या काही किरकोळ चुकांकडे दुर्लक्ष करायला हवं. त्यांच्या चुकांना माफ करायला शिकायला हवं. तरच दोन पिढ्यांमध्ये, समन्वय साधता येईल. असा समन्वय घरासाठी, समाजासाठी, राज्यासाठी, राष्ट्रासाठी विधायक कार्य करू शकतो.

जुनी पिढी आणि नवी पिढी मिळूनच समाज तयार होतो. जुन्या पिढीने मागचं सारं मागे टाकून, नव्या पिढीच्या भविष्यातील संकल्पांकडे डोळसपणे बघायला हवं. सकारात्मकतेने स्वीकारायला हवं. नव्या पिढीनेही जुन्या पिढीचा आदर करत, आपल्या पुढच्या ध्येयावर लक्ष केंद्रित करायला हवं. नवी पिढी जोपर्यंत जुन्या पिढीचा आदर्श, त्यांचा अनुभव, आपल्या सोबत घेत नाही, तोपर्यंत त्यांचं जगणं, वागणं हे दिशाहीन ठरू शकतं. अर्थात, नवी पिढी दिशाहीनच आहे असेही म्हणता येणार नाही. मात्र, नव्या पिढीत जे संघर्ष करतात, नवीन वाटा शोधतात, त्यातील यशापर्यंत पोहोचणाऱ्यांचं प्रमाण खूप अल्प असतं. या उलट, जुन्या पिढीचा अनुभव गाठीशी घेऊन, त्यात आपल्या प्रगतीचा संघर्ष एकत्र करत, जो वैचारिक पाऊल टाकतो, तो मात्र आपल्या उद्दिष्टापर्यंत पोहोचण्यात यशस्वी होऊ शकतो.

दोन पिढ्यांमध्ये संवाद असेल, तर त्यातून कौटुंबिक स्वास्थ्याचा पाया रचला जातो. त्यावर विकासाची इमारत उभी राहू शकते. दोन्ही पिढ्यांच्या कष्टाला यशाची फळे लागू शकतात. मात्र, दोन पिढ्यांमध्ये वाद - मतभेद झाले, तर त्यातून कौटुंबिक स्वास्थ्याचा पायाच विस्कळीत होऊन, इमारतच ढासळू शकते. प्रत्येक पिढीचं जे तत्त्वज्ञान असतं, ते आपापल्या जागी योग्यच असतं. घरात बाप-लेक, सासू-सून यांचा संघर्ष आपल्याला बघायला मिळतो, कार्यालयात बॉस आणि कर्मचारी यांच्यातला संघर्ष टोकाला पोहचतो. पक्ष संघटनेमध्ये नेते आणि कार्यकर्ते यांच्यातला संघर्ष आपण पाहतो. सत्ता स्पर्धेमध्ये शीर्षस्थानी बसलेले नेते आणि त्यांचे अनुयायी यांच्यातला संघर्षही नित्याचा झाला आहे. या सर्वांकडे आपण डोळसपणे बघितलं, तर आपल्याला दोन पिढ्यांमधील अंतर स्पष्टपणे जाणवतं. हे अंतरच बहुदा संघर्षाचं कारण असतं.

या दोन पिढ्यांनी एकातून दुसऱ्यात डोकावताना, डोळसपणे, सहजतेने डोकावले, तर दोघांचा स्वाभिमान जपला जाऊन दोघांमध्ये एक मधुर नातं निर्माण होऊ शकतं. मात्र, प्रत्येक पिढी ही आपलं स्वतःचं स्वातंत्र्य जपण्यासाठी इतके प्रयत्न करते, की त्यांचा एकमेकांमधला समन्वय लोप पावतो. सासूने आयुष्यभर केलेला संघर्ष आणि सुनेचे भविष्यातील स्वप्न यांच्यात स्पर्धा सुरू होते. चढाओढ लागते. त्यातून घरात कलह निर्माण होतो. माणसांचं जगणं असह्य होतं. यातूनच आपल्याला घराघरात होणारे महाभारत बघायला मिळते. यातूनच काही अनपेक्षित घटनाही बघायला मिळतात. जुन्या काळात एकत्र कुटुंब पद्धती होती. नव्या काळात ती विभक्त कुटुंब पद्धती झाली आहे. विभक्त कुटुंब पद्धतीला बंधनं नको आहेत. एकत्र कुटुंब पद्धती स्वातंत्र्य द्यायला नाखुष असते. यामुळे आपोआपच संघर्षाची ठिणगी पडते आणि घरादारांची शकले होतात.

खरंतर दोन्ही पद्धतींचे, आपापले फायदे तोटे आहेतच. एकत्र कुटुंब पद्धतीमध्ये अडचणीच्या वेळेस सारी एकमेकांच्या सोबत असतात. एकमेकांना मदत करतात. सावरुन घेतात. तर विभक्त कुटुंब पद्धतीत, माणूस एकटा पडतो. कोलमडू शकतो. एकत्र असलो तर आपल्याला सावरायला अनेक हात, अनेक माणसं सोबत असतात. एकटे असलो की मग आपली घुसमट होते. नैराश्य येतं. त्यातून काही माणसं टोकाची पाऊलं उचलतात. स्वतःचं आयुष्य संपवतात. कधी कधी संपूर्ण कुटुंबच आत्महत्या करतं. जे व्यक्तिगत पातळीवर आणि कौटुंबिक पातळीवर देखील घातक ठरतं. एकत्र कुटुंब पद्धतीमध्ये सहनशीलतेचा कस लागतो. तर, विभक्त कुटुंब पद्धतीमध्ये वैयक्तिक स्वातंत्र्याचे इमले चढतात.

दोन पिढ्यांमधील अंतर, हे आपण आपल्या घरात देखील अनुभवू शकतो. घरात चार प्रकारची माणसं आढळतात. बाल्यावस्था, युवा अवस्था, तरुण अवस्था आणि वृद्धत्व. यापैकी बाल्यावस्था आणि वृद्धत्व, हे निरागस असतात. परावलंबी असतात. त्यांच्या फारश्या अपेक्षाही नसतात. म्हणून घरात या दोघांचा एकमेकांशी सुसंवाद दिसून येतो. त्यांच्यात स्नेहाचे, सौहार्दाचे नाते असते. आजी-आजोबा, नातू-नात हे एकमेकांचे मित्र झालेले दिसतात. याउलट, युवक आणि तरुण यांचे मात्र या दोघांशी जमत नाही. कारण, त्यांची स्वतःची स्वप्नं तयार झालेली असतात. ती पूर्ण करण्यासाठी ते कोणत्याही थरावर जाऊ शकतात. त्यासाठी ते झेप घेऊ पाहतात. अशावेळी त्यांना, घरातील बालक आणि वृद्ध माणसं पायातील बेडीसारखे वाटतात. बालपणामध्ये निरागसता असते तर वृद्धत्वाकडे परिपक्वता असते. याउलट, युवक आणि तरुण लोकांमध्ये उथळपणा, उद्दामपणा हा थोडा जास्त असतो. म्हणून ते धाडसी वागण्याचा प्रयत्न करतात. नव्या वाटा शोधण्याचा प्रयत्न करतात. विकासाची स्वप्न बघतात. आधुनिकतेकडे त्यांचा ओढा असतो. कमी श्रमात यश मिळवायचा प्रयत्न असतो. अशावेळी वृद्धांनी, ज्येष्ठांनी त्यांना वारंवार, भूतकाळाचे स्मरण करून देत, आपल्या कष्टाच्या, संघर्षाच्या गोष्टी सांगू नये. त्यांचा आदर्श नव्या पिढीने घ्यायला पाहिजे. परंतु तो घेतलाच पाहिजे असा दंडकही असू नये.

घरातील जेष्ठ-वृद्ध व्यक्तींनी वैचारिकदृष्ट्या परिपक्व झाल्याचे दर्शवण्यासाठी, वेळप्रसंगी तडजोडीची भूमिका स्वीकारली पाहिजे. बदल स्वीकारला पाहिजे. जे बदल स्वीकारत नाहीत, ते काळाच्या मागे पडतात. वाहते पाणी वाहतच राहायला हवं! ते एखाद्या ठिकाणी थांबलं, तुंबलं की कुजतं. त्यात घाण, दुर्गंधी निर्माण होते. पाणी दूषित होतं. ज्येष्ठ व्यक्तींनी, आपले विचार प्रवाहित ठेवले नाहीत, तर त्यांचे विचार देखील कुजण्याची

शक्यता असते. असे कुजलेले विचार, घरातील अशांतीचे कारण बनू शकतात. आयुष्यभर संघर्ष करून, कष्ट करून त्यांनी उभं केलेलं घर, त्यांच्या अशा कुजक्या विचारांमुळे उद्ध्वस्त होण्याची वेळ येऊ शकते. म्हणून, जुन्या जाणत्या ज्येष्ठ वृद्ध लोकांनी आपल्या विचारांना प्रवाही ठेवायला हवं. नव्या विचारांचे स्वागत करायला हवं. त्यांना पाठबळ द्यायला हवं. त्यांच्या स्वप्नांना आकार द्यायला हवा. जुनी वृद्ध जाणती माणसं, प्रथा-परंपरा कुरवाळत बसतात. त्यांचे गोडवे गातात. नव्या युगामध्ये खरं तर ते निरुपयोगी असतात. कारण, नव्या युगामध्ये शिक्षणामुळे नव्या पिढीला आत्मविश्वास आलेला असतो. त्यांना स्वतःच्या पायावर उभे राहण्याचे बळ मिळालेले असते. पैसा कमावण्याची शक्यता निर्माण झालेली असते. त्यामुळे आपले स्वातंत्र्य जपण्यासाठी ते जुन्या पिढीला निर्विकारपणे त्यागू शकतात. सोडू शकतात. हा काळाचा बदल आहे. तो प्रत्येकाने स्वीकारायला हवा. अन्यथा कटू प्रसंगाला सामोरे जाण्याची तयारी ठेवावी.

जुनी पिढी आणि नवी पिढी यांच्यात एक महत्त्वाचा फरक आपल्याला दिसतो. जुनी पिढी ही कर्मठ असते तर नवी पिढी ही आधुनिक असते. परंपरा जपाव्यात असा जुन्या पिढीचा आग्रह असतो. नव्या पिढीला मतांचे लादलंपण आवडत नाही. हीच संघर्षाची पहिली पायरी असते. यासाठी दोघांनी सामंजस्याची भूमिका स्वीकारायला हवी. दोन पिढ्यांमध्ये मुक्त संवाद व्हायला हवा. नव्या पिढीला जुनी पिढी अडचण, अडगळ वाटते. म्हणून, आपल्या स्वातंत्र्यासाठी ते त्यांना स्वार्थी होऊन नाकारू शकतात. सोडून जाऊ शकतात. वेगळे होऊ शकतात. हा नातेसंबंध, अनुबंध अतूट रहावा, दृढ व्हावा असं वाटत असेल, तर यासाठी जुन्या पिढीने वैचारिक विशालपण दाखवायला हवं. तरच, दोन पिढ्यांमधे संवादाचा पूल उभा राहील... बंध टिकून राहील.

भगवान गौतम बुद्ध म्हणतात, वैराने वैर शमत नाही. तर, ते सामंजस्याने शमते. जुनी पिढी पारंपारिक असते. तिला नियमांचे पालन करणे आवडते. एकमेकांचा आदर ठेवावासा वाटतो. एकमेकांवर विश्वास ठेवावासा वाटतो. एकमेकांना सहकार्य करावे असं वाटतं. नवी पिढी ही आधुनिक असते. ती उदयोन्मुख असते. तिला शिक्षण, तंत्रज्ञानाचे, विज्ञानाचे पाठबळ मिळालेले असते. या पाठबळामुळे ती स्वतःला मुक्त, स्वैर, स्वतंत्र करू पाहते. हा संघर्ष अनादिकालापासून, पिढ्यानपिढ्या चालत आलेला आहे. त्यात नवल काहीच नाही. जुन्या पिढीला, आपले अधिकार सोडवत नाहीत आणि नव्या पिढीला जुन्या पिढीची बंधनं स्वीकारावीत, असे वाटत नाही. हा संघर्ष अटळ आहे. दोघांचा एकमेकांबद्दलचा विचार प्रवाही होईल, तेव्हाच दोन पिढ्यांमध्ये मधुर नातं निर्माण होईल. त्यासाठी प्रत्येकाने एकमेकांच्या मतांचा आदर केला पाहिजे. एकमेकांना स्वातंत्र्य दिले पाहिजे. एकमेकांसाठी थोडी मोकळी जागा ठेवली पाहिजे. तर आणि तरच, पिढ्यापिढ्यांमधला स्नेहबंध जुळून राहील. अन्यथा, दोन पिढ्यांमधील संघर्ष घरासाठी, समाजासाठी, राज्यासाठी, देशासाठी आणि संपूर्ण विश्वासासाठी घातकच ठरू शकतो. ही काळ्या दगडावरची रेघ आहे!

**प्रा.बी.एन.चौधरी**, देवरुप, नेताजी रोड, धरणगाव जि. जळगाव. ४२५१०५. मो. ९४२३४९२५९३

## 48. कथा - शबरीची भाकरी - श्री आनंदहरी



ऐंशी पार केलेली म्हातारी जनाआज्जी काठी टेकतच पण एखादया दहा-बारा वर्षाच्या पोरीसारखी तरातरा चालत वावरात आली. सडसडीत देहयष्टी असणारी जनाआज्जी अजूनही रानातली कामे करत होती. वय झाले असले तरी, चालण्याची आणि कामाची गती थोडीशी मंदावली असली तरी, काम करण्याचा उत्साह तसूभर कमी झाला नव्हता.. ती कोंबडा आरवायच्या आत उठून कामाला लागत होती आणि रात्री उशिरा भुईला पाठ टेकत होती.

देशमुखांच्या रानात भुईमूग काढायचे काम चालले होतं. वावरात आलेली जनाआज्जी तिकडं वळली. भुईमुगात बांधाला एकेक काकरी तूर टोकली होती.. तूर बऱ्यापैकी फोफावली होती त्यामुळं तिथं काहीशी सावली होती.. जनाआज्जीला रानात आलेली पाहताच गडी म्हणाला,

“म्हातारे, हिकडं सावलीत बस.. ”

जनाआज्जी गड्यानं सांगितले तिथं गेली.. गड्यानं तिथं किलतान अंथरलं आणि म्हणाला,

“म्हातारे, बस सावलीला.. याल उपटून आणून टाकतो. “

डोईवरची रिकामी पाटी आणि काठी बाजूला ठेवून ती सावलीत विसावली.. पदराने घाम पुसला. तेवढ्यात गड्यानं भुईमुगाच्या वेलांचा कवळा तिच्यापुढे टाकला. ती तुरीच्या जाळीदार सावलीतच जराशी पुढं सरसावली. उजव्या हाताने पाटी जरा जवळ ओढली.

पुढ्यातले वेल घेतले आणि सरसर शेंगा तोडायला सुरवात केली.. ठिकठिकाणी सावलीला बायका शेंगा तोडत बसल्या होत्या. दोन गडी भुईमुगाचे वेल तोडून कवळ्याकवळ्याने आणून बायकांसमोर टाकत होते..

दुपारची जेवायची सुट्टी झाली तशा सगळ्याजणी जेवायला बसल्या.. जेवताना चार - सहाजणींचे एक असे चार-पाच वेगळे सुभे झाले होते. कुणाकुणाच्या कसल्या कसल्या गप्पा सुरु झाल्या होत्या. कुणी कौटुंबिक गप्पा मारत होते.... कोणी कामाबद्दल बोलत होते.

“मालक याचं हायती.. उठा न कामाला लागा बगू.. ”

“मालक? कोण मालक? “

जनाआजीनं आश्चर्याने विचारले.

आबासाहेब देशमुख सरकार जाऊन बरीच वर्षे लोटली होती. ते होते तोवर त्यांची शिवारफेरी कधीच चुकली नव्हती. रानात पीक असू दे नाहीतर नसूदे.. दिवस मावळायला लागला की आबासाहेबांची पावले शिवाराकडे वळत होती. आबासाहेबांचे रुबाबदार व्यक्तिमत्व रस्त्याने निघाले की सारी बघतच रहायची. डोईवर कोशापटका, हातात चांदीची मूठ असणारी वेताची काठी, पायात कऽर्र ऽऽ कऽर्र वाजणाऱ्या कापशी वहाणा.. रस्त्यावरून येणारे रामराम घालून बाजूला सरकत. एखाद्या राजाला असावा तसाच मान सारा गावच नव्हे तर सारी

पंचक्रोशी आबासाहेबांना देत होती.. त्यांचा आदर करत होती. आणि आबासाहेब गावासाठी, पंचक्रोशीसाठी राजाच होते. रयतेवर पोटच्या पोरांसारखी माया करणारा राजा.

‘मालक’ म्हणल्यावर जनाआज्जीला आबासाहेबांचीच आठवण झाली होती. आबासाहेबांच्या पश्चात वाड्यात फक्त त्यांची पत्नी होती. त्यांचा एकुलता एक मुलगा दिल्लीला होता. आबासाहेबांच्या मुलाला शेती-मातीत रस नव्हता. तो गावाकडं फारसा फिरकतही नव्हता.. आणि कधी आलाच तर एखाद-दुसरा दिवस पाहुण्यासारखा यायचा. शेत-शिवारातली माती त्याच्या पावलाला कधी लागली असेल की नाही कुणास ठाऊक? त्यामुळे आबासाहेबांच्या माघारी गड्या-मजुरांनी, शेती-भातीने ‘मालकाला कधी पाहिलेही नव्हतं.

“मालक? कोण मालक? “

जना लआज्जीने पुन्हा विचारलं.

“आगं आज्जे, आबासाहेबांचा नातू याचा हाय? “

‘आबासाहेबांचा नातू? ‘ जनाआज्जीलाच नव्हे तर सगळ्यांच्याच मनाला प्रश्न पडला होता. आजवर बघायचं तर राहू देच पण त्या नातवाबद्दल कुणी साधे ऐकलेही नव्हते.

“आबासाहेबांचा नातू? खरं सांगतुयास? “

“तुजी आन आज्जे, खरंच सांगतूय.. ”

“माजी आन घेतुयास.. मी मेल्याव काय तुला सुताक-बिताक लागणार हाय वी..? माज्या मरणावं कशापायी टपलायस रं “

लटक्या रागाने पण काहीसं हसत जनाआज्जी म्हणाली. तशी तिथल्या बायकात खसखस पिकली.

“न्हाय गं न्हाय आज्जे, तुज्या मरणाव मी कशापायी टपतुय? तू काय मला दत्तक घेतलंयस वी? आगं आज्जे, खरंच सांगतुय.. वाड्यावनं सांगावा आलाय.. “

आबासाहेबांचा नातू येणार म्हणल्यावर सगळेच खुश झाले. कितीतरी वर्षांनी आबासाहेबांचा, देशमुखवाड्याचा वारस येणार होता. भेटणार होता.. जनाआज्जीच्या मनात आठवणींचे ‘म्हव’ उठलं होतं. कामात तिचा हात सरसर चालत होता. पण मनात अनेक आठवणी, अनेक विचार पिंगा घालू लागले होते.

‘कसा दिसत आसंल आबांचा नातू? आबांवानी आसंल का ....? आन त्येचा सोभाव कसा आसंल? ‘ अनेक प्रश्नांची पाखरं मनाच्या आकाशात भिरभिरू लागली होती. तिचे डोळे आबांच्या नातवाला पहायला अधीर झाले होते, आणि मन त्याचा स्वभाव जाणायला.

जनाआज्जीला दुष्काळाचे दिवस आठवले. सार्‍या मुलखात दुष्काळ होता. रानात पीक उगवलेच नव्हतं, कणग्या रिकाम्या.. खायला अन्न नाही आणि प्यायला पाणी नाही. हाताला काम नाही आणि हातात पैका नाही. जगायचं कसं? सरकारने रोजगार हमीची कामं काढली होती पण ती लांब होती.. काय करायचं, पोरं, ढोरं कशी जगवायची...? कित्येकांनी ढोरं सोडून दिली होती.. तेही बिच्चारी मुकी जनावरं.. कुठंतरी जातील, काहीतरी खाऊन जगतील.. एवढीच मिणमिणती आशा काळजात तेवती ठेवून..

काही दिवस तसेही रेटले होते.. हळूहळू धीर सुटू लागला होता.. जे काही होईल ते याच मातीत असा विचार करणाऱ्यांचाही धीर सुटू लागला होता. गाव सोडून जायचा विचार मनात येऊ लागला होता.. शेजारपाजारचा मुलुख परागंदा झाला होता पण देशमुखांचे गाव अजूनतरी हलले नव्हते... पण किती दिवस? मनामनाला प्रश्न सतावत होता.

देशमुखांच्या वाड्यानंही होतं नव्हतं ते गावाला देऊन गाव जगवलं होतं.. तगवलं होतं.. पण कुबेराचाही खजिना रिता व्हावा अशी परिस्थिती तिथं देशमुख कुठं पुरे पडणार होते? आबासाहेब सचिंत बसले होते. काय करावं हे त्यांनाही सुचत नव्हतं. सरकार-दरबारी मदतीची विनंती करून झाली होती.

"आबा, लई उपकार झालं तुमचं.. पर आता जातो घाटाखाली.. पोरा-बाळास्नी दोन घास तरी मिळतील.. "

आबांनी वर पाहिलं होतं. काहीजण हताश मनाने गाव सोडण्यासाठी आबांच्या परवानगीची वाट पहात होते. आबांनी मालकिणीला हाक मारली..

"काय आसंल नसंल ती शिजवा.. चाराच्या जागी दोन घास खाऊ पर समदी मिळून खाऊ..

आन तुम्ही मी माघारी येस्तंवर कड काडा.. गाव सोडू नका. "

काहीसा विचार करून आबासाहेब म्हणाले होते.. आणि क्षणातच आबांसाहेबांची फटफटी गावाबाहेर गेली होती.

दुष्काळात आबासाहेबांच्यामुळे गावातल्या कुणालाच गाव सोडून जावं लागलं नव्हतं. त्यांनी त्यांच्या पाहुण्यांकडून लागेल तसे धान्य, वैरण आणली होती.. कृष्णेकाठच्या पाहुण्याचा पाण्याचा टँकर रोज गावात येत होता. दुष्काळात तगून राहणे गरजेचे होतं.. सगळं गाव आबासाहेबांमुळे तगून राहिलं होतं.

आबासाहेबांनी श्रमदानातून डोंगराकडं तलाव खोदायचा विचार मांडला.. आणि सगळ्या गावाला हाताला काम मिळाले. श्रमदानाने तलाव भलामोठा पाझर तलाव डोंगराकडे तयार झाला होता.

उन्हाळा सरला, पावसाळा सुरू झाला. राने हिरवीगार झाली, विहिरी भरल्या, तलाव भरला सालो-साल रानात पिकं डोलायला लागली.. पण दुष्काळातले ते दिवस गाव विसरला नव्हता. त्या दिवसांची गोष्ट त्यावेळच्या कळत्या पिढीकडून, न कळत्या पिढीला सांगितली जात होती.

जनाआज्जीला ते सारे आठवत होते. दुष्काळाचे दिवस सरल्यावर तिला वाटायचं, ' आपण, सारं गाव आबांच्या या ऋणातून उतराई कसे होऊ शकेल? ' आबांनी गावाला दिलेले जीवनदानच होते ते.. त्या ऋणातून कसे उतराई होता येईल? कधीच उतराई होता येत नाही. ' सारं गाव ऋण मानत होतं पण आबासाहेब.?

आपण काही विशेष केलंय असे कधी त्यांना वाटलंच नव्हतं. त्यांच्या बोलण्या-वागण्यातून किंचितही कधी जाणवतही नव्हतं.

जनाआज्जीला वाटायचं, ' उतराई तर कधीच होता येणार नाही पण कधीतरी आबांनी आपल्या या झोपडीत येऊन आपल्या हातचे दोन घास खावेत. ' पण मनातली इच्छा मनातच राहिली होती. ती कधी आबांना तसे म्हणायला धजावली नाही. नवऱ्याजवळ, लेकरांजवळ म्हणाली पण त्यांनी तिला खुळ्यातच काढली. ' येवडा

तालेवार राजा माणूस, आपल्या झोपडीत ईल व्हय? उगा खुळ्यागत काय-बाय इचार करू नगं.. ' एकदा नवऱ्यानं दटावले.. तसे जनाआज्जीची इच्छा मनातून गेली नाही पण ओठाआड राहिली.

दिवस सरत गेले. गाव बदलत गेले, गावातली तरुणाई कामाधंद्यासाठी मुबंईकर झाली.. आबासाहेब गेले. जनाआज्जी मात्र ना दुष्काळ विसरली होती ना मनात दडपून राहिलेली अपुरी इच्छा!

"मालक आलं ऽ मालक आलं ऽऽ! " कुणीसं म्हणालं. तसे मालकांना बघायच्या उत्सुकतेने जनाआज्जी उठून उभी राहिली. खळ्याकडून गड्यांसोबत मालक येत होते. जनाआज्जी डोळे विस्फारून पाहू लागली.. तीच आबासाहेबांची चाल, तोच चेहरा मोहरा.. पॅन्ट-शर्ट घातलेले आबासाहेबच जणू.. जनाआज्जी क्षणभर पहातच राहिली.

आबासाहेबांचा नातू रोज शिवारातून फिरत होता. आधी गड्यासोबत नंतर मात्र एकटाच.. अगदी आबासाहेबांसारखाच ज्येष्ठांना नमस्कार म्हणत.. विचारपूस करत.. साऱ्या गावात आबासाहेबांची आठवण पुन्हा तीव्रतेने जागी झाली होती..

सुगीची कामे जोरात सुरू होती.. दिवस मावळेपर्यंत सारं गाव शिवारातच असायचं.. मग घरी परतले की चुली पेटायच्या. जनाआज्जी झोपडीत आली तेंव्हा अंधारून आले होते.. तिनं झोपडीत आल्यावर हातपाय धुवून कंदील लावला. घोटभर पाणी पिऊन चूल पेटवून त्यावर तवा ठेवला. वैलावर दुधाचं पातेले ठेवलं आणि शिक्यावरची सकाळच्या कोरड्यासाची डिचकी खाली काढुन घेऊन परातीत भाकरीचे पीठ मळायला घेतलं.. भाकरी थापून तव्यावर टाकणार तेवढ्यात हाक आली,

"आज्जी, आहेस का घरात? "

'ह्या वक्ताला.. आन अशी कोण हाक मारतंय? ' म्हणत तव्यात भाकरी टाकून जनाआज्जी उठली. दारात आली.

"मालक, तुम्ही? "

समोर आबांच्या नातवाला पाहून ती गडबडून गेली.. 'आत या ' म्हणायचे भान ही तिला राहिले नाही.

"आज्जी, येऊ ना आत? "

आपली चूक लक्षात येऊन खजील होत, दारातून मागे सरत गडबडीने म्हणाली,

"या ऽऽ! या की मालक आत."

स्वतःला सावरून तिने दांडीवरचे घोंगडं खाली अंथरले.. अचानक आबांच्या नातवाल घरी आलेले पाहून ती आचंबीत झाली होती.. काय करावं? काय बोलावं? तिला काहीच सुधरत नव्हतं. ती त्याच्याकडे पाहतच उभी राहिली होती.

"आज्जी, चुलीवरची भाकरी करपंल.. "

तो म्हणाला तशी जनाआज्जी भानावर आली. पटकन चुलीजवळ गेली..

"आज्जी, परवा तू कांताआज्जीला म्हणत होतीस ते मी ऐकलंय.. तुझ्या हातची कोरभर भाकरी खायला आलोय मी.. आणि मला करपलेली भाकरी आवडत नाही बरं का? "

हसत हसत तो म्हणाला.

जनाआज्जी जास्तच गडबडली, एकीकडे मनाला आनंद झाला होता. दुसरीकडे खंत.. ' अचानक दारात देव यावा अन आपल्याला काहीच उमगू नये.. ' तशी गत झाली होती. त्याचं वाक्य ऐकून काय करू न काय नको? असे तिला झालं होतं.

आपण कोरड्यास केलेलं नाही.. सकाळचंच शिळं कसे वाढायचे.?

"अवो पर मी कालवण काय बी केलेलं नाही. थांबा वाईच करते कायतरी.. "

"आज्जी, जे असेल ते खाणार आहे. तेल चटणी भाकरी दे. "

"अवो पर.. "

"लवकर वाढ, भूक लागलीय! "

"कोरड्यास दुपारचं हाय, शिळं.. थांबा वाईच, तव्यात लगीच झुणका टाकते.. "

"नको, आगं तुझा नातू आहे मी. जे तू खाणार तेच मी खाणार.. नाही म्हणालीस तर जातो मी.. "

काहीशा लटक्या रागाने बोलल्यासारखा तो म्हणाला.. खरंच तो उठून जाईल असे वाटून गडबडून जनाआज्जी म्हणाली,

"नगं ऽनगंऽऽ! जाऊ नगासा.. "

तिनं पटकन उठून त्याला पाण्याचा तांब्या दिला. घरातली एकमेव पितळी थाळी पदरानंच पुसली त्यात खरपूस भाजलेली भाकरी घातली. बाजूला मिरचीचा ठेचा घातला आनं थाळी त्याच्या पुढं ठेवून एका वाटीत गरम दूध अन दुसऱ्या वाटीत गरम केलेलं दुपारचंच कोरड्यास घालून त्याच्या समोर ठेवलं.

"हं! घ्या देवाचं नाव.. "

त्यानं हसत हसत ' जनाआज्जी' म्हणून भाकरीचा तुकडा मोडला.

जनाआज्जीने परातीत दुसऱ्या भाकरीसाठी पीठ मळायला घेतलं... पीठ मळता मळता ती तृप्त पणाने त्याच्याकडे पहात होती. तो काहीतरी विचारत, बोलत आनंदाने भाकरी खात होता. जनाआज्जीला देवळात प्रवचनात ऐकलेली शबरीची गोष्ट आठवली. आणि ती शबरीच्याच तृप्त मनाने, आनंदाने या शबरीची भाकरी खाणाऱ्या त्याच्याकडे पहात राहिली होती.

**श्री आनंदहरी**, इस्लामपूर जि. सांगली – मो ८२७५१७८०९९

## 49. कथा - कथा 'त्या' सम्राटाची… - सौ पुष्पा नंदकुमार प्रभुदेसाई



बाजी दररोज सकाळी उठल्यानंतर, दारासमोर बांधलेल्या गोठ्यातल्या 'कस्तुरी' गाईला हात जोडायचा. खरंतर गोठ्यात आणखीही चार-पाच जनावर होती. पण बाजी आणि त्याची कारभारीण- रखमा दोघांचाही कस्तुरीवर अपार जीव होता. रोज सकाळी तिच्या अंगावरून, डोक्यावरून तिच्या शिंगांमध्ये थोडसं खाजवून झालं की, मग बाजीचं काम सुरू व्हायचं.

आता कस्तुरीला बाळ होणार होतं. त्यामुळे तिचं आणखीनच कोडकौतुक चालू होतं. एकदा तर रखमानं तिची ओटी भरली.. म्हणजे तिच्या पुढ्यात तांदूळ, ब्लाऊज पीस आणि नारळ ठेवला. तिला पुरणपोळी खाऊ घातली. कस्तुरीला काहीच कळत नव्हतं काय चाललंय ते. पण रखमाचीच हाऊस दांडगी! . रखमा आणि बाजीमधे गप्पा चालायच्या. आपल्या कस्तुरीला मुलगी -पाडी झाली तर, काय नाव ठेवायचं बरं? आणि मुलगा म्हणजे खोंड झाला तर काय नाव ठेवायचं? दोघेही वेगवेगळ्या नावांचा विचार करायचे होणाऱ्या बाळाबद्दल.

यथावकाश कस्तुरी बाळंतीण झाली. पुत्ररत्न -- खोंड झाला. कोसा रंगाचा, सुंदर गोंडस रूप होतं त्याचं. बाललीला बघत रहाव्यात अशा. तोंडात आचळ धरून दूध पिता पिता तो ढुशा मारायचा आईला. कस्तुरीला पुरे करायचा. तरी कस्तुरी त्याला वात्सल्याने, प्रेमाने चाटत राहायची. बाजीही कस्तुरीची धार फारशी काढत नसायचा. तिच्या बाळालाच दूध प्यायला सोडायचा. बाजी रखमाला म्हणायचा, " ए रखमे कसा मस्त पैलवान करतो बघ याला. पंचक्रोशीत नाव कमावायला पाहिजे याने. " रखमा ही अधूनमधून दृष्ट काढून टाकायची त्याची. आता त्याचं नाव ठेवायची चर्चा सुरू झाली. रखमा, मुलं, बाजी सर्वांच्या मतानुसार खोंडा च नाव " सम्राट "असं ठरलं. चांगलं भारदस्त नाव! नावाप्रमाणे सम्राट व्हायला पाहिजे त्यानं! .

आता सम्राट मोठा झाला. खूपच हूड झाला. दोरी बांधली तर सर्वांनाच पळवत न्यायचा. कोणालाच ऐकत नव्हता. जिल्ह्यात एकदा जनावरांचं प्रदर्शन होतं. बाजीनी सम्राटला छान सजवलं. घुंगराची माळ काळ्या दोरीत बांधून ती त्याच्या गळ्यात घातली. शिंगं रंगवली. त्याला अंघोळ घालून छान स्वच्छ ठेवलं. आता त्याचं शरीरसौष्ठव आणि सौंदर्य छान खुलून दिसायला लागलं. प्रदर्शनासाठी घेऊन गेला त्याला. शरीरसौष्ठवामधे सम्राटचा पहिला नंबर आला. घरातल्या सगळ्यांच्याच आनंदाला बहर आला. सगळे सम्राटला मिठ्या मारायला लागले. सम्राट थोडा मोठा झाला आणि आता बैलगाडीची शर्यतही त्यानी जिंकली. पंचवीस हजाराचं बक्षीस मिळवलं त्यानं! . बाजीला आपल्या सम्राटचा खूप अभिमान वाटायचा. तो रखमाला म्हणायचा, " बघ रखमे सम्राटनं आपलं नाव कसं खरं करून दाखवलंन. आणि आपल्या नावाचीही प्रसिद्धी करून दिलीन ना! कसा आहे ना आपला पठ्ठ्या.

सम्राट आता मोठा झाला त्यामुळे साहजिकच बैलगाडीचं जू त्याच्या मानेवर आलं. त्याचं रूपही देखणं आणि ऐटबाज झालं होतं. शिंग डौलदार झाली होती. चालायला लागला की, गळ्यातल्या घुंगरांच्या तालावर ऐटीत चालायचा. एखाद्या सम्राटासारखा. गावाच्या जत्रेत बाजीने सम्राटला, शिंगाला बांधायला गोंडे आणि झूल घेतली होती. सम्राटपेक्षा बाजीलाच हौस मोठी! . सम्राट कधीच काही मागत नव्हता. आता बाजी त्याला रोज शेताकडे घेऊन जायला लागला. बैलगाडीचे जू उचलले की, लगेच सम्राट जवळ जाऊन आपली मान जूच्या खाली टेकवायचा. किती आज्ञाधारकपणा ना त्याचा! . काही न बोलता जणू शब्देविण संवादू असं, "चला तयार आहे मी " असं जणू म्हणायचा. बेंदूर आला आणि सम्राटची शिंगं रंगवली गेली. अंगावर वेगवेगळ्या रंगांचे छाप उमटवले गेले. बाजी रोज देवाची पूजा झाली की कस्तुरीला आणि सम्राटला कुंकू लावायचा. सम्राटचं रुप आणखीनच उठून, खुलून दिसायचं. रोज शेताकडे जाताना सम्राटच्या चालीच्या ठेक्याबरोबर गळ्यातले घुंगुरही वाजायचे. आणि त्याच तालावर बाजीचं गाणंही चालू असायचं. शेतात पोचले की, गाडी सोडायची. सम्राटला झाडाखाली सावलीला बसवायचं. सगळी काम झाली की, घराकडे परतीची वाट धरायची. कित्येकदा बाजीला गाडीत झोपही लागायची. घर आलं की गाडी थांबायची. मग बाजीला जाग यायची. अंधार व्हायला लागला की सगळ्या जित्राबांना, सम्राटला कडबा, वैरण, पाणी करून मग घरातली सगळ्यांची जेवण व्हायची.

आज घरात बराच दंगा झाला. रखमा आणि मुलं एकत्र झाली. आणि बाजीबरोबर त्यांची खडाजंगी भांडणं झाली. बाजी रागाने लाल झाला होता. आरडाओरडा चालला होता. बाजीला आज काही झालं तरी शेतात जाणं भाग होतं. शेतात भांगलण चालू होती. भांगलायला बायका यायच्या होत्या. घरात राहून वणवा आणखीनच पेटणार, त्यापेक्षा शेताकडे गेलेलं बरं, असं म्हणून तो घराबाहेर पडला. अंगात राग मुसमुसत होता. पण राग कोणावर काढणार? कोण ऐकून घेणार होत त्याचं? सम्राटला बाहेर बांधलं असलं तरी त्याला जणू सगळं कळत होतं म्हणाना. तोही जरा बेचैनच होता. बाजीन गाडीचं जू उचललं पण सम्राट पटकन आला नाही जवळ. आधीच पेटलेला बाजी सम्राटवर खवळला. आणि चाबकाचे आसूड ओढलेन त्याच्या अंगावर. तूही माझ्या विरोधात काय रे? असं म्हणून थपडा दिल्यान त्याला. सम्राटनेही आज्ञाधारकपणे आपली मान जूच्या खाली टेकवली. आणि दोघे निघाले शेतात. जाताना आज बाजीचं गाणं गुणगुणणं नव्हतं. घुंगरांच्या आवाजाकडेही त्याचं लक्ष नव्हतं. शेतातही तो गप्प गप्पच होता. डाळ, कांदा, भाकरी खाणं झालं. दिवस कलंडायला लागला. घरातल्या जत्राबांसाठी गाडीत वैरण टाकली. तरीही बाजी गप्प गप्पच होता. बाकीचे विचारत होते, " काय रे बाजी काय झालं? आज काय बोलत न्हाईस. गप्प गप्प का र? " “काय न्हाय" असं म्हणून पुन्हा बाजी गप्प झाला. थोडं पाणी प्याला. पण त्याला बेचैन, कसंतरी होत होतं. परतीसाठी गाडीत बसला. आणि बेचैनी वाढायला लागली. गाडी चालतच होती. बाजीला चक्कर आल्यासारखं वाटायला लागलं. घामाने चिंब भिजला. गाडीतच वैरणीवर आडवा झाला. सम्राटशी काय बोलला ते त्याचं त्याला तरी कळलं की नाही कोण जाणे! . सम्राटची पावलं भराभरा पडायला लागली. गाडी दाराशी आली. सम्राटनंही मोठ्या विचित्र आणि कर्कश्य आवाजात हंबरडा फोडला. हं भाँ, हं भाँ, भाँ.. घरातल्यांना काहीच कळेना. आज गाडी लवकर कशी आली.? सम्राट असा विचित्र का ओरडायला लागलाय? सगळेजण बाहेर आले. पाहतात तो बाजी वैरणीवर आडवा पडलेला होता, बेशुद्धसारखा. सगळ्यांनी त्याला उचलून खाली घेतलं. तोंडात पाणी घातलंच. पाण्याचा घोट

घशाखाली उतरला. लगेचच वेळ न दवडता, बाजीला दवाखान्यात नेलं. डॉक्टरांनी तपासून लगोलग उपचार सुरू केले.

बाजीला थोडं बरं वाटायला लागलं. पण त्याच्या डोळ्यासमोर सारखा सम्राटचा चेहरा यायला लागला. मी त्याच्यावर आसूड ओढले, पण बेशुद्धावस्थेत. त्यानेच मला घरी आणलं. मी त्याचे कसे उपकार फेडू बर?

बाजीला आता बरं वाटायला लागलं. डॉक्टरांनी डिस्चार्ज दिला. आणि सांगितलं.. " लवकर आलात म्हणून बरं झालं. उशीर केला असतात तर काही खरं नव्हतं. बाजी घराच्या दाराशी आला. सम्राटसमोर जायला त्याला लाजिरवाणं आणि अपमानास्पद वाटत होत. आपल्याला सम्राटमुळे जीवदान मिळालं असं त्याला वाटत होतं.

बाजी घरातून बाहेर आला. सम्राटच्या जवळ गेला. त्याच्या अंगावरून, तोंडावरून हळुवार हात फिरवायला लागला. त्याच्याशी बोलायला लागला. ' सम्राट, अरे तुझी काहीही चूक नसताना, काहीही कारण नसताना मी तुझ्यावर चापकाचे आसूड ओढले. तुला फटके दिले. घरातला राग मी तुझ्यावर काढला रे SSS. काय प्रायश्चित्त घेऊ मी सांग बर?' सम्राट बाजीच्या खांद्यावर आपली मान घासायला लागला. जणू म्हणत होता, " तू मला लाडानं वाढवलंस ना! आणखी काय हवं मला! " बाजीच्या डोळ्यातली आसवं थांबत नव्हती. माझा सम्राट नसता तर आज मी वाचलो नसतो. तोच माझा जीवनदाता खरा.... जीवनदाता सम्राट .... सम्राट.

*(सत्य घटनेवर आधारित कथा.)*

**सौ. पुष्पा नंदकुमार प्रभुदेसाई,** 'पुष्पानंद' बुधगावकर मळा रस्ता मिरज, जि. सांगली फो नं. ०२३३-२२१२१५१ मो. ९४०३५७०९८७



50. कविता - सूर्य नारायणा... - प्रा. सौ. सुमती पवार



*उठा उठा हो.. सूर्य नारायणा..*
*जगदोद्धारा हे ओंकारा करुणानिधी पावका..*

*आपण उठता जगही उठते चराचर सृष्टी*
*पावन आहे पवित्र आहे सजल आपली दृष्टी*
*ललना जागती घराघरातून सारवती अंगणा..*
*उठा उठा हो...*

*प्रभात समयी गृहस्वामिनीची किणकिणती काकणे*
*सडा सारवण करता त्यांची रूणझुणती पैंजणे*
*प्राजक्ताचा सडा पाहता प्रसन्न हो वदना..*
*उठा उठा हो...*


*गंधधुंद ते वृक्षही सारे प्रसवती चंदना*
*वायुसंगे लहरी येती सुखावती हो मना*
*दवबिंदूंनी नटुनी धरा ही करते खाणाखुणा..*
*उठा उठा हो..*

*विहंग विहरती गाती गाणी किलबिलती कोटरे*
*गायी निघती माळावरती तृप्त करून वासरे*
*शेवंती नि फुले केवडा स्वागतास या ना..*
*उठा उठा हो..*

**प्रा. सौ. सुमती पवार नाशिक मो ९७६३६०५६४२ svpawar6249@gmail.com**

51. चित्रकाव्य - गंधित समीर चैतन्याचा… – श्री आशिष बिवलकर





प्रकाश मांगल्य! दिवाळीचा सण!

राहो आठवण! वर्षभर!! १!!

सवत्स धेनूचे! मंगल पूजन!

करती सज्जन! भक्तीमय!! २!!

धन्वंतरी वैद्य! वैद्यकीय सेवा!

आरोग्याचा ठेवा! आयुर्वेद!! ३!!

अभ्यंग स्नानाने! देह मन शुद्ध!

अष्टलक्ष्मी बद्ध! कृपा दृष्टी!! ४!!

बली प्रतिपदा! मंगल पाडवा!

नात्यात गोडवा! वृद्धिंगत!! ५!!

बहीण भावाचा! दिन भाऊबीज!

नाती सुख चीज! ओवाळणी!! ६!!

बिब्बा दीपावली! सारते तिमिर!

गंधित समीर! चैतन्याचा!! ७!!

श्री आशिष बिवलकर, बदलापूर मो 9518942105

## 52. लेख - भारतीय प्रजासत्ताकाची ७५ वर्षे — सुश्री मंजुषा सुनीत मुळे



आपला भारत देश दीडशे वर्षे पारतंत्र्यात होता हे आपण जाणतोच. पण एक प्रकारे इ. स. १७५७ ते १९४७ असा अंदाजे १९० वर्षांपेक्षाही जास्त काळ आपला भारत देश ब्रिटिशांच्या ताब्यात होता असेही म्हटले जाते. असंख्य देशभक्तांच्या अनेक वर्षांच्या अविरत प्रयत्नांमुळे, असामान्य त्यागामुळे, भारत ब्रिटिश राजवटीतून पूर्ण मुक्त झाला तो दिवस होता १५ ऑगस्ट १९४७.. आपला स्वातंत्र्यदिन.

देश स्वतंत्र झाल्यानंतर " आता यापुढे स्वतंत्र भारत हे एक सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष आणि लोकशाही 'प्रजासत्ताक' देश अशी ओळख धारण करेल " यावर तेव्हाच्या समाजधुरिणांचे मतैक्य होऊन, भारतीय संस्कृती, नीतिमत्ता, आणि आदर्शवाद, तसेच समाजातल्या वेगवेगळ्या घटकांमध्ये बंधुभाव आणि एकोपा राखणे.. अशासारख्या तत्वांना अधोरेखित करणारी राज्यघटना लिहिण्याचे काम सुरू करण्यात आले. २६ जानेवारी १९५० रोजी ही राज्यघटना सादर करण्यात आली...भारत हा अधिकृतपणे 'प्रजासत्ताक' देश म्हणून घोषित झाला तो हा ऐतिहासिक दिवस. आणि ही घटना-निर्मिती हा भारताच्या इतिहासातला मैलाचा दगड ठरला.

या वर्षी या घटनेला बघता बघता ७५ वर्षे पूर्ण झाली. हा सगळा कालखंड अनेक दिशांनी अनेक प्रकारे देशात परिवर्तन घडवणारा ठरला आहे, आणि या दृष्टीने या ७५ वर्षांत देशात काय काय घडले, काय घडते आहे याचा धावता आढावा घेण्याचा हा एक प्रयत्न......

या ७५ वर्षांमध्ये देशाला प्रगतीपथावर नेणाऱ्या अनेक चांगल्या गोष्टी घडल्या आहेत... घडत आहेत. त्या सकारात्मक गोष्टी प्राधान्याने विचारात घ्यायला हव्यात.....

सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे, स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लगेचच देशाच्या आर्थिक आणि सामाजिक विकासासाठी अनेक दिशांनी जाणीवपूर्वक प्रयत्न सुरू झाले. त्या दृष्टीने आर्थिक क्षेत्रातलं पहिलं मोठं पाऊल म्हणजे, ब्रिटिश राजवटीत १९२१ साली अस्तित्त्वात आलेल्या 'इंपिरिअल बँकेचं' राष्ट्रीयीकरण करून देशाची कमर्शियल बँक म्हणून तिचे 'स्टेट बँक ऑफ इंडिया' असे नामकरण १९५५ साली करण्यात आले. या मागचा मुख्य उद्देश हा होता की स्वतंत्र भारताच्या सरकारने सामाजिक आणि आर्थिक सुधारणांच्या दृष्टीने जी ध्येयं ठरवली होती त्यांच्याशी बँकिंग क्षेत्राची सांगड घालणे. स्वातंत्र्यपूर्व काळात काही मोजक्याच धनाढ्य आणि सामर्थ्यवान कुटुंबांकडून बँका नियंत्रित केल्या जात, ते नियंत्रण राहू नये आणि बँकिंग सुविधा अधिकाधिक लोकाभिमुख व्हाव्यात, सामान्य जनतेसाठी आणि देशातल्या ग्रामीण भागातही त्या अधिकाधिक प्रमाणात उपलब्ध व्हाव्यात, हा यामागचा महत्वाचा उद्देश होता. देशाची व्यावसायिक प्रगती, अनेकविध उद्योगधंद्यांची निर्मिती आणि वाढ यासाठी अर्थसहाय्य, विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी कर्ज, शेतीसाठी कर्ज ...असे अनेक उपक्रम हाती घेतले जाऊ लागले. मग काही वर्षांनी अनेक बँकांचे बहुतांशी याच हेतूने राष्ट्रीयीकरण, अशा कितीतरी योजना सातत्याने आजही राबवल्या जात आहेत.

सर्वसामान्य नागरिकांचे रोजचे जगणे सुधारावे, सुलभ व्हावे, या महत्वपूर्ण हेतूने केल्या जाणाऱ्या प्रयत्नांचा आणखी एक मोठा भाग म्हणजे सरकारच्या पंचवार्षिक योजना, ज्या प्रगतीच्या वेगवेगळ्या क्षेत्रांसाठी सातत्याने राबवल्या जात आहेत. याच्या जोडीनेच, स्वतंत्र भारत जगाच्या, विशेषतः इतर प्रगत देशांच्या बरोबरीने रहावा यासाठी प्रयत्न करणे हे महत्वाचे उद्दिष्टही होते आणि आहे.. कारण देशातल्या सर्व स्तरांवरील समाजाचा आर्थिक आणि राहणीमानाचाही स्तर उंचावणे, देशाचे आर्थिक परावलंबित्व आटोक्यात आणणे, जीवनावश्यक विविध उत्पादनांची आयात कमीतकमी करून अंतर्गत उत्पादन क्षमता आणि उत्पादनांचा दर्जा वाढवणे, अत्याधुनिक तंत्रज्ञान देशातच अधिकतम विकसित करणे, देशाची संरक्षण-व्यवस्था जास्तीत जास्त ताकदवान, स्वयंपूर्ण आणि अत्याधुनिक शस्त्रांनी सज्ज करणे, सगळ्या सामाजिक घटकांपर्यंत सर्वंकष शिक्षण उपलब्ध करून देणे, प्रगत शिक्षणही देशातच सहजपणे घेता यावे यादृष्टीने शैक्षणिक संस्था स्थापन करणे, या सगळ्या गोष्टी एका नव्याने स्वतंत्र झालेल्या देशासाठी अत्यावश्यक होत्या. एकूणच देशाची सर्वांगीण प्रगती करत, देश सर्वतोपरी स्वयंपूर्ण करणे हे खूप महत्वाचे आणि खूप मोठे ध्येय डोळ्यासमोर ठेवून, गेली ७५ वर्षे आपला देश जोमाने अनेकांगी प्रवास करत आहे. गेल्या काही वर्षात भारताच्या शेती उद्योगात सुरू झालेले आधुनिकीकरण, उद्योगक्षेत्राची सातत्याने अनेक प्रकारे होणारी प्रगती आणि वाढ, निर्यात क्षेत्रात झालेली लक्षणीय वाढ, भारतीय अर्थव्यवस्था जागतिक क्रमवारीत ४ थ्या क्रमांकावर पोहोचणे, ही नक्कीच याच प्रयत्नांची फलिते आहेत. या सगळ्या सर्वांगीण प्रगतीला आणखी गती मिळावी म्हणून विशेषतः गेल्या काही वर्षात केले जात असलेले आर्थिक उदारीकरण – अर्थव्यवस्थेतील सरकारी हस्तक्षेप आणि नियंत्रण कमी करून खाजगी उद्योगक्षेत्राला आणि बाजारपेठेला दिले जात असलेले प्रोत्साहन आवर्जून लक्षात घ्यावे असे आहे... परिणामतः " एक अविकसित देश " ही देशाची आधीची प्रतिमा आता पूर्णपणे पुसली गेली आहे. इतकंच नाही तर एक ' विकसनशील देश ' ही भारताची ओळखही आता हळूहळू पुसली जाऊन आपला देश लवकरच " एक विकसित देश " म्हणून ओळखला जाईल याची खात्रीच वाटते आहे.

याच उद्देशाने, या सर्वांच्या जोडीने विज्ञान तंत्रज्ञान क्षेत्रात देशाची प्रगती होण्याची तातडीची गरज ओळखून त्या दृष्टीनेही पावले उचलायला लगेचच सुरूवात केली गेलेली आहे. भारताला लाभलेल्या खगोलशास्त्र, गणित, औषधशास्त्र यांच्या फार प्राचीन वारशाच्या जोडीनेच, माहिती तंत्रज्ञान, अवकाश-विज्ञान, अणुविज्ञान, जैवतंत्रज्ञान, उत्पादन आणि नैसर्गिक संसाधन-संशोधन, अशा या क्षेत्रातल्या अनेक शाखांमध्येही संशोधन आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर सातत्याने अनेक वर्षे मोठ्या प्रमाणात केला जात आहे.. आणि दिवसेंदिवस वाढतो आहे. आणि त्यादृष्टीने ISRO, DRDO, BARC, CSIR या सारख्या अनेक संस्थाही स्थापन करण्यात आल्या आहेत. शेती, ऊर्जा, औद्योगिक उत्पादन, शिक्षणक्षेत्र यासारख्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असणाऱ्या क्षेत्रांकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले जात आहे. आता या सगळ्याच आघाड्यांवर आपला देश फक्त वाटचाल करत नाहीये.. तर त्याने बघता बघता या सगळ्या क्षेत्रांमध्ये आणि यासाठी साहाय्यभूत असणाऱ्या इतर क्षेत्रांमध्येही घोडदौड सुरू केली आहे ही अतिशय अभिमानास्पद गोष्ट आहे.

आवर्जून सांगायलाच हवी अशी या ७५ वर्षातली आणखी एक महत्वपूर्ण आणि वैशिष्ट्यपूर्ण गोष्ट ही की, ' फक्त चूल आणि मूल ' हा स्त्रियांसाठी पूर्वापार आखून दिलेला परीघ आता कौटुंबिक पातळीवरही पार पुसून

टाकला गेला आहे. सर्वच क्षेत्रात सातत्याने होत असलेल्या प्रगतीतला आणि संशोधनातला भारतीय स्त्रियांचा वाढता सहभाग खरोखरच लक्षणीय आहे. भारतीय स्त्री आता 'गौण' स्थानावर मानली जाऊच शकत नाही... वरील प्रत्येक क्षेत्रात तिचे कर्तृत्त्व ती वारंवार सिद्ध करते आहे. महात्मा फुले, महर्षी कर्वे यासारख्या धुरिणांनी स्त्री-शिक्षणाचे जे बीज महत्प्रयासाने रुजवले होते त्या बीजाचा या ७५ वर्षात एक प्रचंड आणि दणकट वृक्ष झालेला आपण गौरवाने आणि गर्वाने बघत आहोत.

आपल्या देशात एकूण २८ राज्ये आहेत. आणि यातील प्रत्येक राज्यात जनकल्याणाचे आणि राज्याच्या सर्वांगीण विकासासाठीचे बरेच वेगवेगळे प्रकल्प आणि उपक्रम सतत राबवले जात असतात, उद्योगविश्व सतत विस्तारत असते. आणि त्यामुळे पर्यायाने त्या राज्याबरोबरच देशाच्या सर्वांगीण प्रगतीलाही मोठा हातभार लागत असतो, हेही फार महत्वाचे आहे.

...... थोडक्यात सांगायचे तर ७५ वर्षांपूर्वी प्रदीर्घ पारतंत्र्यातून मुक्त झालेले आपले हे स्वतंत्र प्रजासत्ताक राष्ट्र या ७५ वर्षात आता सगळ्या जगाचे लक्ष स्वतःकडे आवर्जून ठळकपणे वेधून घेण्याइतके स्वयंसिद्ध आणि प्रगत झालेले आहे. आणि म्हणूनच आपला भारत देश हे जगातील " श्रेष्ठ प्रजासत्ताक लोकशाही गणराज्य आहे " असे अतिशय अभिमानाने म्हणता येते.

****

भारताच्या प्रजासत्ताकाच्या ७५ वर्षांचा आढावा अगदी प्रामाणिकपणे आणि तटस्थपणे घ्यायचा झाला, तर प्रत्येक नाण्याला दोन बाजू असतात, या वास्तवानुसार, आत्तापर्यंत पाहिली ती या नाण्याची अतिशय 'सकारात्मक' अशी एक उज्ज्वल, कणखर आणि कौतुकास्पद बाजू आहे यात दुमत असण्याचे अजिबात कारण नाही. पण......

.... पण दुसरी बाजू मात्र याच्या अगदीच उलट म्हणावी अशी आहे, असे नाईलाजाने, आणि एक सजग नागरिक या नात्याने अतिशय खेदाने म्हणायला हवे. गरिबी, सामाजिक विषमता, सामाजिक अशांतता अशासारख्या सामाजिक-आर्थिक आव्हानांशी देश अजूनही झगडतोच आहे हे विदारक सत्य नाकारताच येणार नाही. 'प्रजासत्ताक'... म्हणजे 'प्रजेची सत्ता असणारे राष्ट्र' ही व्याख्या सर्वसामान्य प्रजेच्या दृष्टीने फार अडगळीत पडल्यासारखीच दुर्लक्षित आहे... तिची जागा घेतली आहे... ''प्रजासत्ताक म्हणजे प्रजेवर सत्ता" या राजकारणीय व्याख्येने. देश स्वतंत्र व्हावा म्हणून कितीतरी अज्ञात देशप्रेमींनीही स्वतःचे बलिदान दिले होते, ज्यांचे स्मारक तर सोडाच, पण नावही अज्ञातच राहिले आहे हे सत्य नाकारून चालणार नाही. आणि अत्यंत खेदाची बाब म्हणजे या पार्श्वभूमीवर आता मात्र "मला पहा अन फुले वहा.. या मनोवृत्तीचे तण अति माजे" हेच वास्तव सगळीकडे ठळकपणे दिसते आहे. देशाची आणि पर्यायाने सर्वच स्तरांमधल्या भारतीय नागरिकांची सर्वांगीण आणि सर्वंकष प्रगती...उन्नती व्हावी म्हणून असंख्य योजना सातत्याने तयार केल्या जातात... त्याची अंमलबजावणी मोठा गाजावाजा करत सुरू झाल्याच्या बातम्या ठळकपणे प्रसिध्द केल्या जातात... 'आता या योजनांचा लाभ आपल्यालाही घेता येईल' या विचाराने सामान्य माणूस सुखावतोही क्षणभर... पण हे आपल्याला दाखवलेलं 'गाजर' आहे हे आता अनुभवांती सगळ्यांनाच बरेच समजायला लागले आहे. कारण

सरकार या योजनांच्याद्वारे पुरवत असलेल्या सुविधा सामान्य माणसापर्यंत पोहोचेपर्यंत वाटेत इतर अनेक मार्गांनी इतरत्र पाझरत जातात…. फायदा ज्यांना मिळायला हवा ते बाजूलाच रहातात. आणि गैरफायदा घेणारे कावळ्याच्या छत्र्यांसारखे फोफावत रहातात हे अत्यंत कटू वास्तव, कुणीही नाकारू शकणारच नाही. अशीच परिस्थिति सगळीकडे वाढत्या प्रमाणात दिसते आहे. तरुणांनी बेकारीमुळे व्यसनाधीन होऊन निरर्थक आयुष्य न जगता व्यवसायाभिमुख व्हावे, सर्वांना रोजगार मिळावा, यासाठी कितीतरी लोकाभिमुख योजना जाहीर केल्या गेल्या होत्या.. उदा. राजीव गांधी सुशिक्षित बेरोजगार योजना आणि अशा इतरही योजना. या योजना बँकांच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहोचवायच्या असे आदेश होते. त्यासाठी दर महिन्याला या योजनेअंतर्गत कमीत कमी किती तरुणांना कर्ज द्यायचे हा आकडाही ठरवून दिलेला असायचा. ही दिलेली उद्दिष्टे गाठताना एक बँक कर्मचारी म्हणून मला जे विपरीत आणि मूळ उद्दिष्ट वाऱ्यावर सोडले जात असल्याची दाट शंका निर्माण करणारे अनुभव आले होते, ते बँकेतल्या इतर कितीतरी जणांना नक्कीच आले असतील. असो. हे एक लहानसे उदाहरण झाले. अशा इतरही अनेक योजना सततच सादर होतच असतात, ज्याही अशाच त्यांच्या मूळ उद्देशापासून खूपच भरकटत जात असल्याचे, रखडत राहिल्याचे सहजपणे लक्षात येऊ शकते. राष्ट्रहितापेक्षा आता पक्षहित आणि त्याहीपेक्षा व्यक्तिगत हित मोलाचे वाटायला लागले आहे हे दारुण सत्य आता अगदी तळागाळातल्या लोकांपासूनही लपून राहिलेले नाही. आणि ही परिस्थिती दिवसेंदिवस चिघळतच चालली आहे. “ आंधळं दळतंय आणि कुत्रं पीठ खातंय ” अशीच ही खेदकारी अवस्था. स्वतःच्या हक्काची गोष्ट असूनही कुणाच्या ना कुणाच्या हातापाया पडल्याशिवाय ती मिळत नाही हे उघड सत्य कुठलाही सूज्ञ नागरिक नाकारू शकणारच नाही…या सगळ्या पार्श्वभूमीवर मला काही वेगवेगळ्या ओळी सुचताहेत.. ज्या सद्य राजकीय परिस्थितीवर भाष्य करण्यास पुरेशा आहेत असं मला वाटतं – – –

“शिवबा नि टिळक - गांधी । पस्तावुनी की गेले | यासाठी वेचलेले, आयुष्य व्यर्थ गेले ।। “

“लाज-चाड आणि तत्त्वं, गाडून खुर्ची राहे । लोकांस वगळुनीया ही लोकशाही आहे ।”

“आम्हीच आता राजे म्हणुनी.. स्वातंत्र्याला उधाण येऊनि.. जन्मे स्वैराचार … गर्जा जयजयकार ।।”

“जनसेवेचे बेगडी सोंग.. सत्कार्याचे नुसते ढोंग.. मनी पुरता कुविचार.. “

“बासनात ते नियम, कायदे.. रोज रोज ते नवे वायदे.. जनतेवर उपकार … हे जनतेवर उपकार … “

“पुंडशाहीचा जोर वाढता.. देशाला या विकू पहाता.. आत्म्याचा जोहार.. तरीही गर्जा जयजयकार.. “

— आणि आता तर बऱ्याचदा असं म्हणण्यासारखी परिस्थिती दिसते की —

“दिसतो झगमग थाटमाट वरी …. भारतभूच्या मनी दाटे परी..

निराश अंध:कार … तरीही गर्जा जयजयकार.. लोकहो गर्जा जयजयकार …. “

— — हे असे सगळे चित्र दिवसेंदिवस जास्त ठळक व्हायला लागले आहे यात जाणत्या लोकांचे दुमत नसावे. ‘प्रजासत्ताक’ शब्दाची व्याख्या आणि नियम नको त्या दिशेने अनेक वर्षांपासून वळवले गेले आहेत

आणि त्यामुळे खरी “लोकशाही“ एकीकडे खूपच “ दीन-दुबळी “ होत चालली आहे की काय अशी भीतीदायक शंका, देशावर प्रेम करणाऱ्या कुणालाही वारंवार वाटू लागणे अगदीच स्वाभाविक आहे…… ……

असो. सूज्ञास अधिक सांगणे न लगे.

… अर्थातच या कटू वास्तवाला काही सन्मान्य अपवाद नक्कीच आहेत जे खरोखरच स्वतःला वगळून देशातल्या नागरिकांचा आणि देशहिताचा मनापासून विचार करतात, त्यासाठी प्रत्यक्ष कृती करण्याचा तळमळीने विचार करतात.. त्यासाठी मनापासून प्रयत्न करतात, यात शंकाच नाही. आणि अशा संख्येने मोजक्याच पण कणखर असणाऱ्या ‘आत्ताच्या सच्च्या देशभक्तां’मुळेच गेल्या ७५ वर्षात मनापासून रेखाटले जात असलेले भारताच्या सर्वांगीण विकासाचे ठळक असे सकारात्मक चित्र आता जगाला बघता येते आहे हे निर्विवादपणे मान्यच करायला हवे… अशा सगळ्या चित्रकारांना अगदी मनःपूर्वक सलाम …

… आपला देश आज ना उद्या खऱ्या अर्थाने अधिकाधिक जनतेसाठी अधिकाधिक ‘ कल्याणकारी ‘, आणि १०० % प्रजासत्ताक देश व्हावा ही मनापासून प्रार्थना आहे……

… भारतीय प्रजासत्ताकाला अखंडपणे ७५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने सर्व भारतीयांना मन:पूर्वक शुभेच्छा!

**सुश्री मंजुषा सुनीत मुळे**



## 53. लेख - पत्नी... - श्री संदीप रामचंद्र सुंकले (दास चैतन्य)



खरं तर प्रत्येकच माणसाच्या आयुष्यातलं मनापासून जोडलं गेलेलं प्रत्येकच नातं त्याच्यासाठी खास असंच असतं. अनेक कारणांनी.. वेगवेगळ्या वेळी आणि कित्येकदा कळत नकळतही कितीतरी नाती जोडली जातात. त्यापैकी अत्यंत महत्वाचं असतं ते विवाहसंबंधातून निर्माण होणारं पत्नीचं नातं असं म्हटलं तर ते वावगं ठरणार नाही, कारण या एका नात्यात इतर अनेक नात्यांची आपसूकच गुंफण झालेली असते.

... पत्नी ही केवळ जोडीदार नसून, ती एक मैत्रीण, सखी, आई, मार्गदर्शक आणि आयुष्याची खरी सहचरी असते.

आपल्या संस्कृतीत पत्नीबद्दल नेहमीच गौरवपूर्ण उल्लेख केलेला आढळतो. " पत्नीतच पतीचे सौख्य दडलेले असते " असे म्हटले जाते. संसार नावाच्या रथाची दोन चाके असतात – पती आणि पत्नी. आणि या दोन चाकांमध्ये जर समन्वय असेल तर संसार आनंदी आणि सुखी होतो हे सर्वमान्य तत्वच आहे.

पत्नी ही केवळ घरातील कामे करणारी व्यक्ती नसते, तर ती घरातील माया, करुणा आणि प्रेमाचा स्त्रोत असते. तिच्या त्यागामुळे आणि कष्टामुळे घरात समृद्धी आणि आनंद नांदतो. एक आदर्श पत्नी आपल्या पतीच्या प्रत्येक यशात आणि अपयशातही त्याच्या सोबत खंबीरपणे उभी राहते.

आजच्या आधुनिक युगात पत्नीचं कार्यक्षेत्र केवळ घरापुरतं मर्यादित नसून ती शिक्षण, व्यवसाय, सामाजिक कार्य यासारख्या सर्व क्षेत्रांमध्ये पुरुषांबरोबर खांद्याला खांदा लावून कार्य करत आहे. आणि ती घरातल्या आणि बाहेरच्या अशा दोन्ही जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडते आहे ही सर्वांसाठीच अभिमानास्पद बाब असायला हवी..

पत्नी ही पतीसाठी प्रेरणास्थान असते. तिचा पाठिंबा मिळत असेल तर पुरुष कितीही कठीण प्रसंगांना सामोरे जाऊ शकतो. तिचं प्रेम, माया आणि काळजी यामुळे संसारात सुख-समाधान निर्माण होतं.

खरं तर स्त्रीची अनेक रूपे आहेत, त्यात पत्नी हे रूप थोडे अधिक विलक्षण असे आहे. अन्य नात्यांच्या सीमारेषा तुलनेने मर्यादित आहेत, पण पत्नी हे नाते अनेक कंगोरे असलेले आहे असे म्हणता येईल.

खऱ्या अर्थाने.. "Multi level and multi dimensional... "

स्वतःचे घर, नाती आणि इतर अनेक आवडत्या गोष्टी सोडून एक स्त्री लग्न करून नवऱ्याकडे येते, आणि हळूहळू त्याच्याशी.. त्याच्या कुटुंबाशी.. त्याच्या घराशी एकरूप होऊन जाते....

आणि याच अनुषंगाने, आजच्या लेखनाचा मूळ उद्देश 'स्त्री कुटुंबासाठी काय करते' हा नसून, पतीच्या घरातील मंडळी त्या स्त्रीचे कसे स्वागत करतात, तिची काळजी कशी घेतात, तिला समजून कसे घेतात हे लक्षात आणून देण्याचा आहे...

पत्नीला भार्या, सहचारिणी, घरची लक्ष्मी अशी संबोधने दिली जातात..... हे नक्कीच कौतुकास्पद आहे....

देवाची आपल्याला वाटते त्या पद्धतीने पूजा करणे ही एक पद्धत झाली. आणि दुसरी पध्दत असते ती म्हणजे देवाला त्याची जशी पूजा केलेली आवडते तशी पूजा करणे....

.... आणि सासरच्या प्रत्येक नात्यात हा विचार लक्षात घेतला जायलाच हवा.

सांगण्याचा हेतू असा की घरातील सर्व मंडळींनी, खास करून नवरोबाने आपल्या पत्नीची विचारपूस करून, तिच्याशी हितगुज करून, तिच्या मनातील स्लेज, कुठल्याही प्रकारची कटुता.. नाराजी.. मल आणि कल, तिची आवड-निवड, या गोष्टी जाणून घेऊन तिच्याशी संवाद साधण्याचा आवर्जून प्रयत्न करायला हवा आणि तिच्याशी आदरयुक्त मैत्री करायला हवी.....

सुसंवाद हे अनेक गोष्टींवरील एक सर्वोत्तम मलम आहे. मलम लावले की थंड वाटते आणि हळूहळू आजारही बरा होतो.....

जर घरात पती पत्नीचे संबंध मित्रत्वाचे असतील, किंवा तसा प्रयत्न असेल तर ते घर नक्कीच आनंदाचा स्त्रोत होईल....

सासरी आलेल्या मुलीला आनंदाने सासरी राहता यावं आणि सासर सोडून आपण कुठे गेलो तर आपला आनंद कमी होईल असे तिला वाटावे, असे आनंदी, सुखावह वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न प्रत्येक कुटुंब-सदस्याने आणि खास करून तिच्या पतीने करायला हवा. कुटुंब प्रमुख म्हणून त्यांचे हे आद्य कर्तव्य आहे हे नक्कीच लक्षात ठेवायला हवे.

सद्गुरू श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज म्हणतात की " प्रेम करायला खर्च लागत नाही, आणि प्रेम दाखवायला कितीही खर्च केला तरी तो पुरत नाही. ".. आणि महाराजांचे हे सांगणे फक्त पत्नीच्याच बाबतीत नाही, तर खरं म्हणजे प्रत्येक नात्याच्याच बाबतीत लक्षात घ्यायलाच हवे असेच आहे.

आपण आपल्या कुटुंबातील सर्वांवर जिवापाड आणि निरपेक्ष प्रेम करण्याचा प्रयत्न करत असू तर मग आवर्जून आपलं प्रेम दाखवण्याचा खर्च आपल्याला करावाच लागणार नाही....

... पहा, पटतंय का?

**श्री संदीप रामचंद्र सुंकले (दास चैतन्य)**, थळ, अलिबाग, ८३८००१९६७६

## 54. कविता – कला... — सुश्री सुनीता जोशी



कला म्हणजे...

उमलत्या फुलाची कोमलता, अन् दवबिंदूंची आर्द्रता

लहानपणची निरागसता, अन् वाहत्या पाण्याची सरलता...

कला म्हणजे...

थांग न लागणारा मनाचा तळ, अन् उभारी देणारं आत्मिक बळ

सोसावी लागणारी खूपशी झळ, अन् नवनिर्मितीची सुखावह कळ...

कला म्हणजे...

नाविन्याचा रोजचा ध्यास, अन् कल्पनेची शुद्ध आसक्ती

झपाटून टाकणारा गोड हव्यास, अन् ध्येयावरची सश्रध्द भक्ती...

कला म्हणजे...

रसिक मनात दरवळणारा अत्तराचा 'गंध'

अन् भारावून टाकणारा हवासा 'आनंद'

कलाकाराला भावणारा कस्तुरीचा 'सुगंध'

अन् मनाला मोहवणारा मोठासा 'स्वानंद'....

सौ. सुनिता अनंत जोशी, मिरज

## 55. कथा - औषध... सुश्री अर्चना देशपांडे



मकरंद आपल्या दुकानात पोचला. त्यापूर्वी कामवाली बाई झाडलोट करून, लादी पुसून गेली होती. विनयने, त्याच्याकडे अनुभव घेण्यासाठी आलेल्या मुलाने कपड्याने काचा पुसून ठेवल्या होत्या. मकरंद येताच विनयने त्याचे हसतमुखाने स्वागत केले. "श्री गुरुदेव दत्त "असे म्हणून हात जोडले. मकरंदने कपाटातील स्वच्छ कपडा काढून दत्तगुरूंचा फोटो पुसला. येताना आणलेला हार फोटोला घातला. उदबत्ती ओवाळून मनोभावे नमस्कार केला, एवढ्यात गिऱ्हाईक येण्यास सुरुवात झाली. मकरंद आलेल्या गिऱ्हाईकांची प्रेमाने चौकशी करून औषधे, गोळ्या देत होता. थोडी गर्दी कमी झाल्यावर तो खुर्चीवर बसला. त्याचे समोर लक्ष गेले. रस्त्यावर रहदारी सुरू झाली होती. कामावर जाणारी मंडळी दुचाकी वरून धावत होती. पी. एम. टी बसेस खचाखच भरून धावत होत्या. त्याचवेळी एक वयस्कर स्त्री रस्त्याच्या पलीकडे उभे राहून दुकानाकडे पहात होती.

गेले दोन-तीन दिवस मकरंद ही गोष्ट अनुभवत होता. दुसरे दिवशी दुकान विनयवर सोपवून तो दुकानातून बाहेर पडला. तेवढ्यात त्या आजी जवळच असलेल्या रामाच्या देवळाकडे गेल्या. वाटेत भेटलेल्या मित्राशी दोन शब्द बोलून तो देवळाच्या दारात पोचला. "रामराया सहनशक्तीच्या मर्यादा ओलांडून गेल्या आहेत, आयुष्यभर काबाडकष्ट करून तुझे नामस्मरण केले तरी तू माझी परीक्षा का घेतो आहेस? मी काय करू आता रामराया"? असे आजींचे शब्द त्याच्या कानी पडले. रामाला नमस्कार करून देवळातील खांबाशी त्या डोळे मिटून बसल्या. त्यांच्या चेहऱ्यावरून त्या दुःखी दिसत होत्या. " त्यांच्या मनातील दुःख माझ्याकडून दूर व्हावे अशी माझी इच्छा आहे " रघुनायका मागणे हेचि आता" असं म्हणून त्याने देवाला मनोभावे नमस्कार केला.. त्याच्या मनात विचार आला नाती जुळवायचे म्हटले की ती कशीही जुळतात, कधी अकस्मात तर कधी योगायोगाने.. पण ही जुळलेली नाती जपावी लागतात 'फुलवावी लागतात', या आजींशी नाते फुलवण्याचा मी प्रयत्न करेन... खूप माणसे अशी असतात की जे दुसऱ्याच्या आनंदात आपला आनंद मानतात.. त्यापैकीच एक मकरंद होता.

तो दुकानात पोहोचला तर गिऱ्हाईक त्याची वाट पाहतच होते. एक गृहस्थ मागील बाकी देण्यासाठी थांबले होते. मकरंद दुकानात पोहोचताच ते उद्गारले, "त्यादिवशी गडबडीत मी माझे पाकीट घरी विसरलो तरी तू मला औषध दिलेस, खूप उपकार झाले तुझे! हे पैसे घे त्या औषधाचे. "

"काय काका? काय गडबड होती? आता काकी कशा आहेत? त्यांचं बी. पी नॉर्मल ला आले का?"

डॉक्टर म्हणाले, "आता काळजीचे कारण नाही. थोडी विश्रांतीची गरज आहे"

"सगळी दत्तगुरूंची कृपा "असे म्हणून त्याने फोटोला नमस्कार केला.

नंतर थोडी गर्दी कमी झाली. विनय कोणती औषधे संपली? कोणती पुन्हा मागवावी लागतील? याची नोंद करण्यात गुंग होता. मकरंदचे घड्याळाकडे लक्ष गेले. घड्याळ्यात एक वाजला होता.. "विनय जेवायला चल बाळा "म्हणत मकरंदने त्याला जेवणाच्या वेळेची आठवण करून दिली. दोघांनी डबे उघडून जेवायला सुरुवात केली. जेवताना मकरंदच्या डोळ्यासमोरुन आजींचा चेहरा हलत नव्हता. त्यानं पोळी बाजूला काढून ठेवली आणि कसा बसा भात चिवडत संपवला. विनयच्या ते लक्षात आल्यावर त्याने विचारले, " दादा, आज बरे वाटत नाही का? डोकं दुखतंय का? बरं वाटत नसेल तर घरी जाऊन थोडा आराम करा "

"नाही रे! मी व्यवस्थित आहे पण.. मी आपल्या दुकानाकडे पहात उभ्या असलेल्या आजींची विचारपूस करायला गेलो पण त्यांच्याशी बोलणे झाले नाही. त्यांना काही हवे होते का हे कळू शकले नाही त्यामुळे मनाला हुरहुर वाटत आहे. "

"भेट होईल हो उद्या "असे म्हणून विनय राहिलेले काम पूर्ण करण्यास गेला.

विनय फार्मसीच्या दुसऱ्या वर्गात शिकत होता. शिकत असताना थोडीशी मकरंदला मदत करत होता. शनिवार, रविवार कॉलेजला सुट्टी असल्यामुळे जास्तीत जास्त वेळ औषधाची माहिती करून घेत होता. वडील लहानपणीच बेपत्ता झाल्याने आईच्या कष्टाची जाण असलेला तो मेहनती मुलगा होता. मकरंदही पोरका असल्याने अशा लोकांची दुःख तो जाणत होता. प्रेमाला आसुसलेला मकरंद त्याला लहान भावाप्रमाणे समजून औषधाविषयी माहिती देत होता.

सोमवारी दुकानाला साप्ताहिक सुट्टी होती, मकरंद मोहितला घेऊन पत्नीसह जवळच्या मॉलमध्ये गेला. मोहित तिथे गेम खेळण्यात रमून गेला होता पण मकरंदच्या मनातील आजींच्या विषयीचे विचार चालूच होते. पत्नी संसारोपयोगी वस्तू घेऊन आली. तिथेच मसाला डोसा खाऊन येईपर्यंत संध्याकाळ कशी झाली हे कळलेच नाही. त्या रात्री मकरंदने आजीविषयी वाटणारे प्रेम आपल्या पत्नीकडे व्यक्त केले आणि तो म्हणाला, " जर त्या आजी आपल्या घरी यायला तयार असतील तर मी त्यांना आपल्या घरी घेऊन येईन.. तुझे काय म्हणणे आहे."

यावर ती म्हणाली, "माझी काहीच हरकत नाही. आपल्याला मोठ्या माणसाचा सहवास मिळेल व आपल्या मोहितला आजीचे प्रेम मिळेल. " पत्नीची सहमती मिळाल्यावर मकरंद खूश झाला.

दुसरे दिवशी ठरलेल्या वेळी मकरंद दुपारचा डबा घेऊन दुकानात पोचला. विनय आलेल्या गिऱ्हाईकांना औषधे देत होता. साडेनऊ वाजण्याच्या सुमारास मकरंदची नजर रस्त्यावर आजीला शोधत होती पण जेवणाची वेळ झाली तरी आजी दिसल्या नाहीत. आजींना बरे तर नसेल ना? त्यांची काळजी कोण घेईल? असे विचार मकरंदच्या मनात चमकून गेले. थंडीचे प्रमाण वाढल्यामुळे औषधाला मागणी होती. औषध देताना मकरंदची नजर आजींना शोधत होती.

त्यानंतर एक दिवस दुकानाच्या दुसऱ्या बाजूला उभं राहून दुकानाकडे पहात असलेल्या आजी मकरंदला दिसल्या. कदाचित दुकानातील गर्दी कमी होण्याची वाट पहात असाव्यात असे मकरंदला वाटले. त्यांना एखादे औषध हवे असेल पण एवढ्या गर्दीतून रस्ता ओलांडून जायचे कसे? या विचारात त्या असतील, असा विचार करून दुकानाची जबाबदारी विनयभर सोपवून मकरंद आजीपाशी आला. शरीराने किंचित स्थूल, गोऱ्यापान आजी राहणीमानावरून मध्यमवर्गीय कुटुंबातील वाटत होत्या. कदाचित औषध लिहून दिलेला कागद त्यांच्याकडून हरवला असेल किंवा पैसे कमी असतील म्हणून त्या औषधांसाठी न येता केवळ दुकानाकडे पहात असतील असे मकरंदला वाटले.

मकरंद त्यांच्याजवळ गेला… " मी मकरंद पंडित. समोरच माझं गुरुकृपा हे औषधाचं दुकान आहे " अशी त्याने आपली ओळख करून दिली. "आजी तुम्हाला काही औषधे हवी आहेत का?"त्याने प्रेमाने विचारले, त्या क्षणी आजींचे डोळे भरून आले.

"काय झाले आजी? तुम्हाला डॉक्टरने औषधे लिहून दिलेला कागद सापडत नाही का? औषधासाठी लागणारे पैसे कमी आहेत का? काय अडचण आहे?" असे मकरंदने विचारले त्या क्षणी भरल्या स्वरात त्या म्हणाल्या',
" अरे माझ्याकडे पैसे आहेत पण मला हवे असलेले औषध तुझ्या दुकानात आहे का?"

"तुमच्याकडे असलेला कागद मला द्या. तुम्हाला हवे असलेले औषध माझ्या दुकानात नसेल तर मी गावातून तुम्हाला आणून देईन. " आजी काही क्षण त्याच्याकडे पाहतच राहिल्या.

… काही वेळाने त्या म्हणाल्या, " बाळा, माझा मुलगा तुझ्याच वयाचा आहे. तो इंजिनिअरिंगची परीक्षा उत्तम गुणांनी पास झाला. पुढील शिक्षणासाठी त्याला शिष्यवृत्ती मिळाली. मी माझ्या मनावर दगड ठेवून त्याला परदेशी जाण्याची परवानगी दिली कारण त्याचा आनंद हाच माझा आनंद होता. ना! शिक्षण पूर्ण झाल्यावर त्याला तिथेच नोकरी मिळाली. त्यानंतर तो दरवर्षी घरी यायचा. येताना घरासाठी नवनवीन वस्तू आणायचा. तीन वर्षांपूर्वी त्याने मेक्सिकन मुलीशी लग्न केले आणि त्यानंतर तो आलाच नाही. दर महिन्याला आठवणीने पैसे पाठवतो. सहा महिन्यापूर्वी मी त्याला पत्र लिहून कळवले.. ' मला तुझे पैसे नकोत, माझे डोळे तुला पाहायला आसुसलेले आहेत.. पण त्याने न येण्याची कारणे लिहून पत्र पाठवले. त्यानंतर तो आलाही नाही आणि त्याचे पत्रही आलेलं नाही… मला एकच औषध हवं आहे की मला एक मुलगा आहे हे विसरायला होईल. आहे का? तुझ्याकडे हे औषध असेल तर मला लगेच दे. "

मकरंद नि:शब्द झाला. त्याच्या मनात विचार आला की आज अनेक पालकांना या औषधाची गरज आहे परंतु अजूनपर्यंत असे औषध उपलब्ध झाले नाही. जर अशा औषधाचा शोध लागला किंवा औषधाची निर्मिती झाली तर म्हातारपणी मुले असूनही एकटेपणाच्या वेदना भोगणाऱ्या लोकांच्या वेदना कमी होतील का? वृद्धाश्रमामध्ये असणाऱ्या पालकांना या औषधापासून फायदा होईल का?

स्वार्थाने बरबटलेल्या या जगात मुलाला आई वडील स्वीकारतात. त्यांच्यासाठी जीवाचे रान करून, काबाडकष्ट करून त्याला वाढवतात पण मुलगा मात्र त्यांना दूर करण्याचा अपराध करत असतो. तरीसुद्धा आई-वडील

त्याच्याबद्दल तक्रार न करता आनंदाने जगत असतात. "मुलाला सुखी ठेव "अशी देवाकडे प्रार्थना करत असतात. आपली मुलं शरीराने व मनाने दूर गेली तरी त्यांचं कल्याणच व्हावे म्हणून परमेश्वराला आळवत असतात. पण जेव्हा सहनशक्तीच्या मर्यादा ओलांडल्या जातात त्यावेळी त्यांना अतीव दुःख होते. माणसाला आनंदात सहभागी होण्यासाठी आणि दुःखाचे निरसन करण्यासाठी नेहमीच जवळ कोणीतरी हवं असतं, त्यांना कावडीतून काशीला घेऊन जाणारा श्रावण बाळ नको असतो पण मुलाने यावं, भेटावं, जवळ बसून आपली विचारपूस करावी एवढीच त्यांची माफक अपेक्षा असते.

मकरंदने त्यांची समजूत घातली. त्यांच्या दुःखाचा आवेग कमी झाल्यावर तो म्हणाला, " माझ्याकडे एक औषध आहे पण ते औषध तुम्ही मान्य कराल असे मला वचन द्या. "

"कोणते बाळा" आजींनी अधीरतेने विचारले.

"आधी मला शब्द द्या मग मी सांगतो "

त्याचे आपल्याबद्दलचे प्रेम, आपुलकी पाहून त्यांचें डोळे भरून आले. व त्यांनी वचन पूर्ण करेन असा शब्द दिला. मकरंद म्हणाला....

"माझे आई-वडील मला लहानपणी सोडून गेले. मला माझ्या काकीने आश्रय दिला. तिने माझे बी. फार्मसी. चे शिक्षण पूर्ण केले. दुर्दैवाने गेल्याच वर्षी ती पण मला अनाथ करून गेली. तिच्या आशीर्वादाने माझे दुकान "गुरुकृपा "व्यवस्थित सुरू आहे. -- – आता तुम्ही माझी काकी म्हणून घरी याल का? मला तुमच्या रूपाने आई मिळेल आणि माझ्या मोहितला प्रेमळ आजी. चांदण्याविना आकाशाला कसली शोभा नसते तसे आईविना घर ओसाड ओसाड भासते. "

.... आजीला त्याच्या प्रेमाने गहिवरून आले. मकरंदने त्यांची समजूत घातली आणि त्यांनी घरी येण्याचे कबूल केले. मकरंदने त्यांच्या पायावर डोके ठेवून आशीर्वाद घेतला आणि समाधानाने दुकानात परतला. आणि दुसऱ्या दिवशी त्यांना आपल्या घरी घेऊन आला.

**सौ अर्चना देशपांडे**, प्लॉट नंबर 55 गिरीश सोसायटी, आशीर्वाद बंगला, लेन नं ३; शानू पटेल हायस्कूल, पुणे 411 0 58 **मो ९९६०२१९८३६**



## 56. कथा - मायेची सावली … - डॉ. शैलजा करोडे

‘



सकाळी सकाळी डोअरबेल वाजली. कचरा नेण्यासाठी सफाई कर्मचारी आला होता. घड्याळ पाहिले, बाप रे सहा वाजले. कसं आटोपणार सगळं आता. अर्णवच्या शाळेची तयारी, डबा तयार करायचा. माझा डबा, सुधीरचा डबा. सकाळची सगळी आन्हीक आटपायची. तितक्यात मोलकरीण मालती ही आली. मालती आज तुलाही उशीर झाला. " काय करू ताई, माझ्या धाकल्या पोराला बरं नव्हतं. रातभर किरकिर करत होता. सकाळी सकाळी झोपला तशी आली इकडे धावत".

" बरं बरं, कामावरून गेली की मुलाला घेऊन जा दवाखान्यात. आज मलाही उशीरा जाग आली. सगळं काम पडलंय “.

"काही काळजी करू नका. पोळ्या मी भाजून देऊ का? "

"हो चालेल " मालतीने पोळ्या करायला घेतल्या, मी पटकन गवारीच्या शेंगांची भाजी फोडणीला घातली. वरण भाताचा कुकर लावला. मधून मधून अर्णवला उठवत होते. थांब थोडा वेळ, थांब थोडा वेळ, त्याचं चालूच होतं. सुधीरही उठले. यांना अगदी गरम चहा लागतो. अर्णवही उठला. त्याचं स्नान, युनिफाॅर्म, बूट घालून देणे, डबा, वाॅटरबॅग, सगळं दिलं. मला बाय बाय करत तो सुधीरसोबत गेला शाळेला. मीही तयारीला लागली आणि धावत पळत 8. 40 ची लेडीज स्पेशल ट्रेन गाठली. साडेनऊ वाजता ऑफिसला पोहोचले. पी सी आँन केला. आजचे मेल चेक केले. आवश्यक ती उत्तरे दिली. आजच्या कामाचं शेड्यूल पुन्हा एकदा चेक केलं. प्रशांत बिल्डर्स, संदीप प्लास्टिक्स यांचे लोन प्रपोजल्स होते. त्या साईटला व्हिजीट द्यायच्या होत्या. फोनवरून मी वेळ ठरवली व आवश्यक कागदपत्रांची फाईल घेतली. माझी आँफिसर मीनाला ऑफिस सांभाळण्याच्या सूचना देऊन मी निघाले.

संदीप प्लास्टिक्सचं प्राॅडक्शन युनिट, बॅलन्सशीट, अॅसेटस, लायबिलिटीज् व प्रत्यक्षदर्शी मी केलेला अभ्यास.. सगळे पॉईंट्स नोट करुन थोडा मोकळा श्वास घ्यावा वाटत असतांनाच फोनची रिंग वाजली. आईचा फोन होता. बाबांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला होता. माझी तर पायाखालची जमीनच सरकली. काही वेळ मला काही सुचलेच नाही. " काय झालं मॅडम. काही प्राॅब्लेम? तुम्ही चिंताक्रांत दिसत आहात " संदीप प्लास्टिक्सचे CEO मूलचंद वर्मा बोलत होते. " माझ्या बाबांना हृदयविकाराचा तीव्र झटका आलाय. रुग्णालयात अतिदक्षता विभागात आहेत. "

"ओह, धीर धरा मॅडम, बाबांना काही होणार नाही " त्यांनी मला पाणी दिले. एक दीर्घ श्वास घेऊन मी सुधीरला फोन केला.

"मीनाक्षी, घाबरू नकोस. मी निघतोय ऑफिसमधून, येतांना अर्णवलाही आणतो शाळेतून. लगेच निघू आपण आपल्या गाडीने ".

हळूहळू बाबांच्या आठवणी मनात फेर धरत होत्या. माझ्या प्रगती पुस्तकावर कौतुकाने सही करणारे बाबा, मला बक्षीस मिळाल्यानंतर आनंद व्यक्त करणारे बाबा, परीक्षेच्या वेळी प्रोत्साहन देणारे बाबा, संकटे अडीअडचणीच्या वेळी धैर्य, हिंमत देणारे बाबा, मला नोकरी मिळाल्यावर पहिल्या दिवशी माझ्यासोबत ऑफिसला येणारे बाबा, माझ्या लग्नातील विदाईच्या वेळी हळवे झालेले बाबा, डोळ्यातील अश्रूंना 'कचऱ्यामुळे आले' सांगणारे बाबा.

आठवणींच्या या भोवऱ्यात मला आठवला तो प्रसंग जेव्हा आई बाबांना म्हणत होती, " अहो मीनाक्षीसाठी स्थळ पाहणी सुरू करा आता " तेव्हा बाबांना वाटले कालपर्यंत इटुकली पिटुकली असलेली माझी मैना सासरी जाण्याइतपत शहाणी कधी झाली? "

"काय हो? काय विचार करताय? "

"काही नाही ग. आपली छकुली कधी मोठी झाली कळलेही नाही. "

"अहो चालायचंच. प्रत्येक बापाला असंच वाटतं. आपल्या लेकीविषयीची माया असते ही. पण जगरहाटी कोणाला सुटलीय? तर आपल्याला सुटेल? "

"नाही नाही, मी नाही माझ्या मीनूला कोठे पाठवणार? "

"म्हणजे? तिचे लग्नच करणार नाहीत काय तुम्ही "

"तसं नाही ग, माझ्या राजकन्येसाठी चांगला राजकुमार शोधेन मी. राहतील दोघे माझ्याजवळ. "

पण मी बँकेत ऑफिसर तर सुधीर स्टेट गव्हर्नमेंटमध्ये क्लास वन ऑफिसर. आमचे दोघांचेही ट्रान्सफरेबल जाॅब. बाबांजवळ फारसं राहताच आलं नाही. आम्ही आमच्या आमच्या चक्रात फिरतच होतो. सणावारालाही आम्ही अभावानेच जात होतो.

शाळेत मला वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांकाचं बक्षीस मिळालं होतं. बक्षीसाचं स्वरूप होतं, गोष्टीचं पुस्तक " गुलाब आणि जाई ".. बाबांनी किती कौतुक केलं होतं माझं, त्यांनी स्वतःही ते पुस्तक वाचलं. माझ्या आजोबांनीही वाचलं.. घरातून मिळणाऱ्या या प्रेरणाचं मला अनेक पुढे मिळणाऱ्या बक्षीस, पुरस्कारांची नांदी ठरल्यात.

बाबांनी जीवनाच्या पावलापावलावर माझी मदत केली. माझ्या महाविद्यालयातील प्रवेशावेळीही बाबांनी अगदी माहिती पत्रक आणून, स्वतः त्याचा अभ्यास करून मला योग्य ते मार्गदर्शन केले होते. माझ्या नोकरी संशोधनातही त्यांचा सिंहाचा वाटा. अगदी भरतीच्या जाहिराती वाचून तर फाॅर्म भरण्यापासून, कागदपत्रांच्या पूर्ततेपासून सगळं बाबाचं बघायचे.

बालपणी दसऱ्याच्या दिवशी मी सुद्धा सिमोलंघनाला जायचे. मग बाबा मला पेढे, बताशे, फेणी असा खाऊ घेऊन द्यायचे. खेळणी, फुगे घेऊन द्यायचे. मग रावण दहनाचा कार्यक्रम आटोपला की आम्ही परतायचो. देवळात देवीला सोने वाहिल्यावर घरी यायचो. दरवाज्यावर आई सीमोलंघनाहून आले म्हणून आम्हां भावंडांचं व बाबांचही औक्षण करायची. मग आम्ही आईला सोनं द्यायचो.

.... अश्रूंचे ओघळ गालावर आले तसे सुधीर म्हणाले, “ मीनाक्षी be brave, काही होणार नाही बाबांना. every thing will be alright. घे, पाणी घे जरा “ म्हणत त्यांनी पाण्याची बाॅटल मला दिली. अर्णवही अंतर्मुख झाला होता. मला चिकटून बसला. मी त्याच्या पाठीवरुन हात फिरवला, त्याला आंजारलं, गोंजारलं. माझं लेकरू टकामका मला पाहात होतं. मी स्वतःला सावरलं. त्याच्याशी प्रेमानं बोलले तसा तो थोडा रिलॅक्स झाला, मोकळा झाला.

सुधीर स्वतःच कार ड्रायव्हिंग करत होते. डोळ्यावर झोपेची पेंग येऊ लागली तशी त्यांनी गाडी रस्त्याच्या कडेला चहाच्या टपरीजवळ लावली. ” मीनाक्षी, चहा घेऊया थोडा थोडा, माझी ही झोपेची पेंग जाईल, तुलाही थोडी तरतरी वाटेल. ”

बाबा ICU मध्ये तर आई आणि भाऊ waiting room मध्ये. मला पाहाताच आईच्या संयमाचा बांध फुटला. मी ही अश्रूंना रोखू शकत नव्हते. " आई, ताई रडू नका, शांतता राखा. आपण हाॅस्पिटलमध्ये आहोत " माझा भाऊ सचिन बोलत होता. सुधीरनेही आपला आश्वासक हात सचिनच्या खांद्यावर ठेवला. त्याच्याही डोळ्यात अश्रू तरळत होते पण प्रयत्नपूर्वक त्याने रोखले होते.

ICU room च्या काचेच्या विंडोतूनच मी बाबांना पाहिले. त्यांना त्या अवस्थेत पाहून मला कसेतरीच होऊ लागले. तिथे जवळच पॅसेजमध्ये गणपतीचे छोटेसे मंदिर होते. " देवा, माझ्या शिरावरील ही मायेची सावली हिरावून घेऊ नकोस. मला पोरकं करू नकोस. उतार पडू दे बाबांच्या तब्येतीला " मी मनोभावे देवापुढे प्रार्थना करत होते कि माझ्या खांद्यावर कोणीतरी हात ठेवला, " होईल तुझी प्रार्थना सफल. विश्वास ठेव, डगमगू नकोस " वळून पाहिले तर एक ताई होत्या.

" मायेची सावली मायेची सावली मायेची सावली मायेची सावली मायेची सावली मायेची सावली मायेची सावली मायेची सावली मायेची सावली मायेची सावली मायेची सावली मायेची सावली ण आहे ताई "

सासूबाई, “ अर्धांगवायूचा झटका आलाय. जीभही जडावलीय."

"वाटेल बरं त्यांनाही “.

मी मनोमन पुन्हा देवाला हात जोडले. इतक्यात शर्वरी सचिनसाठी डबा घेऊन आली. "ताई, भावोजी तुम्ही प्रवास करुन आलात. घरी जा, फ्रेश व्हा, मी स्वयंपाक करुन ठेवलाय, थोडं खाऊन घ्या मग या सावकाश दवाखान्यात, सोबत आईंनाही घेऊन जा. खूपच टेंशन घेतलंय त्यांनी "

मनावर दडपण तर खूप होतं. मन अशांत होतं. अशा या विकल अवस्थेत केव्हा डोळ्यावर झोपेने अंमल मिळवला कळले नाही. सकाळी सकाळी मोबाईलचा रिंगटोन वाजला. सचिनचा फोन होता. " ताई बाबा गेले ग " आईने तर हंबरडा फोडला, माझी व शर्वरीचीही रडारड सुरू झाली. सुधीर लगेच गाडी घेऊन रूग्णालयात गेला. रुग्णालयातील आवश्यक पूर्तता करून बाबांचं कलेवर घरी आणलं. बाबांना निरोप देतांना मला खूपच भडभडून आलं. " माझी मायेची सावली हरवली हो " मी सुधीरच्या खांद्यावर मान ठेवली. " सुधीरने हलकेच मला थोपटलं. " मीनाक्षी सावर स्वतःला. बाबांनी केलेलं मार्गदर्शन, त्यांनी दाखविलेल्या पाऊलवाटेवर चालत राहा. हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल. आज त्यांचं पार्थिव शरीर संपलंय पण अंतःकरणातील स्थान पक्कं झालंय. बघ अर्णव किती दुर्मुखला झाला आहे. आपणही आई बाबा आहोत हे विसरुन कसं चालेल. "

.... मी अश्रू पुसले. अर्णवला कुशीत घेतलं. आता ही मायेची सावली मला अर्णववर धरायची होती.

**डॉ. शैलजा करोडे, नेरुळ नवी मुंबई मो. 9764808391 ईमेल – karodeshailaja@gmail.com**



## 57. ललित - ती सोफिया नव्हती…” — प्रा.डॉ.सतीश शिरसाठ



सध्या मी कुटुंबासोबत इंग्लंडला आहे. दर आठवडा पंधरा दिवसांनी पत्नीसोबत मार्केटिंगसाठी जवळच्या टाऊनला मी जात असतो.

असंच एक दिवस निघालो. जाताना पहात होतो, सगळं कसं यांत्रिक दिसत होतं. चाॅकलेटी रंगाची एका ओळीत जमीनीला चिकटवलेली बसकी घरं, त्याच्या भोवतालची शिस्तीत उभी गार्डन्स, काचेच्या तावदानात बंद उंचच उंच कमर्शियल बिल्डिंगा, काळा रंगही आकर्षक दिसेल असे लांबच लांब रस्ते, ट्रॅफिकला नियंत्रण करणारे पोलीस नसतानाही रांगेत धावणारी वाहने… इतकंच काय आत्ताच घोटून दाढी केल्यासारखी दिसणारी स्वच्छ झाडं; वाऱ्याबरोबर त्यांची पानेही हालताना ती काॅम्प्युटरच्या हलत्या चित्रागत.

ए. आय. चा. (कृत्रिम बुद्धिमत्ता)आज सगळीकडं बोलबाला चाल्लाय. ए. आय. हे लवकरच माणसाची सगळी कामं सुलभ करताना, माणसाची जागा घेत असल्याचं बोललं जातं. या ए. आय. नं अनेक क्षेत्रांत प्रतिसृष्टी निर्माण केली आहे. याच्या सुरस कथा, व्हिडिओ आपण पहातो.

… या प्रवासात मला प्रत्येक गोष्ट ए. आय. सारखीच दिसत होती. बस वेगाने जात होती. खिडकीतून दिसणारे सारे दृश्य ए. आय. चे व्हिडिओ वाटत होते. रस्त्याच्या कडेला फूटपाथवरून जाणारी माणसंही ए. आय. प्रमाणे हातपाय हलवत होते. एका घराच्या दर्शनी भागावर शिडीवरून एक रंगारी रंग देत होता. तेही मला यंत्रवत वाटत होते. बुध्दी, कौशल्य, वेग इ. त ए. आय. ने माणसावर मात केली असून याच्या फायद्याबरोबरच तोटेही खूप आहेत.

एक विचार असा पुढे येतोय की, 'जगाचा विनाश होईल की नाही? 'हा प्रश्न आता विचारण्यापेक्षा, 'तो कधी होईल? ' एवढंच आपल्या हातात आहे… हा विचार आणि डोळ्यांना दिसणारे तसेच. थकून डोळे कधी मिटले गेले ते कळलंच नाही.

जाग आली, पत्नीच्या आवाजाने, "आला स्टॉप आपला". बसमध्ये फारशी गर्दी नव्हती. सोबत आणलेली ट्राॅली घेऊन उतरताना, सहज मागे लक्ष गेलं. एका सीटवर एक वयस्कर इंग्लिश स्त्री बसली होती. कौटुंबिक आणि इतर सामाजिक कटकटी तिच्या कपाळावरच्या आठ्यांत प्रतिबिंबित झाल्या होत्या. तिचे पांढरे केस भकास वाटत होते. निस्तेज चेहऱ्यावरच्या बोळक्यातून एक खिन्न हसू फुटले.

मला एक वाचलेली गोष्ट आठवली…..

एका श्रीमंत माणसाला डॉक्टरकडून समजतं की, त्याचं आयुष्य काही दिवसांचंच असून लवकरच तो मरणार आहे. यावर तो उपाय शोधतो. स्वतःसारखा एक मेणाचा पुतळा बनवतो. ज्या दिवशी त्याचा मृत्यू येणार असं सांगितलेलं असतं, त्या दिवशी तो बेडवर झोपतो; जवळ मेणाचा पुतळा. त्याला न्यायला यम येतो. मात्र सारखेच दोघे पाहून क्षणभर तोही गोंधळून जातो. मात्र चाणाक्षपणे तो त्यावर उपाय शोधून काढतो. दोन्ही कमरेवर हात ठेवून, तो काळाकभिन्न यम दोन्ही पुतळ्यासमोर उभं राहून आपल्या डोळ्यांतून आग ओतू लागतो. हे पहाताच, जिवंत माणूस घाबरून भितीच्या भावना त्याच्या चेहऱ्यावर दिसू लागतात. ते ओळखून यम त्याला उचलून घेऊन जातो.

ए. आय. ने विकसित केलेला रोबोट हा कितीही बलशाली असला तरी इलेक्ट्रिक प्लगने त्याला चार्ज करावं लागतं. जैविक रचना आणि आनंद, दु:ख, प्रेम, वैषम्य अशा भावभावना यांचा त्यांच्यात अभाव असतो. त्या दिवशीच्या प्रवासामध्ये मला सगळं काही ए. आय. च्या रुपात दिसलं होतं. अगदी माणसंही दुरून तशीच भासली होती. बसमधल्या त्या स्त्रीच्या चेहऱ्यावरच्या भावना पाहून ती 'माणूस' आहे हे जाणवलं. २०१६ मध्ये विकासित झालेल्या सोफिया रोबोटला तशा भावभावना नसतील.

उद्या रोबोट कितीही शक्तिशाली झाला तरी, त्याच्याकडून संहारक आणि विनाशक कामं होत जाऊन मानवी संस्कृती आणि जनजीवन संकटात आली तर, त्यापासून मुक्तता भावभावना आणि विवेकबुद्धी असलेला माणूसच देऊ शकेल या आशावादाने मनाला उभारी आली.

**प्रा. डॉ. सतीश शिरसाठ, मोबाईल नं. ९९७५४३५१५२ ईमेल- sks.satish@gmail.com**





**58. पुस्तकावर बोलू काही - भन्नाट माणसं - ११ पुस्तकांचा संच - परिचय – श्री हर्षल सुरेश भानुशाली**



**स्वातंत्र्यासाठी आणि मानवाच्या कल्याणासाठी आयुष्य वेचलेल्या महापुरुषांच्या चरित्रांचा संच.. भन्नाट माणसं!**

**भन्नाट माणसं: पुस्तकांचा संच! एकूण पुस्तकं : ११**

**एकूण मूल्य:१६७५ ₹**

१. शहीद भगतसिंह:१५०₹

२. अलेक्झांडर द ग्रेट:१५०₹

३. अल्बर्ट आईन्स्टाईन:२००₹

४. थॉमस अल्वा एडिसन:२००₹

५. श्रीनिवास रामानुजन:१५०₹

६. मार्टिन ल्युथर किंग:१५०₹

७. अब्राहम लिंकन:१२५₹

८. अमिलिया एयरहार्ट:१००₹

९. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले :१५०₹

१०. सम्राट अशोक:१५०₹

११. जे आर डी टाटा:१५०₹

भन्नाट मुलांसाठी भन्नाट माणसांचे चरित्र! चाकोरीबद्ध विचारातून वेगळ्या दिशेने विचार करायला प्रवृत्त करणारी काही माणसं जगात होऊन गेली आहेत. त्यांचे जीवन दीपस्तंभ ठरले आहे… असे महान आणि

आगळेवेगळे कार्य करून गेलेल्या भन्नाट माणसांचे चरित्र... आपल्यासाठी! आपल्या भन्नाट मुलांसाठी! कारण चरित्र वाचूनच चरित्र घडते!

**१. शहीद भगतसिंह**

**लेखिका: सायली परांजपे**

**पृष्ठ:११५ मूल्य:१५०₹**

एका लहान मुलाला मातीत खेळताना पाहून विचारले जाते, 'काय करत आहेस?' ते मुल सांगते, "मी बंदुका पेरतोय. यातून भरपूर बंदुका उगवतील! " बंदुकांची शेती करून, इंग्रजांना देशातून हाकलून लावण्याची भन्नाट कल्पना ज्या मुलाच्या डोक्यात आली होती, तो मुलगा म्हणजे, भगतसिंग!

देशभक्त कुटुंबात जन्माला आलेला थोर योद्धा क्रांतिकारक! ज्याच्या कर्तृत्वाने आणि नेतृत्वाने देशविदेशातील तरुणांना प्रेरणा मिळाली! ज्यांचे हौतात्म्य ही स्वातंत्र्याची ज्वाला म्हणून तेवत आहे. अशा महान क्रांतिकारक भगतसिंग यांचे चरित्र या संचात नव्याने समाविष्ट करण्यात आलेले आहे.

भगतसिंग यांच्या जीवनातील सर्व महत्वाच्या प्रसंगांचा सुरस भाषेत आढावा घेतला आहे. त्यांची तो जालियनवाला बाग येथील मातीला बाटलीत भरून घेतलेला प्रसंग लहान थोरांच्या अंगावर रोमांच उभे करतो. त्यांची ती प्रतिज्ञा यातून वाचकाच्या मनावर खोलवर ठसा उमटवत आहे.

मी बंदुका पेरतोय, शपथ जालियनवालातल्या मातीची, सत्याग्रहाकडून क्रांतिकडे, लग्नाच्या बेडीला नकार, चंद्रशेखर आझादशी भेट, काकोरीचा घणाघाती घाव, लालाजींच्या चितेचं लोण, क्रांती रक्त मागते, इन्कलाब जिंदाबाद अशा लहान लहान ३४ प्रकरणांमध्ये हे पुस्तक विभागले आहे. प्रत्येक प्रकरण एक नवीन माहिती वाचकाला देऊन जाते... पण त्याची साखळी कायम राहते.

**२. अलेक्झांडर द ग्रेट**

**विश्वसाम्राज्य उभं करणारा जगज्जेता**

**लेखिका: कीर्ती परचुरे**

**पृष्ठ:१२२ मूल्य:१५०₹**

भारताला जो सिंकदर म्हणून माहिती आहे! पुरू राजाने ज्याचाशी कडवी झुंज दिली, पुरुराजाचे धाडस आणि साहस पाहून सिकंदरदेखील भारून गेला! पराभूत झालेल्या पुरुराजला जेंव्हा सिकंदर विचारतो, आता तुमच्याशी कसे वागावे, त्यावर पुरू राजा उत्तर देतो, ‘ एक सम्राट दुसऱ्या सम्राटाला जसे वागवतो, तसे वागवावे! ’

पराभूत पुरूराजाचे हे बाणेदार उत्तर इतिहासात अमर झाले आहे... आणि त्याबरोबरच अलेक्झांडरचा व्यवहार ही! त्याने पुरूराजाचा गौरव केला.

ग्रीसवरून जग जिंकत निघालेल्या अलेक्झांडरने पूर्ण भारत जिंकण्याचा निर्धार केला होता, पण येथे प्रत्येक राजा पुरू सारखा कडवी झुंज देणारा निघतोय पाहून त्यांचे निर्णय बदलले. थकलेल्या सैन्यासह तो परत आपल्या मातृभूमीला निघाला.... ज्याच्यामुळे भारतात राष्ट्रीय भावना वाढीस लागली. चाणक्य आणि चंद्रगुप्त हे पराक्रमी महापुरुष येथे घडले त्याची ही पार्श्वभूमी!

मॅसेडोनिया नावाचे एक ग्रीक राज्य! फिलिप राजा, जो घोड्यांचा उत्तम जाणकार! अतिशय उमदा आणि ऐटबाज "बुसेफलस" नावाचा घोडा खरेदी करण्याची राजाची तीव्र इच्छा होती. मात्र तो घोडा काही केल्या कोणाच्या ताब्यात यायला तयार नव्हता. त्यामुळं त्याचा नाद सोडून राजाने दुसऱ्या घोड्यांकडे लक्ष घातले... पण १२ वर्षाच्या राजपुत्राने मात्र तो घोडा वठणीवर आणण्याचा जाहीर मनोदय प्रगट केला. त्याने तो शर्थीने वठणीवर आणला. इतक्या नाठाळ घोड्याला लगाम लावणारा हा बालक म्हणजे अलेक्झांडर! जो पुढे अलेक्झांडर द ग्रेट म्हणून ओळखला जाऊ लागला.

अलेक्झांडर जो एक महान तत्वज्ञ ॲरिस्टाटल यांच्या शाळेत शिकला. प्रयोगशील तत्वज्ञ ॲरिस्टाटल याने एका अर्थाने आपला शिष्य तयार केला. त्याच्या पुढील आयुष्यावर या शिक्षणाचा मोठा प्रभाव दिसून येतो. अजरामर अशी ही गुरू शिष्याची जोडी!

वयाच्या सोळाव्या वर्षापासून युद्ध जिंकण्याची त्याला जणू सवयच लागली! अथेन्स, थीब्ज सारख्या बलाढ्य राज्यांना अठरा वर्षाच्या अलेक्झांडरने पराभूत केलं. ३०० वीर जे शेवटपर्यंत लढले त्याचीही माहिती आपल्याला या पुस्तकात मिळते... जे सेक्रेड बँड म्हणून ओळखले जातात. ज्यांच्या पराभवाचा अर्थ आहे... त्या सर्वांचा मृत्यू!

अशी वेगवेगळी, नवीन माहिती वाचकाला या पुस्तकातून होते. पिता फिलिप अतिशय महत्वाकांक्षी! अनेक प्रदेश जिंकत पूर्ण ग्रीस स्वतःच्या ताब्यात घेतला... पण आपल्याच मुलाला अलेक्झांडरला मात्र राज्यातून चक्क बेदखल केलं. त्याच्या आईसह त्याला हाकलून लावले. पुढे वयाच्या २० व्या वर्षी अलेक्झांडर गादीवर येतो... अचानक असा तो राजा कसा होतो? ही माहिती आपण पुस्तकातून वाचूया!

.... ३६ लहान मोठ्या प्रकरणातून वाचकाला खिळवून ठेवणारी माहिती मिळते.

**३. अल्बर्ट आईन्स्टाईन**

**काळाचं रहस्य भेदणारा कालातीत प्रतिभावंत**

**लेखिका: चैताली भोगले**

**पृष्ठ:१३२ मूल्य:२००₹**

भन्नाट शोध लावले या महान शास्त्रज्ञाने! आज जगाची प्रगती शक्य झाली ती याच्या संशोधनामुळे! प्रकाशाच्या झोतावर स्वार होऊन प्रवास करता आला तर? दोर कापलेल्या लिफ्टमधून पडताना माणसाला गुरुत्वाकर्षण जाणवेल का? अशा भन्नाट कल्पना त्याच्या डोक्यात येत!

वयाच्या चौथ्या वर्षापासून तर धड बोलताही न येणारा हा बुजरा लाजरा विद्यार्थी शाळेत अतिशय "ढ"! शिक्षकांना नकोसा असलेला! अर्धवट शाळा सोडून देणारा! कारकून म्हणून नोकरी करणारा हा जगद्विख्यात शास्त्रज्ञ कसा झाला याची ही रंजक कथा!

**४. थॉमस अल्वा एडिसन**

**स्वतःच्या प्रतिभेने जग बदलणारा किमयागार**

**लेखिका: कीर्ती परचुरे**

**पृष्ठ:१३० मूल्य:२००₹**

आयुष्यभर ज्याला कुतूहल अर्थात क्युरिऑसिटीने झपाटलेले होते! कोंबडीसारखा स्वतः अंडी उबवून पिलं काढण्याचा प्रयत्न करणारा हा विचित्र बालक! जगाला प्रकाश देणारा विजेचा दिवा यांनी शोधून काढला! या शास्त्रज्ञाचे आयुष्य भन्नाट गोष्टींनी भरलेले आहे! हे चरित्र वाचताना वाचक स्वतःला हरवून जातो!

**५. गणित विश्वातील अढळ तारा "श्रीनिवास रामानुजन"**

**लेखिका: कीर्ती परचुरे**

**पृष्ठ:१३० मूल्य:१५०₹**

त्याच संख्येला त्याच संख्येने भागले असता उत्तर 1 येते असं सांगणाऱ्या शिक्षकाला, शून्याने शून्याला भागले तर ही उत्तर "एक" येईल का असा प्रश्न विचारणारा बालक.. पुढं महान गणिती रामानुजन म्हणून प्रसिद्ध झाला.

रामानुजन यांचे प्रेरणादायी चरित्र आपल्याला या पुस्तकातून समजते. गरिबी आणि गणितासाठी केलेला त्यांचा अतोनात संघर्ष शेवटच्या श्वासापर्यंत कायम राहिलेला आहे! तो वेदनादायी शेवट आणि अथक केलेला संघर्ष वाचकाला खिन्न करून टाकतो... तरीही हे एक अतिशय भन्नाट चरित्र!

**६. मार्टिन ल्युथर किंग**

**समानतेचे स्वप्न पाहणारा मुक्तिदाता!**

**लेखिका: कीर्ती परचुरे**

**पृष्ठ:१३५ मूल्य:१९५₹**

जात, वंश आणि वर्ण यावरून भेदभाव जगभर केला गेला आहे. पण याविरुध्द समतेसाठी लढाही जगात उभा राहिला. तो लढा उभा करणारे जसे भारतात डॉ बाबासाहेब आंबेडकर होऊन गेले, तसेच अमेरिकेत वर्णभेद संपावा म्हणून मार्टिन ल्युथर किंग यांनी कष्ट घेतले. स्वतः निग्रो असल्याने त्यांचे आयुष्य अनेक कडवट अनुभवांनी भरलेलं!

महात्मा गांधी यांना आपला आदर्श मानून लढा उभा केला. सत्याग्रह यशस्वी केला. हे करताना कोठेही विद्रोही भूमिका न घेणारा हा नेता, समाज जोडणारा ठरला. We have a dream.... नावाच्या प्रसिद्ध भाषणात त्यांनी अमेरिकेच्या प्रगतीत आमच्या सहभागाचे स्वप्न पाहणारा हा नेता खरंच वंदनीय!

**७. अब्राहम लिंकन**

**गुलामगिरीमुक्त देशाचे स्वप्न पाहणारा राष्ट्राध्यक्ष**

**लेखिका:डॉ जान्हवी बिदनूर**

**पृष्ठ:८४ मूल्य:१२५₹**

माणसाला माणूस म्हणून वागवले पाहिजे हा ध्यास घेऊन स्वतःचे आयुष्य पणाला लावलेला एक गोरा माणूस! ज्याने काळ्यांसाठी स्वतःचे प्राण दिले! ज्याने अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष म्हणून सर्वात मोठ्या गृहयुद्धाला हाताळले! ज्याने स्वतःच्याच देशात आपलीच माणसं एकमेकांचे वैरी होताना पाहिले.... स्वतःचे बलिदान

देऊन देशाला विभाजित होण्यापासून वाचवले! असा हा प्रेरणा-पुरुष! त्यांचे हे अतिशय प्रभावी आणि प्रेरक चरित्र!

**८. अमिलिया एयरहार्ट**

**गगन भरारीच ‘ या ध्येयाने झपाटलेल्या तरुणीची सत्यकथा**

**लेखिका: कीर्ती परचुरे**

**पृष्ठ:६४ मूल्य:५०₹**

अटलांटिक समुद्रावरून विमान चालवणारी पहिली महिला पायलट! संपूर्ण सफर तिच्या शांतीची धैर्याची कसोटी पाहणारा! कधी तिच्या विमानाने पेट घेतला तर कधी त्याच्यावर बर्फ पडला! शंभर वर्षांपूर्वी अमेरिकेत जन्मलेल्या अमिलिया नावाच्या आकाशाला गवसणी घालणाऱ्या पायलटचे ही चरित्र! एव्हिएशन क्षेत्रात स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचे स्थान मिळावे म्हणून ती अखेरपर्यंत झटत राहिली! तिचे हे प्रेरक चरित्र!!

**९. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले**

**स्त्री शिक्षणाचा पाया रचणारी धगधगती मशाल**

**लेखन:सायली परांजपे**

**पृष्ठ:९५ मूल्य:१५०₹**

समाजाचं काम करणाऱ्या माणसाकडे जितकी आत्मीयता, तितकीच धमक आणि तितकाच संयमही लागतो. या तिन्हीचा अर्क म्हणजे सावित्रीबाई फुले! अर्थात अशा बाईला जर ज्योतिरावांसारख्या जोडीदाराची साथ मिळाली, तर ‘स्त्री पुरुष समानता’ हे फक्त शब्द राहत नाहीत. त्या संपूर्ण समाजबदलाच्या पाऊल खुणा ठरतात! अशा अर्थानं लिहिलेले हे सावित्रीबाई फुले यांचे चरित्र... ज्यात सावित्रीबाई यांचा झुंजारपणाही अधोरेखित केला आहे.

एक दिवस तर हद्दच झाली. सावित्रीबाई शाळेत निघालेली असताना तिच्या वाटेत एक धटिंगण गुंड येऊन उभा राहिला.

"ये बाई, बऱ्या बोलानं घरी जा... नाहीतर फुडं जे व्हईल, त्याची जिम्मेदारी माझी नव्हं! "त्याने दम दिला. त्या गुंडाचा अविर्भाव बघून सावित्रीबाई क्षणभर गांगरल्या, पण त्यांनी लगेचच सगळं अवसान गोळा केलं आणि पुढे होऊन त्या गुंडाला एक जोरदार थप्पड लगावली. गुंडाला याची अजिबात अपेक्षा नव्हती. सावित्रीबाईंनी त्याच्या धमकवण्यालाही उत्तर दिलं, पण ते ऐकायला तो तिथे थांबलाच नव्हता, त्याने तडक पोबारा केला होता. (पेज:२६)

**१०: सम्राट अशोक**

**लेखिका: सायली परांजपे**

**पृष्ठ:१०१ मूल्य:१५०₹**

नुकत्याच झालेल्या भीषण युद्धामुळे सगळंच उद्ध्वस्त झालंय... कलिंगदेशावर राज्य करणाऱ्या नंद घराण्याचा पराभव झालाय... इथून थोड्याच अंतरावर असलेल्या तंबूतून चाळीसेक वर्षांचा एक इसम या सगळ्या

संहाराकडे निराशेने बघतोय... गेले काही तास तो तंबूत नुसत्या येरझारा घालतोय... त्याचा पोशाख, त्याचा चेहरा, त्याच्या हालचाली कलिंगदेशाच्या हरलेल्या राजाला शोभतील अशा आहेत, मात्र त्याच्या तंबूवर युद्धात जिंकलेल्या मगध साम्राज्याचा ध्वज दिमाखात फडकतोय... त्याच्या आजूबाजूच्या तंबूंमध्ये तर उत्साहाचं वातावरण आहे. मग हाच इतका दुःखी का? हा नेमका आहे तरी कोण? जिंकण्यापलीकडची व्यर्थता बघणारा असा हा कोणता राजा आहे? - हा तोच आहे, ज्याला युद्धाने शांततेचं मोल शिकवलं. याचं नाव 'सम्राट अशोक'! ..... मगधाच्या मौर्य साम्राज्याचा हा सम्राट अशोक... आजपासून साधारण अडीच हजार वर्षांपूर्वी होऊन गेलेला एक थोर राजा! 'कलिंगाचं' हे युद्ध अशोकाच्या गोष्टीची सुरुवातही नव्हती किंवा शेवटही नव्हता... ते होतं त्याच्या आयुष्याच्या गोष्टीतलं एक वळण... पण या एकाच वळणाने राजेपणाला एक नवीन झळाळी दिली. म्हणूनच आज अडीच हजार वर्षांनंतरही अशोकाची गोष्ट फक्त भारतातच नव्हे, तर जगभरात सांगितली जाते!

**११. जे आर डी टाटा**
**लेखिका: कीर्ती परचुरे**
**पृष्ठ:१२६ मूल्य:१५०₹**

जर घडणाऱ्या गोष्टींकडे मानवी दृष्टीकोनातून पाहण्याची आपली तयारी असेल, तर इतरांनी घेतलेले निर्णय आपल्याला विपरीत वाटले, तरी 'हाच निर्णय योग्य आहे' या विश्वासातून इतरांनी ते घेतलेले असतात, हे आपण समजून घेऊ शकतो. '

हे उद्गार एरवी आपल्याला कुणा संताचे किंवा तत्त्वज्ञाचे किंवा एखाद्या शिक्षकाचे वाटले असते. पण हे उद्गार भारतातल्या एका महत्त्वाच्या उद्योगपतीचे आहेत. त्यांचं नाव - जेआरडी टाटा!

जेआरडींच्या मृत्यूला आज ३१ वर्षं झाली, पण आजही टाटांच्या समूहाचा पाया त्यांनी घालून दिलेल्या तत्त्वांच्या आधारावर भक्कम उभा आहे. हा समूह देशातल्या... जगातल्या काही श्रीमंत समूहांपैकी एक आहे, पण समूह म्हणून असलेल्या त्यांच्या प्रतिमेत किंवा टाटांच्या कोणत्याही वागण्यात कुठेच बडेजाव नाही; देखावा नाही. ते कायम आपल्या कामासाठीच ओळखले जात राहिले. 'उद्योजक' या बिरुदाला जागणारी आणि त्याला स्वस्त न करणारी ही तत्त्वं येणाऱ्या उद्योजकांना किंबहुना आपल्या सगळ्यांना नक्कीच वाट दाखवत राहतील! "

– – तर असा हा स्वतःसाठी आणि स्वतःच्या मुलांसाठी.. थोडक्यात सर्वांसाठीच आयुष्याची योग्य दिशा शोधायला प्रेरित करू शकेल असा पुस्तक-संच सर्वांच्या संग्रही असावा असाच......

परिचय – श्री हर्षल सुरेश भानुशाली, पालघर मो 9619800030



## 59. कविता – कृष्णमर्म — सुश्री प्राची जोशी



जगणं अगदी साधं व्हावं
सहज हसता यावं
सहज रडता यावं
मनापासून कौतुक करता यावं....

जगणं अगदी साधं व्हावं
खिडकीतून पावसाला बघता यावं
आल्याच्या चहात बुडता यावं
वाफेमध्ये विचारांना सोडून देता यावं.....

जगणं अगदी साधं व्हावं,
सुखदुःखातही सहज असावं
अनेक रंगात रंगता यावं
तरीही रंगात "वेगळं " असावं.....

जगणं अगदी साधं व्हावं,
सर्वांचं मन जपणारं असावं
आतल्या मनापर्यंत पोहोचता यावं
मनाचं मनाशी बांधलं जावं.....

जगणं अगदी साधं व्हावं,
कर्म, मर्म सर्व कृष्णच व्हावं
कृष्ण कृष्ण जपता जपता
कृष्णाचरणीच विलीन व्हावं....

**सुश्री प्राची अभय जोशी,** *मो 9822065666*

## 60. कविता - बारा मास.. बारा गाणी … – श्री सुहास रघुनाथ पंडित



चैत्रामधली गाणी
पालवीस फुटते वाणी …

वैशाखातली गाणी
वणवा पानोपानी …

ज्येष्ठामधली गाणी
ढगात लपले पाणी …

आषाढ घनांची गाणी
थेंबातून पानोपानी …

श्रावणसरींची गाणी
हिरव्या मखमल कुरणी …

भाद्रपदाची गाणी
गौरीचे पाऊल अंगणी …

अश्विनाची गाणी
कोजागिरीची रजनी …

कार्तिकाची गाणी
दीपांच्या पंक्तींमधुनी …

मार्गशीर्षाची गाणी
पतझड पानोपानी …

पौषामधली गाणी
तिळागुळाच्या दाणी …

माघामधली गाणी
कुडकुडत्या गात्रांमधुनी …

फाल्गुनातली गाणी
वर्षभराचे रंग भरुनी …

बारा मास बारा गाणी
लय साधती या जीवनी…

श्री सुहास रघुनाथ पंडित. सांगली. मो. 9421225491

## 61. कथा - जिंदगी के साथ भी... जिंदगी के बाद भी!! – श्री संभाजी बबन गायके





“बंदुकीतून सुटणा-या प्रत्येक गोळीवर कुणाचं नाव असतंच असं नसतं, सलमा! आणि ज्याचं कुणाचं नांव लिहिलेलं असतं ना एखाद्या गोळीवर, ती गोळी मृत्यूचा निरोप पोहोचवतेच त्या देहापर्यंत. मग मी का घाबरावं? मृत्यू जर ठरलेलाच असेल तर कर्तव्यही ठरलेलंच आहे की. मरणाला भिऊन आताचं जगणं का गमवायचं आपण? “

आमच्या लग्नाला पंधराच दिवस झालेले होते. आणि तेवढ्यात ह्यांना आदेश आला... पंजाबमध्ये दाखल होण्याचा. बंगळुरूमध्ये माझं बालपण गेलं. घरातील वातावरण पूर्णत: परंपरावादी. बाहेरचं जग आणि मी यांत एक पडदा कायम होता आणि माझ्या चेह-यावरसुद्धा. माझ्यासाठी ह्यांचं स्थळ सांगून आलं... त्यांनी मला पाहिलं आणि आमचं लग्न झालं. तोवर सैनिकाचं आयुष्य नेमकं कसं असतं याची मला सुतराम कल्पना नव्हती. बंगळुरूमधून थेट पंजाबसारख्या वेगळ्या प्रदेशात मला एकटीला राहायची कल्पनाच सहन होईना. मी अक्षरश: धाय मोकलून रडले... ’मला तुमच्या साहेबांकडे घेऊन चला... मी सांगेन त्यांना... माझ्या नव-याला पाठवू नका सीमेवर!‘

‘जाऊ नका!’ एवढाच मी धोशा लावला होता. त्यावर मेजर रफिक महमूद घोरी साहेबांनी मला अत्यंत हळुवारपणे समजावलं... ”तू सामान्य स्त्री नाहीस, एका सैनिक अधिका-याची पत्नी आहेस... उद्या मी सुट्टीवर आलो आणि झाला माझा अपघात... तर काय करशील? माझं पहिलं प्रेम माझं कर्तव्य आहे... या भारताचा संरक्षक म्हणून मी देहावर हा गणवेश परिधान केला आहे... त्याच्याशी माझं इमान आहे आणि राहील. मी नाही गेलो सीमेवर तर दुस-या कुणाला तरी जावंच लागेल की नाही... आणि प्रत्येक वेळी माझ्याऐवजी दुसरा कुणी जाईल असं कसं शक्य आहे? आणि तू हे स्वप्न का नाही पाहात... मला बढती मिळाली आहे... काही दिवसांनी मी कर्नल म्हणून रिटायर्ड झालो आहे... आपली मुलं छान मोठी झालीत... आणि आपण एकमेकांच्या हातांत हात गुंफून आपल्या एखाद्या बागेत मस्त फेरफटका मारतो आहोत!”

पुढे पंजाबातून मेजरसाहेबांना देशाच्या अनेक सीमांवर धाडण्यात आले. प्रत्येक वेळी त्यांच्यासोबत जाता येतच होते असे नव्हते. त्यात मला दिवस गेलेले. त्यांची जवळजवळ प्रत्येक दिवशी येणारी पत्रं हा एक फार मोठा दुवा होता आमच्या दोघांतला. वळणदार इंग्रजी अक्षरात लिहिलेली त्यांची पत्रं मी तासनतास वाचत बसायची.... कारण त्यांची पत्र म्हणजे कित्येक पानांचा निबंध असे... भावनांनी, प्रेमाने ओतप्रोत भरलेला! आणि त्याचं शीर्षक एकच असायचं... ’याद आ रही है!’ आणि त्यांच्या पत्राचे उत्तर पाठवायला मी

रोज पोस्ट ऑफिसमध्ये जायची. मेजरसाहेब खूप छान व्यक्त होत असत. विविध प्रकारची भेटकार्डस त्यांना आवडत. ज्या ज्या ठिकाणी बदली होई त्या त्या ठिकाणच्या जवळच्या शहरात जाऊन ते जमतील ती सर्व भेटकार्ड्स विकत घेत आणि मला पाठवत असत. फोटोग्राफी तर त्यांचा छंदच होता. त्यामुळे आमच्या आयुष्यातील प्रत्येक आनंदाच्या क्षणांची अनेक छायाचित्रं हा माझ्याजवळचा एक खजिनाच आहे. साहेबांचा नेम अतिशय पक्का. सेनेत भरती झाल्यावर त्यांना नेमबाजीचंच काम मिळालं... तोफखाना विभाग. अचूक तोफगोळे डागण्याच्या स्पर्धेत त्यांचा पहिला क्रमांक सहसा चुकत नसे. पण हा रांगडा गडी खेळाची आवड सांभाळता सांभाळता गाण्याची आवड राखून होता.... ' जिंदगी तो बेवफा है... एक दिन ठुकारायेगी... मौत महबूबा है अपनी साथ लेकर जायेगी.'... हे त्यांचं आवडीचं गाणं.

असंच त्यांना काश्मीरने बोलावून घेतले. राष्ट्रीय रायफल्स हे सैनिक दल विशेष करून पाकिस्तानातून भारतात घुसणाऱ्या आणि स्थानिक अतिरेक्यांचा माग काढीत त्यांना नेस्तनाबूद करण्याच्या कामगिरीवर सतत सज्ज असते. इथे सातत्याने अतिरेकी हल्ले आणि त्यांच्याविरुद्ध भारतीय सैन्याच्या कारवाया सुरू असतात. या युनिटमध्येसुद्धा मेजरसाहेबांनी अल्पावधीतच आपले स्थान निर्माण केले. उंचीपुरी शरीरयष्टी, अत्यंत उच्च दर्जाचे व्यावसायिक प्रशिक्षण आणि असामान्य शौर्य या त्यांच्या जमेच्या बाजू. अचूक नेमबाजी तर त्यांना प्रसन्नच होती.

दिवस पुढे सरकत गेले. युनिटमधली माणसं अतिरेकीविरोधी मोहिमेवर गेली की युनिटमधील इतर अधिका-यांच्या पत्नी एकत्र बसून त्यांची प्रतिक्षा करीत असायचो. त्यावेळी मोबाईल फारसे नव्हते. त्यामुळे वाट पाहण्याशिवाय पर्याय नव्हता... आठच दिवसांपूर्वी मेजर साहेबांनी सांगितले होते... की त्यांनी मागील ऑपरेशनमध्ये काही अतिरेक्यांना ठार करण्यात यश मिळवलं... त्यासाठी बहुदा एखादं मेडल मिळणार आहे!

त्यादिवशी भारतीय सैन्याला एक पक्की खबर लागली... बारामुल्ला मधील बोबान वत्सारच्या दाट जंगलात अतिरेक्यांचा एक गट लपला आहे. साहेबांनी त्या अतिरेक्यांच्या मागावर जायची जबाबदारी स्वीकारली. अतिशय काळजीपूर्वक ऑपरेशनची तयारी केली गेली. ओपस या लॅटीन शब्दाचा अर्थ आहे काम किंवा प्रयत्न. यातून operari शब्द बनला आणि पुढे तो इंग्लिशमध्ये ऑपरेशन असा आला... अर्थात... अनेक लोकांना एकत्रित घेऊन, कृतीक्रम आखून, त्याचे सुयोग्य नियोजन आखून एखादे काम तडीस नेणे! भारतीय सैन्य याबाबतीत खूप दक्ष असते. पाकिस्तानशी समोरासमोर झालेली युद्धे तशी तुलनेने सोपी म्हणावी लागतील अशी काश्मीरमध्ये सुरु असलेल्या युद्धाची परिस्थिती आहे. प्रचंड लांबी असलेली सीमा, घनदाट जंगल, प्रतिकूल हवामान, पाकिस्तानी सैन्याने खास प्रशिक्षित केलेले आणि कट्टर अतिरेकी, त्यांना काही ठिकाणी दिला जाणारा छुपा पाठिंबा, नागरिकांच्या जीवितास, मालमत्तेस हानी पोहोचू न देण्याची, मानवी हक्कांचे रक्षण करण्याची कसरत ... अशा एक न दोन समस्यांना तोंड देत सेना अतिरेक्यांना टिपून मारत असते. स्थानिकांना हाताशी धरून खब-यांचे जाळे विणावे लागते. स्थानिक प्रशासन, पोलिस, अर्धसैनिक दल यांचेशी समन्वय राखावा लागतो. मोहिमेवर निघताना आवश्यक दारूगोळा सोबत न्यावा लागतो, शक्य तिथे वैद्यकीय पथक सोबत ठेवावे लागते, अतिरेकी लपल्याची खात्री झाल्यावर त्या भागाला वेढा घालावा लागतो.

प्रसारमाध्यमांना कुणकुण लागतेच, त्यांच्या सावध नजरांसमोर कारवाई करावी लागते. आणि विशेष म्हणजे अतिरेक्यांना शरण येण्याची संधी द्यावीच लागते.... आणि भारतीय सैन्य ही संधी देतेच देते! जखमी सैनिकांना रुग्णालयात हलवत असताना काहीवेळा स्थानिक लोक रस्त्यात अडथळे उभारतात! देशाचे रक्षण करण्यासाठी सैनिक आणि त्यांचे कुटुंबीय फार मोठे मोल देत असतात. किती मोल? २००४ ते २०१४ या दशकात १०६७ बलिदाने.. अर्थात हजारभर कपाळांवरचं कुंकू पुसले गेले... शेकडो मुलं वडिलांच्या प्रेमाला पारखी झाली.... कित्येक माता-पित्यांच्या म्हातारपणाचा आधार हिरावला गेला, बहिणींना राखी बांधायला मनगटे उरली नाहीत!

त्यादिवशी अतिरेक्यांच्या शोधात पुढे निघालेल्या गटाच्या पुढे मेजरसाहेब स्वतः होते.... आणि त्यांच्यावर गोळीबार सुरू झाला.... साहेबांना अनेक गोळ्या लागल्या.... आणि ते कोसळले... गटातील इतर सैनिकांनी त्वरीत उत्तरादाखल गोळीबार आरंभला. मेजरसाहेब उठून उभे राहिले.... त्यांच्या गटातील एक तरुण सैनिक गोळ्या लागून कोसळला होता... साहेबांनी त्याला स्वतःच्या खांद्यावर उचलून ते सैनिकांच्या वाहनापर्यंत पोहोचले.... तो सैनिक बचावला... पण अतिरक्तस्राव झाल्याने मेजरसाहेब बेशुद्ध पडले आणि त्यानंतर पुन्हा कधीच उठले नाहीत... भारतीय सैन्याचा आणखी एक बहादूर अधिकारी देशाच्या रक्षणार्थ लढताना कामी आला होता!

... त्यादिवशी मी माहेरी होते. सुफियाच्या सुट्टीचा तो शेवटचा दिवस होता... दुसऱ्या दिवसापासून माझ्या मुलाची, सैफची शाळा सुरु होणार होती.. तो पहिल्यांदाच शाळेत दाखल होणार होता.. आणि त्याला शाळेत सोडवायला नेहमीप्रमाणे त्याचे वडील नसणार होते! मी त्या संध्याकाळी माझ्या घरी पोहोचले... आणि मुलांच्या शाळेची तयारी करू लागले... एवढ्यात दरवाजावर थाप पडली... दारात काही लष्करी अधिकारी उभे होते... मला वाटले साहेबांना मिळणार असलेल्या मेडलची खुशखबर द्यायला आले असतील... कारण काहीच दिवसांपूर्वी त्यांना त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून सन्मानपत्र दिले गेले होते... आणि एक मोठे मेडल दिले जाण्याची शक्यताही होती.... पण माझ्या दारात गंभीर चेह-याने उभ्या असलेल्या त्या अधिकाऱ्यांसोबत आमच्याच पैकी दोन महिलाही होत्या.... माझं काळीज हादरलं.... याचा अर्थ मला ठाऊक होता... मेजरसाहेब....! ते म्हणाले, " साहेब खूप शौर्याने लढले... पण अखेरीस कामी आले! "

... माझ्या डोळ्यांसमोर आणि आयुष्यात काळोख दाटला! प्रत्येक सैनिकाच्या मातेला, पत्नीला नेहमी पडतात अशी दुःस्वप्नं मलाही अनेकदा पडली होती... पण हे स्वप्न सत्यात उतरून माझ्यासमोर आ वासून उभं होतं!

मी साहेबांना receive करायला विमानातळावर गेले.... तिरंग्यात लपेटलेला त्यांचा देह तीन दिवसांनी माझ्या नजरेसमोर होता. माझी थोरली मुलगी तशी कळत्या वयातली होती, मात्र मुलगा केवळ चारेक वर्षांचा होता.... तो म्हणाला, "माझे वडील मी असा जवळ असताना कधीच झोपी जाणार नाहीत... त्यांना उठवा! " मेजरसाहेब कधीच उठणार नव्हते... काहीवेळाने जनाजा गेला... आणि माझं सुखही!

त्या क्षणापासून मी बधीर झाले... तहान, भूक, झोप, पोटच्या लहान लेकरांचा आणि स्वत:चा विचार यांपासून कित्येक कोस दूर गेले... डॉक्टर मला झोपेचे इंजेक्शन देत.... पण तरीही मी मध्यरात्री उठून ह्यांना घरभर शोधत फिरत असे. मेजरसाहेब आमच्या घराला हॅपी होम म्हणायचे. जीवनावर एवढं भरभरून प्रेम करणारा माणूस.. असा अकाली निघून जावा! ते नेहमी म्हणायचे.... मी कितीही दूर असलो तरी तुमच्या सोबतच आहे अशी कल्पना करत जा... मी निश्चित परतेन लवकरच.

.... आयुष्य पुढे सरत गेले... मुलं शाळेतून परत आली की म्हणायची...' मित्राला सोडवायला आणि घेऊन जायला त्याचे वडील आले होते... आमचे वडील का नाही येत?' या प्रश्नाचे उत्तर द्यावे तरी काय? त्यांना घट्ट मिठीत घ्यायचं आणि आसवांचे कढ गिळून टाकायचे!

सरत जाणा-या दिवसांनी माझ्या वेदनेचा दाह कमी कमी करत नेला. मला आधी वाटायचं...' मीच का? माझ्याच वाट्याला हा विरह का आला?' साहेबांचा गणवेश मी जपून ठेवला होता.... खराब होऊ नये म्हणून धुतलाही नाही... त्यांच्या गणवेशातल्या खिशातल्या कोणत्याही वस्तू, पैसे मी त्यातून बाहेर काढले नाहीत आजवर...!

ज्या जागी मेजरसाहेबांनी शेवटचा श्वास घेतला त्या जागी भारतीय सैन्याच्या वतीने 'घोरी स्मारक' उभारलं आहे. स्थानिक लोक त्या जागेला 'घोरी प्रेरणास्थळ' म्हणतात.. आणि १७२, मेडियम रेजिमेंटने त्यांच्या कार्यालयाच्या एका भागाला 'घोरी ब्लॉक' हे नाव दिले आहे! मी या सर्व स्थळांना भेट देऊन आले... मेजरसाहेब देहाने गेले होते... पण कीर्तीरूपाने मागे उरले आहेत!

जात, धर्म, पंथ, भाषा, प्रांत यांच्या पलीकडे आहे भारतीय सैन्य..... इथं प्रत्येकजण एकमेकांचा रक्ताच्या नात्यातला... सहका-यासाठी आपल्या प्राणांची पर्वा न करणारा इथला सैनिक. साहेबांचे सहकारी माझे भाऊ बनून पाठीशी उभे राहिले... अधिका-यांच्या पत्नी धीर देत राहिल्या... त्यात अनेक जणींनी माझ्यासारखेच सौभाग्य गमावले होते... त्या अनुभवातून त्या गेलेल्या असल्याने त्यांच्या शब्दांना अर्थ होता...!

काळ सरत होता... नंतर हळूहळू उमगलं.... मी एकटी नाही या दु:खाच्या समुद्रात गटांगळ्या खात... कित्येक जणी आहेत! महाविद्यालयात असताना मानसशास्त्र एक विषय म्हणून अभ्यासला होता... त्या ज्ञानाचा प्रत्यक्ष जीवनात उपयोग करून घेण्याचा निश्चय केला. माझ्या शहरात माझ्यासारखीच आणखी एक वीरपत्नी होती... त्यांनीही त्यांचे पती अशाच रीतीने गमावले होते... पण त्या लवकरच सावरल्या होत्या आणि त्यांनी सैनिक कल्याण कामात स्वत:ला वाहून घेतले होते. मी त्यांच्यासोबत काम करू लागले... मग माझे दु:ख मला धाकटे वाटू लागले. सैनिकांच्या विधवा वीरपत्नी, वीरमाता यांच्या कल्याणाच्या उपक्रमात मी व्यग्र झाले... मुख्यत: त्यांना धीराचे दोन शब्द सांगणे हे माझे कामच झाले... यालाच औपचारिक भाषेत समुपदेशन म्हणतात.... इथे माझ्या स्वत:च्या दु:खाचा अनुभव कामी आला!

माझी दोन्ही मुलं आर्मी स्कूलमध्ये बारावीपर्यंत शिकली. प्रत्येक पालक सभेला, स्नेहसंमेलनाला इतर मुलांचे वडील युनिफॉर्ममध्ये येत... त्यांना बघून मला मेजरसाहेबांची आठवण येई... पण मुलांना वाईट वाटू नये म्हणून मी चेहरा निर्विकार राखत असे.... तो अभिनय मी शिकून घेतला होता! शफिकसाहेब त्यांच्या नावाच्या अर्थाप्रमाणेच वागले... शफिक म्हणजे प्रेमळ... कोमल हृदयी... देशप्रेम आणि कर्तव्य त्यांनी सर्वोपरी मानले.

२०२५.... यावर्षी २५ वर्षे पूर्ण झालीत साहेबांना जाऊन... एका अर्थाने हे माझ्या विरहाचं रौप्यमहोत्सवी वर्ष म्हणावं लागेल... पण वीरपुत्र मेजर शफिक महमूद खान घोरी साहेब मला सोडून गेले आहेत असं मला वाटतच नाही.... जणू साहेब म्हणताहेत.... जिंदगी के साथ भी... जिंदगी के बाद भी!

**शब्दांकन : श्री संभाजी गायके, पुणे मो. 9881298260**



## 62. कथा – लकवर्धन — सुश्री स्नेहल अखिला अन्वित



मधे मला कुठूनतरी कळलं की मी चांदीच्या वस्तू वापरल्या तर माझं लक एनहान्स होईल! थोडक्यात चांदी माझ्यासाठी लक्की आहे. चांदीचं नाणं पर्समध्ये ठेवा, चांदीच्या ग्लासातून पाणी प्या, चांदीची अंगठी घाला, चांदीची माळ गळ्यात घाला. चांदीने चमचम चमचम चमका, मग तुमचं नशीब देखील चमकू लागेल!

आता खरंतर जे जसं चाललेलं ते काही वाईट नव्हतं. किंबहुना चांगलंच होतं. पण म्हटलं चांदीने अधिक चांदी होणार असेल नशीबाची, तर कशाला ना उगाच संधी दवडा! अन् त्या निमित्ताने घरात पडून असलेली चांदी देखील वापरली जाईल.

जसा विचार आला तसा पेटारा उघडला, अन् त्यातून चांदीच्या वस्तू बाहेर काढल्या. पहिलं देवासाठी निरंजन बाहेर काढलं. म्हटलं होऊन जाऊ दे देवाचीही चांदी! चांदीचे पेले होते काळेमिट्ट होऊन पडलेले, त्यांना बाहेर काढलं. म्हटलं आता पाणी प्यायचं ते चांदीच्या पेल्यातूनच! नाणीही काढली बाहेर. लग्गेच वापरातल्या दोन तीन पर्समध्ये टाकून दिली. पोरीच्या गळ्यातली चांदीची चेन स्वतःच्या गळ्यात अडकवून टाकली. लॉकरमध्ये चांदीचं पैंजण अंगाचं मुटकुळं करून शांत झोपलं होतं कित्येक वर्षांपासून; त्याला जागवलं, रुपेरीने चमकवलं अन् पायात घालून घरभर छम्मक छल्लो बनून छमकू लागले. बाई डोक्यावर पडली यावर घरच्यांचं एकमत झालं!

मग वाटलं, अंगठी पाहिजे होती चांदीची. ही सोन्याची अंगठी काही कामाची नाही. हिला आत ढकलली पाहिजे.

लग्गेच मैत्रिणीला फोन लावला. आम्ही बऱ्याच बाबतीत सेम पिंच आहोत. तिचंही लक चांदीने वर्धित होणार होतं. तिला चांदी या धातूचं तिच्या जीवनातलं अनन्यसाधारण महत्व लक्षात आणून दिलं. लक एनहान्स करून तिलाही हवं होतं!

त्याच संध्याकाळी दोघी गेलो, आणि प्रत्येकी दोन दोन अंगठ्या घेऊन आलो. मैत्रिणीने लक वाढवण्याच्या हौसेने चांदीचे आणखी दोन तीन आयटम पण घेतले. माझ्याकडे पेले होते, वाटी देखील होती. मनात आलं आपण चांदीच्या ताटात जेवलो तर आणखी लकवर्धन होईल. अंगठ्या तशा किरकोळ किंमतीच्या होत्या, मात्र ताटाची किंमत ऐकून ते भाग्योदय झालं की घेऊ असं ठरवलं.

देवाला रोज चांदीच्या निरंजनात दिवा लागू लागला. मी रोज चांदीच्या ग्लासात पाणी ढोसू लागले. रोज चांदीच्या अंगठ्यांकडे पाहून आता कधीही नशीब फळफळू शकतं यासाठी मनाला तयार करू लागले. पर्समध्ये

ठेवलेलं चांदीचं नाणं नशीब पालटल्यावर नोटांच्या थप्प्यामधून शोधून काढावं लागेल, या विचाराने हुरळून देखील जाऊ लागले.

आता होईल.. नंतर होईल करता सहा महिने झाले. माझं लक इतकुसं देखील एनहान्स झालेलं नाही हो अजूनपर्यंत!

चांदीची भांडी चमकवून चमकवून रुपेरीच्या बाटल्या संपल्या. पण नशीबाला काही चमकावं वाटलं नाही अजून!

माझा धीर संपत आलाय, अजून दोन दिवस वाट बघणार. नाहीतर सरळ सगळी चांदी पेटारा जमा करणार. उगाच आणखी आशा नकोच जीवाला!

कालच मैत्रिणीचा फोन आला होता, माझ्या नादी लागून आता चारआणे सुद्धा खर्च करणार नाही असं तिने मला अगदी ठणकावून सांगितलं.

खरं सांगू? मला ना माझं लक एनहान्स झालं नाही याचं एवढं काही नाही वाटलं. पण तिचंही झालं नाही हे ऐकून इतकं भारी वाटलं ना की काय बोलू!

... नाही म्हणजे माझा विचार माझ्याबरोबर तिचंही भलं करायचाच होता. पण तिचं एकटीचच भलं झालं असतं ना तर माझ्या जीवाला फाऽऽर बोचलं असतं!

असो......

होतं ते सगळं चांगल्यासाठी म्हणतात ना ते हेच्च......

**सुश्री स्नेहल अखिला अन्वित**



## 63. कथा – शॉपिंग फेस्टिव्हल – श्री कौस्तुभ केळकर नगरवाला



दसरा झाला. त्याच्या कंपनीत बोनस पण जाहीर झाला.

कंपनीत तो साधा वर्कर म्हणून लागला होता बारा वर्षांपूर्वी. आता सुपरवायझर झाला.

दिवसभर हात काळे व्हायचे मशीनवर. पण घरी जाऊन त्याच्या परीचा हसरा चेहरा बघितला, की थकवा कुठल्या कुठे पळून जायचा.

छोटीशी का होईना स्वतःची जागा घेतली होती त्यानं. बँकेचा हफ्ता भरताना ओढाताण व्हायची. काही नाही तरी या बारा वर्षात 'गणित' विषय पक्का झालेला. महिनाअखेरीला परीक्षेचं जाम टेन्शन यायचं. काठावर पास व्हायचा दरवेळी.

शिलकीत काही पडायचं नाही. पण कुठं ऊधारीचीही वेळ आणली नाही कधी.

आता तर दिवाळी तोंडावर. नंतर दुकानांत खूप गर्दी होते म्हणून बाॅसकडून आधीच ऊचल घेतलेली. त्याची बायको समजूतदार. स्वतःहून कधी मागितलं नाही बिचारीनं. पण यावेळी त्यानं ठरवलं होतं. त्याच्या परीला छान ड्रेस घ्यायचा.

परी ड्रेस...

.... तो पायघोळ ड्रेस हातांनी वर उचलत, पायातलं छुमछुम वाजवत.. त्याच्या छोट्याश्या अंगणात, फुलबाज्या ऊडवणारी त्याची परी.... क्षणभर त्या फुलबाज्यांच्या चांदण्यांनी, त्याच्या मनात आत्ताच दिवाळी साजरी झाली.

परीला तो शोकेसमधला गुलाबी परीचा ड्रेस घ्यायचा. बायकोला छान डिझायनर साडी. नंतर छानशा हाॅटेलात जेवायला जायचं.. त्यानं पुन्हा गणिताचा 'होम'वर्क करायला सुरवात केली... जमेल.. जमवायचंच.

बहुधा सगळ्यांनी त्याच्यासारखंच ठरवलेलं. नंतर गर्दी होईल, म्हणून दुकानात आत्तापासूनच गर्दी केलेली.

काऊंटरवरच्या गर्दीत तो घुसतो. शोकेसमधला तो ड्रेस काढायला लावतो. परीचा चेहरा आनंदी फुलबाजी झालेला.

ट्रायल रूममधनं त्याची परी बाहेर येते.. त्यानं जशी कल्पना केली होती तशीच... तशीच गोऽऽड दिसत्येय.

किमतीचं लेबल पाहून बायकोचा जीव वरखाली. त्याला फुलबाजीशिवाय दुसरं काहीच दिसत नाहीये.. तो ड्रेस पॅक करायला लावतो. परी पंख लावून उडताना बघून, तो आभाळाएवढा खूष.

मग साड्यांची शोरूम. यावेळी तो बायकोला सांगतो, चांगला तास दीड तास लागू दे.. शंभर साड्या बघ..

मनासारखी मिळेपर्यंत हो म्हणायचं नाही... तो सतत तिच्यावरच लक्ष ठेवून आहे.. ती लाल रंगाची साडी..

तिनं किंमत बघून हळूच मागे ढकललेली... तीच घ्यायची.. तो ठार बहिरा झालेला.. बायकोचं 'नाही' त्याला ऐकूच येत नाही. शेवटी तीच साडी पॅक करून तो बाहेर पडतो. लाल रंगाच्या साडीतली त्याची बायको जगात सगळ्यात सुंदर वाटू लागते...

क्षणभरात तो 'श्रीमंत' होतो.... मनासारखी खरेदी झालेली. त्याची परी आणि बायको, त्याच्या खरेदीच्या मागे लागतात.

तो घड्याळ दाखवतो.. ‘ तुम्हाला माहित्येय ना, मला किती वेळ लागतो ते.. आज नको.. चला आता बाहेर जेवायला जाऊ.. ’

त्याची सोनपरी..

"नको बाबा... खूप दिवसात आईच्या हातची शेवभाजी खाल्ली नाहीये.. " गुलाबजामून घेवून तो घरी.. मस्त गोऽड जेवण.

त्याच्या परीलाही 'गणित' छान येतंय की. उगाच परी नाही म्हणत तो..

हात डोक्याखाली घेवून तो विचार करू लागतो... दिवाळीत तयार होत नाही कुणी.. तीन दिवस ओव्हरटाईम करू..

भाऊबीजेला ताई येईल तेव्हा घरी थांबू.. मग मला नवीन कपड्यांची काय गरज? आपला निळा वर्कशाॅपसूट सगळ्यात भारी ड्रेस. कंपनीचं वर्कशाॅप हेच खरं शाॅपींग फेस्टिवल. सगळे सण इथेच साजरे करायचे. त्याच्याच जीवावर.... ताईच्या ओवाळणीचं पुढच्या रविवारी बघू.

त्याचा पटकन डोळा लागतो. सकाळ उजाडायच्या आत तो कामावर पळतो. दिवसभर काम करून तो घरी येतो.

जेवण झाल्यावर बायको त्याच्या हातात नवीन ड्रेस ठेवते... येलो शर्ट अन् चाॅकलेटी पॅन्ट.. ताईंच्या ओवाळणीची साडीही....

... त्याच्या चेहऱ्यावर भला मोठ्ठा क्वेश्चन मार्क?

"तुमचीच बायको आहे मी. वर्षभर साठवलेले पैसे आहेत माझे... आणि हो बिलकूल डबल शिफ्ट करायची नाही दिवाळीत. तुम्ही असाल तरच दिवाळी साजरी होईल माझी. "

मनकवडी.. खरंच ओळखून होते दोघं एकमेकांना.

...... खरंच तिघांनी गणितात पैकीच्या पैकी मार्क्स मिळवले यावेळी.. तो दिवाळी शाॅपींग फेस्टिव्हलच्या तुडुंब गर्दीएवढा खूष होतो... जगातला सगळ्यात श्रीमंत..

... डोक्यावर गजरा लावून बायको परीला झोपवू लागते..

... तो त्या दिवाळी सुंगधात, घनघोर हरवतो..

स्वप्नील.... त्याच्या बायकोबरोबर.. काश्मीरी जंगलात.. बर्फांच्या गोळ्यांची रप्पाधप्पी......

...... न संपणारी स्वप्ने उशाशी घेवून, तो तिची वाट बघू लागतो.

******* हॅप्पी दिवाली. *******

**श्री कौस्तुभ केळकर नगरवाला**

## 64. कथा – व्यवहार — सुश्री नीता कुलकर्णी



रोज माझ्याकडे नीला कामाला येते. काम करता करता माझ्याशी गप्पा मारते. पण गेले दोन दिवस ती गप्प गप्प होती. मला माहित होतं.. वेळ आली की ती सांगेल. काहीतरी बिनसलं असेल तिचं... म्हणून मी काही विचारले नाही. चार दिवसानंतर ती म्हणाली,

"वहिनी काय आणि कसं सांगू तुम्हाला? माझं तर डोकं भंजाळून गेलंय बघा.. "

"थांब जरा बैस. मी चहा करते" मी म्हणाले

"चहा नको.. तुमच्याशी जरा बोलते. बसा वहिनी"

"बरं सांग काय झालं?"

"अहो माझा जावई एका पोरीच्या नादी लागलाय. ती पोरगी चांगली शिकलेली आहे. मोठ्या कंपनीत नोकरीला आहे. माझ्या जावयानी बँकेतून कर्ज घेऊन गाडी घेतलेली आहे. त्याची गाडी तोच चालवतो. गाडी भाड्यानी द्यायचा त्याचा धंदा आहे. वेळेवर हप्ते फेडतो. सगळं काही सुरळीत चालू होतं. पण ही महामाया त्याच्या मागे लागली. "

"अग पण त्याला ही कुठे भेटली??"

"तो तिला पुणे -मुंबई एअरपोर्टला आणायला सोडायला जायचा. तिला दिवसभर गाडी हवी असली की ह्यालाच बोलवायची. त्यात त्यांचं सूत जुळलं. "

"अग ती एवढी शिकलेली.. विमानानी फिरणारी.. ड्रायव्हरच्या कशी प्रेमात पडेल?"

"हो ना.. तेच आम्हाला पण काही समजत नाहीये.. आणि कसंय वहिनी रांगडा असला तरी देखणा आहे माझा जावई.. इंग्रजी बोलतो.. भाळली असेल त्याच्यावर. आत्ताच्या पोरींचं काय सांगता येतंय... "

"कदाचित तसं काही नसेलही. चार दिवस गेले की ती त्याला सोडून जाईल. " मी म्हणाले.

"आम्हाला पण तसंच वाटतय पण माझी वंदी फार रडतीय बघा.. माझ्या तर जीवाला घोर लागलेला आहे."

"हो तुला काळजी वाटणारच. जावयाला तू नीट विचारलंस का?"

"चांगलं खडसावून विचारलं.. म्हणाला माझं तसं काही नाही. पण तुम्ही सांगा अशी गोष्ट लपून राहत असते का? काय करावं कळना झालंय बघा.. "

त्या दिवशी ती रडतच होती. तशीच घरी गेली.

मलाही फार वाईट वाटले. वंदी सरळ साधी छान मुलगी होती. माझ्याकडे आलेली होती. बिचारीवर हे संकट अचानक कोसळलं होतं....

जावयाची भानगड.. ही नाजूक गोष्ट होती. म्हणून मी नंतर नीलाकडे हा विषय काढला नाही.

सावळी, कुरळ्या केसांचा घट्ट अंबाडा घालणारी, मोठ्ठ कुंकू लावणारी, साधीभोळी हसतमुख नीला अगदी कोमेजून गेली होती. यायची, कामं करायची, थोडं बोलायची... जायची.... उदासच असायची. स्वाभाविकच होतं ते...

काही दिवसानंतरची गोष्ट.....

त्या दिवशी बारा वाजले तरी नीला आली नाही. तिचा फोनही लागत नव्हता. माझं मी काम करून घेतलं.

लक्षात आलं निश्चितच काहीतरी गडबड झालेली असणार.. काय झालं असेल... मला काळजी वाटायला लागली...

दुसरे दिवशी लवकर ती आली. आल्या आल्या म्हणाली,

"वहिनी वंदीला आणि दोन्ही नातींना घरी घेऊन आले. काल खूप भांडले जावयाशी. वंदीची सासू म्हणत होती.. पोरगं सुधारेल.. चुलीतलं लाकूड चुलीतच राहू दे..... पण मी काही ऐकलं नाही. माझी दोन्ही पोरं, नवरा आम्ही सगळेच गेलो होतो. "

"अग पण वंदीच पुढे काय?"

"पुढचं पुढे बघू.. रडून रडून जीव जायचा माझ्या पोरीचा. "

"हो ग.. तिला किती धक्का बसला असेल "

"म्हणूनच तिला घेऊन आले. आता लोक दहा तोंडानी दहा गोष्टी बोलणार हे मला माहिती आहे. मी लोकांकडे लक्ष देणार नाही. बोलू देत काय बोलायचं ते... "

यावर मी तरी काय बोलणार? वंदी पाच सहा घरी कामं करत होती. आता माहेरी आल्यावर तिला लांब जायला लागत होतं. पण ती कामं करत होती. पोरींची शाळा चालू होती. जावयाला लागलेला त्या पोरीचा नाद.. कसा सोडवावा हे नीलाला कळत नव्हतं. ती देवाला नवस करत होती. तेवढचं तिच्या हातात होतं... जावयाचा भाऊ, आई त्याला समजावत होते. पण तो त्याच्याच नादात होता. कोणाचं काही ऐकत नव्हता.

नीला आली की रोज काहीतरी सांगायची. बिचारीचं कष्ट करत तसं बरं आयुष्य चाललं होतं. मध्येच हे विघ्न आलं होतं. यावर काय उपाय करावा हे कळत नव्हतं. असेच दोन महिने गेले.

एके दिवशी सकाळी नीलाचा फोन आला.....

"वहिनी फार गडबड झालीये. मी दोन दिवस येणार नाही. आले की तुमच्याशी बोलते. "

मला चिंताच लागून राहिली. आता अजून काय झालं असेल कोण जाणे?

दोन दिवसांनी नीला आली. चेहरा अगदी थकून गेला होता. म्हणाली,

"वहिनी जावयाचं लफडं त्या पोरीच्या बापाला कळलं. त्या पोरीला त्यांनी मुंबईला पाठवून दिली. चार लोक घेऊन तो जावयाच्या घरी आला होता. त्यांनी जावयाला दम भरला. पोलिसात तक्रार करीन म्हणाला. मग मात्र जावई घाबरला. आम्ही पण तिच्या बापाला खूप बोललो. बजावलं.. तुमच्या पोरीला आवर घाला. तीच आमच्या दोन पोरींचा बाप असलेल्या पोराच्या मागे लागलीय... नाहीतर आम्ही पण पोलिसात तक्रार करू. फार जोरात भांडण झाली. कसंबसं आम्ही सगळ्यांनी मिळून ते प्रकरण मिटवलं. "

"बरं झालं तिच्या बापाला कळले ते"

"हो न... जाताना आम्ही वंदीला बरोबर नेलं नव्हतं. मग घरी जाऊन वंदीला आणि तिच्या दोन्ही पोरींना घेऊन आले. तिला सासरी सोडलं. वंदी जायला नको म्हणत होती. "

"हो ग.. तिचंही बरोबर आहे.. तिला राग येणारच.. "

"वहिनी ते खरं.. पण अशा वेळी व्यवहाराचं बघायचं असतं बघा. जन्मभर पोसायला मी खंबीर आहे.. असं नुसतं म्हणायचं असतं... उद्या माझ्या पोरांची लग्न झाली की... वंदीची त्यांना अडचण होणार की नाही.... शिवाय तिच्या पदरात दोन पोरी आहेत.. त्यांच पुढं कसं निभावणार? वंदीला अजून जगाचा काही अनुभव नाही"

... शांतपणे नीला बोलत होती. मी थक्क होऊन ऐकत होते.

"दोन्ही नाती घरी गेल्यावर बापाच्या गळ्यात पडल्या... ज्याची त्याला ओढ असतीय.. म्हणूनच मला कालची वेळ साधून वंदीला सासरी पाठवायचं होतं..... झाली जावयाच्या हातून चूक... कुठवर धरून बसायचं ते समजतंय मला... तुटेल इतकं ताणायचं नसतं बघा... वेळेवर सोडलं की फार पुढे जात नाही. जावयाला पश्चाताप झाला आहे आता तो परत असं करणार नाही म्हणालाय... "

"अगदी योग्य केलंस बघ.. "

"खरं सांगू का.. मला जावयाचा फार संताप आलाय.. पण आपला हात दगडाखाली आहे... म्हणून माघार घ्यावी लागतीय.. एवढं मला कळतंय... "

"हो ग... " म्हणेपर्यंत माझेही डोळे भरून आले.

"वहिनी माझ्या दोन्ही नातींना आयुष्यभर बाप पाहिजे आणि लेकीचा संसार मोडायला नको.. म्हणून मी सगळा राग मनात ठेवला आणि गप्प बसले.. "

... बोलून झाल्यावर पदराने डोळे पुसत शांतपणे तिने रोजच्या कामाला सुरुवात केली.


भावनेच्या आहारी न जाता समंजसपणे किती मोठा अवघड प्रश्न तिने सोडवला होता. मला फार कौतुक वाटले. शहाणी होती ती...

... सहज बोलता बोलता नीला आज मलाही चार गोष्टी शिकवून गेली....

**सुश्री नीता चंद्रकांत कुलकर्णी,** *मो* 9763631255

65. चित्रकाव्य – प्रेमाचे झाड — सुश्री वर्षा बालगोपाल





काळीज दगडावर
बीज कुठूनसे आले
सांदीकोपऱ्यात गेले
खाली वर ना ते झाले ||

दगडाचेच काळीज,
तसेच त्याला ठेवले
बीज महाचिवट,
रुजायचे ठरवले ||

काळीजही पाझरले
रक्त त्याचे पाजिले
चीर गेली आरपार
मैत्र तयांचे अंकुरले ||

मुळे पसरली खोल
काळजा मिळाली ओल
वाढले झाड मैत्रीचे
सांभाळत त्याचा तोल ||

काळीज बनले पार
दिला भक्कम आधार
फांद्या पाने या मैत्रीची
ना रूप नाही आकार ||

मैत्री ही सळसळली
अनेकांना ती भावली
पक्षी-मित्र सवे घेत
घरटी वर टांगली ||

पक्षांसाठी मैत्री अशी
फळरूप हो जाहली
मानवाची ये जा झाली
क्षणभर विसावली ||

जाण ठेऊनी मैत्रीची
पक्षांनी ती फोफावली
मानवाला नाही चाड
तोडतो मैत्रीचे झाड ||

**सुश्री वर्षा बालगोपाल**, मो 9923400506

## 66. कविता - ओढ माहेराची... - सौ. शुभदा भास्कर कुलकर्णी (विभावरी)



सकाळच्या प्रहराला
काव.. काव येईल कानी
भाऊ येईल पाहुणा
आनंदले माझ्या मनी... |

किती दिस झाले आता
विसरला काहो बाबा
लेक तुमची लाडकी
आता झाली का परकी... |

पंचमीचा सण आला
डोळे ओलावून गेला
गणराया सवे गौराई
सय माहेराची येई... |

अशी कशी भाऊराया
माया सगळी आटली
माहेरच्या सुखाला रे
बहिण पारखी झाली... |

नको येऊस रागाला
आठवते माय माई
दिवाळीचा सण आला
मला माहेराला नेई... |

आजी झाले सईबाई
वाटे नवलची मोठे
कसं वेड मन बाई
ओढ माहेराची वाटे... |

**सौ. शुभदा भास्कर कुलकर्णी (विभावरी),** कोथरूड -पुणे ४११०३८ मोबा. ९५९५५५७९०८

## 67. ललित – गरज आणि फायदा नियम - सुश्री संध्या बेडेकर



काल श्री. कुलकर्णी भेटले. तसे येताना जाताना बरेचदा भेटतात.. म्हणजे दिसतात.

आमच्या या स्वतःच्या नवीन घरात येण्याआधी आम्ही आणि कुलकर्णी एका सोसायटीत एकाच बिल्डिंगमध्ये रहात होतो. साधारण वर्षभर आम्ही बरोबर होतो. कधी कधी ते आपल्या तीन वर्षाच्या मुलीला आमच्याकडे थोडया वेळासाठी सोडून जात असत. त्यानंतर आम्ही आमच्या घरात आलो आणि काही महिन्यांनंतर तेही आमच्या समोरच्या सोसायटीत रहायला आलेत. त्यामुळे अगदी रोज दिसत नसले तरी कधी कधी समोरासमोर भेट व्हायची म्हणण्यापेक्षा दर्शन व्हायचे म्हणणे जास्त योग्य होईल. कारण एकमेकांबद्दल बरंच काही माहित असूनसुद्धा कुलकर्णींच्या चेहऱ्यावर ओळखीचे भाव कधी दिसायचे नाही.

... काही लोकांना गरज आणि फायदा नियम छान समजतो. आणि वेळेनुसार, प्रसंगानुसार तो छान अमलात आणता येतो. दोन तीन भेटीनंतर हे लक्षात आल्यावर मी पण 'तुम्ही कोण?' असे भाव चेहऱ्यावर आणायचा खूप प्रयत्न करत होते.

एखाद्याला आपल्याबरोबर बोलायचे नाहीये याची अनेक कारणे असू शकतात. ही गोष्ट मी समजू शकते. याबाबतीत बरेचदा वेगवेगळे अनुभवही येतातच. काही माणसं कधी बोलतात कधी नाही. कधी कधी तर त्यांच्या चेहऱ्यावर * मी तुम्हाला ओळखत नाही * असे भाव स्पष्ट दिसतात.

पूर्वी मला ही गोष्ट पचनी पडत नसे.. मला अशा वागण्याचं आश्चर्यच वाटायचं. एकाच कॉलनीत राहणाऱ्या सर्वांची नावं वगैरे आपल्याला माहीत नसली, आपण अगदी बोलत नसलो तरी समोर दिसल्यावर आपल्या चेहऱ्यावर ओळखीचा भाव सहज येतो. साधं morning walk ला एखादी व्यक्ती आपल्याला दोन चारदा दिसली तरी आपण हसतो.. कधी कधी तर बोलणंही होतं.

ओळखीच्या लोकांशी न बोलण्याचं काय कारण असावं? inferiority / Superiority complex / भीती / फायदा / नुक़सान / विचार? माहीत नाही. तसं आजकाल कोणी कोणाच्या गळ्यात पडत नाही. वाटीभर साखर, कपभर दूध शेजारी मागायलाही कोणी जात नाही.

एखादा माणूस आपल्याबरोबर बोलला नाही तर आपलं नुकसान असं काहीच होत नाही. मला पण हजार मित्र मैत्रिणी जमवायची हौसही नाही. आधी या अशा वागण्याचं आश्चर्य वाटतं. काही दिवसानी ते पण वाटत नाही.

**'Distance is the new answer for such people.'** वाट बघायची... ते हसले/ बोलले तर हसायचं / बोलायचं, नाही तर नाही ... असा एक साधा नियम मी माझ्यासाठी तयार केला आहे. I have learned to keep distance from them.

सगळेच असे वागतात असे नाही. पण असे नमुने दिसले की कधी गम्मत वाटते तर कधी आश्चर्य. एखादया वेळेस हेच लोक एवढं बोलतात की त्याचंही आश्चर्यच वाटतं. म्हणजे त्यादिवशी आपणच त्याचे जिवश्च कंठस्थ मित्र आहोत की काय? अस वाटतं. स्वतःवरच डाऊट येतो.

... आज श्री. कुलकर्णी दुरूनच येताना दिसले, आणि आश्चर्य म्हणजे थांबले. दुसरा जबरदस्त धक्का तेंव्हा बसला जेव्हा त्यांनी विचारल.. 'ओळखलं का?'.. ही अशी अनपेक्षित भेट/ प्रश्न ऐकून मला हसावं की रडावं की छान धमाकेदार जोरदार उत्तर द्यावं कळलंच नाही. मला कळेचना.. आज हे अचानक.. एवढं प्रेम कशासाठी?.. म्हणजे जसं बुर्ज खलिफा, आयफेल टॉवर बघितल्यावर आपलं तोंड थोड्यावेळ उघडंच राहतं ना, तसंच काहीसं झालं माझं.

एकदा वाटलं सरळ म्हणावं.. *अजिबात ओळखलं नाही, कोण तुम्ही? *

आपल्या मुलीला हक्काने आमच्या घरी सोडून जाणारे आज 'ओळखलं का?' विचारताहेत?

... काय आहे ना! कधी कधी आपला चांगलेपणा आपल्यालाच नडतो. अगदी चांगले आदर्श quote नेमके तेव्हाच त्याच वेळेस आठवतात...

**आपण नेहमी चांगलंच वागावं. त्यांच्यासारखे आपणही वागलो तर त्यांच्यात आणि आपल्यात काय फरक राहिला?**

**Always do good, It comes back to you in unexpected ways.**

आजपर्यंत मला चांगल्या वागण्याचं कधी सर्टिफ़िकेट किंवा बक्षीस मिळालेलं नाही. गैरफायदा मात्र लोकांनी बराच घेतला आहे. Granted धरलंय, दुर्लक्षही केलेलं आठवतंय.

एकदा माझ्या सखीने मला सल्लाही दिला होता. म्हणाली होती....

"कुठे चालूगिरीचे क्लासेस असतील तर join कर."

मला आधी वाटायचं, मला माणसं वाचता येतात, पण आजच्या जगात एकाच माणसाचे वेगवेगळे चेहरे बघून, माझा भ्रम दूर झालाय. असे लोक लपंडाव छान खेळतात हे नक्की.

एखाद्या गोष्टीला किती समजून घ्यायचं याची पण एक लिमिट असते. प्रत्येक वेळेस compromise करणं म्हणजे मूर्खपणा आहे.

... कितीही अभ्यास/ विचार केला तरी न समजणारा विषय म्हणजे **माणूस**.. त्यात अशी माणसं म्हणजे परीक्षेत येणारा सर्वात कठीण प्रश्न. **Out of syllabus.**

... मी आजच्या भेटीचे कारण शोधत होते. म्हणजे आजचा मुहूर्त होता का? लहानपणी डॉट्स जोडून आपण एक खेळ खेळत असू. तसेच डॉट्स मी जोडायचा प्रयत्न करत होते.

मनात आलं... ' पुन्हा मुलीला आमच्या घरी सोडायचा कार्यक्रम आहे की काय?'.. 'पुन्हा **गरज आणि फायदा** नियमात आम्हीच विश्वसनीय/योग्य दिसलो की काय?'

... काही तरी गरज/ फायदा असल्याशिवाय असे लोक बोलत नाहीत. काम झाल्यावर त्यांना विसरायलाही जास्त वेळ लागत नाही.

म्हणतात ना ...

"इज्जत किसी इंसानकी नही होती, जरूरत की होती है ।जरूरत खत्म... इज़्ज़त खत्म। यही दुनिया का सत्य है।"

आयुष्यात अनेक घटना घडत असतात, ज्या आपल्याला समजवायचा/शिकवायचा प्रयत्न करत असतात की...

'कोणाला सांभाळायच? आणि कोणापासून सांभाळून रहायच? '

**सुश्री संध्या बेडेकर**, *वारजे, पुणे मो. 7507340231*



## 68. ललित - मॅडम मला सिरीयल करायची…! - श्री शीला पतकी



माझ्या ओळखीतील एक मुलगी माझ्याकडे आली. वय साधारण 25 ते 30 च्या आसपास. नाटक वेडी होती. आणि अभिनय क्षेत्रात खूप काय काय करावं असं तिला वाटत होतं. मला चार दिवसापूर्वी बोलली होती मी तुम्हाला भेटायला येते, म्हणून ती आली आणि म्हणाली, "आत्या तुम्ही मध्यंतरी सिरीयलच्या लिखाणाचा कोर्स केला होता ना? “

मी म्हणाले, "होय"… "मग मला सिरीयल करायची आहे "

मी म्हणलं, "म्हणजे मला काय लेखक हो म्हणतेस का काय? "

ती म्हणाली, "नाही नाही, मला सगळ्याच बाबतीत तुमचे मार्गदर्शन हवे आहे. "

मी म्हणलं, "कोणत्या प्रकारची सिरीयल करावयाची आहे "

ती म्हणाली, “ तसं नाही.. एक सिरीयल करायचं ठरलं तर काय काय लागेल? ".. हे म्हणजे प्रवासाला जायचं तर काय काय लागेल हे विचाराव इतकं सहज विचारलं!

मी म्हणाले, " घे लिहून "

आणि खरोखरच ती लिहायला बसली. मला सुद्धा वाटलं नव्हतं मी इतकं काही सांगेन तिला …

"पहिल्यांदा आपण कोणकोणती लोकेशन लागतील याचा विचार करूया. ----- दोन-तीन चांगले उत्तम, भाड्याने घेतलेले बंगले, त्यानंतर एक चाळीतली खोली, एक छान ऑफिस… अत्याधुनिक! एक छोटं ऑफिस किंवा सरकारी कचेरी काहीही चालेल. एक कॉफी शॉप, एक छोटे स्टेशनरी दुकान किंवा प्रोव्हिजन स्टोअर्स, एक बस स्टॉप, एक उद्यान छोटसं, किमान दोन देवाची वेगळी मंदिर… एखादे शांत तळे… मग कथेप्रमाणे आपण बाकीची ठिकाणं बदलू … तिने ते तिने ते आज्ञाधारकपणे लिहून घेतले

आता दुसरा मुद्दा पात्रांचा…. हिरो हिरोईन.. हिरोला आई-वडील.. ते मध्यम वयात असतील तर त्यांचे सासरा किंवा सासू म्हणजे त्यांचे आई किंवा वडील.. थोडक्यात हिरोला आजी किंवा आजोबा हवेत. हिरॉइन जी असेल तिला साध्या साडीमध्ये राहणारे, तसेच दिसणारे मध्यमवर्गीय किंवा अती मध्यमवर्गीय आई बाबा.. भाऊ भाऊजयी… एक दोन भाचे.. इतके हवेतच… हिरोला एक दोन मित्र, हिरोइनला दोन मैत्रिणी…! हिरो श्रीमंत असेल तर त्याच्या घरात स्वयंपाकाला एक बाई….

“तिने मध्येच प्रश्न विचारला, मग मोलकरीण वगैरे? “

मी म्हणलं “मध्यमवर्गीय घरात नाही... त्यांना परवडत नाही... आणि मोठ्यांच्या घरात ते ठेवत नाहीत.. निदान सिरीयल मध्ये तरी... एक स्वयंपाकाच्या बाईपेक्षा जास्त काही घ्यायचं नाही. किमान तीन भटजी“

तिने विचारलं “ तीन कशाला? ”

मी म्हणाले, "तारखा मिळायच्या दृष्टीने सोपं असतं. तेही काही रिकामटेकडे नाहीत आणि खरे खरे भटजी घ्यावे लागतात. नट चालत नाहीत. " तिने मान डोलावली....

“हे झालं बेसिक.... आता थोडसं बारकाईने पाहूयात. कथेच्या रचनेनुसार हल्ली पोलीस स्टेशन, कोर्ट, हॉस्पिटल हे लागतंच. पोलीस स्टेशन.. तिथे दोन-तीन शेंदाड शिपाई, एखादा चलाख शिपाई, एक मगरूर इन्स्पेक्टर, एक कर्तव्य तत्पर इन्स्पेक्टर, दोन जेल म्हणजे सळयावाले तुरुंग,.....! हॉस्पिटल... एक हॉस्पिटल असते... कॉट चार-पाच, वेगवेगळे यंत्र ज्याच्यावर बीपी वगैरे काय काय दाखवलं जातं ते, दोन-तीन डॉक्टर, दोन-तीन नर्सेस, एखादा वॉर्ड बॉय, रिसेप्शनिस्ट.. ही पात्र आलीच! आता कोर्ट सीन असेल तर दोन वकील, दोन साक्षीदार, आरोपी, वादी प्रतिवादी समोर बसायला दहा-पंधरा माणसं, एक टायपिस्ट.... ”

“अजूनही कोर्ट टाईप करतात?“ तिचा प्रश्न ...

मी म्हणलं “कोर्ट बदलत नाही!”

ती म्हणाली, “ बरं!“

“त्यानंतर त्यांच्यामागे आरोळी देणारा एक माणूस.... चेहऱ्यावर कुठलाही भाव नसणारा जज असतो. तो त्याला चार वाक्य बोलायला चांगली आली तरी बस झाली. ‘ऑर्डर ऑर्डर केस इज एडर्जंट, ऑब्जेक्शन सस्टेण्ड, ऑब्जेक्शन ओव्हररूल, आणि शेवटच्या केसच्या निकालाच्या चार ओळी शुद्ध वाचता आल्या पाहिजेत असा माणूस चालेल. मग प्रसंगानुरूप मधली पात्र पाहू!”

“आता घर कसा असेल पहा. घरामध्ये आई बाप आजी आजोबा, आई-वडिलांना दोन मुलं एक मुलगी.. जी लग्न झालं तरी घरातच बसलेली आहे. एखादी काकू किंवा काका काकू जोडपं सुद्धा चालेल... घर सोडून आलेली आत्या पण चालते... तुझ्या गरजेनुसार पात्र ठरवू. गरजेनुसार म्हणण्यापेक्षा बजेटनुसार...! “

ती म्हणाली, "असं कसं कथेनुसार नको का ठरवायला?"

“कथा हा सगळ्यात शेवटचा मुद्दा आहे पुढे चल.... बस स्टॉप वगैरे लोकेशन असतात ना ती डायरेक्ट तिथेच घ्यायची.... टपऱ्यावर मात्र संवाद घडतात त्यामुळे त्या टपऱ्या तयार करायच्या... कॉफी शॉप तयार करायचं... मंदिर तात्कालिक.. भाड्याने घ्यायचे. हिरोच्या घरात स्वयंपाकघर म्हणजे किचन, त्याला लागून मोठा हॉल, उत्तम फर्निचर, किचनमध्ये समोर फार दाखवायचं नाही.. गॅस.. त्याच्यावर सतत एक चहाचं भांडं, एक दुधाचे भांडं, आणि भाजीच्या टोपल्यात टोमॅटो फ्लॉवर कोबी पालक आणि भोपळे ह्या कॉमन भाज्या दररोज आणून ठेवायच्या. येताना आपल्या घरी घेऊन यायचं.. आता या पात्रांमध्ये कोणाला खलनायक करायचं ते आपण ठरवायचं म्हणजे.. भाऊ खलनायक होईल, बहीण खलनायक होईल, आत्या तर त्याचा रोल करू शकतेच, ते काका काकू होऊ शकतात. मग हे घरातले जमले नाही तर बाहेरचा एखादा खलनायक गुंड

आणायचा. याशिवाय चार-पाच उग्र चेहऱ्याचे दिसणारे गुंड कायम तयार पाहिजेत.. ते मारामारी करणारे असावेत. त्यानंतर एक जोगिणींची टोळी म्हणजे देवी घेऊन फिरणाऱ्या बायका. त्यानंतर घरामध्ये देवीचे उत्तम मुखवटे असलेल्या मोठ्या मोठ्या देवींची प्रतिष्ठापना केलेले देवघर..... तेथे सतत समया तेवत असतात आणि देवीला घातलेले हार मात्र सतत ताजे पाहिजेत... हीरोइनच्या घरात रस्त्यावर मिळतं तसं लाकडी देवघर, त्याच्यात एखादा फोटो... गणपतीची एखादी बारकी मूर्ती... एक निरंजन, एक उदबत्ती.. यापेक्षा जास्त प्रॉपर्टी नाही. तिच्या घरात एखादी कॉट, एखादी खुर्ची, जुनी लाकडी किचन टेबल, अर्ध्या घरात स्वयंपाक आणि बाथरूम हे लोकेशन.. सगळे मी तुला सांगितलेले आहेत. "

"आता वाहनाबद्दल बोलूयात.. एक दोन कायमस्वरूपी रिक्षा, किमान दोन ते तीन आलीशान गाड्या, एक स्कूटर एक सायकल... धडक बिडक मारायला व अपघात घडवायला एक टेम्पो. शिवाय सर्वात महत्त्वाचे म्हणजे एक अड्डा.. इथे खोकी.. पिंप रचलेली आहेत. अडगळीचं सामान खूप आहे.. जाळी खूप झालेली आहे. खुर्ची आहे, एक माठ आहे, इतकं साहित्य तिथे पाहिजे..... आणि शिवाय बांधून ठेवण्यासाठी दोर.. हे सर्व सिरीयलमध्ये लागतंच."

तिने मध्येच प्रश्न विचारला.. "एखादा प्राणी वगैरे?"

मी म्हणलं, " उगीच काहीतरी वाढवू नकोस. प्राण्यांवर बंदी आहे. त्याऐवजी एखाद-दोन लहान मुलं घेतात.. ती जरा हुशार घ्यावीत, त्यांची शाळा बुडली तर प्रॉब्लेम होतो."

.. "आता मी तुला अत्यंत महत्त्वाच्या गोष्टी सांगते आहे.. प्रत्येक सिरीयलमध्ये किमान चार-पाच पिस्तूल पाहिजेत, दोन-तीन बंदुका, कोयते, सुरे, रॉड, मारामारीसाठी सायकलचे चेन हे लागतंच.. एवढी प्रॉपर्टी जमा कर. संगीत अवघड नसतं.. सिरीयलचं टायटल सॉन्ग मधून मधून वाजवायचं. चार-पाच ट्युन्स तयार करायच्या.. एक आनंदी, एक गंभीर, एक शांत, एक भयानक काही घडते अशा वेळेला वाजणारे म्युझिक आणि मग सीनप्रमाणे म्युझिक.. संगीताचा भाग विशेष कटकटीचा नसतो आणि हे सगळं जमल्यावर मग कथानक काय लिहायचं ते आपण बघू. सध्या एवढाच अभ्यास कर.. मग पुढचं दुसऱ्या अंकात.... म्हणजे परत सांगेन."

तिने ते लिहून घेतलं. मला नमस्कार केला आणि अभ्यास करून पंधरा दिवसांनी येते असं सांगून निघून गेली...! बिच्चारी..!!

**सुश्री शीला पतकी**, सोलापूर मो. 8805850279

## 69. कथा – प्रकाशवाटा — सौ. वंदना अशोक हुळबत्ते



जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते प्रगतशील शेतकरी म्हणून तुकारामचा मोठा सत्कार झाला. सर्वांनी त्यांच्यासोबत फोटो काढून घेतले. दुसऱ्या दिवशी सगळ्या दैनिकातून बातम्या प्रसिद्ध झाल्या. तुकाराम रातोरात हिरो झाला. सगळ्या लोकांना त्याच्या यशाचे कौतुक वाटले. यश जाणून घेण्यासाठी सगळे तुकारामाच्या अवतीभवती गोळा होऊ लागले. त्याच्या यशाचे रहस्य विचारू लागले. या घटनांनी तुकारामाला आनंद झाला होता. हे यश त्याच्या एकट्याचे नव्हते ही जाणीवही त्याला होती.

या क्षणी मागील वर्षांतील घटनांची मालिका डोळ्यासमोर येत होती. मन कष्टी झाले. ते क्षण आजही डोळ्यासमोर उभे राहिले. हिरवगार काढणीला आलेलं उभं पीक बघून मन हरकून गेले. या वर्षी पीक चांगले आले आहे. धान्याला भाव चांगला मिळाला तर बँकेचे कर्ज सगळं सहज फिटून जाईल. चार पैसे गाठीला शिल्लक राहतील म्हणून घरातील सर्व मंडळी आनंदी होती. शेताची कामे हिरीरीने सुरू होती. आता लवकरच आपला माल मार्केट यार्ड मध्ये जाईल आणि आपले स्वप्न पूर्ण होईल याची तुकारामाला खात्री होती.

पण झाले उलटेच.. अचानक आभाळ भरून आले. पाऊस कोसळला. सगळीकडे पाणीच पाणी झाले. सगळ्या स्वप्नावर पाणी पडले. सात दिवस पीक पाण्यात कुजले. डोळ्यादेखत सगळे संपले. कुजक्या शेतातून हातात काय येणार? शहरात शिकणाऱ्या मुलाची फी कशी भरणार? बँकेचे कर्ज कसे फिटणार? सावकाराचं ऋण कसं फेडणार? आता वर्षभर घरखर्च कसा चालणार? असे अनेक प्रश्न फेर धरून नाचू लागले. बायकोनं धीर दिला. यातून काही मार्ग निघेल अशी वेडी आशा दाखवली.

पण दिवसेंदिवस परिस्थिती अजून बिकट होत गेली. आता मात्र खरंच वेड लागायची वेळ आली. धीर सुटत चालला. जगणं अवघड होऊन बसलं. जीव गंजून गेला. मनात उलटसुलट विचारांचे थैमान सुरू झाले. आता जगून तरी काय करू? असे वाटू लागले. तेच तेच प्रश्न समोर येऊ लागले. गावात तोंड दावायला जागा राहायली नाही. देणेकरी वाट आडवत होते. आता काय करावं कळेना. घरी जायला जीव धजेना. जीव द्यावा असं वाटायला लागलं. तशी मनाची, सामानाची जुळवाजुळव केली. बायको झोपली होती. तिच्या डोक्यावर हात ठेवला " माफ कर मला. मी तुला सोडून जात आहे. पोरांची आणि स्वतः ची काळजी घे. येतो मी. " मनातल्या मनात म्हणाला. शर्टाच्या बाहीला डोळे पुसले. देवाला नमस्कार केला. घराच्या चौकटीवर डोकं टेकवले आणि तुकाराम घराबाहेर पडला...

... शेतातल्या एका झाडावर कासरा टाकला. फास तयार होता. काळ्या आईला डोळे भरून बिघतलं आणि नमस्कार केला. डोळ्यात अश्रू दाटले. समोरचे दिसेनासे झाले. डोळे मिटले फास गळ्यात घालणार तेवढ्यात त्याला कुणी तरी मागे ओढले. " हे काय...? काय करतूस रं तुक्या? तुझा मैयतर अजून जिता हाय. तुला काय झाल मरायाला. "

पक्याला समोर बघून तो गळ्यात पडला. ढसढसा रडला. " पक्या मरू नाही तर काय करू? बघितलं का उभं पीक नासलं. मी बरबाद झालो. आता काय करू. कर्ज कसं फेडू? घर कसं चालवू? "

"तुझ्या एकट्याच्या जीवाला फास हाय व्हय ह्यो. समद्या गावाच्या शेताला काय छपार हाय? समदी सारखीच हायती. अस आवसान गाळून कसं चालल. लेकरांनी, वहिनींनी कुणाच्या तोंडाकड बघायचं र?"

"मला काय पण सुदरत नाय. "

"म्या हाय तुझ्यासोबत. म्या सांगतो तसं कर. बघ हे बी दिस जातील. "

काशने चांगले मनावर घेतले. तो नेहमी तुकारामसोबत राहू लागला. त्याचं मन वळवू लागला. त्याला जिल्ह्यातील कृषि महामंडळात घेऊन गेला. तिथली माहिती दिली. कृषि विद्यालयात घेऊन गेला. वेगवेगळं तंत्रज्ञान समजून दिलं. प्रगत शेतीची संकल्पना समजून दिली. त्याचं प्रशिक्षण दिलं. त्याच्यात विश्वास निर्माण केला. आपला मोबाईल वापरायला शिकवला. नवनवीन तंत्रज्ञान समजून दिले. ॲपवरची माहिती कशी बघायची, प्रश्न कसे विचारायचे, उत्तरे कशी मिळवायची, मदत कशी घ्यावी, बाजार भाव कसा समजून घ्यायचा, हे सांगितले. तुकारामचा उत्साह वाढत होता. माहिती समजून घेत होता. शेतात राबत होता. कष्ट करत होता. काही निधीही प्रकाशने जमा करून दिला. शेतीच काम सोपे झाले होते.


तुकारामाला ॲप वरून त्याच्या शेतातील मातीची गुणवत्ता कळली होती. या मातीत कोणते पीक घेतले तर ते चांगले येईल याची माहितीही मिळाली होती. या सगळ्या नव्या तंत्रज्ञानाचा वापर करून विचारपूर्वक तुकाराम पाऊले उचलत होता. हवामान, जमिनीचा कस, मशागत, पिकाची गुणवत्ता.. सगळं सगळं लक्षात घेऊन पिकाची लागवड केल्याने केलेल्या कष्टाला फळ आले. मुख्य पीक, अंतर पीक, भरघोस आले. कृषि प्रदर्शनात पिकाला बक्षीस मिळाले. एकरी उत्पन्न वाढल्याने सगळ्यांचे लक्ष त्याच्या शेतीकडे गेले. शेतमालाकडे गेले. अनेकांनी मदत केली. तुकारामाच्या कामाची दखल जिल्हा कृषी मंडळाने घेतली. अन् जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते त्याचा सत्कारही झाला. हे यश प्रकाशच्या मदती- शिवाय शक्य नव्हते. तुकारामाच्या आयुष्यातील यशाचे दार प्रकाशने उघडले. तो त्यासाठी कृतज्ञ होता. हे यश दोघांचे होते. ते श्रेय एकट्याला मिळत असल्याने तुकाराम जरा संकोचला होता. हे सारे सत्य त्याला आपल्या गावकऱ्यांना सांगायचे होते.

गावातील ग्रामसभेत तुकारामाने आपली गोष्ट सर्वांना सांगितली तेव्हा त्याचे मन थोडे हलके झाले. गावकऱ्यांसमोर त्याने प्रकाशचा फेटा बांधून सत्कार केला. म्हणाला, " मला जीवनदान देणारा मित्र जसा मिळाला तसा प्रत्येक शेतकऱ्याला मिळायला पाहिजे. तंत्रज्ञानाची योग्य माहिती लोकांपर्यंत गेली पाहिजे. लोकांना त्या अनुभवाचा फायदा होईल. सर्वाना शेतीबद्दल नेमकी माहिती मिळेल. आणि होणाऱ्या नुकसानीपासून शेतीचा बचाव करता येईल. माझे जीवन उजळून माझ्या जीवनाची वाट प्रकाशित करणारा प्रकाश माझा केवळ मित्र नाही तर माझा भाऊ आहे. त्याने दिलेले ज्ञान माझ्या परीने मी सर्वांना देईन. सर्वानी याचा उपयोग केला तर आपला देश खऱ्या अर्थाने सुजलाम सुफलाम होईल यात शंका नाही. प्रत्येक शेतकऱ्याचा सत्कार प्रगतीशील शेतकरी म्हणून जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते होवो एवढीच माझी इच्छा आहे."

**सौ.वंदना अशोक हुळबत्ते**, इंदिरा अपार्टमेंट बी-१३, हिराबाग कॉर्नर, रिसाला रोड, खणभाग, सांगली, ४१६ ४१६

मो.९६५७४९०८९२

## 70. कथा – इभ्रत — श्री सुभाष धारणकर



मी आमच्या बँकेच्या दुष्काळी तालुक्याच्या शाखेत शाखा व्यवस्थापक म्हणून कार्यरत होतो. – ते ठिकाण म्हणजे जिथं कर्ज वसूल करताना आपली अक्षरशः तत पप होते, असं ठिकाण!

त्या काळात आमच्या शाखेने 'वन टाईम सेटलमेंट' (OTS) योजनेअंतर्गत ऐतिहासिक वसुली केली. आम्ही ठरवलेलं उद्दिष्ट काही नियोजनबद्ध कृतीने केवळ गाठलंच नाही, तर त्याच्या तब्बल ३०० पट अधिक वसुली करून दाखवली. वरिष्ठ अधिकारी प्रसन्न झाले. शाखेला भेट दिली आणि खास शब्दांत कौतुक केलं.. "तुमचं काम आदर्शवत आहे. इतकी वर्षं थकलेली कर्जं सुद्धा वसूल झालीत, हे खरंच उल्लेखनीय आहे! "

त्यांच्या त्या शब्दांनी मन भारावून गेलं. मी झपटल्यासारखी वसुली करत राहिलो.

पण काही आठवड्यांनी एक प्रसंग असा घडला, की याच भारावलेल्या मनाला खोल तडा गेला…

त्या दिवशी मी ऑफिसमध्ये वसुलीची कागदपत्रं चाळत होतो. नोटीस पाठविलेल्या खातेदारांची यादी समोर होती. आढावा घेत होतो. इतक्यात केबिनच्या बाहेर कुणीतरी सावध पावलांनी येत असल्याची चाहूल लागली.

एक वृद्ध महिला दारात उभी होती. थरथरत, दबकत केबिनमध्ये आली. अंगावर जुनी, हिरवट साडी – जागोजागी ठिगळं, विस्कटलेले केस, चेहरा घामाने काळवंडलेला, पायात चप्पल नाही… आणि हातात आमचं वसुलीचं पत्र!

ती धीरगंभीर स्वरात म्हणाली –

"सायेब… मी माणिक. तुमचं पत्र आलं म्हणून आले… कर्ज फेडायला. "

मी तिच्या हातातील पत्र पाहिलं… थबकलो. कर्ज रक्कम – फक्त ₹१८७०!

कुतूहलानं विचारलं –"ताई, एवढी रक्कम तुम्ही कशी जमवली? "

ती क्षणभर शांत राहिली. डोळ्यांच्या कडा पाणावल्या. मग अलगद नाक-डोळे पुसत हळू आवाजात म्हणाली –

"बँकेची नोटीस आली तेंव्हापासून झोपच नाही सायेब… मी मोलमजुरी करते. पण इतके पैसे जमवता येईनात. शेवटी… माझं मणी मंगळसूत्र विकलं. आणि दोनशे रुपये मजुरीतून साठवले. खूप जुने देणं आहे ना… ते मनाला लागून राहिलं होतं. नाव पुन्यांदा बँकेच्या 'थकीत' यादीत येऊ नये म्हणून घाबरले होते…"

त्या वाक्यांनी काळजाला चर्र झालं! मंगळसूत्र – तिच्या आयुष्याचा आधार, तिच्या आठवणींचं प्रतीक – आणि ते तिनं फक्त इभ्रतीसाठी विकलं?

मी हलक्या आवाजात म्हणालो – “ताई, इतकी घाई करायची काहीच गरज नव्हती. रक्कम फार मोठी नव्हती. हळूहळू फेडली असती तरी जमलं असतं. ”

बाई दोन्ही हात जोडून, डोळ्यांत पाणी आणत म्हणाली –

“सायेब ... आम्ही गरीब माणसं. पोटा-पाण्यासाठी कर्ज काढलं, पण परतफेडीला उशीर झाला म्हणून लोकं नाव घेऊ लागले. कर्जाचं ओझं रकमेवर नसतं हो...पन्नास असो की हजार – मनावर बसलं की भारी होतं. लोकांत नाव निघालं की, ‘हिचं कर्ज बाकी आहे’ असं बोलायला लागले की, आमचं जगणंच कठीण होतं! पैसा फेडता येईल कसा बसा ... पण इज्जत गेली की परत मिळवणं फार कठीण जातं सायेब. आम्ही गरीब आहोत सायेब ... पण इभ्रत राखतो. हे मंगळसूत्र काय, परत मिळवीन मी...”

तिचे शब्द काळजावर ठसठसत राहिले.

मी माझे पाणावलेले डोळे पुसले नाहीत... ते पाणी आतच गिळावं लागलं.

कर्तव्याच्या नात्याने तिच्याकडून पैसे घेतले. पावती दिली.

ती पावती घेताना तिच्या चेहऱ्यावर एक हलकं समाधानाचं हसू उमटलं.

ती म्हणाली –

“उशीर झाला, पण कर्ज फिटलं. आता मन शांत झालं...”

ती निघून गेली...तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे मी पहातच राहिलो.

पण तिचं विकलेलं मंगळसूत्र, तिच्या फाटक्या साडीचा पदर, तिचे अनवाणी पाय, आणि तिचे थरथरते डोळे – हे सारं माझ्या मनात खोलवर रुतून बसलं.

त्या दिवशी संध्याकाळी मी एकटाच शाखेत बसलो होतो. दुपारच्या तिच्या आठवणी डोळ्यासमोरून हटेनात. मनात सतत एकच विचार घोळत होता –

“खरंच... आपण गरिबांवरच कठोर होतो का?”

काही मोठ्या कर्जधारकांचं आठवलं –ते म्हणायचे – “साहेब, ते कर्ज माफ झालंय ना? बँकेनं राईट-ऑफ केलंय!” मी त्यांना समजावायचो ...

“राईट-ऑफ म्हणजे माफी नाही. वसुली चालूच राहते.”

त्यांना सांगणे म्हणजे दगडाला पाझर न फुटण्यासारखे होते. काहींनी बैल विकले, शेती गहाण ठेवली... पण त्यातले काही – राजकारणी, व्यापारी – लाखो रुपयांचं कर्ज घेतलेलं... वर्षानुवर्षं कर्ज न फेडलेलं...आणि आम्ही मात्र त्यांच्या ‘तडजोड’ प्रस्तावांना मंजुरी देत होतो.

... आणि त्या पार्श्वभूमीवर पुन्हा आठवली –ती माणिकताई... ती वृद्ध महिला, तिचं मंगळसूत्र, तिची भीती, तिचं अब्रू जपणं...तिचं वाक्य कानात गुणगुणू लागलं –

“आम्ही इभ्रतीला जपतो सायेब ...”

आज इतकी वर्षं उलटली...पण तिचा चेहरा, तिचं मौन, दु:ख अजूनही मन अस्वस्थ करतं.

हो, मी कर्तव्य पार पाडलं होतं. पण... कर्तव्य करताना करुणा हरवली होती. मी माझं काम केलं...

पण माणिकताईचं मंगळसूत्र मात्र कायमचं गेलं.

"खरंच... आपण तिच्यावर अन्याय केला का? "हा प्रश्न आजही मनात गडद सावलीसारखा फिरतो. कर्तव्य निभावणं महत्त्वाचं असतं...पण कधी कधी ‘माणुसकी’ राखणं त्याहून अधिक महत्त्वाचं ठरतं. पण येथे भावनेपेक्षा कर्तव्य श्रेष्ठ होते. ते मी बजावले होते.

पुढे मोठ्या शहरात गेल्यावर जेव्हा मोठमोठ्या कर्जमाफ्यांचे प्रस्ताव मंजूर होताना पाहिले, तेव्हा ती वृद्ध महिला पुन्हा आठवायची...तिचं मंगळसूत्र, तिचे अनवाणी पाय, तिच्या डोळ्यांतील भय, आणि तिच्या शब्दांतलं शुद्ध, निखळ वाक्य

“आम्ही इभ्रतीला जपतो सायेब ...” त्या एका वाक्यानं माझ्या आत काहीतरी खोलवर हलवलं होतं.

आजही कधी एकटं बसलो, की तिचं ते थरथरत म्हणणं आठवतं... आणि मनात नकळत उठतो एकच सवाल —

“कर्तव्य निभावलं... पण माणुसकी हरवली नाही ना? ”

त्या दिवशी फक्त ₹१८७० जमवून आलेली ती वृद्ध स्त्री मला ‘इभ्रतीचं खरे मूल्य’ शिकवून गेली.

कायद्याच्या भाषेत तिचं कर्ज फिटलं होतं...

.... पण माझ्या मनावर मात्र एक न फिटणारं ऋण ओरखडा उमटून गेलं होतं.

**श्री सुभाष धारणकर**, बी/४/६०१. लेक टाऊन, बिबवेवाडी. पुणे. मो. ९४२३००२९५४ फोन ०२०-२६९६००६४.



## 71. कथा – भुतांनी उडवली भंबेरी — सुश्री त्रिशला शहा



**भुतांनी उडवली भंबेरी..**

**माणसांपेक्षा भुतंच बरी..**

आमोशाची काळीकुट्ट रात हुती. रातीचं नऊ धा वाजलं असत्याल. धोंडीला रानातनं आज घरी परतायला उशीरच झाल्ता. त्याचं रान आणि घर यात आंतर हुतं फकस्त अर्ध्या कोसाचं. पर मधोमध हुता मुंजापिंपळाचा पसारा. जिकडं बगावं तकडं गच्च पिंपळच पिंपळ. दिवसा सूर्याचं कवडसं पिंपळाखाली पडतील तर बेहत्तर. मग रातीची काय कथा! कडूसं पडायच्या आतच काय त्यो राबता. त्येच्या नंतर कोन बी त्या पसाऱ्यात शिरायचं धाडस करीत नव्हतं. आज तर काय बोलून चालून आमोशा. डोळ्यात बोट घातलं तरी दिसायचं न्हाय. अशा अंधारात धोंडी पिंपळाच्या पसाऱ्यात शिरला आन् सुरू झाली की पिंपळाची सळसळ. गच्च अंदारात पाय फुडच्या वाटंवरच पडतायत का, ह्ये बी कळंना. खाली मान घालून सवयीनं झपाझप चालणाऱ्या धोंडीच्या तोंडात राम राम कदी सुरू झालं ह्ये त्याला बी कळालं न्हाई. त्याचा तसा त्याला आधारच वाटला म्हणा.

'राम राम राम राम... ' वाट काय संपत नव्हती. अचानक धोंडीचं लक्ष पिंपळाच्या माथ्यावर ग्येलं. गच्च फांद्या अशा काय खाली वाकल्या हुत्या की धोंडीला वाटलं त्या आता आपल्याला कवटाळणारच. त्यातच माकडांचा किचकिचाट सुरू झाला. वरच्या सावल्या जास्तच हालाय लागल्या. रातकिड्यांच्या किरकिरीनं धोंडीला काय सुचंना. धोंडी राम नाम विसरला. 'आईच्यान्, का म्हून आलो हितं? ' धोंडीच्या अंगात आता कापरं भरू लागलं. पुन्यांदा 'राम राम' सुरू झालं. आता तर त्येचा पण आधार वाटंना आन् त्याच येळंला धोंडीच्या नदरला आलं का, समोरनं येक पांडरं गट्टुडं आल्लाद तरंगत येत हुतं. खाली आन् वर कायच न्हाय. फकस्त येक पांढरंधोट गोल गट्टुडं. धोंडीचं राम राम अंधारात विरलं. पाय थरथराय लागलं. अंगाला कापरं सुटलं. खच्चून वरडावं म्हटलं तर जीभ कवाच टाळ्याला चिकटल्याली. डोस्क्याचं आन् अंगावरचं क्यास ताट उभं राहिलं. समोरचं गट्टुडं अजून जवळ आलं. 'नक्की ह्यो पिंपळाचा मुंजाच. त्येचंच पागोटं हाय ह्ये. आता ह्ये उसवून माझ्या नरड्याला आवळणार' धोंडीच्या मनात ह्ये आलं आन् जवळ आलेल्या त्या गट्टुड्यानं येक सपाक्कन् उसळी घेतली आन् त्ये जमिनीवर आदाळलं. ह्ये समदं बगाय धोंडी जाग्यावर हुता कुटं फेफरं यिऊन त्यो कवाच धरणीवर पडला हुता.

आपला बा अजून का आला न्हाई बघाय त्येचा पोरगा शिवा पोरांसंगं हातात पेटता बुधा घिऊन येका तासानं तितं आला. तवा येका ठिकाणी त्येचा पायच आडकाळला. हितं लुगडं कुटनं आलं म्हून त्येनं उजेड धरला तर त्या लुगड्यात आडवी तिडवी पसारल्याली शिंगाक्का. डोळं पांडरं, जीभ दातात आडाकल्याली, आन् आंग निपचित् गार. तिचं आसं काय कशानं झालं? आन् बा बी कुटं दिसंना म्हून जरा फुडं जाऊन शिवानं बगितलं तवा बा बी घावला. पाय फताडं पसरून धरणीशी नातं सांगत पसारल्याल्या धोंडीला सुद नव्हती. दोगांनी

धोंडीला उचालला, दोगांनी शिंगाक्काला पाटुंगळी घाटली. घिऊन आलं घराकडं. कांदा हुंगावला, हात पाय श्येकलं तवा कुटं दोगांच्या तोंडातनं 'हुं, हुं' निगायला लागलं. तवा शिवा वैतागून म्हणला, "निस्त हुं हुं काय कराय लागलायसा? हितं काय रामदासाची कथा चाललीया व्हय? आता सांगा की इस्कटून आसं काय झाल्तं राती त्ये. "

रामाचं नाव ऐकल्यावर धोंडीला हुशारी आली. उटून बसला. तकडं बायकांनी कोंडाळं करून शिंगाक्काला बी हुशारी आणली हुती. "आगं मसणे, सांग आता तरी काय झाल्तं पिंपळाच्या पसाऱ्यात त्ये! त्या मुंजाच्या कानात कोणती गोस्ट सांगाय गेल्तीस त्ये बी सांग. " म्हणल्यावर शिंगाक्का उटून बसली आन् म्हणली, " व्हय, त्या मुंजाला कवा भीत नव्हतो म्या. म्हून आज आमोशा का असंना, पल्याड आमच्या रानात दाल्ल्याला जरा राकनीला मदत म्हून चाल्लो हुतो. पिंपळाचा पसारा जवळ आल्यावर म्होरनं निस्तं येक पांडरं धोतार चालत यायला लागल्यालं दिसलं तवा पाचावर धाराण बसली माज्या. धोतार जवळ जवळ येताना लईच हालाय लागलं तवा पिंपळावरचा मुंजाच धोतरातनं यिऊन माझ्या नरड्याला आवळणार म्हून माझा जीवच नरड्याला आला. पर वरडायचं बी सुचलं न्हाई. डोळ्याला अंदारी आली, तवा गटुळ्यावरचा हात कवा सुटला, गटुळं कुटं पडलं आन् म्या कुटं पडलो काय बी कळालं न्हाई. आत्ता कळतंय बग. या पोरास्नी मी घावलो म्हून बरं झालं. न्हायतर म्या आज काय जित्ती नसतो. पिंपळावरच्या मुंज्याची भण हून पिंपळावरच लटाकलो असतो. "

"आगं ए मसणे, तुझी तिरडी आडाकली पिंपळाला, आगं, काल तूच माज्या म्होरं राती आल्तीस व्हय गं काळे? आगं, किती मोट्ट्या संकटात घातलं हुतंस मला! "

"आरं मुडद्या, तू हुतास व्हय त्या धोतरात? आरं कोळशा, धोतराच्या वर तू दिसला असतास तर माजी आशी का गत झाली असती? आरं ध्येकण्या, आमोशाला राती भूतावानी फिरत जाऊ नगंस सांगतो तुला"

"आन् तू गं ध्येटकाळे, तु बी काळी म्हस तुझ्या गटुळ्याखाली दिसली न्हाईस मला. आता समद्यांसमोर आण घे राती फिरणार न्हाई म्हून. "

धोंडी आन् शिंगाक्काच्या कालव्यांनं कानात जाळ झाल्याला शिवा आणि पोरं एकदमच वराडली,

... "आरं, बसा गप. अमोशाच्या रातीच काय, कुटल्याबी राती भूतं येत नसत्यात. तुमच्या रंगामुळं फकस्त पांढरी कापडंच अंदारात दिसली तुम्हास्नी आन् येकामेकाला भूत समजून आकडी आली तुम्हास्नी. थुत् तुमच्या! तुमच्या परास भुतंच बरी लेकानु"....

**सुश्री त्रिशला शहा**, मिरज

## 72. कविता – ठेच —श्री नितीन सुभाष चंदनशिवे



“पायाला ठेच लागली तिच्या

अंगठा फुटला बिचारीचा...

दगड धारदार होता रुतून बसलेला

तरीही ती हसली...

मैत्रिणीने विचारलं

एवढा मोठा दगड लागलाय पायाला

अशी हसतेस काय???

ती खळखळून हसत म्हणाली

अगं माहेरच्या वाटेवरचा दगड होता तो

त्याचं एवढं काय वाईट वाटून घ्यायचं...?”

श्री नितीन सुभाष चंदनशिवे 7020909521

73. कविता – विसर्जन — सुश्री संजीवनी कुलकर्णी



लाल माती हाती। घेऊनी मळुनी।
जल मिसळुनी। केला गोळा।।

अवयव सारे। साकार झाले।
आकारी आले। गणराज।।

सुकवी मातीला। उन्ह आणि वारा।।
येऊन भरारा। दृढ मूर्त।।

आप, तेज, वायू। पृथ्वीचे आभार।
शरीर साकार। झालेची ते।।

स्थापिला मखरी। सुशोभित देह।
ॐकारा जुळते। शब्दब्रह्म।।

रुप, रस, गंध। शब्द आणि स्पर्श।
होई परामर्श। देहेची ह्या।।

जोडीले हे हात। भाव मिसळले।
एकरुप झाले। देहभान।।

साजीरे हे रुप। सोडवी ती कोडी
पिंडी ते ब्रह्मांडी। अनुभव।।

विसर्जन होता। सद्गती मिळे।
पार्थीव मिसळे। निसर्गात।।

मन शांत होई। मिटवी संदेह।
सोने होई देह। निर्वाणीला।।

सुश्री संजीवनी कुलकर्णी मो 9922066260

## 74. कथा - अपराजिता... – श्री भरत खैरकर



अनिता आपल्या मलेशियामधील क्वालालंपूरच्या आलिशान ऑफिसमध्ये बसली होती. तिच्यासमोर तीन तीन मोठमोठे स्क्रीन असलेले कॉम्प्युटर ठेवले होते. त्यावर असलेल्या इन्व्हर्टर, ऑटोकॅड आणि सॉलिड वर्क्स ह्या तिन्ही सॉफ्टवेअरवर ती शिताफीने काम करत होती.. पायपिंग डिझाईनमध्ये तिने बऱ्यापैकी मास्टरी मिळवली होती. त्यामुळे कंपनीने तिला मागील महिन्यात मलेशियातील एका रिफायनरीच्या प्रोजेक्टसाठी "ऑन साईट " पाठवले होते. आतापर्यंतच्या विविध प्रोजेक्टमध्ये अनिताने कंपनीला भरपूर नफा कमवून दिला होता. त्यामुळे तिच्या विभागाची आता ती हेड होती.. प्रत्यक्षात तिला सॉफ्टवेअरवर काम नसले तरी, अडचणीच्या वेळी तिला ड्रायव्हिंग सीट सांभाळावीच लागायची! आणि आजही ती तेच करत होती.. मोठ्याशा रिफायनरीमधील एका पाईपलाईनच्या चुकीच्या मेजरमेंटमुळे अख्ख्या प्लांटचं सिमुलेशन व्यवस्थित दिसत नव्हतं. आणि तोच प्रॉब्लेम सोडविण्यासाठी ती डोकं टाकीत होती..

थकवा जाणवल्यामुळे ती खिडकीतून बाहेर डोकावली.. तिला क्वालालंपूर पेट्रोनास ट्वीन टॉवर दिसला. त्या उंच टॉवरच्या टोकाकडे बघत आपणही कसे उंच टोकावर आलो. हे आठवता आठवता ती तिच्या बालपणात गेली..

तिला आठवलं.. आपण अभ्यासात जेमतेम होतो. दहावीत मिळालेल्या कमी गुणांमुळे तिने प्रायव्हेट आयटीआयला ऍडमिशन घेतली होती आणि त्यासाठी ती पुण्याला आपल्या काकाकडे राहायची.. ड्रॉइंग चांगलं असल्याने तिला मेकॅनिकल ड्राफ्ट्समन ह्या ट्रेडला ऍडमिशन घ्यायचा सल्ला दिला गेला. तिने तो दोन वर्षाचा कोर्स मन लावून पूर्ण केला.. काकांच्या ओळखीने तिला एक वर्षासाठी सँडविकसारख्या मोठ्या स्वीडीश कंपनीत अप्रेंटीसशीप मिळाली.. आणि तिने ह्या संधीचं सोनं केलं.. मिळेल ते काम वेळेत कम्प्लीट करणे.. विविध ड्रॉइंग समजावून घेणे.. ऑटोकॅडवर अलग अलग प्रकारचे पाईप फिटींग, पाईप जॉइंट्स काढून त्यांचा सिंगल लाईन डायग्राम, डबल लाईन डायग्राम तयार करणे, आवश्यक त्या ठिकाणी पंप बॉयलर इत्यादींचा जॉईंट देणे, ही कामे ती आता चुटकीसरशी करू लागली होती.. तिची कामातली गती आणि मती बघून सुपरवायझर खुश होते.. अनिताला ते वेळोवेळी मार्गदर्शन करायचे. ती सुद्धा एक्स्ट्रा काम मागून घ्यायची.. दुसऱ्या दिवशी ठरल्यानुसार ते काम त्यांच्याकडून तपासून घ्यायची. झालेल्या चुका डायरीमध्ये लिहून ठेवायची. ह्यामुळे तिच्या कामामध्ये एक प्रकारचा परफेक्टनेस आला होता.. पाहता पाहता तिचा वर्षभराचा कालावधी संपला. त्यानंतर तिने एका मोठ्याशा पायपिंग कंपनीमध्ये "ट्रेनी ड्राफ्ट्समन" म्हणून नोकरी मिळवली. ह्याच कंपनीमध्ये तिने सॉलिड वर्क्स, इन्व्हर्टरसारखे ऍडव्हान्स सॉफ्टवेअर शिकून घेतले.. दरम्यानच्या काळात तिने पार्टटाइम डिप्लोमा इंजीनियरिंगसाठी ऍडमिशन घेतले.. आयटीआय झाल्याने तिला सेकंड इयरला डायरेक्ट ऍडमिशन मिळाले. आणि तिचा आता दोन वर्षाचा प्रॅक्टिकल एक्सपिरीयन्स असल्याने

तिला इतर सब्जेक्ट सुद्धा सोपे गेले. त्या कारणाने तिने डिप्लोमा इंजीनियरिंग चांगल्या गुणांनी पास केले होते.. आता तिला पार्टटाइम बी. ई. करायचे वेध लागले होते. कंपनीचे काम करता करता तिला आता आपला अभ्यासही करावा लागायचा. कंपनीत वाढलेला कामाचा लोड आणि इंजिनिअरिंगचा अभ्यास ही तारेवरची कसरत होती. पण मोठ्या जिद्दीने तिने तेही पूर्ण केले होते.. तिचे दोन-तीन प्रमोशनही झाले होते.. पगार बऱ्यापैकी वाढला होता..

आता तिच्या लग्नासाठी आई-वडिलांची लगबग सुरू झाली होती.. तिची इच्छा नसतानाही गावाकडच्याच पण पुण्यात सेटल झालेल्या एका सिव्हिल इंजिनिअरसोबत तिचं लग्न लावून देण्यात आलं. मुलगा गावाकडचा, गुलबर्गा कर्नाटक साईडचा.. त्यातल्या त्यात जुन्या विचारसरणीचा असल्याने.. बायकांनी घराबाहेर जाऊन नोकरी करावी किंवा तिचा पगार आपल्यापेक्षा जास्त असावा हे न पटणाऱ्यापैकी होता.. त्याला अनिताच्या प्रगतीबद्दल.. कंपनीतील पोझिशन बद्दल हेवा वाटायचा.. थोडा अधिक उशीर झाला तरी तो संशय घ्यायचा.. त्यावरून भांडण उकरून काढायचा.. आणि मग दोघांमध्ये एक प्रकारचा असंतोष धुमसत राहायचा.. लहान सहान कारणावरून तो तिला मारझोड करायला लागला होता.. तरीही ती आपला संसार आहे.. काका काकू काय म्हणतील? त्यांना उगाच खाली पाहायला लागू नये.. म्हणून दुर्लक्ष करायची!

एक दिवस कंपनीत गेल्यावर तिच्या गालावर खरचटल्याचा लाल डाग तिच्या मैत्रिणीला दिसला. तिला अनिताने घडलेला प्रकार सांगितला.. मैत्रिणीला राहवले नाही. तिने लगेच अनिताच्या काकांना फोन करून याबद्दल सांगितले.. तेही मग कुठला उशीर न करता सायंकाळी अनिताकडे घरी पोहोचले.. सर्व खुलासेवार चर्चा झाल्यावर अनिता हमसून हमसून रडू लागली. नवऱ्याच्या सगळ्या कारवाया तिने सांगितल्या.. पोलीस कम्प्लेंट करावी म्हटलं, तर हीच नको नको म्हणत होती.. एवढ्या तेवढ्यासाठी संसार नको मोडायला म्हणून तिनेच मनाला मुरड घातली होती.. आतापर्यंत झाकून असलेला आपला राग आणि "नवरेपणा" इतरांना कळल्यामुळे तिचा नवराही शरमला व वरमला होता.. हळूहळू त्याच्यामध्ये सुधारणा व्हायला लागली.

काही दिवसांनी बांधकाम विभागामध्ये मंदी आल्याने त्याचा जॉब सुटला.. नव्हे त्याला कंपनीने काढूनच टाकले! आता मात्र तो पूर्णपणे अनिताच्या पैशावर जगत होता.. त्याला त्याशिवाय उपाय नव्हता.. हळूहळू त्याचे पुरुषीपण माणुसकीत बदलायला लागले होते! इकडे तो घरची कामे करायला लागला होता.. अनितचा डबा तयार करण्यापासून तिची घरातली सर्व कामे तो बघायला लागला होता. ती ओव्हरटाईमला थांबल्यावर सायंकाळचा स्वयंपाक करून ठेवणे, इत्यादी जबाबदाऱ्या त्याने सांभाळल्या होत्या..

त्याच्यात झालेला हा कायापालट बघून अनिताही आता त्याच्यावर भरभरून प्रेम करत होती.. त्यातच त्यांना एक मुलगा झाला.. आता हळूहळू संसार फुलायला लागला होता.. दोघांनी पुण्यामध्ये फ्लॅट बुक केला.. कार घेतली.. मुलाला चांगल्या शाळेमध्ये ऍडमिशन दिली.. आता कुठल्याही प्रकारची काळजी अशी राहिली नव्हती! अनिता आता अधिक जोमाने आपल्या कंपनीतील कामाकडे विविध प्रोजेक्टकडे सर्व शक्तीनिशी लक्ष द्यायला लागली होती. त्याचाच परिणाम म्हणून की काय तिला विविध देशांमध्ये विशेषतः रिफायनरी आणि तेल

कंपन्यांमध्ये भरपूर मागणी होती.. तिच्या हाताला भरपूर यश होतं. पाहता क्षणी ती कोणतीही समस्या सहज सोडवायची.. ह्याच तिच्या कौशल्यामुळे अलीकडे तिला सारखं ह्या देशातून त्या देशात फिरतीवर राहावं लागायचं.. पण आता मात्र तिचा नवरा कोणत्याही प्रकारचा संशय न घेता आपल्या मुलाला आणि तिच्या संसाराला मन लावून सांभाळतो.. त्याला आपली चूक कळलेली आहे.. आपल्या कर्तबगार बायकोच्या कहाण्या तो अभिमानाने आता आपल्या मित्रांमध्ये.. नातेवाईकांमध्ये मिरवतो.. सांगतो!

हे सगळं आठवून.. अनिताचे डोळे भरून आले.. तिचं पुन्हा लक्ष तीनही कम्प्युटरकडे गेलं.. तिला पटकन काहीतरी सुचलं.. एका क्षणात तिने आठवडाभरापासून न सुटलेलं सिमुलेशन सोडवलं.. ती खूप खूश होती..

ती अपराजिता झटपट लॉगआऊट झाली.. तिनं लगेचच भारताचं रिटर्न तिकीट मिळवण्यासाठी कंपनीच्या ट्रॅव्हल एजंटला फोन केला.. आता तिला घरची आठवण आलेली होती.. कधी एकदा घर गाठते आणि आपला संसार बघते.. असं तिला झालं होतं!

**प्रा. भरत खैरकर, बी १/७, काकडे पार्क, तानाजी नगर, चिंचवड, पुणे ३३. मो.  ९८८१६१५३२९.**

**Bharatiya Sanskriti Bamberg e.V.**

*Bridging Indian heritage and the Bamberg Community*



**Bharatiya Sanskriti Bamberg e.V. is established to celebrate and promote the rich cultural heritage of India within the Bamberg community, Germany. Our mission is to foster cross-cultural understanding and unity by organizing events, workshops, and festivals that showcase Indian traditions, arts, and values. Through these initiatives, we aim to create a vibrant platform where individuals from diverse backgrounds can come together to appreciate and experience the essence of Indian culture.**

**Dr. Radhika Pawar Bawankar**

**Editor (International Literature & Culture)**

## 75. ललित – बालपणीचे आनंद — सौ. मुक्ता महेश अभ्यंकर



आज अचानक पेप्सीकोला खायचा योग आला. पेप्सीकोला खाता खाता लहानपणीच्या आठवणींचा उजाळा झाला.

आम्ही लहान होतो तेव्हा किती छोट्या छोट्या गोष्टीमध्ये आनंद वाटायचा.

… परीक्षा झाली रे झाली की लगेच मैत्रिणींबरोबर साठवलेले पैसे घेवून गोष्टींची पुस्तके आणायला जायचे आणि मग आळीपाळीने त्यांचे वाचन व्हायचे. सुट्टीत एक पिक्चर, एकदा भेळ खायला जाणे व कुल्फी खाणे हे कार्यक्रम ठरलेले असायचे.

आजोळी डहाणूला जायचो तेव्हा रोज समुद्रावर जायचे व वाळूत किल्ले व घरे करणे, शंख गोळा करणे व तासनतास समुद्राच्या पाण्यात खेळणे असा दिनक्रम असायचा. टिव्ही बघणे हाही एक सोहळाच असायचा. सगळे शेजारचे यायचे व आम्ही सगळे एकत्र मिळून टिव्ही बघायचो.

मावश्या व इतर नातेवाईक सुट्टीला आले की एक दिवस भाड्याने पॉट आणून आइस्क्रीम घरी तयार करणे व ते अगदी पोट भरून खाणे असा एक दिवस कार्यक्रम असायचा. एक दिवस भेळ करणे तर एक दिवस वडापाव असे खाण्याचे बेत असायचे. रात्री पत्ते खेळणे, गप्पा गोष्टी, नाव गाव फळ फुल व भेंड्या खेळणे ठरलेले असायचे.

ह्यात सुट्टी कशी संपायची कळायचेच नाही.

दरवर्षी आई माझ्या वाढदिवसाला मला आवडणारे छोले व घरीच केक बनवायची. माझ्या शाळेच्या मैत्रिणीही हे आवडीने खायच्या. दर वाढदिवसाला हेच पदार्थ खावून सुद्धा कधीही कंटाळा आला नाही.

आयुष्यात विविधता नव्हती. तोच तोचपणा असला तरी निखळ आनंद होता. आजी दिवाळीला व वाढदिवसाला दहा रुपयाची नोट द्यायची त्यात ही खूप समाधान व आनंद होता.

सुट्टीत चप्पी, साप शिडी, पत्ते, कवड्यांचा खेळ व मैदानी खेळ खेळता खेळता दिवस कधी संपायचा कळायचे नाही आणि त्याचा कधीही कंटाळा आला नाही.

गणपतीच्या दिवसात सगळे एकत्र जमायचो व सण साजरा करायचो. रात्र रात्र जागून मखर बनवायचो व एकत्र प्रसाद वाटायचो. शेजारच्या घरी जाऊन आरती म्हणणे व प्रसाद खाणे असा उपक्रम ठरलेला असायचा.

श्रावणी सोमवारी उपवास करून सगळ्यांनी एकत्र लवकर जेवायचो. दिवाळीत थोडे थोडे पदार्थ घरीच करायचो व सगळ्यांनी मिळून ते खायचो.

सुट्टीत गमतीजमती असायच्या. बटाट्याचा कीस, साबुदाण्याच्या चकल्या व चिकवड्या करण्यात कसा वेळ जायचा कळायचेच नाही. ते वाळवायला टाकल्यावर पहारा किंवा लक्ष ठेवण्याच्या कारणाने परत एकत्र खेळ खेळायचो.

पावसाळ्यात कागदाच्या होड्या करून डबक्यात सोडणे ह्यात काय आनंद होता त्याची कशाशी गणना होवू शकत नाही. पावसात भिजणे, डबक्यात उड्या मारणे, गांडुळांवर मीठ टाकणे अश्या अनेक गोष्टी करायच्या असायच्या.

आयुष्यात खूप विविधता नव्हती तरीही खूप आनंद होता.

मी विचार केला की आजच्या पिढीतल्या मुलांना सगळ्या गोष्टी किती सहज मिळतात तरीही समाधान नसते. आयुष्यात एवढी विविधता असली तरीही त्यांना कंटाळा येतो. घरात सुबत्ता असली तरी आनंदी वातावरण नसते. पूर्वी न कळवता पाहुणे यायचे त्याचा आनंद वेगळाच होता. आजी आजोबा आले की खाऊ म्हणून कशाच्या तरी वड्या यायच्या. त्या आम्ही सगळे वाटून खायचो.

आता पूर्वी इतके पाहुणेही येत नाहीत आणि अचानक न कळवता तर कोणी येत नाही कोणाकडे. त्यामुळे नाती जपणे, गोष्टी वाटून खाणे ह्या सगळ्या गोष्टी आजच्या पिढीला माहीतच नाही. चौकोनी किंवा त्रिकोणी कुटुंब व आभासी जगात आजची पिढी कुठे तरी हरवून गेली आहे. त्यांना व्यक्त व्हायलाही वेळ नाही आणि कुणाची सोबतही नाही. छोटे कुटुंब असल्यामुळे व आर्थिक सुबत्ता असल्यामुळे सगळ्या गोष्टी खूप सहज मिळतात त्यामुळे त्याचे काही महत्व राहिले नाही.

मला आठवते की आमच्या लहानपणी दिवे गेले की आम्हाला आनंद व्हायचा, कारण तेव्हा सगळे मिळून कानगोष्टी व भेंड्या खेळायचो व गप्पा गोष्टी करायचो. अंधारात ओट्यावर बसून आकाशातले तारे बघायचो. आता आकाशातले तारे बघायला वेळ नाही आणि ते बघायला खोलीत कृत्रिम तारांगण लावले जाते. घरात जनरेटर असल्यामुळे दिवे कधी जातच नाहीत. अंधार कधी होतच नाही त्यामुळे उजेडाचे महत्व अनुभवायला मिळत नाही आणि अंधाराची गंमत ही नाही.

आजच्या ह्या आभासी जगात नाती, मैत्री आणि त्याबरोबर आलेल्या संवेदना लोप होत चालल्या आहेत आणि त्याचे शरीरावर व मनावर निश्चितच घातक परिणाम होत आहेत.

... वेळीच ह्या गोष्टींवर विचार केला गेला पाहिजे तरच मनाने व शरीराने सुदृढ पिढीची निर्मिती होईल.

**सौ. मुक्ता महेश अभ्यंकर, सन युनिव्हर्स फेज २, एम ५०३, नवले ब्रिज जवळ, नऱ्हे, पुणे. मो. ७५०६२४३०५०**

## 76. कथा – "नाव का बदललं?" — श्री मंगेश मधुकर



टीव्ही पाहत बसलेल्या तिनं बेल वाजल्यावर दार उघडलं तर समोर तो उभा. चेहऱ्यावरुन येणाऱ्या वादळाचा अंदाज आल्यानं न बोलता ती सोफ्यावर बसली. तिच्या अंगावर हातातला पेपर फेकत तो ओरडला....

"इथपर्यंत मजल गेली"

"हळू!! . ओरडू नकोस आणि माझ्या घरात आहेस हे लक्षात ठेव. "

"तेवढं कळतं. अजून डोकं ठिकाणावर आहे. "

"गुड!! जरा विचार करून बोल आणि वागसुद्धा"

"काय करशील? "

"बरंच काही. "

"धमकी देतेयेस? "

"मला इतरही कामं आहेत आणि कायद्यानं आता आपला काही संबंध नाही. तेव्हा.... "

"तरीही मी विचारणारच. "

"मला उत्तर द्यायचं बंधन नाहीये. नावापुरतचं शिल्लक असलेलं आपलं नातं आता कागदोपत्री सुद्धा संपलयं."

"तुला तेच हवं होतं. मनासारखं झालं ना. आता हवं ते करायला मोकळी!! . "

"पुन्हा सांगते. नीट बोल. नाहीतर इथून जा. मला वाद घालायची इच्छा नाहीये. "

"मला पण.... दगडावर डोकं आपटायची हौस नाहीये. "

"मग थांबला कशाला?? जा ना... "

"पेपरमध्ये हे काय जाहीर केलंय? "

"जे तू वाचलं तेच. "

"वाकडयात शिरु नकोस. "

"का? त्याचा मक्ता फक्त तूच घेतलायेस? . "

"ए बाई!! तुझ्या मनाप्रमाणे वेगळे झालो मग हा उद्योग कशासाठी?? "

"हा निर्णय माझा नाही. सगळं विचारून आणि त्याच्या परवानगीनं केलंय. "

"चांगलं माहितीये हे तुझंच डोकं आहे. पोराला काय कळतयं. लहान आहे"

“तो अठरा वर्षाचा झालाय आता. ”

“म्हणून काय बापाचं नाव टाकून द्यायचं? ”

“लावून तरी काय फायदा होता? ”

“म्हणजे? ”

“काय म्हणतेय ते बरोबर समजलंयं. ”

“स्पष्ट बोलायची भीती वाटते का? ”

“हा हा हा!! भीती? लग्न झाल्यापासून मनाचा दगड झालाय. तू, तुझे लाडके आईवडील यांच्याविषयी काहीच वाटत नाही. ”

“ते माहितीये. परत सगळं उकरून काढायची काहीही गरज नाही. ”

“मला पण... आपले मार्ग भिन्न आहेत. ”

“कळलं गं!! पुन्हा पुन्हा तेच सांगू नकोस. आधी माझ्या प्रश्नाचं उत्तर दे. ”

“मग ऐक!! स्पष्टच बोलते. मुलाच्या बाबतीत तू फक्त निमित्त आहेस बाकी काही नाही. ”

“शुद्धीवर आहेस का? वाट्टेल ते बोलू नकोस. ”

“का? खरं ऐकून त्रास होतोय? ”

“तुझं डोकं फिरलय.. ”

“ते तुझ्याशी लग्न केलं तेव्हा फिरलं होतं. आता कुठं ठिकाणावर आलंय. इच्छा नसताना नोकरी करावी लागली कारण तू सेटल नव्हतास.. आणि तसं पहायला गेलं तर आजही सेटल नाहीसच. घरासाठी पैसे देताना तुझा हात कायमच आखडता. दर महिन्याला पाच हजार द्यायचे एवढ्यापुरता घरातला सहभाग. तुझ्याकडून काही अपेक्षा नाहीत. मुलगा हेच जगण्याचं कारण. तो सेटल झाला की लग्न लावून देणार.. माझी जबाबदारी संपली. ”

"अगं जनाची नाही तर मनाची तरी लाज ठेव. तोंड दिलंय म्हणून काहीही बोलशील.. ”

“काहीच खोटं बोलत नाहीये. तू फक्त नामधारी बाप आहेस. ”

संतापलेल्या त्यानं हात उगारला....

“खबरदार!! ही चूक करू नकोस नाहीतर तुरुंगाची हवा खायला लागेल. ”.. त्याचा आवेश उतरला. एकदम शांतता पसरली. इतक्यात बेल वाजली. दार उघडलं तर समोर मुलगा. वडिलांकडे दुर्लक्ष करून तो जाऊ लागल्यावर वडिलांनी थांबवलं...

“इतका तिरस्कार करतोस की तोंड फिरवून चाललास. मी तुझा बाप आहे. दुश्मन नाही. ”

मुलानं आईकडं पाहत विचारलं “कशासाठी आलेत? काम झालं असेल तर जायला सांग. ”

“तिला काय विचारतोय. माझ्याशी बोल ना. जाब विचारायला आलोय. पेपरमध्ये नाव बदलल्याची जाहिरात दिलीस. आता माझं नाव सुद्धा जड झालं. ”

“मला वाटलं ते केलं. त्याचा इश्यू करू नका”

“यात काहीच विशेष वाटत नाही? आम्ही वेगळे झालो पण आपलं नातं अजूनही शाबूत आहे. ”

“असं फक्त तुम्हांला वाटतं. मला नाही. आपला फक्त बायोलॉजिकल संबंध आहे. त्याला नाईलाज आहे. काही गोष्टी हातात नसतात. ”

“मनात जे काही आहे ते स्पष्ट बोल. आज होऊन जाऊ दे”

“ओके, ऍज यू विश. जन्म देण्याव्यतिरिक्त माझ्या आयुष्यातलं तुमचं कॉन्ट्रीब्युशन काय??? शिक्षण, अभ्यास, आजारपण, हौस मौज सगळं आईनं केलं. प्रत्येक वेळी फक्त आईच सोबतीला होती. ”

“आणि मी काहीच केलं नाही? .. बोलताना जरा विचार कर. ”

“तिनं एकटीने मला वाढवलंय. तुम्ही कायम स्वतःपुरता विचार केलात. शंभर नोकऱ्या केल्या पण एका ठिकाणी टिकला नाहीत. कमावती बायको म्हणून सोयीची कारणं देत जबाबदारी टाळत राहिलात. ”

“लक्षात ठेव, बापाला अक्कल शिकवण्याइतका मोठा झाला नाहीस. तुझ्या तोंडून आई बोलतीये. ”

“तिला मध्ये घेऊ नका. तुम्ही कायम आपल्याच धुंदीत. तिचा कधी विचारच केला नाहीत. एकटी लढत राहिली. काय त्रास सहन केलायं, किती तडजोडी केल्यात हे मला माहितीये. कित्येकदा मध्यरात्री अंधारात हमसून हमसून रडणाऱ्या आईला मी पाहिलं आहे... तुम्ही नाही. ”

“म्हणजे मी इतकी वर्ष झक मारली का? ”

“आय डोन्ट नो. अचानक बाप वगैरे नात्याची जाणीव करून देऊ नका. यापुढे आईचं नाव लावणार आणि हे फायनल”

मुलाचं सडेतोड बोलणं ऐकून त्याला धक्का बसला.. पण ती मात्र निर्विकार...

“आता उगीच इमोशनल ड्रामा नको. बोलून झालं असेल तर.. ” मुलानं दरवाज्याकडं हात दाखवला.

“जातो. परत कधीच तोंड दाखवणार नाही.. ”

“प्लीज!! आम्हालाही इच्छा नाही. तुम्ही कायम नावापुरते होता आणि तसेच वागलात म्हणून नाव बदललं. गुड बाय, नॉट टू सी यू अगेन”

– – मुलाचं ऐकून खूप राग आला. घरातून जाताना त्यानं जोरात दार आपटलं. खूप भावूक झालेल्या तिनं मुलाच्या कुशीत शिरत डोळ्यातल्या पाण्याला वाट मोकळी करून दिली तेव्हा मुलाचे डोळेसुद्धा पाणावले.

**श्री मंगेश मधुकर** मो. 98228 50034

## 77. कथा – ए आय बाबा की जय! - श्री मकरंद पिंपुटकर



पुण्याच्या गजबजलेल्या भागात वसंत जोशी नावाचे एक काका राहत होते. पुण्यातले होते, स्टेट बँकेत नोकरीला होते आणि निवृत्त होऊन पाच वर्षे झाली होती. या सर्वच कारणांनी, अर्थातच, जगातल्या यच्चयावत सगळ्याच विषयांवर ते प्रचंड अधिकाराने आपली मतं ठामपणे आणि हिरीरीने मांडत असत.

गेले काही महिने त्यांच्यावर "कृत्रिम बुद्धिमत्ते"चे (artificial intelligence AI) भूत स्वार झाले होते. अमेरिकेत स्थायिक झालेल्या मुलाने पाठवलेल्या लॅपटॉपवर, शेजारच्या राजूने chatgpt install करून दिले होते, आणि वसंतरावांना जणू अलिबाबाची गुहाच सापडली होती.

त्यांच्या chatgpt ला ते अत्यंत आदराने "एआय बाबा" म्हणत. " माझ्या एआय बाबाला सर्व काही माहित आहे," त्यांनी घोषणा केली ... "राजकारणापासून लग्नाच्या गाठी जुळवण्यापर्यंत सर्व निर्णय माझा एआय बाबा घेऊ शकतो. शेरोशायरीपासून योगासनं - डाएट सगळ्या सगळ्यात माहिर आहे माझा एआय बाबा. " काका सार्थ अभिमानानं सांगत.

काकांच्या असंख्य स्थानिक व्हॉट्सअॅप ग्रुपमध्ये काकांच्या या सर्व बढायांमुळे चांगलीच उत्सुकता निर्माण झाली होती. काकांनी उदार अंतःकरणाने त्यांच्या एआय बाबाला रोजच्या सल्ल्यासाठी वापरण्याची खुली ऑफर दिली आणि लवकरच गोंधळ सुरू झाला.

पुण्यातल्या "तमिळ संघम" च्या अय्यरांना एका कार्यक्रमासाठी गणपती बाप्पाची प्रतिमा हवी होती, त्यांनी जोशीकाकांना विनंती केली, आणि काकांच्या एआय बाबाने लगेच रिद्धी सिद्धीसहित सालंकृत बाप्पाचे चित्र तयार करून दिले. अय्यरांचा मुलगा ते चित्र घेऊन गेला, आणि अर्ध्या तासातच तमिळ संघममधून संतप्त आवाजात अय्यरांचा फोन आला.

"ए वसंथ, अरे ये कैसा गणपथीका फोटो भेजा तुम? हमारे गणेशजीका right दांत टुटा हुवा रहता है, तुने तुम मऱ्हाटी लोग जैसा left दांत टुटा हुवा गणेशजी भेजा है इधर. और उसका सुंड right को मुडा है. ऐसा right सुंडवाला गणेशजी कितना उग्र होता है, जानते हो ना? और, यार, हमारे तमिळनाडूमे गणपथी बॅचलर है, बॅचलर! और तू इधर गणेशजीका दो दो बीबीया दिखाया हैं! तेरे एआय बाबाने पुरा वाट लगा दिया इधर!"

वसंतकाकांना क्षणभराचीही उसंत न घेऊ देता, अय्यर त्याची भडास काढत होता. महाराष्ट्रातील गणपती आणि दाक्षिणात्य गणपती यात एवढे फरक असतात, हे ना काकांना ठाऊक होतं, ना बहुधा त्यांच्या एआय बाबाला.

या वर्षी काकांनी गुरुपौर्णिमेच्या दिवशीच काकूंना सांगितलं, " चला, चला. तयारीला लागा, उद्यापासून श्रावण सुरू होत आहे. " काकू चक्रावल्या, म्हणाल्या, "अहो, अजून पंधरा दिवस आहेत श्रावणाला. "

काका काही केल्या ऐकेचनात. त्यांचा बोलावता धनी त्यांचा एआय बाबा होता. उत्तर प्रदेशासंदर्भात काही प्रश्नाचे उत्तर देताना त्याने गुरुपौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशीपासून श्रावण सुरू होतो म्हटलं आणि काकांनी तेवढं वाक्यच धरून ठेवलं.

"अगं, सर्वज्ञानी एआय बाबा सांगतोय, ते चुकीचं कसं असेल? "

... शेवटी पिढ्यान् पिढ्या पौरोहित्य करणाऱ्या बंडूकाकांनी जेव्हा ठणकावून श्रावण महिन्याला अजून पंधरा दिवस बाकी आहेत हे सांगितलं, तेव्हा कुठे जोशीकाका गप्प बसले.

उत्तर भारतीयांचा नवीन हिंदू महिना पौर्णिमेपासूनच सुरू होतो, तर महाराष्ट्रात अमावस्येनंतर नवा महिना सुरू होतो, हा पोटभेद कॉम्प्युटरला ध्यानात आला नव्हता.... पण या असल्या लहान मोठ्या अडीअडचणींनी काका नाऊमेद झाले नाहीत.

त्यांनी त्यांचा पुतण्या रोहनला जीवनसाथी शोधण्यास मदत करण्याचं मनावर घेतलं होतं. जातपात, वय याची काही अट नाही, आवडीनिवडी जुळल्या पाहिजेत, कुंडली जुळली पाहिजे, मग मुलगी भले महाराष्ट्राबाहेरची असली तरी चालेल असं त्यांनी कॉम्प्युटर बाबाला सांगितलं. शेकडो वैवाहिक प्रोफाइलचे विश्लेषण करून क्षणार्धात बाबांनी भविष्यवाणी केली - “सर्वोत्तम जोडीदार: राधा सिंग, वृश्चिक रास, बिर्याणीप्रेमी, रामपूरमध्ये राहते. ”

“कोणतं रामपूर? ” रोहनने विचारले. “भारतात ३२ आहेत. ”

“खरं प्रेम पिनकोडच्या क्षुद्र बंधनांना जुमानत नाही, ” काका एकदम वसुधैव कुटुंबकम mode मध्ये गेले.

शोधाशोध करत ते शेवटी उत्तर प्रदेशातील रामपूरला पोहोचले, परंतु त्यांना आढळले की राधा प्रत्यक्षात बिर्याणीची गाडी चालवणारी ६० वर्षांची महिला होती. वयाची अट नाही हे एआय बाबाने फारच मनावर घेतलं होतं.

... त्या दिवसापासून वसंतकाकांचं नुसतं नाव जरी काढलं, तरी रोहन काढता पाय घेत असे.

एके दिवशी प्रमिलाकाकूंना अस्सल पंजाबी छोले करायचे होते. “प्रिय एआय बाबा,” तिने विचारले, “ते उत्तम प्रकारे कसे बनवायचे?”

.. प्रश्न पूर्ण होण्याचा अवकाश झरझर मुद्देसूद उत्तर आलं. “पायरी १: कढीपत्ता, मोहरीचे दाणे, नारळाचे दूध घाला,” एआय बाबा आत्मविश्वासाने उत्तरले.

“अहो, हे तर दक्षिण भारतीय सांबार बनतंय! ” त्या ओरडल्या. एआय बाबांनी एका पंजाबी रेसिपी ब्लॉगवर तमिळ युट्यूब कमेंट थ्रेड तयार केला होता आणि त्यातून ती भन्नाट (की भीषण?) रेसिपी तयार झाली होती.

दुर्दैवाने प्रमिला काकूंनी भक्तिभावाने ती रेसिपी अंमलात आणली आणि परिणामी, त्या छोल्यांचा पार निक्काल लागला होता.

नंतर आल्या नगरपालिका निवडणुका. एकदाची प्रभाग रचनांची मांडामांड झाली, युती - आघाडी यांची समीकरणं जमली, बिघडली. निवडणुका ऐन तोंडावर आल्या असताना शहरातील एका वाचाळ नेत्याने पलटी मारून सरकारी पक्षाला सक्रिय पाठिंबा जाहीर केला. या नेत्याच्या एका पदाधिकाऱ्याला नगरसेवकपदाचे तिकीट मिळाले.

... निवडणुका झाल्या, तो नेता भक्तिभावाने काकांकडे आला, आणि आपल्या विजयाबद्दल अंदाज विचारू लागला. काकांच्या सूचनेवरून एआय बाबांनी सोशल मीडिया, भावनांचे स्कोअर आणि व्हॉट्सअॅप फॉरवर्ड्स तपासले आणि घोषित केले: “ हा नेता एकहाती, एकतर्फी निवडून येणार! विरोधकांची अनामत रक्कमसुद्धा जप्त होणार! ”

काकांच्या एआय बाबाने एवढे निखालसपणे सांगितल्यावर तो नेता प्रचंड खुश झाला, त्याने विजयी मिरवणुकीसाठी ढोलपथक बोलावून घेतलं, मोटारसायकलवरून झेंडे फडकावत एक विजय यात्रा आयोजित केली, पेढे लाडूंची ऑर्डर दिली, सगळी जय्यत तयारी ठेवली, आता फक्त निकाल घोषित होण्याचीच खोटी होती.

... पण, हाय दैवा, झालं उलटंच. या बडबोल्या नेत्याच्या येण्याने, सरकारी पक्षच निवडणुकीत साफ झाला, आणि काकांच्या प्रभागातल्या या नेत्याचा पराभव तर झालाच, शिवाय त्याची स्वतःचीच अनामत रक्कम जप्त झाली.

"अहो पण, एआय बाबांना ९२% सकारात्मक प्रतिसाद मिळाला होता! " एवढा उलटफेर पाहून काका चक्रावले होते.

"काका, आपण पुण्यात राहतो. ९२% लोकांनी जे होकारार्थी अंगठे दाखवले, ते अस्सल पुणेरी खवचटपणाचे होते "

... राहुल काकांना समजावत होता, "ते समर्थन नव्हते, ती टर उडवली जात होती. आणि तुमच्या एआय बाबाने फक्त शब्दशः अर्थ घेतला, गर्भितार्थ त्याला कळलाच नाही. "

तो नेता येऊन आता काही भानगड करतो की काय या भीतीने, काका खरंतर चांगलेच घाबरले होते, पण त्यांच्या सुदैवाने, झालेल्या फजितीने तो नेताच इतका शरमिंदा झाला होता, की तो काकांच्या वाटेला फिरकलाच नाही आणि अनावस्था प्रसंग टळला.

" एआय बाबा हा जीवनातील निर्णय घेण्यासाठी नव्हे तर फक्त र ट फ जुळवत, शेरोशायरी लिहिण्यासाठीच वापरावा. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करा, पण आपला मेंदू गहाण ठेवू नका, आंधळेपणाने एआय बाबावर विश्वास ठेवू नका, " असं आता काका सर्वांना सांगत असतात.

आता काका पुन्हा एकदा आपल्या आतल्या आवाजाचं ऐकतात. रोहनने, नागपूरचा जाज्वल्य अभिमान असणाऱ्या एका मुलीशी लग्न केलं, तिला ज्योतिष आणि बिर्याणीपेक्षा नागपूरचा वडाभात जास्त आवडायचा.

... आणि एआय बाबा? तो आता निराशेचे सुस्कारे सोडत दर्दभऱ्या गजला लिहित असतो.


कथेचं तात्पर्य?

ज्या देशात २२ प्रमुख भाषा आहेत, अक्षरशः हजारो बोलीभाषा आहेत, देशभरात तब्बल ३२ रामपूर आहेत आणि राज्यात १२ वडगाव आहेत, तिथे असला कोणताही कृत्रिम यांत्रिक अल्गोरिथम टिकू शकत नाही.

तुम्हाला गाज्जर का हलवा खिलानेवाली आणि कपडे सिलासिलाकर मोठी करणारी आई हीच फक्त आतल्या गोटातील खरं सत्य जाणते. तेव्हा कधीही महत्त्वाचा सल्ला हवा असला, तर पुन्हा एकदा आईचे पाय धरा, एआय चे नाही.

**श्री श्री मकरंद पिंपुटकर,** चिंचवड, मो ८६९८०५३२१५

## 78. पुस्तकावर बोलू काही – Gone with the wind — सुश्री साधना प्रफुल्ल सराफ






***पुस्तक : Gone with the wind***

***लेखिका : मार्गारेट मिचेल***

***पृष्ठसंख्या : १०११***

एखाद्या कादंबरीचे नायक किंवा नायिका हे सर्वगुणसंपन्नच असणार असं एक गृहितक असतं आणि बहुशः कादंबऱ्या, नाटक, चित्रपट यातून ते तसंच रंगवलेलं आपण वाचत, पहात आल्यामुळे ते तसंच असणार हे आपल्या मनात पक्कं ठसलेलं असतं.

पण या गृहितकाला एक सणसणीत अपवाद म्हणजे, मार्गारेट मिचेल हिची जगभर गाजलेली कादंबरी "Gone With The Wind ". या लेखिकेचा जन्म अमेरिकेतील जॉर्जिया राज्यातील ॲटलांटा इथे झाला. आणि या कादंबरीचे मुख्य कथानक ॲटलांटातच घडलेले आहे. तिचे वडील वकील होते आणि ॲटलांटा हिस्टॉरिकल सोसायटीचे अध्यक्ष होते. तिच्या घरातील सर्वांनाच इतिहासात इंटरेस्ट होता, आणि तो गुण मार्गारेटनेही उचलला होता. तिच्या घरात सदैव अमेरिकन यादवी युद्धातील हकिकतींवर चर्चा चालत असत. शिक्षण पूर्ण केल्यावर तिने 'ॲटलांटा जर्नल' या वर्तमानपत्रात काही वर्षे नोकरी केली आणि 1925 साली जॉन मार्शशी लग्न केल्यानंतरच्या दहा वर्षात तिने आजवर ऐकलेल्या यादवी युद्धाबद्दलच्या सर्व गोष्टी लिहून काढल्या. हीच ती 1011 पानांची दीर्घ कादंबरी-

या कादंबरीची नायिका स्कार्लेट ओ हारा ही अत्यंत स्वार्थी, तिच्या मनात जी गोष्ट येईल, ती झालीच पाहिजे, मग त्यासाठी इतर कोणाच्या इच्छा, आकांक्षा पायदळी तुडवल्या गेल्या, तरी तिला त्याची पर्वा नसे, अशा स्वभावाची दाखवली आहे. खरं तर तिला सुंदर म्हणता आलं नसतं, पण तिच्या चेहऱ्यात असा काही मोहकपणा होता, की एखाद्या विलक्षण सुगंधी फुलाभोवती भुंग्यांनी जमून गुंजारव करावा, तशी तिच्याभोवती तरुण मुलं पिंगा घालत असत. तिच्या चेहऱ्यावर नजर खिळून रहात असे. फ्रेंच वंशाची उच्चकुलीन, नाजुक

आई आणि आयरीश वंशाचे, लालबुंद चेहऱ्याचे वडील या दोघांच्या वैशिष्ट्यांचं एक विलक्षण मिश्रण झालेलं होतं तिच्या चेहऱ्यात.

जाॅर्जियातील तिच्या वडिलांची कापसाची भली मोठी शेती आणि गढी म्हणता येईल असा तारा नावाचा बंगला असतो. त्या बंगल्याचं आणि त्या भोवतीच्या इस्टेटीचं इतकं प्रत्ययकारी वर्णन लेखिकेने केलेलं आहे, की ते पुस्तक वाचताना, त्यातल्या पात्रांसह आपणही तिथेच वावरतो आहोत असं वाटायला लागतं. तिथलं त्यांचं ऐषोआरामाचं आणि श्रीमंती रहाणीमान, आजुबाजुच्या त्यांच्या शेजाऱ्यांबरोबरचे त्यांचे संबंध, त्यांच्या चालणाऱ्या पाट्र्या, त्यांचे निग्रो नोकर, सगळंच खरंखुरं डोळ्यांसमोर उभं करण्याची विलक्षण हातोटी या लेखिकेला, तिच्या या पहिल्याच आणि एकुलत्या एक पुस्तकात साधलेली आहे!

नायक ऱ्हेट बटलर हा पण अवैध उद्योग करुन श्रीमंत झालेला, सामाजिक नियमांना धुडकावून लावणारा आणि त्यामुळेच समाजात ज्याची छुपेपणानी हेटाळणी होत असते असा सावळा, देखणा तरुण आहे. या दोघांच्या स्वभावातील सारखेपणामुळे त्यांच्यात एक 'लव्ह-हेट' नातं तयार होत जातं. एकीकडे एकमेकांचं आकर्षणही वाटत असतं आणि दुसरीकडे दोघांच्या विचित्र वागण्यामुळे एकमेकांना एक दुसऱ्याची चीडही येत असते. यादवी युद्धामुळे त्यांचं हे नातं कसं कसं बदलत जातं हे वाचताना मानवी नात्यांमधील गुंतागुंत लेखिकेने इतकी सुरेख गुंफली आहे, की आपण वाचताना त्यात अगदी गुंगून जातो.

ऱ्हेट या स्कार्लेटला प्रत्येक टप्प्यावर भेटत रहातो. सुरुवातीलाच ज्या पार्टीत अॅशली स्कार्लेटला सांगतो, की मी तुझ्याशी लग्न करु शकणार नाही आणि ती चिडून त्याच्या थोबाडीत मारते. तो निघून जातो आणि ती चिडून एक काचेचा फ्लॉवरपॉट भिंतीवर फेकून फोडते, त्यावेळी एका कोचामागे लपून हे सगळं बघत असलेला ऱ्हेट बाहेर येतो आणि तिला म्हणतो, "This not a ladylike behavior! " तेव्हा ती त्याच्यावरही चिडते आणि त्यांची शब्दाशब्दी होते. ही त्यांची पहिली भेट. (हा प्रसंग गाॅन विथ द विंड या सिनेमातील आहे.) यानंतर तिच्या चार्ल्सशी लग्नानंतर अॅटलांटामधेही त्यांच्या वारंवार भेटी होतात. त्याने तिचा स्वभाव बरोबर ओळखलेलाअसतो आणि कधी तिच्या वागण्याबद्दल टाॅन्टींग करत तर कधी ती अडचणीत असताना तिला मदत करत तो तिच्या आयुष्याचा एक अपरिहार्य असा भागच होऊन जातो. आणि मग एका भयंकर घटनेत तिचा दुसरा नवरा फ्रॅन्क मारला जातो, त्यानंतर काही काळाने ते दोघं लग्न करतात. त्यांच्यामधील बदलत जाणाऱ्या नात्याचं आणि दोघांच्या मनातील उलघालीचं सुरेख वर्णन आपल्याला त्या काळात, त्यांच्याबरोबर घेऊन जातं.

दुसरीकडे अॅशली आणि मेलनी या जोडप्याची कथाही स्कार्लेट आणि ऱ्हेट यांच्या कथेला अस्तरासारखी जोडून पुढे जात रहाते. अगदी लहान वयातच, म्हणजे 17 व्या वर्षापासूनच स्कार्लेट अॅशलीच्या प्रेमात पडलेली असते,

पण ॲशली हा खानदानी आणि अगदी शांत स्वभावाचा असतो. त्याची वाचनाची आवड, ना अध्यात ना मध्यात असा स्वभाव या कशाशीच स्कार्लेट जुळवून घेऊ शकणार नाही याची कल्पना असल्यामुळे ॲशली तिच्या प्रेमात पडलेला असला तरी, त्याच्या कुटुंबियांनी ठरवून ठेवलेल्या मेलनीशी लग्न करतो. त्यामुळे भडकलेली स्कार्लेट मेलनीचा भाऊ चार्ल्स हॅमिल्टनशी लग्न करते.

स्कार्लेटची आई इलेन ही अतिशय दयाळू, न्यायाने वागणारी, मुलींनी नैतिकतेने वागावे असे संस्कार करणारी अशी अत्यंत सज्जन, शालीन अशी स्त्री दाखवली आहे. तिचा आणि तिच्या खालोखाल निग्रो दाई मॅमी हिचा धाक या तिन्ही बहिणींना असतो. त्याचप्रमाणे मेलनी ही सुद्धा शरीराने दुर्बळ पण मनाने अतिशय सशक्त, नैतिकतेने वागणारी, स्वभावाने अतिशय चांगली स्त्री दाखवली आहे.

या दोन्ही लग्नांनंतर एखाद्या महिन्यातच युद्धाला सुरुवात होते आणि आणखी एका महिन्यातच चार्ल्स मारला जातो. त्यानंतर ॲटलांटामधे युद्धाचा भडका उडतो आणि तिथे रहाणाऱ्या नागरिकांचे हाल सुरु होतात. या युद्धाचंही इतकं प्रत्ययकारी वर्णन लेखिकेनं केलेलं आहे, की जसं काही तिने स्वतः हे युद्ध प्रत्यक्ष बघितलेलं आहे! आपल्याला मात्र ते वाचवत नाही.

या काळात स्कार्लेट, चार्ल्सच्या ॲटलांटातील बंगल्यात मेलनी आणि चार्ल्स आणि मेलनीच्या आत्याबरोबर रहात असते. तिला एक मुलगाही होतो.

तरीही तिच्या मनातलं ॲशलीबद्दलचं प्रेम जराही कमी होत नाही. आणि त्याबरोबरच मेलनीबद्दलचा राग, आकस वाढतच जात असतो.

युद्धात दक्षिणेचा, म्हणजे निग्रो गुलाम असावेत हा पक्ष घेणाऱ्यांचा पाडाव होत असल्याच्या काळात एकदा ॲशली रजेवर येतो आणि तो येऊन गेल्यानंतर मेलनी आई होणार असल्याचं कळतं. स्कार्लेटचा मत्सराने अगदी संताप संताप होतो.

हळुहळू युद्धातील जखमी झालेले सैनिक ॲटलांटामधे दाखल होऊ लागतात. त्यांच्यासाठी हाॅस्पीटलची व्यवस्था करणे आणि स्त्रियांनी त्यांचे नर्सिंग करणे यात नागरिक व्यस्त होतात. पण युद्ध आता अगदी उंबरठ्याशी, म्हणता म्हणता शहरातच दाखल होते आणि बाॅम्बवर्षावात घरांची पडझड, शहरातल्या बिल्डिंग्ज जळणं आणि शत्रुसैन्याचा वावर या भितीदायक गोष्टींना तोंड द्यावं लागतं. शहरात इतकी रणधुमाळी सुरु होते की लोक शहर सोडून अंतर्भागात जाऊ लागतात. पण मेलनीच्या अशा नाजुक अवस्थेत तिला हलवणं अशक्य असल्यामुळे ती आणि स्कार्लेट तिथेच कशाबशा तगून रहात असतात.

मेलनीचा कितीही राग येत असला तरी स्कार्लेटनं ॲशलीला तिची काळजी घेईन असं वचन दिलेलं असतं. आणि याच वेळी तिकडे 'तारा' मधे तिची आई आणि दोघी धाकट्या बहिणी टायफॉईडशी झुंजत असतात. तिचा जीव तिकडे ओढ घेत असला तरी मेलनीला अशा अवस्थेत सोडून ती जाऊ शकत नाही. ॲटलांटातले डाॅक्टर मीड्स हाॅस्पीटलमधे सैनिकांच्या शुश्रुषेत बुडालेले असतात. नेमक्या शेजारच्या दोघी तिघी प्रौढ, अनुभवी स्त्रियाही घरं बंद करुन कुठेशी गेलेल्या असतात. यांच्या बाजूच्या सैनिकांच्या जखमी झुंडीच्या झुंडी त्याच दिवशी शहरातल्या हाॅस्पीटलमधे दाखल होत असतात. हारलेले, थकलेले सैनिक लढाई हरल्याच्या, शहर लवकरच शत्रू सैनिकांच्या ताब्यात जाण्याच्या बातम्या घेऊन आलेले.. हाॅस्पिटलमधल्या जखमी सैनिकांच्या शुश्रूषेत डाॅक्टरना मान वर करायला सुद्धा वेळ नाही, कोणी प्रौढ, अनुभवी स्त्रीसुद्धा मदतीला नाही.. अशा अवस्थेत केवळ एका निग्रो नोकराणीच्या मदतीने स्कार्लेट मेलनीचं अवघड बाळंतपण कसंबसं पार पाडते. मेलनी इतकी नाजुक, त्यात बाळंतपण अवघड, स्कार्लेट आणि निग्रो नोकराणी बाळंतपणाबद्दल पूर्णतः अनभिज्ञ! पण ते बाळंतपण सुखरुप पार पडून आई आणि बाळ पण सुखरुप रहातात.

यानंतर स्कार्लेटचं आयुष्य म्हणजे, एकापेक्षा एक अवघड परिक्षाच जणू! ॲटलांटा शहर म्हणजे शत्रुसैनिकांचाच तळ बनत चालल्याने ॲटलांटा सोडून तारा ला जाण्याशिवाय तिच्याकडे पर्याय नसतो. सगळे रेल्वे मार्ग शत्रुसैनिकांनी उखडून टाकलेले. त्यामुळे, ही ओली, अशक्त बाळंतीण, तिचं तान्हं बाळ, स्कार्लेटचा स्वतःचा मुलगा आणि हाताशी उरलेली एकुलती एक निग्रो मोलकरीण यांच्यासह एका घोडागाडीतून.. ही घोडागाडीही असंख्य अडचणींना तोंड देत ऱ्हेटच तिला मिळवून देतो... असंख्य अडचणींना तोंड देत ती कशीबशी तारा ला पोचते. तिथेही संकटांची मालिका तिची वाटच बघत असते. तिची आई वारलेली आणि वडील भ्रमिष्ट झालेले असतात. शेतीत काम करणारे सगळे निग्रो गुलाम निघून गेलेले असतात. शत्रु सैनिकांनी सगळी नासधूस, जाळपोळ केल्याने खाण्याचेही हाल होत असतात. अशा वेळी सर्व जबाबदारी आपल्या खांद्यांवर घेऊन विलक्षण कष्ट करुन ती ते घर चालवत रहाते.

तिथलं दारिद्र्य संपतच नाही, हे बघून एक दिवस ती काहितरी करायच्या निश्चयाने परत ॲटलांटाला निघून येते. आणि त्या काळात कधी कुठल्या स्त्रीने केली नसतील, अशी अवघड कामं करुन, इमारतीसाठी लागणाऱ्या लाकडांच्या दोन मिल्स स्वतःच्या कष्टांनी आणि हिकमतीने उभ्या करुन चालवू लागते आणि तारा मधे रहाणाऱ्या सर्वांचा उदरनिर्वाह चालवत असते. पण या काळात धाकट्या बहिणीचं ज्याच्यावर प्रेम असतं, आणि त्याचंही त्या बहिणीवर प्रेम असतं अशा फ्रॅन्ककडे बऱ्यापैकी पैसा आहे, हे कळल्यावर त्याला आपल्या मोहात पाडून, बहिणीबद्दल खोटंनाटं सांगून त्याच्याशी लग्न करते. शेवटी मात्र तिला ऱ्हेटशी लग्न केल्यावर आणि त्यांची लाडकी, सुंदर आणि अतिशय हुशार अशी मुलगी अगदी लहान वयातच गेल्यानंतर त्याच्या प्रेमाची जाणीव होते.

त्या दोघांच्याही मनातले विचार, आंदोलनं लेखिकेनं जणू, त्यांची अंतःकरणं सोलून, आतला गाभाच आपल्यापुढे मांडला आहे असं जाणवतं. अतिशय स्वार्थी अशा स्कार्लेटच्या स्वभावात, वागण्यात युद्धासारख्या भयंकर संकटाला तोंड देताना कशी स्थित्यंतरं होत जातात हे वाचून आपणही थक्क होतो.

एवढी मोठी कादंबरी, पण कुठेही कंटाळवाणी होत नाही. शेवटही आपल्याला हुरहूर लावून जातो! मात्र हे अमेरिकेच्या दक्षिण भागातले लोक, निग्रो गुलाम असावेत हा पक्ष घेऊन लढत असतात, त्यांच्याच दृष्टीकोनातून सर्व कादंबरी लिहिलेली आहे. परंतु कादंबरीच्या अवाढव्य परिघात मानवी वागणुकीची आणि परस्पर संबंधांची जी वीण गुंफली आहे, त्याला तोड नाही!

युद्धकाळात आणि नंतरच्या पुनर्बांधणीच्या काळात पूर्वीची संथ, आरामदायक जीवनपद्धती आणि जीवनमूल्येही कशी वाऱ्यावर उडून जातात हे दाखवणारं Gone With The Wind हे नावही कसं समर्पक आहे, हे जाणवतं! आपल्याला अमेरिकेचा इतिहास फारसा माहीत नसतो. यादवी युद्धाबद्दल आपण फक्त ऐकून असतो. या कादंबरीतून त्याचे अमेरिकन जनतेवर व मानसिकतेवर झालेले परिणाम व्यवस्थित कळतात. ही कादंबरी वाचून झाल्यानंतरही कित्येक दिवस मनावर तिचा परिणाम जाणवत रहातो. प्रत्येक पुस्तकप्रेमीने वाचायलाच हवी अशी ही कादंबरी आहे!

Gone With The Wind या कादंबरीला पुलित्झर 2 प्राईस मिळालेलं आहे आणि या कादंबरीचे आजवर अनेक भाषांमधे भाषांतर झालेले आहे. तसेच या कादंबरीवर याच नावाचा सिनेमा ही येऊन गेला. तोही जगभर नावाजला गेला.

**परिचय : सुश्री साधना प्रफुल्ल सराफ,** मो. 7709014058



## 79. कविता – बाजार नाही — सुश्री सुनंदा पाटील (गझलनंदा)



लेखणी माझी तशी अलवार नाही
थाटता आला तिला बाजार नाही

का बळीने वावरातच जीव द्यावा
पावसाने ठेवले घरदार नाही

वाट थोडी वाकडी दिसली मलाही
जायचे आहेच मी वळणार नाही

शस्त्र झालेल्या जिभांनी वार केले
कुंकवाने मज दिला आधार नाही

पांढऱ्या शब्दांस माझ्या का पुसावे
मांडला येथे कसा शृंगार नाही

हुंदक्यांच्या वाहते येथे पखाली
लागली डोळ्यास माझ्या धार नाही

का अपेक्षा वाढल्या मी गीत गावे
लेखणीच्या अंतरी गंधार नाही

अर्जुनाने शर्थ केली जिंकण्याची
सारथी पण कृष्ण आढळणार नाही

सांग रामाला नको सीतेस टाळू
जानकी येथे पुन्हा जळणार नाही

**सुश्री सुनंदा पाटील,** (गझलनंदा), मो. ८४२२०८९६६६

## ४०. कथा – सौदा – श्री सदानंद आंबेकर



नर्क चतुर्दशी ला सकाळी दहा वाजताच तुषार बाजारात पोहोचला। ऐन दिवाळी च्या दिवशी गर्दी खूप होऊन जाते नि वस्तुंचे भाव उगाच वाढलेले असतांत म्हणून आजंच सगळं घ्यायचं हा त्यानी विचार केला।

इतर वस्तु घेऊन झाल्या वर, मित्रमंडळी नि शेजारीं करिता मिठाई म्हणून त्यानी शहरातील प्रसिद्ध दुकान- राजस्थान स्वीटस् मधून मिठाई घेतली नि रस्त्या वर उभ्या हातठेल्या वर सुटे फुलं, हार, आंब्याची पानं वगैरे घ्यायला थांबला।

ठेले वाल्यानी सांगितले झेंडुची फुलं शंभर रुपये किलो ला येतील। तुषार नी भाव कमी करायला म्हंटल्यावर तो दुकानदार आधी नाही म्हणाला पण तुषार परत जाता पाहून तो ऐंशी रुपयात किलो द्यायला तयार झाला। फुलं, पानं यांचे एक शे तीस रुपये झालेत नि तुषार नि त्याला एक शंभर नि पन्नास च्या नोटा दिल्या। शिल्लक वीस रुपये दुकानदार परत करत असतांना त्याला आठवलं कि आत्ताच मिठाई च्या दुकानांत साढे पाच शे रुपये किलो ची मिठाई घेतली नि दहा रुपये सुध्दा कमी नाही झाले। हे आठवतांच त्यानी ठेलेवाल्या ला म्हंटलं - "दादा शिल्लक पैशे तुम्हीं राहू द्या"।

पार्किंग मधून स्कूटर काढत असतांना तिथे एक दहा बारा वर्षांचा मुलगा हातांत मातीच्या पणत्या घेऊन आला नि पंचवीस रुपयांत वीस दिवे तरी घ्या अशी विनवणी करू लागला। तुषार नि काही विचार करून वीस दिवे घेतले अन् घरी येऊन पोहोचला।

सामानाची पिशवी पत्नीला देतांच तिनं इतर सामाना सोबत फुलं आणि पणत्या पाहून विचारलं - "हे काय भावात आणले"? शंभर रुपये सांगताच ती म्हणाली- "तुम्हाला भाव करतांच येत नाही, महागात वस्तु घेऊन येता। अन् हे दिवे कशाला आणलेत, मी कालंच दारावर पंचवीस दिवे घेतलेत"। तुषार नी यावर काहीच उत्तर नाही दिले आणि तो आपल्या कामाला लागला।

दिवाळीच्या संध्याकाळी लक्ष्मी पूजन झाल्या वर घराच्या दारावर काल आणलेल्या फुलांची झालर आणि नवीन पणत्यां मधून येत असलेला निर्मळ प्रकाश बघून तुषार च्या चेहर्यावर एक वेगळा आनंद फुलला आणि त्याला वाटले काल आपण जास्त पैसे खर्चून महागाचा सौदा नाही केला। त्या ठेलेवाल्याच्या दिवाळी आनंदात आपण ही सहभागी झालो असं त्याला वाटलं।

**श्री सदानंद आंबेकर, म नं सी 149, सी सेक्टर, शाहपुरा भोपाल मप्र 462039 मो – 8755 756 163 E-mail : ambekar.sadanand@gmail.com**

## 81. कविता – पाळ तोच वारसा — श्री अशोक श्रीपाद भांबुरे



(चामर: गालगाल गालगाल गालगाल गालगा)

धावपळ नको करू इथेच थांब माणसा
सर्व राहते इथे नको करूस लालसा

रूप देखणे तरी अशांत चंद्र वाटतो
टाळतोय नेत्र धूर्त पाहतोय आरसा

मोह टाळ चादरीत मागतोस काय तू
ओंजळीत दान घे पुरेल एवढा पसा

वादळात का असे तुला उदास वाटते
दाखवून दे जगास तू कुठे असा तसा

दान धर्म पुण्य कर्म सागतात धर्म हे
त्यातलाच पंथ एक थोर होय खालसा

माणसास या इथे गुलाम तू करू नको
नेक काम कर असेच पाळ तोच वारसा

ठेच लागली म्हणून थांबणे नको इथे
वागणे असेच ठेव वाहतो झरा जसा

**श्री अशोक श्रीपाद भांबुरे,** धनकवडी, पुणे ४११ ०४३, ईमेल - ashokbhambure123@gmail.com
मो. ८१८००४२५०६, ९८२२८८२०२८

## ४२. कविता – दिव्या दिव्यांचा प्रकाश पडला — सौ. किरण ढवळे बावनकर



दिव्या दिव्यांचा प्रकाश पडला
घरों घरी....
दिवाळी चा सण आला कार्तिक मासी ||१||
तोरण सजले घरा घराच्या दारा वरी...

दिव्यांच्या प्रकाशात उजाळून निघाली
अमावस्येची रात्र सारी ||२||

अंगणा अंगणात सजली सुंदर रांगोळी...
पणत्या लावुनी करू
लक्ष्मी मातेच्या आगमनाची तयारी ||३||

फराळाचा सुगंध पसरला घरातुनी ....
गोड लाडूचा नैवेद्य दाखवून पुजू
लक्ष्मी मातेला आपण सारी||४||

गणेशाला वंदन करुनी,
पुजू लक्ष्मी मातेला प्रेमानी.....
सुख समृद्धी समाधान नांदू दे
हीच प्रार्थना करू मिळून सगळी||५||

**सौ.किरण ढवळे बावनकर**, मणीकोंडा, रंगा रेड्डी डिस्ट्रिक्ट, हैदराबाद, तेलंगाना

## 83. कविता – फराळ..! - श्री सुजित कदम



(दिवाळी निमित्त खास छोट्या दोस्तांसाठी.. बालकविता...!)

आई म्हंटली दिवाळीला
फराळ करू छान
फराळात चकलीला
देऊ पहिला मान..!

गोल गोल फिरताना
तिला येते चक्कर
पहिलं कोण खाणार
म्हणून घरात होते टक्कर..!

करंजीला मिळतो
फराळात दुसरा मान
चंद्रासारखी दिसते म्हणून
वाढे तिची शान..!

एकामागून एक करत
करंजी होते फस्त
फराळाच्या डब्यावर
आईची वाढे गस्त..!

साध्या भोळ्या शंकरपाळीला
मिळे तिसरा मान
मिळून सा-या एकत्र
गप्पा मारती छान...!

छोट्या छोट्या शंकरपाळ्या
लागतात मस्त गोड
दिसत असल्या छोट्या तरी
सर्वांची मोडतात खोड..!

बेसनाच्या लाडूला
मिळे चौथा मान
राग येतो त्याला
फुगवून बसतो गाल..!

खाता खाता लाडूचा
राग जातो पळून
बेसनाच्या लाडू साठी
मामा येतो दूरून..!

चटपटीत चिवड्याला
मिळे पाचवा मान
जरा तिखट कर
दादा काढे फरमान..!

खोडकर चिवडा कसा
मुद्दाम तिखटात लोळतो
खाता खाता दादाचे
नाक लाल करतो...!

दिवाळीच्या फराळाला
सारेच एकत्र  येऊ
थोडा थोडा फराळ आपण
मिळून सारे खाऊ..!

**श्री सुजित कदम**, पुणे, मो.. ७२७६२८२६२६

## ई-अभिव्यक्ती (मराठी) सम्पादक मंडळ








सौ. उज्ज्वला केळकर श्री सुहास रघुनाथ पंडित सुश्री मंजुषा सुनीत मुळे सौ. गौरी गाडेकर



डॉ. राधिका पवार बावनकर

संपादिका अंतरराष्ट्रीय साहित्य एवं संस्कृति




**'फ्लिपबुक' स्वरूपातला भारतातील पहिला आणि एकमेव दिवाळी विशेषांक**

**(या अंकातील विविध प्रकारच्या साहित्यात व्यक्त केले गेलेले विचार आणि मते यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)**

**(सर्वांसाठी एक नम्र निवेदन: संगणकाशी संबंधित काही अपरिहार्य अशा तांत्रिक त्रुटींमुळे/कारणांमुळे (उदा. लिखाणाचा font बदलणे) या अंकातील साहित्य प्रकाशित करतांना काही चुका... जसे की काही शब्द वेगवेगळे छापले असले तरी प्रत्यक्षात जोडले जाणे इ.... अंक वाचतांना खटकू शकतात. आणि त्याबद्दल आम्ही दिलगीर आहोत. पण अशा गोष्टी वाचक समजून घेतील ही अपेक्षा.)**